मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास


राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत


युगवाणी

७


॥ श्रीज्ञानेश्वर विशेषांक ॥

॥ डिसेंबर १९७५ – जानेवारी १९७६ ॥ मार्गशीर्ष – पौष शके १८९७





चांगदेव पासष्टीच्या संस्कृत – मराठी अनुवादाच्या जुन्या पोथीचे
पृष्ठ १ आणि पृष्ठ २४ (संपूर्ण पोथीचे मुद्रण याच अंकात अन्यत्र दिले आहे.)



अनुक्रमणिका

' महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ ' पुरस्कृत विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

डिसेंबर १९७५–जानेवारी १९७६

मार्गशीर्ष – पौष शके १८९७

श्रीज्ञानेश्वर विशेषांक

संपादक : मधुकर आष्टीकर

कार्यकारी संपादक वसंत खेरडीकर

युगवाणी

मूल्य पाच रुपये

वर्ष ३१ अंक ९–१०

॥ अथ संपादकीय ॥

ॐ नमोजी रसिका ! । श्रीसरस्वती प्रतीका !
ज्ञानदेवो विशेषाङ्का । सादर करी ॥
ममाल्पमतीचे वसे । अर्पितो जी धिवसे
भय चित्तीचे नसे । गुरुकृपे ॥
ज्ञानदेव गुणगणु । वर्णिता जाहला सणु
अजाणाचा नच अणु । उरतसे ॥
सप्तजन्मशताब्दिवर्षे । ज्ञानेश्वरी पीयूष वर्षे
जनमने बहरली हर्षे । आपसये ॥
गीतार्णवाचे मंथन । पावले हय्यंगवीन
ते परमतत्व गहन । ज्ञानेश्वरी ॥
परमार्थ तो सरलु । दाटलासे परिमलु
ज्ञानदेव तो दयालु । ज्ञानदाता ॥
तत्वार्थु आणि काव्यार्थु । सोनीया येतसे सुगंधु
इहामुत्रभोग विरागु । इये ग्रंथी ॥
या ग्रंथाचे परिसणे । तत्वसार उमजणे
पांडित्य होत सिहाणे । नवल देखा ॥
ऐसे सिहाणे पंडित । कवित्वी जे परतत्व
परतत्वी जे कवित्व । ते शोधिती ॥
शोधांचे हे सुवर्णमणी । सुविचारांची पर्वणी
कोंदणी जैसी हिरकणी । युगवाणी ॥
तरी न्यून ते पुरते । अधिक ते सरते
करोनि घेयावे हे तुमते । विनवितु असे ॥

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

याशिवाय कार्यवृत्त, अध्यक्षीय भाषण, साभार पोच इत्यादी.

मुखपृष्ठ : दि. के. मनोहर

ज्ञानदेवीचे पाठसंशोधन

श्री. ना. बनहट्टी

श्रीज्ञानदेवीच्या पाठसंशोधनाचा वृत्तान्त ६० वर्षाइतका जुना आहे. खरे म्हटले तर

पूर्वीच ग्रंथ अतिशुद्ध । परी पाठांतरी शुद्ध अबद्ध ।
तो शोधूनियां एवंविध । प्रतिशुद्ध सिद्ध ज्ञानेश्वरी ।।

अशी ग्वाही देणाऱ्या एकनाथांपासून हे पाठसंशोधन सुरू झाले आहे. त्यांनी आपली प्रतिशुद्ध ज्ञानेश्वरी शके १५०६ मध्ये, म्हणजे आजपासून ३८१ वर्षापूर्वी सिद्ध केली. पाठसंशोधनाचा इतिहास इतका जुना आहे. त्यानंतर या ग्रंथाची प्रत करणारे किंवा करविणारे आपआपल्या दृष्टिकोणानुसार पाठसंशोधन करीतच राहिले. एकनाथांनी ज्ञानेश्वरी प्रतिशुद्ध केली म्हणजे काय केले याविषयी तर्क करण्यात आले आहेत. पण तशा तर्कांची उजळणी इथे करीत बसण्याचे कारण नाही.

इंग्रजी अमलानंतर छापील आवृत्त्या काढण्यास सुरवात झाली. छापण्यासाठी हस्तलिखित पोथ्या लक्षपूर्वक पाहण्याचा प्रसंग आला तेव्हा हा ग्रंथ 'पाठांतरी शुद्ध अबद्ध' असल्याची जाणीव संपादकांना ('संपादक' हा शब्द त्यावेळी नव्हता.) झाली असणारच. पण त्यावरून पाठांतरांची तुलना करून त्यांत योग्यायोग्य ठरविण्याची प्रेरणा कोणास झाली असल्याचे दिसत नाही. एक कोणती तरी पोथी आधारार्थ घेऊन तदनुसार ग्रंथ छापून काढावयाचा, असेच बहुतेकांनी केलेले दिसते. काही थोड्या जणांनी इतके मात्र केले की आधारपोथीखेरीज इतर पोथ्यांमध्ये आढळलेले काही पाठभेद खाली दिले, शके १७६७ साली पहिलीच जी मुद्रित आवृत्ति शिळाछापावर पोथी स्वरूपात निघाली तिच्यात पाठांतरे दिली आहेत. त्यानंतर पाठभेद देणारी आवृत्ति अण्णा मोरेश्वर कुंटे यांची. ही शके १८१६ मध्ये प्रसिद्ध झाली. कुंटे विद्वान होते. त्यांनी वाग्भटासारखे संकृत ग्रंथ छापून काढले होते. ज्ञानेश्वरीतील पाठांतरांची जाणीव त्यांना होती. पण पाठसंशोधनाच्या उद्योगात ते पडले नाहीत; काही पाठभेद टीपांच्या स्वरूपात त्यांनी दिले. ते म्हणतात—

"ज्ञानेश्वरीच्या काही हस्तलिखित प्रती मिळाल्या त्यांवरून निघालेलीं पाठांतरें व अधिक ओव्या मिळाल्या त्या टीपांवर निरनिराळ्या स्वतंत्र देऊन पाठांतरेंहि दिलीं आहेत."

आधारसंहितेबरोबर इतर पोथ्यांतील काही पाठभेद दाखल करणे म्हणजे पाठसंशोधन नव्हे. अनेक पाठ उपलब्ध असता त्यांतील खरा कोणता याचा विचार करून तो स्वीकारणे आणि बाकीचे उपलब्ध पाठ त्यासोबत दाखल करणे म्हणजे पाठसंशोधन. असा पाठसंशोधनाचा पहिला प्रयत्न मुद्रणोत्तर काळात रामचंद्र विष्णु माडगांवकर यांनी केला. त्यांनी आपली 'पाठांतरांसहित शोधिलेली' ज्ञानदेवीची आवृत्ति १९०७ साली प्रसिद्ध केली. यापूर्वी दोन वर्षे तरी या त्यांच्या प्रयत्नास सुरवात झाली असली पाहिजे. म्हणून 'पाठसंशोधनाचा वृत्तान्त ६० वर्षाइतका जुना आहे' असे सुरवातीस म्हटले आहे.

ज्ञानदेवीच्या पोथ्यांमध्ये पाठांतरांचा 'ब्रह्म-घोटाळा' झाला आहे. याची प्रेरक जाणीव माडगांवकरांना झाली आहे आणि त्यातून सुटण्याचा मार्गही त्यांनी सांगितला आहे.—

"हल्लीच्या स्थितींत साध्य गोष्ट ही आहे की हस्तलिखित पोथ्या जमा करून पाठांचा भरणा वाढवावा, ग्रंथकारांच्या वेळेस शब्दांचीं मूळरूपें कोणतीं होतीं, विभक्तींचीं—काळांचीं वगैरे रूपें कोणतीं होतीं, शब्दांची जोडणी कशी होती, दृष्टान्त, उपमा, रूपकें कशीं होतीं या बाबींचा विवेचक बुद्धीने ग्रंथाचें सूक्ष्म रीतीनें अध्ययन करून निर्णय करावा."

पाठसंशोधनाच्या तुलनात्मक शास्त्रीय पद्धतीचे तत्त्व त्यांनी इथे बरोबर सांगितले आहे. पण त्या काळी मराठीचा भाषाशास्त्रीय अभ्यास सध्याच्या इतका प्रगत झालेला नव्हता. जेवढे भाषाशास्त्रीय

ज्ञान उपलभ्य होते तेवढ्याचा त्यांनी उपयोग करून घेतला असे दिसत नाही. बरेचसे प्राचीन मराठी शिलालेख व ताम्रपट आणि बहुतेक सगळे महानुभावीय वाङमय प्रसिद्ध झालेले नव्हते. ज्ञानदेवीच्या पुष्कळ महत्त्वाच्या जुन्या पोथ्यांची माहिती त्या वेळी उपलब्ध झालेली नव्हती. अशा अनेक कारणामुळे माडगावकरी आवृत्तीतील पाठसंशोधनाची उपयुक्तता आजच्या घटकेस फारशी राहिलेली नाही. भाषादृष्ट्या अधिक जुना आणि अर्थदृष्ट्या अधिक योग्य असा पाठ टीपेत आणि कमी जुना व तुलनेने अयोग्य असा पाठ मुख्य संहितेत, असे पुष्कळ ठिकाणी आढळते.

तथापि त्यांच्या कामगिरीचे नैतिक मूल्य फार मोठे आहे. त्यांनी हे काम पूर्ण निरपेक्षतेने, विषयनिष्ठेने आणि निर्लेप भावाने केले. प्रस्तुत विषयाच्या संबंधात या वृत्तीचे महत्त्व फार आहे.

यानंतर २ वर्षांनी, १९०९ साली, विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांनी आपली ज्ञानेश्वरी प्रसिद्ध केली. बीड शहरातील पाटांगण नावाच्या मठात त्यांना ज्ञानदेवीची जुनी प्रत मिळाली ती खुद्द ज्ञानदेवकालीन अस्सल प्रत म्हणून त्यांनी प्रसिद्ध केली. 'विवेकसिंधु' कर्ता जो प्रसिद्ध मुकुंदराज त्याने आपल्याकरिता लिहवून घेतलेली ज्ञानदेवीची प्रत ती हीच असा त्यांचा ग्रह झाला व तो त्यांनी आपल्या दीर्घ प्रस्तावनेत आग्रहपूर्वक मांडला. अभिमान आणि आग्रह यांचे मिश्रण त्यांच्या लेखनाला बाधल्याखेरीज राहिले नाही. उपलब्ध छापील प्रतींमध्ये सर्वांत अधिक प्राचीन पाठ देणारी ही प्रत आहे एवढाच दावा त्यांनी मांडिला असता तर बहुधा पुढील वाद व अनर्थ टळला असता.

राजवाड्यांनी सिद्धान्त म्हणून मांडिलेल्या मताची प्रतिक्रिया सुरू झाली. 'विविधज्ञानविस्तारा'-च्या ४२ व्या पुस्तकाच्या १ ल्या अंकात (जानेवारी १९११) शंकर बळवंत सहस्रबुद्धे यांचा "राजवाड्यांची ज्ञानेश्वरी" हा लेख प्रसिद्ध झाला. या आस्थेवाईक अभ्यासकाने मँचेस्टर (इंग्लंड) येथून हा लेख पाठविला होता. छापील प्रतींमध्ये राजवाड्यांचीच प्रत सर्वांत प्राचीन आहे हे त्यांनी मान्य केले आहे; पण ती ज्ञानेश्वरकालीन होय, हा राजवाड्यांचा सिद्धान्त खोडून काढला आहे. त्यांनी केलेला युक्तिवाद समर्पक व मार्मिक आहे. पण तो इथे अनुवादण्याचे कारण नाही. त्यानंतर राजवाडे प्रतीतील पाठांची चर्चा त्यांनी बऱ्याच विस्ताराने केली आहे. या चर्चेत तुलना करण्यासाठी त्यांनी दुसऱ्या एका हस्तलिखित प्रतीतील पाठ घेतले आहेत व बहुतेक ठिकाणी तेच खरे व योग्य पाठ असल्याचे दाखवून दिले आहे. शेवटी राजवाड्यांनी आपल्या आवृत्तीच्या शेवटी जो शब्दार्थकोश दिला आहे त्यातील अर्थाच्या चुकाही सहस्रबुद्धे यांनी दाखविल्या आहेत.

राजवाडे प्रतीशी तुळण्यासाठी जी पोथी सहस्रबुद्धे यांना मिळाली ती पुढे बऱ्याच महत्त्वाला चढली. तिजबद्दल सहस्रबुद्धे म्हणतात—

"प्रसिद्ध प्रकाशक रा. माडगांवकर यांना पाटांगणाच्या नवीन मठांत एक हस्तलिखित प्रत १९०६ साली मिळाली; ती प्रत व रा. राजवाडे यांची छापील प्रत ह्यांच्या तुलनात्मक अभ्यासावरून माडगांवकर यांच्या जवळ सध्या असलेली प्रत ज्यास्त 'अस्सल' व ज्ञानदेवकालीन होय अशी माझी खात्री झाली. ही खात्री महाराष्ट्रीयांना आधारांसह निवेदन करणे हा माझ्या लेखाचा मुख्य उद्देश आहे.

"शेवटीं, रा. माडगांवकरांनी त्यांच्या पोथीचा आधार घेऊन मला माझा लेख प्रसिद्ध करण्यास परवानगी दिली याबद्दल त्यांचे आभार मानतों.
मँचेस्टर, १ एप्रिल १९१० शंकर बळवंत सहस्रबुद्धे"

राजवाड्यांच्या प्रतीवर अशीच आणखीही टीका झाली. तिला क्रीडावृत्तीने तोंड न देता क्रुद्ध होऊन त्यांनी ज्या पोथीवरून आपली ज्ञानेश्वरी छापली ती पोथीच जाळून टाकली! मराठी साहित्यभांडाराची कल्पनातीत हानि झाली.

मला मिळालेली पोथी हीच अस्सल ज्ञानदेवकालीन ज्ञानदेवी हा ग्रह घट्ट धरून बसल्यामुळे राजवाड्यांच्या हातून पाठसंशोधन असे झालेच नाही. पण त्यांच्या लिखाणामुळे ऐतिहासिक दृष्टि आणि भाषाशास्त्रीय अभ्यास यांना प्रेरणा मिळाली; एतत्संबंधी सर्व प्रश्नांवर विचारमंथन सुरू झाले. राजवाड्यांनी प्रसिद्धिलेली ज्ञानदेवी खुद्द ज्ञानदेवकालीन नाही, तथापि तिची संहिता खूप जुनी आहे, भाषादृष्ट्या तिचे पाठ सर्वांत अधिक प्राचीन आहेत, ही गोष्ट प्रस्थापित झाली. त्याविषयी वाद घालणारा आता कोणी असेल किंवा यापुढे निघेल असे वाटत नाही.

अनुक्रमणिका

यानंतर पुष्कळ वर्षांनी, १९४७ साली, डॉ. रामकृष्ण गणेश हर्षे यांनी ज्ञानदेवीच्या 'चिकित्सक व भाषाशास्त्रीय' आवृत्तीचा पहिला अध्याय प्रसिद्ध केला. राजवाडे यांना जशी एक जुनी प्रत गवसली तशी हर्षे यांनाही दुसरी एक जुनी प्रत मिळाली. ती शके १२७२ मध्ये, म्हणजे ज्ञानदेवीच्या रचनेनंतर फक्त ६० वर्षांनी निर्माण झालेली आहे, अर्थात जवळ जवळ ज्ञानदेवकालीन आहे, असा त्यांचा ग्रह झाला व त्यांनी तिचा पहिला अध्याय प्रदीर्घ प्रस्तावनेसह छापून काढला.

मात्र त्यांनी राजवाड्यांप्रमाणे 'हम करे सो कायदा' अशी वृत्ति न अवलंबिता संहिताशोधनविषयक अनेक प्रश्नांचा ऊहापोह आपल्या प्रास्ताविक विवेचनात केला आणि त्याच्या आधारे आपल्याला मिळालेल्या 'सिद्धनाथ प्रती'चा प्राचीनपणा पटवून देण्याचा यत्न केला. राजवाडे यांच्या प्रतिपादनातील हेत्वाभास उघड करून त्यांची आधारप्रत ते म्हणतात त्यापेक्षा बरीच अलीकडची आहे असे दाखवून दिले. अभ्यासकांना अतिशय उपयुक्त ठरतील अशा आणखी अनेक महत्त्वाच्या गोष्टी त्यांनी केल्या. निरनिराळ्या ठिकाणाहून ज्ञानदेवीच्या २६ पोथ्या त्यांनी जमविल्या, त्यांचे तपशीलवार विवरण आपल्या प्रास्ताविक विवेचनात दाखल केले आणि या २६ हस्तलिखित प्रती व ४ छापील प्रति यांच्यामधले सर्व पाठभेद मूळ संहितेच्या खाली नमूद केले. मूळ छापिल्यानंतर 'पाठचर्चा' एका प्रकरणात नमूद केली व पुढे अनेक उपयुक्त परिशिष्टे व सूच्या तयार करून दिल्या. मात्र हे सर्व फक्त पहिल्या अध्यायापुरते झाले. म्हणजे एकंदर ज्ञानदेवीच्या मानाने पाहता हे फक्त तीन टक्के काम झाले. केवळ पहिल्या अध्यायाच्या संबंधाने पाहिल्यास त्यांची कामगिरी अजोड झाली आहे; शिवाय त्यांनी अनेक प्रश्नासंबंधी जे साधार व विद्वत्तापूर्ण विवेचन केले आहे व जी सामग्री मोठ्या परिश्रमांनी तयार करून दिली आहे ती एकूण ज्ञानदेवीच्या अभ्यासकास अत्यंत उपयुक्त ठरणारी आहे. अंधुक उजेडाच्या क्षेत्रात त्यांनी मोठ्या शक्तीचे प्रकाशझोत स्थापून ठेवले आहेत.

इतका पायाशुद्ध व शास्त्रशुद्ध प्रयत्न करूनसुद्धा डॉ. हर्षे यांची ख्याती मात्र जशी व्हावी तशी झाली नाही. इतरांना तुच्छ करून, आग्रही मते बेमुलाहिजा रीतीने मांडून आणि आपली आवृत्ति जिच्यावरून छापली ती पोथी नष्ट करून 'ज्ञानेश्वरी' बाबत विख्यात झाले ते राजवाडेच.

याचे एक कारण असे की डॉ. हर्षे यांना पंढरपूरचे श्री. विप्र यांच्याकडून जी ज्ञानदेवीची पोथी मिळाली, तिच्याविषयी ममत्व उत्पन्न होऊन ती पोथी सर्व ज्ञात पोथ्यांमध्ये आणि छापील आवृत्त्यांमध्ये प्राचीन, ज्ञानदेवांनंतर ६० वर्षांच्या आत लिहिली गेलेली, असे सिद्ध करण्याचा त्यांनी अनिवार खटाटोप केला. आपल्या मुलाचा पहिला नंबर यावा म्हणून त्याचे पालक नाना खटपटी करतात. हर्षे यांचे ममत्व त्या तोडीचे दिसते एकाचा अभिमान, दुसऱ्याचे ममत्व; परिणाम एकच. हर्षे यांना मिळालेल्या या विप्र प्रतीत शेवटी एकनाथी शोधनाच्या ओव्या नाहीत; तेव्हा ती एकनाथपूर्वकालीन किंवा एकनाथपूर्वकालीन प्रतीची नक्कल असावी, एवढे अनुमान सयुक्तिक दिसते. या पलीकडचा दावा करून त्याच्या समर्थनाकरिता जो प्रपंच त्यांनी केला आहे त्याने फार थोड्यांचे समाधान झाले असेल.

प्रस्तुत पोथीत लेखनाचा जो काल दिला आहे त्यातील शतं स्थानाचा आकडा उडून जाऊन ती जागा पांढरी झाली आहे. बाकी संवत्सर, वार, महिना, तिथि हे सर्व आहे. त्यावरून उल्लिखित शक १२७२ किंवा १५७२ असला पाहिजे. ग्रहलाघवकर्ता गणेश दैवज्ञ याने दिलेल्या अहर्गण साधनाने गणित करून तिथि आणि वार हे शक १२७२ ला जमतात, १५७२ ला जमत नाहीत, असे हर्ष्यांनी दाखविले आहे. यावर डॉ. वि. भि. कोलते यांनी 'महाराष्ट्र' पत्रात एक 'प्रदीर्घ' लेखमाला लिहिली; व गणिताच्या गहन प्रांतात अवगाहन करून पोथीत निर्देशिलेले तिथि, वार, महिना, शक १५७२ शीच अधिक जुळतात, शक १२७२ शी मुळीच जुळत नाहीत असे परिश्रमपूर्वक दाखवून दिले. हर्ष्यांच्या अतिदीर्घ प्रास्ताविक विवेचनात आणखीही 'गडबडगुंडा' व विसंगति असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. इतरत्रही हर्ष्यांच्यावर टीका झाली. या पोथीचा लेखक जो सिद्धनाथ त्याच्यात आणि ज्ञानदेवशिष्य सच्चिदानंद याच्यामध्ये फक्त तीन पिढ्यांचे अंतर असल्याचे सिद्ध करण्याचा हर्ष्यांनी प्रयत्न केला आहे, त्यातही त्यांना अपयश आले आहे.

जुन्या पोथ्यांचे लेखक आणि लेखनकाल यांच्यामध्ये बहुधा असे काही घोटाळे असतात. त्यांच्या मागे

लागणाऱ्या संशोधकाला भवचक्रात सापडलेल्या प्राण्या-प्रमाणे गिरक्या खाण्याचा प्रसंग येतो. भाषेचा पुरावाच अखेर तारणहार ठरतो. त्यातही धोके आहेत; पण योग्य सावधगिरी घेतल्यास, स्थूलमानाने का होईना, तो पौर्वापर्य दाखवून देतो. हर्ष्यांनी छापिलेली (फक्त १ ला अध्याय) विप्र प्रत पुष्कळ जुनी व चांगले पाठ देणारी आहे. पण तिच्यातील भाषेचे स्वरूप राजवाडे प्रतीतील भाषेच्या स्वरूपापेक्षा अलीकडचे आहे. राजवाडे प्रतीतील तेया, तेयाचि, तेयाचे, तेयासि, तेयापासौनि तयाहीहूनि इ. रूपे तया, तयाचि, तयासि, तयापासौनि, तेयाहीहूनि या विप्रप्रतीतील रूपांपेक्षा निःसंशय पूर्वीची होत. हर्ष्यांनीच दिलेला शिलालेख ताम्रपटांतील मराठी शब्दसंग्रह पाहिल्यास हे दिसून येईल. तो याचे तया असे सामान्यरूप राजवाडे प्रतीत (अ. १) एकदाही आलेले दिसत नाही; उलट विप्र प्रतीत (अ० १) तेया असे सामान्यरूप एकदाही नाही. (हर्षे आवृत्तीतील पदसूचि पहा.) युद्ध याचे जूझ (निरनुस्वार) हे रूप पूर्वीचे व जुंझ (सानुस्वार) हे रूप त्यानंतरचे. राजवाडे प्रतीत पहिले आहे व विप्र प्रतीत दुसरे. मराठीच्या भाषिक विकासाची मोडणी ज्याला थोडीबहुत माहीत आहे त्याला हे पौर्वापर्य मान्य होण्यास अडचण पडू नये.

राजवाडे आणि विप्र या दोन्ही प्रतीच्या योग्यायोग्यतेसंबंधीच्या अधिक तपशिलात येथे शिरण्याचे कारण नाही. वर फक्त निष्कर्ष निवेदिले; कारण प्रतींचा सरसनिरसपणा ठरविणे हा आपला उद्देश नाही. यासंबंधात आतापर्यंत जे लेखन झाले त्यावरून कोणतीही एक प्रत आपणाला सर्वस्वी योग्यतम पाठ देत नाही हे स्पष्ट झाले आहे. राजवाडे प्रतीतही अनेक दोष व अपपाठ आहेत हे अनेक व्यासंगी व अधिकारी लेखकांनी दाखवून दिले आहे. डॉ. शं. दा. पेंडसे यांनी आपल्या 'श्रीज्ञानेश्वरांचें तत्त्वज्ञान' या ग्रंथाच्या दुसऱ्या प्रकरणात राजवाडे प्रतीच्या १० ते १८ अध्यायात आलेल्या १०४ अपपाठांची यादी दिली आहे. मामासाहेब दांडेकर यांनी आपल्या अधिकारानुरूप सडेतोड शब्दांत राजवाड्यांची हजेरी घेतली असून त्यांच्या प्रतीतील प्रमादस्थळे दाखविली आहेत. (सार्थ ज्ञानेश्वरी, प्रस्तावना, पाने, २५ – ३२)

पाठसंशोधनाच्या संबंधात आणखी एका महत्त्वाच्या प्रयत्नाचा इथे उल्लेख केला पाहिजे. नगरच्या व्यासंगी मंडळींनी 'ज्ञानेश्वरदर्शन' या ग्रंथाचे दोन खंड प्रसिद्ध केल्यानंतर खुद्द ज्ञानदेवीची पाठचिकित्सा व अर्थनिश्चिति करण्याची प्रेरणा त्यांना झाली. लगेच शक १८५६ मध्ये त्यांनी 'ज्ञानेश्वरी चर्चा मंडळ' या नावाने कामाला आरंभ केला. ज्ञानदेवीच्या तेरा चौदा चांगल्या ह. लि. प्रती पाठनिश्चयासाठी त्यांनी जमविल्या. त्यात माडगांवकरांना मिळालेल्या (शं. ब. सहस्रबुद्धे यांनी उल्लेखिलेल्या) प्राचीन प्रतीची तेल्या कागदावर केलेली अस्सलबरहुकूम नक्कल (प्रा. न. र. फाटक यांजकडून मिळविलेली) हीही एक होती. "वर उल्लेखिलेल्या हस्तलिखित प्रति आणि आजवर छापलेल्या सर्व प्रति मिळवून पाठ निश्चित करण्याच्या प्रयत्नास आम्ही लागलों. अनेक पाठभेदांमुळे कधीं कधीं अडचण वाटे. अर्थ न उमगल्यामुळे कित्येक पाठ बदलले असल्याचे दिसून आलें. कित्येक सांप्रदाय बुजविण्याकरितां किंवा स्वतःच्या सांप्रदायास जुळविण्याकरितां.... अस्तित्वांत आले आहेत. तसेंच शब्दाच्या रूपांत फारच फरक पडलेले दिसले. त्यामुळें पाठचिकित्सेचें काम विशेष कठिण झालें. अशा स्थितींत जुन्या प्रतींवर विशेष भर देणें क्रमप्राप्त होऊन त्या प्रतींतील पाठांना प्रत्यंतर मिळाल्यावर पाठांचा निश्चितपणा कायम करण्यात आला." याप्रमाणे ज्ञानेश्वरी चर्चा मंडळाच्या कार्याचे विवरण कै. त्र्यं. गं. घनेश्वर यांनी केले आहे. अशा रीतीने हे कार्य १८ वर्षे चालून शके १८७५ मध्ये या मंडळाने तयार केलेल्या 'पाठशुद्ध आवृत्ती 'चे ९ अध्याय प्रसिद्ध झाले.

हे छापलेले ९ अध्याय पाहता पाठलेखनाच्या दृष्टीने समाधानकारक योजना झालेली दिसत नाही. स्वीकारलेले पाठ कोणत्या ह. लि. प्रतीतील आहेत याचा कोठे खुलासा केलेला नाही. पाठभेद फार थोडे दिले आहेत व ते समासात दिले असून कोणता पाठ कोणत्या प्रतीतला याचा निर्देश केलेला नाही. सहाव्या अध्यायापासून पुढे पाठभेदांचे प्रमाण आणखी कमी झाले आहे, ते फार क्वचित आणि अर्थबोधक टीपांतच दिले आहेत. या आवृत्तीचा सर्व भर नाथपंथीय गूढ व सांकेतिक अर्थ देण्यावर दिसतो. त्या दृष्टीने तिचे महत्त्व मोठे आहे. प्रस्तावनेमध्ये जरी निरनिराळ्या ह. लि. प्रतींची आणि त्यावरून करावयाच्या पाठचिकित्सेची चर्चा पुष्कळ विस्ताराने केली असली तरी प्रत्यक्ष ज्ञानदेवीसंहितेच्या मुद्रणात तिचा परिणाम उमटलेला दिसत नाही.

त्यानंतर अलीकडचा (इ. स. १९६०) प्रयत्न म्हणजे सरकारने नेमलेल्या समितीने काढिलेली राजवाडे ज्ञानेश्वरीची सुधारलेली आवृत्ति. विविधज्ञानविस्तारात लिहिणारे श्री. सहस्रबुद्धे यांनी माडगांवकरांना मिळालेल्या ज्या पाटांगण प्रतीचा उल्लेख केला त्या प्राचीन प्रतीची नक्कल श्री. न. र. फाटक यांच्याकडून प्रस्तुत समितीला मिळाली. त्याच तोलाच्या आणखी काही पोथ्या समितीने जमविल्या. या सर्वांच्या साहाय्याने ही आवृत्ति काढण्यात आली. प्रस्तावनेत या आवृत्तीच्या तयारीचे जे वर्णन दिले आहे त्यावरून समितीने पाठसंशोधन असे काही केले नसून राजवाडे संहितेत इतर प्रतींच्या आधारे काही तांत्रिक बदल केले आहेत आणि काही पाठभेद टीपेत दिले आहेत.

आतापर्यंत झालेल्या प्रयत्नांचा जो इतिहास सांगितला तो त्या त्या प्रयत्नकर्त्यांचे उणे काढण्याकरिता नव्हे. सर्वांचे काम उपयुक्त झाले आहे. पाठसंशोधन व्हावयाचे मात्र बाकी आहे. पाठसंशोधनाच्या निर्लेप भूमिकेवरून केलेला खराखुरा प्रयत्न माडगांवकरांचा. पण मागे सांगितलेल्या कारणांस्तव तो तोकडा ठरला. राजवाड्यांनी आपली पोथी खुद्द ज्ञानदेवांच्या काळची असा दावा मांडल्यामुळे पाठसंशोधनाची प्रेरणाच हतबल झाली. संशोधकीय अंधविश्वास ज्याला म्हणता येईल असा भाव चिकित्सक म्हणविणाऱ्या विद्वानांमध्ये बळावला. एकीकडे सांप्रदायिक श्रद्धा, तर दुसरीकडे चिकित्सकांचा अंधविश्वास अशा दोन दडपणांनी संशोधनकार्य गुदमरून गेले. पुढे व्यासंग वाढला, अनेक मूल्यवान जुन्या प्रती उजेडात येऊ लागल्या, तशी राजवाडे प्रतीची असमाधानकारकता स्पष्ट होऊ लागली. इतर कित्येक प्रती अधिक चांगले पाठ देऊ शकतात असे प्रत्ययास येऊ लागले. मागे डॉ. पेंडसे आणि मामासाहेब दांडेकर यांनी यासंबंधात केलेल्या विवेचनाचा दाखला दिला आहे. शिवाय प्रस्तुत लेखकाने केलेल्या पहिल्या अध्यायाच्या 'भीमातोपणी व्याख्ये'मध्ये ईभ १७.२, द्वैताद्वैतनिकुंभ १७.२, कलूं ६६.२, सैन्यें सिंधु ९५.३, कृतांतु आंकणा घातला २००.२ यांवरील टीपा पाहिल्यास राजवाडे प्रतीतील पाठ चुकीचे असणे, ही गोष्ट अपवादात्मक नाही, हे दिसून येईल. भाषेच्या दृष्टीने रा. प्रतीची संहिता सर्वांत अधिक जुनी आहे हे सामान्यतः खरे असले तरी तिचा लेखक कित्येक ठिकाणी चुकीची वा नंतरची शब्दरूपेही देतो असे प्रत्ययास येते.

तेव्हा रा. प्रत आपणाला योग्यतम पाठ सर्वत्र देऊ शकत नाही, ही गोष्ट आता शाबीत झाली आहे. इतर मुद्रित प्रतींची प्रतवारी तिच्याही खाली. ज्या जुन्या महत्त्वाच्या हस्तलिखित प्रती आता माहीत झाल्या आहेत त्यांच्यापैकी कोणतीही एक प्रत ज्ञानदेवरचित मूलसंहितेच्या निकट आपणास नेऊन सोडील असे दिसत नाही. ज्ञानदेवांच्या काळापासून केवळ ६० वर्षांच्या अवधीत लिहिलेली म्हणून जिचा डॉ. हर्षे यांनी अभिनिवेश बाळगिला तिचा प्रसिद्धिलेला पहिला अध्याय कितपत जुना व विश्वसनीय ठरतो हे मागे सांगितलेच आहे. सर्व विवेचनाचा निष्कर्ष हा, की कोणतीही एक हस्तलिखित वा मुद्रित प्रत आपणाला सर्वत्र योग्यतम पाठ देऊ शकत नाही.

तेव्हा एकच मार्ग उरतो. सर्व महत्त्वाच्या हस्तलिखित व मुद्रित प्रती जमा करून सर्व पाठांची सर्व दृष्टींनी एकमेकांशी तुलना करून योग्यतम पाठांची ज्ञानदेवी संहिता तयार करणे. असे करताना एकनाथपूर्वकालीन व एकनाथोत्तरकालीन असे भिंत घालून दोन विभाग करण्याचे देखील कारण नाही. एकनाथोत्तरकालीन पोथ्यांमध्येही संदर्भ, अर्थ इ० दृष्टींनी सुयोग्य पाठ मिळू शकतील. अशा रीतीने महत्त्वाच्या प्रतींचा वृहत् संचय केल्यानंतर आजवर विकसित झालेल्या भाषाशास्त्राची, समाजशास्त्राची, मानसशास्त्राची तत्वज्ञानाची आणि पाठसंशोधनविद्येची मदत घेऊन तौलनिक आणि ऐतिहासिक पद्धतीचा उपयोग करून निर्लेप बुद्धीने पाठनिश्चिति केल्यास सांप्रतकाळची 'प्रतिशुद्ध सिद्ध ज्ञानेश्वरी' आपणास मिळू शकेल. ती ज्ञानदेवांच्या मूळ ज्ञानदेवीच्या सर्वात अधिक जवळ आपणास नेऊ शकेल. हा उद्योग मोठा आहे. त्यापासून होणारा लाभही मोठा असेल.

या पद्धतीवर एक आक्षेप घेण्यात येतो. अनेक प्रतींतून पाठांची निवड करून तुम्ही एक स्वतःची संहिता तयार करणार; इतर हस्तलिखित प्रतींच्या संहिता आहेत त्यात तुमच्या एका संहितेची भर पडणार. ज्ञानदेवांची ज्ञानदेवी अशा प्रयत्नातून मिळणारच नाही. कोणाला तुमचे पाठ पटतील, कोणाला नाही. अनेकांच्या गलबल्यात तुमच्या आणखी एका आवाजाची भर पडेल एवढेच.

या आक्षेपात तथ्य आहे, पण ते फार थोडे. मानवाचे ज्ञान दिवसेंदिवस प्रगत होत आहे. तुलनात्मक आणि ऐतिहासिक दृष्टींमुळे पुष्कळ अज्ञात गोष्टींवर प्रकाश पडू शकतो. भाषाशास्त्रीय ज्ञानाच्या प्रगतीमुळे

अनुक्रमणिका

कोणते शब्द, कोणती शब्दरूपे पूर्वीची, कोणती अली-कडची हे आपण बऱ्याच विश्वासाने सांगू शकतो, नाथपंथाचे ग्रंथ, काश्मीरी प्रत्यभिज्ञा दर्शन, शंकर–रामानुजांची अद्वैत विशिष्टाद्वैत दर्शने, खुद्द ज्ञानदेवांची तत्त्वज्ञानविषयक वचने या सर्वांच्या यथोचित तुलनेने आपण ज्ञानदेवांच्या तात्त्विक उद्गारांमधील पाठभेदांत बराचसा संभवनीय निर्णय करू शकतो. पुष्कळ वेळा निरनिराळ्या पोथ्यांमधील पाठांच्या तुलनेतच बरोबर पाठ कोणता हे ओळखण्याच्या खुणा आपणाला सापडू शकतात. पाठसंशोधनविद्या यातूनच विकसित झाली आहे. आतापर्यंत विकसित झालेल्या सर्व ज्ञानाचा व विवेचनशक्तीचा उपयोग पाठसंशोधनाच्या कामी न करणे म्हणजे मानव चंद्रावर स्वारी करण्याच्या तयारीत असता आपण पंगुपणाचा आश्रय करणे होय. चष्मे वापरून जड इंद्रियांची दृष्टि सुधारायची, प्रचंड शक्तीच्या दुर्बिणी सिद्ध करून अंतराळात नवनवीन तारकापुंज शोधायचे आणि मानवीय शास्त्रांच्या प्रगतीने 'जैसें डोलेयां अंजन भेटे। तेव्हलि दृष्टीसि पाटा फुटे।' अशी अवस्था प्राप्त झाली असता तिचा मात्र सत्याच्या जवळ जाण्यासाठी उपयोग करायचा नाही. हा आग्रह का असावा ?

असा पाठसंशोधनाचा प्रचंड शास्त्रशुद्ध प्रयत्न ग्रंथाच्या बाबतीत यशस्वी झालेला आपल्या डोळ्यांसमोर आहे. महाभारताची शास्त्रशुद्ध पाठसंशोधित आवृत्ति निघावी ही कल्पना डॉ. वि. सी. सुकथनकर यांना सुमारे ४५ वर्षांपूर्वी स्फुरली. त्यावेळी विख्यात विद्वान भारताचार्य चिं. वि. वैद्य यांनी वर उल्लेखिला तशाच स्वरूपाचा आक्षेप त्यावर काढला होता. पण सुकथन-करांनी आपल्या प्रतिभाबलाने या कार्याचा पाया रचिला, त्याची उभारणी केली. त्याचे भव्य फल निष्पन्न झालेले आज आपण पाहत आहो. ते जगभर विद्वन्मान्य झाले आहे. कोणी असे म्हणत नाही की भारताच्या मुंबई, कलकत्ता, मद्रास या आवृत्त्या पूर्वी होत्या त्यात ही पुणेकर (भांडारकर) आवृत्ति आणखी एक येऊन बसली; काय फायदा झाला त्यापासून ? विनोबांनी म्हटल्याप्रमाणे 'ह्यापासून फायदा काय ?' असा प्रश्न विचारणारे अंतिम प्रश्नापासून एकच पायरी मागे असतात. 'फायद्यापासून फायदा काय ?' हा प्रश्न ते कधी विचारीत नाहीत.

पाठसंशोधन हा सत्याच्या जवळ जाण्याचा एक विनम्र प्रयत्न होय. यात कोणताही अभिनिवेश नसावा. निर्मम भावनेने आणि निर्लेपपणाने हा प्रयत्न झाला तरच तो यशस्वी होईल. त्यासाठी जुन्या विश्वसनीय प्रतींचा आणखीही शोध व्हावा. पाठनिश्चितीच्या संबंधात ऐतिहासिक व तुलनात्मक पद्धतींनी विचार करू शकणाऱ्या विद्वानांचे मनःपूर्वक साहाय्य मिळावे. या प्रयत्नातून ज्ञानदेवांची मूळ ज्ञानदेवी कानामात्रा अनुस्वारासह जशीच्या तशी आपणास मिळणार नाही. पण योग्यतम पाठ निश्चित होऊन ज्ञानदेवीची सर्वांत अधिक समाधानकारक प्रत सिद्ध होईल, एवढे मान्य होण्यास हरकत असू नये.

[*श्री. श्यामकान्त बनहट्टी, नागपूर यांच्या सौजन्याने*]

चक्रधर आणि ज्ञानेश्वर

नरेश कवडी

'रविवार – लोकसत्ते'च्या १० फेब्रुवारी १९७४ च्या अंकात डॉ. वि. भि. कोलते यांची एक विस्तृत मुलाखत प्रसिद्ध झालेली आहे. तीत डॉ. कोलते म्हणतात "चक्रधरांचे (मातंगाच्या हातचा लाडू खाणे) हे एकच कार्य लक्षात घेता 'मातंगाचे सदन टाळले पाहिजे' असे सांगणाऱ्या ज्ञानेश्वरांना मी कदापी क्रांतिकारक म्हणणार नाही."

मातंगाचे सदन टाळले पाहिजे असे ज्ञानेश्वरांनी कुठे सांगितले आहे? ज्या ओवीतून हे विधान डॉ. कोलते यांनी उचलले आहे ती ओवी तामसज्ञानाच्या चर्चेत आलेली आहे. तामसज्ञानाचे नावही घेऊ नये असे श्रोत्यांच्या मनावर बिंबवण्यासाठी ज्ञानेश्वर म्हणतात :

आतां तामसाचेंही लिंग । सांगेन तें वोळख चांग ।
डावलावया मातंग – । सदन जैसे ॥ १८.५४८

म्हणजे, एखादी गोष्ट टाळायची असेल तरी तिचे नाव घ्यावे लागते तसे आपण तामसज्ञानाचे नाव घेतले, पण वस्तुतः ते कटाक्षाने टाळले पाहिजे. या भावस्पष्टीकरणार्थ ज्ञानेश्वरांनी मातंगसदनाचा दाखला दिला आहे. अस्पृश्यता हा काही इथे प्रस्तुत विषय नाही. (तसा तो गीतेत किंवा ज्ञानेश्वरीत कुठेच नाही.) त्या काळात सर्वांना सहज समजण्यासारखा हा दाखला असल्याने ज्ञानेश्वरांनी तो वापरला. आपल्या आचार-धर्मातील विधिनिषेध सांगणे हा हेतू असला तरी ती निषिद्ध गोष्ट तामसज्ञान ही आहे. मातंगसदन नाही. कितीतरी सामाजिक – सांस्कृतिक संकेत नष्ट झाल्या-वरही आपण त्यांच्यावर आधारलेले वाक्प्रचार वापरीत राहतो. याचा अर्थ ते संकेत आपणास मान्य आहेत किंवा त्यांचे पुनरुज्जीवन करावयाचे आहे असा घेता येईल काय? दुसरी गोष्ट : तामसज्ञान कटाक्षाने टाळा असे सांगितल्यावर, भेदाभेद पाळा असे म्हणणे हे मूळ प्रमेयाचाच पराभव करणारे ठरेल हे ज्ञानेश्वरांना कळत नसेल काय? त्यातून ज्ञानेश्वरी हे काव्यरूप तत्त्वज्ञान आहे. चक्रवाक, चकोर, चातक वगैरेसारखे काव्यसंकेत आपण वापरतो तेव्हा शास्त्रीय दृष्टयाही ते सत्य आहेत असे आपण मानत नाही. केवळ प्रतिपाद्य विषयाच्या स्पष्टीकरणासाठी आपण त्यांचा वापर करतो. तोच प्रकार मातंगसदनाच्या दृष्टांताचा म्हटला पाहिजे.

ज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान मूलतः समतेचे, अमंगल भेदाभेद नष्ट करणारे आहे ही गोष्ट इतकी निःसंदिग्ध आहे की केवळ भावस्पष्टीकरणार्थ वापरलेल्या दृष्टां-तांचा आधार घेऊन ते अन्यथा ठरवता येणार नाही. चक्रधरांच्या बाबतीत स्वतः डॉ. कोलते असे करतही नाहीत. तेलीणीजवळ झोपण्याच्या वगैरे 'अजब आणि विलक्षण' आख्यायिका चक्रधरांच्या चरित्रात आहेत त्या लक्षात घेऊनही, "चक्रधरस्वामी हे निर्दोष आणि चारित्र्यवान होते असेच माझे मत आहे." असे डॉ.कोलते म्हणतात ते कशाच्या आधारावर? चक्रधरांचे एकंदर चरित्र, त्यांचे प्रत्यक्ष तत्त्वप्रतिपादन, इतर आचार हे लक्षात घेऊनच ना? मग ज्ञानेश्वरांच्या बाबतीतही हाच न्याय का नाही? ज्ञानेश्वरांच्या नव्हे, तर त्या काळातील सामाजिक आचाराविचारावर प्रकाश टाक-णारा हा दाखला आहे एवढेच म्हणता येईल. तो ज्ञानेश्वरांना मान्य होता असे म्हणण्यापूर्वी इतर सर्व पुराव्यांचा विचार केला पाहिजे.

"वारकरी संप्रदाय आपल्या मूळ ध्येयधोरणा-पासून फार दूर गेला आहे." असाही आक्षेप डॉ. कोलते घेतात. या संप्रदायाच्या ज्ञानेश्वरांसारख्या अध्वर्यूंना प्रारंभापासूनच जातिव्यवस्था व श्रेष्ठकनिष्ठता मान्य होती असे सुचवल्यावर मग या आक्षेपात तरी काय अर्थ उरतो? खरे म्हणजे, हा आक्षेप त्यांनी महानुभाव पंथावरच घ्यायला हवा. कारण स्वतः चक्रधरांनी मातंगाच्या हातचा लाडू खाऊन आणि सर्व वर्णांच्या लोकांकडे भिक्षेला जा असा पंथीयांना आदेश देऊन जातिव्यवस्थेला धक्का दिलेला असताही

आज त्या पंथात अस्पृष्यता शिरली आहे अशी माहिती डॉ. कोलतेच देतात. फक्त मराठीचा आग्रह धरणाऱ्या चक्रधरांचेच नाव देऊन महानुभाव पंथ संस्कृत महाविद्यालय चालवतो. आपल्या अधिवेशनाचा प्रारंभ गीतापठनाने करतो. (पाहा : 'महानुभाव', जाने. १९७८) 'कन्नड देशा, तेलंग देशा न वचावे' हा चक्रधरांचा आदेश आज महानुभावपंथीय पाळतात काय? या सर्व गोष्टींकडे उचित विवेकवादाने पाहणाऱ्या डॉ. कोलत्यांना ज्ञानेश्वरांचा हा दृष्टांत इतका आक्षेपार्ह आणि त्यांच्या सर्व तत्त्वज्ञानाचे मोल कमी करणारा कसा वाटतो? शिवाय, आपल्या मूळ ध्येयधोरणापासून दूर गेला नाही असा एक तरी पंथ किंवा धर्म, राजकीय – सामाजिक संघटना जगात तरी सापडेल काय? मग वारकरी पंथावरच खास आक्षेप कशाला?

अशा दृष्टांतांमुळे डॉ. कोलते ज्ञानेश्वरांना क्रांतिकारक म्हणण्यास तयार नाहीत. सर्व दुष्ट, अन्याय्य भेदाभेदांचे मूळ उगमस्थान असलेले मानवी मनच समूळ बदलले पाहिजे असे आग्रहपूर्वक प्रतिपादन करणे हे क्रांतिकार्य नसेल, आणि मातंगाच्या हातचा लाडू खाणे हे मात्र क्रांतिकार्य असेल तर आज अक्षरशः लक्षावधी क्रांतिकारक समाजात आहेत. मग 'क्रांतिकार्य' का दृष्टीला पडत नाही? उलट, शेकडो वर्षे ज्या संप्रदायाने कटाक्षाने अस्पृश्यता दूर ठेवली त्या संप्रदायातही अस्पृश्यता का शिरली?

ज्ञानेश्वरांनी चक्रधरांप्रमाणे अतिशूद्राच्या हातचे खाण्याचे उदाहरण का घालून दिले नाही असा प्रश्न उपस्थित करण्यापूर्वी त्या दोघांच्या भूमिकांतली भिन्नता लक्षात घेतली पाहिजे. चक्रधर हे एका संप्रदायाचे संस्थापक – नेते होते. त्यांनी आपले शिष्य तयार केले होते. मठ स्थापन केले होते. ज्ञानेश्वरांचे तसे काहीही नव्हते. क्रांतिकारक तत्त्वज्ञान प्रस्थापित करणे हीच एक त्यांची बंडखोर भूमिका होती. प्रत्येक लहानसहान गोष्ट उदाहरणाने आपल्या अनुयायांना शिकवण्याची जबाबदारी किंवा आवश्यकता पुढाऱ्याला असते तशी आणि तितक्या प्रमाणात क्रांतिकारकाला नसते. शिवाय, या एका विशिष्ट आचारापुरते बोलायचे तर ज्ञानेश्वरांची परिस्थिती विलक्षणच होती. तत्कालीन समाजाने त्यांचे ब्राह्मणत्वच हिरावून घेतलेले होते. असे वाळीत पडलेले ज्ञानेश्वर अतिशूद्राकडे जेवले असते तरी ते त्यावेळी क्रांतिकार्य ठरले नसते किंवा समाजावर त्याचा काही परिणामही झाला नसता.

या दोन महापुरुषांच्या भूमिकांतली ही भिन्नता आणि त्यांची वैशिष्ट्ये लक्षात घेतली असती तर डॉ. कोलते यांनी आणखी एक विधान केले नसते. ते म्हणतात: "महाराष्ट्र व मराठी भाषा याबद्दल इतका आदर व स्वाभिमान (चक्रधरांशिवाय) दुसऱ्या कोणत्याच संताने दाखविला नाही." याचे कारणही चक्रधरांच्या विशिष्ट भूमिकेत व परिस्थितीतच आहे. चक्रधर मूळ गुजरातचे. महाराष्ट्रात येऊन त्यांनी संप्रदाय स्थापन केला. तेव्हा आपली मूळ भूमी सोडून आपण का आलो याविषयी लोकांच्या मनात थोडीही शंका राहू देणे त्यांना त्यांच्या कार्याच्या दृष्टीने अडचणीचे ठरणारे होते. शिवाय, जननीपेक्षा खुषीच्या दत्तक आईबद्दलचा अभिमान अधिक बोलका असणे हे स्वाभाविकच आहे. इतर मराठी संतांना त्याची काय आवश्यकता?

सर्व तपशिलासह धार्मिक – सामाजिक जुनी चौकट प्रत्यक्ष मोडून दाखवण्यासाठी आवश्यक तितके दीर्घायुष्य तरी ज्ञानेश्वरांचे कुठे होते? परंतु आपल्याला इष्ट व अभिप्रेत असलेले मनाचे परिवर्तन घडून आले तर जुनी सामाजिक चौकट मोडून पडल्याशिवाय राहणार नाही हे ज्ञानेश्वरांना कळत नसेल काय? आणि हेच खरे व मूलभूत क्रांतिकार्य नाही का? हे मान्यच नसेल तर दुसऱ्या प्रकारचे– म्हणजे तपशीलवार प्रत्यक्ष आचाराचे – क्रांतिकार्य चक्रधरांनी तरी कुठे केले होते? डॉ. कोलतेच म्हणतात: "जुन्याची जाणीवपूर्वक मोडतोड करून, नवे प्रस्थापित करणे म्हणजे क्रांती, असा आज 'क्रांती' या शब्दाला अर्थ आला आहे. पण, चक्रधरांनी या अर्थाने क्रांती केली नाही." मग तरीही चक्रधर क्रांतिकारक का? तर "समाजाला काहीसा धक्का देऊन नवीन तत्त्वज्ञान त्यांनी समाजाला शिकवले, नवीन क्रांतिकारक विचारांचे बीजारोपण त्यांनी महाराष्ट्रात केले व त्यांचे पोषणही केले." आणि म्हणून, "निदान त्या काळात तरी ते (चक्रधर) निश्चितच क्रांतिकारक होते."

मग हाच न्याय ज्ञानेश्वरांना का नाही? ज्ञानयोग, कर्मयोग, ध्यानयोग, भक्तियोग हे योग्यतेनुरूप आचा-

रावयाचे भिन्न 'मार्ग' आहेत असे मानून आपापल्या मार्गाचे अवडंबर माजवून त्यातही श्रेष्ठकनिष्ठतेचा भ्रामक गोंधळ घालणाऱ्या समाजाला हे भिन्न मार्ग नसून एका 'पंथराजा'चे (पण रूढ अर्थाने 'मार्ग' नसलेल्या) विविध अनिवार्य घटक आहेत असे सांगणे 'समाजाला काहीसा धक्का देणे' नव्हे काय? पुढे अठरापगड जातींच्या संतांना जन्म देणाऱ्या भागवत संप्रदायाला संपूर्ण व सर्वांगीण तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान पुरवणे हे 'समाजाला नवीन तत्त्वज्ञान' शिकवणे किंवा 'नवीन क्रांतिकारक विचारांचे बीजारोपण आणि पोषण' नव्हे काय? जाती, कूळ, व्यवसाय इ. गोष्टीं-मुळे माणसांच्या मूलभूत एकतेला किंवा मोक्षाच्या पात्रतेला बाध येत नाही असे प्रतिपादन करणे हे बंड नव्हते काय? देवदेवतांतराच्या मागे लागू नका असा उपदेश त्याकाळात धक्का देणारा ठरला नसेल काय? असे असता ज्ञानेश्वरांना मी 'कदापी क्रांतिकारक म्हणणार नाही' असे डॉ. कोलते कसे म्हणू शकतात? किंवा चक्रधरांनी जे केले 'तेच ज्ञानेश्वरांना नको होते' असे डॉ. कोलते ठासून कसे काय सांगतात? एवढेच नव्हे तर चक्रधरांच्या कार्यामुळे जातिव्यवस्थेला धोका निर्माण झाल्याने तिला सावरून धरण्यासाठी व पुन्हा प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठीच ज्ञानेश्वरांचा सारा आटापिटा होता असेही ते सांगतात.

याचे कारण, आजच्या जातिव्यवस्थेचे सारे मूळ गीतेत आहे या गैरसमजुतीत आहे. यावबतीत सामान्य जनांच्याच नव्हे, तर विद्वानांच्याही मनात असे काही अपसमज आणि चुकीचे अर्थ दृढमूल होऊन बसले आहेत की त्यांचा पुर्नविचार व्हावा अशी सूचना करणेही अशक्य व्हावे!

याचा अर्थ एवढाच की या सर्व कल्पनांचा आज अगदी वस्तुनिष्ठ आणि मूलगामी विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. यात 'वर्ण' आणि 'जात' हे शब्द आम्ही सर्रास समानार्थी वापरतो ही एक मोठी अडचण आहे. यामुळेच अनेक विपर्यास उद्‌भवतात.

मुळात, भिन्न स्वरूपांच्या चतुर्विध कर्मांवरून केलेली विभागणी म्हणजे 'वर्ण'. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र ही ती कर्म करणाऱ्यांना दिलेली नावे. त्यात श्रेष्ठकनिष्ठतेचा विचार त्या त्या व्यावसायिकांनी लौकिक पातळीवरच्या व्यवहारात आणला. हा प्रकार जगातल्या कोणत्या समाजात कधी नव्हता? आजही शाळेतल्या कारकूनापेक्षा बँकेतला कारकून स्वतःला श्रेष्ठ समजत नाही काय? याचाच विचार करणाऱ्यांनी तो करावा. मोक्षाच्या संदर्भातच मानवाचा विचार करणाऱ्या तत्त्वज्ञानात याचा आवश्यक तितकाच आणि त्या पद्धतीनेच विचार होणार. वेदातल्या पुरुषसूक्तात ब्राह्मण म्हणजे मुख आणि शूद्र म्हणजे पाय अशी कल्पना करून समाजपुरुषाचे काव्यमय रूपकात्मक वर्णन केले आहे. त्यात श्रेष्ठ-कनिष्ठतेपेक्षा चारी वर्णांनी बनलेल्या परिपूर्णतेचा अभिप्रायच अधिक आहे. माणूस मात्र मुख आणि पायच काय पण डाव्या आणि उजव्या हातातही श्रेष्ठ-कनिष्ठ करत बसतो. मोक्षाच्या दृष्टीने अशा अनेक भेदभावांचा जो अडसर मनुष्य निर्माण करतो तो काढून टाकण्यासाठी गीतेने या चातुर्वर्ण्याचा प्रपंच केला आहे. चौथ्या अध्यायातल्या 'चातुर्वर्ण्यं मया सृष्टं' इ. प्रसिद्ध श्लोकातच त्यांचा कर्ता मी आहे असे वाटले तरी मी स्वतः अकर्ता व अव्यय आहे असे स्पष्ट म्हटलेले आहे. कर्मांच्या भिन्नतेवर मोक्षमार्गाची पात्रा-पात्रता अवलंबून आहे की काय हा जनमानसातला संभ्रम दूर करून तो अधिकार सर्वांना आहे हे गीतेला पटवून द्यायचे होते. हे सारे प्रत्यक्ष परमेश्वराच्या तोंडूनच वदवण्यात गीतेने (गीताकारांनी) फारच मार्मिकता दाखवली आहे. पूर्वीच्या सर्व मुमुक्षूंनी हे ओळखूनच कर्मे केली व त्यामुळे त्यांना ती कर्मेच मोक्षकारक ठरली असा पुरावाही दिला आहे. जाती, कर्मे यात श्रेष्ठकनिष्ठतेचा भेद केला तर गीतेचे सारे तत्त्वज्ञानच फोल व निरर्थक ठरेल. तरीही गीतेने भेदात्मक चातुर्वर्ण्यव्यवस्था सांगितली व ज्ञानेश्वरांनी तिचा पाठपुरावा केला असा अर्थ आम्ही लावावा हे आश्चर्य आहे! आज आपण 'जाती'चा जो अर्थ घेतो (जन्माने मिळणारी) त्या अर्थाने नव्हे तर स्वभावाच्या वर्णाने—जातीने कर्मे प्राप्त होतात असे गीतेचे विवेचन आहे आणि कशानेही कोणतीही कर्मे प्राप्त झाली तरी मुमुक्षूंनी त्यांचा काथ्याकूट करत बसण्याची आवश्यकता नाही असे सांगणे आहे. अठराव्या अध्यायात श्रीकृष्ण अर्जुनाला तू 'जन्माने' क्षत्रिय असल्याने तुला युद्ध करावे लागेल असे सांगत नाहीत, तर तुझा 'क्षात्र-स्वभाव' तुला युद्ध करायला लावील असे सांगतात.

मूळ गीतेत, आणि म्हणून ज्ञानेश्वरीत, विशिष्ट कर्मांमुळे विशिष्ट व्यवसाय वर्ण ठरतात आणि माणसे

आपल्या विशिष्ट स्वभाव–गुणांप्रमाणे विशिष्ट कर्म करतात असे म्हटले आहे ते आजच्या वैज्ञानिक युगातही विवाद्य आहे काय ? आपल्या स्वभावधर्माप्रमाणे आपला विशिष्ट कर्माकडे ओढा असतो. पण ती बदलता येत नाहीत असेही नाही. गीतेला हेही मान्यच आहे. पण मोक्षासाठी ती बदलणे आवश्यक नाही. कर्म मग कुठलेही असो ते केव्हा बंधनकारक होते व केव्हा मोक्षदायक होते एवढेच गीतेला स्पष्ट करायचे आहे. यात श्रेष्ठकनिष्ठतेचा किंवा जातिव्यवस्थेचा प्रश्नच येत नाही. जातीने ब्राह्मण असल्याशिवाय वेदाधिकार नाही किंवा वेदाधिकार असल्याशिवाय मोक्षाधिकार नाही असे ज्ञानेश्वरीत म्हटलेले नाही. उलट 'तैसे द्विजसंगे शूद्राते। स्वीकारी श्रुती' असेच म्हटले आहे. अशा रीतीने सर्व बाह्य भिन्नता स्वभावजन्य विविधतेचा प्रकार असल्याने तिच्याशी निष्कारण झगडत बसण्यापेक्षा मानवाचे मूलभूत स्वरूप जाणून सर्वांचा मोक्षाधिकार कशात आहे हे ओळखा असे सांगणारे ज्ञानेश्वर श्रेष्ठकनिष्ठतेच्या भ्रामक कल्पनांवर 'असीम' श्रद्धा ठेवतील तरी कशी ? या कल्पनांनी माणूस माणसावर किती अन्याय करतो याचा अनुभव त्यांना स्वतःलाच आलेला होता. या अनुभवाने केवळ स्वतःपुरताच आणि तेवढ्यापुरताच प्रतिकार किंवा बंड करण्यापेक्षा सर्व थरांतच सर्वांगीण क्रांतीसाठी तत्वज्ञान सांगून ते कार्य संपताच अवतारसमाप्ती करण्यातच त्यांची श्रेष्ठता दिसून येते. कदाचित याची काहीशी खंत वाटल्याने पुढे एकनाथांच्या रूपाने अवतार घेऊन अतिशूद्राकडे त्यांनी भोजन केले असेल ! (हे विधान सहज केले आहे. कारण, पूर्वजन्म पुनर्जन्म यासंबंधीच्या रूढ कल्पना मला मान्य नाहीत आणि ज्ञानेश्वरांनाही त्या मान्य नव्हत्या असे मला वाटते. पण तो विषय निराळा.)

१० फेब्रु. १९७४ च्या 'लोकसत्ते'त मुलाखत प्रसिद्ध झाल्यावर डॉ. कोलते यांनी पुढच्याच रविवारी म्हणजे–१७ फेब्रु. १९७४ च्या 'लोकसत्ते'त खुलासा करून काही विधाने दुरुस्त केली आहेत. त्यातील एक दुरुस्त विधान असे "मातंगाच्या हातचा लाडू खाण्याला त्यांना (चक्रधरांना) संकोच वाटला नाही. त्यांचे गुरू श्री गोविंदप्रभू हे तर अतिशूद्राच्याही घरी जेवीत." यात चक्रधर आपल्या गुरुंच्या पुढे तर गेलेले दिसत नाहीतच. उलट, गुरुंच्या इतकेही कार्य त्यांनी केलेले दिसत नाही. चक्रधर मूळचे गुजरातेतील होते. महाराष्ट्राबाहेर गुजरात उत्तरप्रदेश वगैरे प्रदेशात तळलेले पदार्थ, लाडू वगैरे 'पक्की रसोई'ला विटाळ मानत नाहीत. शिजवलेल्या अन्नाला म्हणजे 'कच्ची रसोई' लाच विटाळ मानतात. अर्थात एवढ्यावरून चक्रधरांना अस्पृश्यता मान्य होती असे कुणीही म्हणणार नाही. कारण इतर पुरावा अगदी निर्विवाद आहे. परंतु याच न्यायाने ज्ञानेश्वरांच्या बाबतीतही विचार व्हावयास हवा. म्हणजे, ज्ञानेश्वरांचे कार्य ही चक्रधरांच्या कार्याची प्रतिक्रिया नव्हती, तर दोघांचेही कार्य एकाच दिशेने जाणारे होते हे सहज लक्षात येऊ शकेल.

नाथपरंपरा व काश्मीरशैव परंपरा

भा. पं. बहिरट

श्री ज्ञानेश्वरांनी आपली परंपरा नाथपरंपरा असल्याचे ज्ञानेश्वरीच्या शेवटी सांगितले आहे. ही परंपरा शंकराचार्यांच्या व काश्मीर शैवांच्या परंपरेहून भिन्न आहे. शंकराचार्यांची परंपरा आदिनारायण–ब्रह्मा – वसिष्ट – शक्ती पराशर – व्यास शुक – गौडपाद – गोविंद व शंकराचार्य अशी असून काश्मीर शैव परंपरा श्रीकण्ठ – वसुगुप्त – सोमानंद - उत्पल – लक्ष्मणगुप्त अभिनवगुप्त क्षेमराज अशी आहे. ज्ञानदेवाची आदिनाथ उमा – मच्छेंद्र – गोरख – गहिनी – निवृत्ति – ज्ञानदेव अशी आहे. अलीकडे नाथसंप्रदाय व काश्मीर शैव संप्रदाय हे अभिन्न आहेत असे मत मांडले जात आहे. श्री. बाळाचार्य खुपेरकरशास्त्री यांच्या "श्री शैवागम आणि ज्ञानेश्वर" या ग्रंथांत त्याचा पुरस्कार केला गेला आहे. या मताचा स्वीकार करून त्यानी श्रीज्ञानेश्वरांना काश्मीरशैव संप्रदायी मानले आहे.

वरील समज निर्माण होण्याचे कारण काश्मीरशैव मताच्या "महार्थ मंजरी" या ग्रंथाच्या कर्त्याने स्वतःची माहिती देताना म्हटले आहे–

"गोरक्षो लोकधिया देशिकदृष्टया महेश्वरानन्दः"

यावरून महार्थ मंजरीच्या कर्त्यांचे नाव महेश्वरानन्द असून त्यांचे दीक्षापूर्व नाव गोरक्षनाथ होते असे दिसते. गोरक्षनाथ या नावावरून नाथ परंपरेतील प्रसिद्ध पुरुष गोरक्षनाथ व महामंजरीकार महेश्वरानन्द हे एकच होत, म्हणून नाथपरंपरा व काश्मीर शैव परंपरा अभिन्न असून ज्ञानेशांची परंपराही काश्मीर शैव परंपराच होय असे अनुमान करण्यात आले. परंतु हे अनुमान चुकीचे असल्याचे अधिक संशोधनावरून स्पष्ट होत आहे.

काश्मीरशैव परंपरेतील महेश्वरानंद यांचे दीक्षापूर्व गोरक्षनाथ नाव असले तरी केवळ नामसादृश्यावरून नाथ परंपरेतील गोरक्षनाथाशी ऐक्य मानता येत नाही. महेश्वरानंदाची गुरुपरंपरा – शिवानंद, महाप्रकाश महेश्वरानंद अशी आहे. तर गोरक्षनाथाचे गुरु मत्स्येन्द्रनाथ महेश्वरानंद यांचे परमगुरु शिवानंद यानी नित्याषोडशिकार्णव नावाच्या योगतन्त्र ग्रंथावर टीकालिहिली आहे. शिवानंदांचा काल इ. स. च्या १३० या शतकाच्या अखेरीस येतो असे पं–व्रजवल्लभ द्विवेदी यानी वाराणसी संस्कृत विद्यालया तर्फे प्रकाशित होणाऱ्या योगतन्त्रमालेतील ५ वा ग्रंथ "महार्यमंजरी"च्या प्रस्तावनेत स्पष्ट केले आहे. शिवानन्दांचे प्रशिष्य महेश्वरानंद यांचा काल इ. स. चौदाव्या शतकांत पडतो.

नवनाथांपैकी मत्स्येंद्रनाथ यांचा काल अभिनवगुप्तानी केलेल्या त्यांच्या सादर स्मृतीवरून ९ वे अगर १० वे शतक ठरतो. अभिनवगुप्तांचे शिष्य क्षेमराज, महेश्वरानंदांचे परमगुरु शिवानंद यानी क्षेमराजाचे आपल्या ऋजुविमर्शिनीत सादर स्मरण केले आहे. तेव्हा ज्यांना अभिनवगुप्तानी "मच्छंदविभु" म्हणून आदराने स्मरले आहे त्या मत्स्येन्द्रनाथाचे, क्षेमराजाची अवतरणे उधृत करणाऱ्या शिवानंदांचे प्रशिष्य महेश्वरानंद (पूर्वाश्रमीचे गोरक्ष) हे शिष्य होते असे कसे म्हणता येतील ? महेश्वरानंद हे आपले गुरु मच्छेंद्र असा कोठें उल्लेखही करीत नाहीत. तेव्हा शैव परंपरेतील महेश्वरानंद तथा गोरख व नाथ परंपरेचे गोरखनाथ हे भिन्न होत.

नाथपरंपरेचे गोरक्षनाथ हे हठयोगी होते व त्यांच्या सिद्धांतांचे साम्यही महामंजरी व त्यावरील परिमल टीकेत आढळत नाही.

ज्ञानेश्वरांच्या व काश्मीरशैव मताच्या विचारसरणीत कांही साम्ये दिसली तरी ज्ञानेशाची परंपरा भिन्न आहे. दुसरे, ज्ञानेशांच्या परंपरेसंबंधी एक महत्वाची गोष्ट लक्षांत ठेवण्याजोगी आहे. ती म्हणजे नाथ परंपरा ही केवळ योगपरंपराच नव्हती तर तीमध्ये भक्तीचा प्रवाहही होता. ज्ञानेशांचे गुरु गहिनीनाथ यांचा गुरुपरंपरेचा अभंग आहे. त्यावरून हे स्पष्ट होते. ते म्हणतात.

(पुढील मजकूर २६० पानावर)

श्री ज्ञानदेवांचे शिवशक्त्यद्वैत

मधुकर रामदास जोशी

१. श्रीज्ञानेश्वर तत्वज्ञान सांवादीक समस्या—

गेल्या ७०–८० वर्षात ज्ञानदेव वाङमयाचा सांगोपांग अभ्यास करण्याकडे मराठी अभ्यासकांचे लक्ष वेधले गेले व ज्ञानेश्वर वाङमयाबरोबरच ज्ञानेश्वरांच्या तत्वज्ञानाचा ऊहापोह होऊ लागला. श्रीज्ञानदेवमहाराज शांकरमताचा पुरस्कार करतात असा जो समज मराठी वाचकात होता त्याला धक्का देण्याचे कार्य काही अभ्यासकांनी केले. इ. स. १८९६ – ९७ च्या सुमारास दोन ज्ञानदेववाद चर्चेस जो प्रारंभ झाला त्याच्या मुळाशी ज्ञानेश्वर तत्वज्ञानसंबंधी गृहित धरण्यात आलेली काही प्रमेये होती. सगुणोपासक अभंगकर्ता रामानंदी ज्ञानदेव हा, भारद्वाजांच्या मते परिणामवादी होता तर निर्गुणोपासक ज्ञानेश्वरीकर्ता ज्ञानदेव गुण-परिणामवादी होय. यद्यपि, भारद्वाजांनी तात्विक चर्चा फारशी केली नसली तरी त्यांनी अभंगकर्त्या ज्ञानदेवाच्या आडून काही तात्विक शंका प्रगट केलेल्या आहेत, पण भारद्वाजांनी तत्वज्ञान व चरित्र यांची गल्लत केली. दोन ज्ञानदेववादातील भारद्वाजांचे प्रतीपक्षी भिंगारकरबुवा होते व त्यांनी भारद्वाजांच्या मताचा खरपूस समाचार घेतला. भारद्वाजांनी उपस्थित केलेल्या शंकांना उत्तर देतांना भिंगारकरांनी तत्कालीन वारकरी संप्रदायातील प्रचलीत समजूतीचा जो उल्लेख, केला त्यातूनच ज्ञानेश्वर तत्वज्ञानाचा वाद उपस्थित झाला. भिंगारकरबुवा लिहितात, "ज्ञानेश्वरी व अमृतानुभव या दोन ग्रंथांत परस्पर विरुद्ध तत्वज्ञान ज्ञानदेवांनी सांगितले आहे व ज्ञानेश्वरीचे खंडन अमृतानुभवांत आहे."

वारकऱ्यांची ही समजूत खरी की खोटी हे पारखून पाहणे जसे आवश्यक आहे तसेच ज्ञानेश्वरांच्या ग्रंथात परस्पर विरोधी विचार आहेत काय याचाही गंभीर विचार होणे आवश्यक आहे. ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीत निर्गुणपर व अभंगात सगुणपर विचार मांडले आहेत काय ? याच बरोबर व तितकेच महत्वाचे म्हणजे भिन्न अर्थाचे, परस्पर विसंगत किंवहुना परस्पर विरुद्ध सिद्धान्त ज्ञानदेव सांगतात काय ? त्यांत पुन्हा ज्ञानदेवासारखा प्रस्थानत्रयीचे सूक्ष्म अध्ययन करणारा व दर्शनांशी सर्वस्वी सुपरिचित असा श्रेष्ठ प्रज्ञावंत क्षणात एक तर क्षणात दुसरा असे विचार प्रतिपादन करील काय ? त्यांत पुनः ज्ञानदेवांसारखा आत्मानंदात रममाण होणारा नाथसिद्ध लोकांना गोंधळात पाडणारे सिद्धान्त व तत्वज्ञान व्यक्त करून काय मिळविणार ?

परंतु चमत्कार मात्र असा की, गेल्या ७० – ८० वर्षात सर्वश्री विद्वद्वर्य पांडुरंग शर्मा, वहिरट व बाळाचार्य खुपेरकर या शांकरविरोधी पंडितांनी असे ठासून प्रतिपादन केले की, ज्ञानदेव हे पांचरात्र रामानुजांची कास धरतात. बाळाचार्य खुपेरकर तर त्याच्याही पुढे गेले व केवळ ठासूनच नव्हे तर आग्रहाने प्रतिपादन केले की ज्ञानदेव हे काश्मीरीशैव प्रत्याभिज्ञा-मतच मांडतात. शांकरमताला विरोध करताना वैष्णव पांचरात्र व शैव प्रत्यभिज्ञाची जी नवलपूर्ण सांगड पंडितवर्य पांडुरंग शर्मांनी घातली ती तपासण्याचे काम आज आपल्या समोर नाही.

(पान २५९ वरून)

आदिनाथ उमा बीज प्रगटले ।
मच्छिद्रा लाधले सहजस्थिति ।।
तेचि प्रेममुद्रा गोरक्षा दिधली ।
पूर्ण कृपा केली गहिनीनाथा ।।
निवृत्तिं गहिनीं कृपा केली पूर्ण ।
कुळ हे पावन कृष्णनामे ।।

नाथ परंपरेत योगमुद्रेच्या जोडीस "प्रेममुद्रा" म्ह. भक्तिप्रवाहही होता व त्यांचा वारसा ज्ञानेशांना मिळून तो त्यांनी प्रामुख्याने वारकरी संप्रदायद्वारा वृद्धिगत केला.

ज्ञानेश्वरांच्या तत्वज्ञानाचे स्वरूप या विषयी मराठी विद्वानांची मते कितीही अभ्यसनीय असली तरी त्या मतांचे खंडन वा सिद्धान्तांचे परिशीलन करण्याऐवजी ज्ञानदेव ज्या परंपरेतील नाथसिध्द होते त्या नाथपंथाच्या तत्वज्ञानाकडे लक्ष दिले असता ज्ञानदेवांच्या तत्वज्ञानाचे यथार्थ स्वरूप आकलन होऊ शकते.

२. श्रीगोरक्षप्रणीत सिद्धमत व कौल शांकर मत

श्रीज्ञानदेवांचे ग्रंथ वरवर चाळले तरी त्यांनी निर्दिष्ट केलेल्या पूर्वसूरींच्या ग्रंथांची कल्पना येते. विशेषतः ज्ञानदेवांच्या समोर भेदाभेदवादी भास्करांचे ग्रंथ होते. ज्ञानदेवांच्या गुरुपरंपरेतील व गहिनीच्या गुरुबंधूने – अमरनाथाने भास्करमताचा केवळ उल्लेखच नव्हे तर खंडनही केलेले आहे. भास्करांनी ब्रम्हसूत्रावर भाष्य लिहिले होते व त्यांनी परिणामवादाचा पुरस्कार केला. ज्ञानेश्वर हे रामानुजांना अनुसरत नाहीत. त्याचप्रमाणे भास्कराचार्यांनाही अनुसरत नाहीत. डॉ. पेंडसेनी असा निष्कर्ष काढला की, २१८ स्थळांपैकी फक्त ५ ठिकाणी शंकरांना सोडून रामानुजांचा अर्थ स्वीकारला आहे. पण या विधानात दुरुस्ती करून असे म्हणता येईल की फार तर पांच ठिकाणी रामानुजाऐवजी भास्करांना ज्ञानदेव मानतात. म्हणून पांचरात्र वा रामानुजाऐवजी भेदाभेदवादी भास्कर व ज्ञानदेव यांचे अध्ययन होणे आवश्यक आहे. ज्ञानदेवासकट सर्व नाथसिद्ध भास्कराचार्यांचे खंडन करतात.

ज्ञानदेवांनी केवलाद्वैतमताचे ग्रंथ अभ्यासिले होते व ज्ञानेश्वरीच्या तेरा – पंधरा अध्यायात ज्ञानकांड सांगताना ज्ञानाने मोक्ष मिळतो हे विचारसूत्र स्पष्ट केले. ज्ञानदेवांनी केवलाद्वैताचा पुरस्कार केला हे आतापर्यंत अनेकांनी सांगितले आहे. केवलाद्वैताप्रमाणेच तांत्रिक पण अद्वैताचा पुरस्कार करणाऱ्या कौलमताशी ज्ञानदेवांचा चांगला परिचय होता. ज्ञानेश्वरांच्या गुरुपरंपरेतील नवनाथसिद्धांनी पदपिंडविवेक करून अद्वैताचा सिद्धान्त प्रस्थापित केला. नवनाथ व विशेषतः गोरक्षांनी पाशुपत, कालमुख व शैवमाहेश्वर या शैवागमाचे खंडन करून सिध्दमताचा पुरस्कार केला.

३. मत्स्येंद्रगोरक्षादी नाथसिद्धांचा पदपिंडविचार व ज्ञानदेव

नाथसिद्ध व विशेषतः मत्स्येंद्रगोरक्षांचा फार मोठा प्रभाव निवृत्ति ज्ञानदेवावर आहे. श्रीमत्स्येंद्रनाथांनी तंत्रप्रधान मत्स्योदरकौल विचारांचा पुरस्कार केला व जालंदरनाथांनी उमासहित शिवालाच – परशिवाला वंदन केले आहे. श्री – मत्स्येंद्रानीहि परशिवाला वंदन केलेले आहे. परशिव हे नाथसिद्धांचे उपास्यदैवत होय. परशिव म्हणजे कुलाकुलशिवशक्तितत्व होय. अकुलशिव कुलशक्ति आविर्भूत करतो व कुलशक्ति अकुलशिवाची इच्छामात्र आहे. जलबुडबुड्याप्रमाणे अकुलशिव व कुलशक्ति एकाकार आहेत. या कुलाकुल शिवशक्तिलाच परशिव म्हणतात.

अकुलम् कुलम् आधत्ते कुलं च अकुलम् इच्छति ।
जल बुन्दुदवद्न्यायात् एकाकारः परः शिवः ।।

अतएव परशिव म्हणजे शिवाशी अभिन्नत्वाने वास करणारी शिवाची शक्ति व आदिनाथशिव म्हणजे शक्तियुक्त अकुलशिव. अकुलशिवाच्या पाच शक्ति आहेत. निजा, परा, अपरा, सूक्ष्मा व कुंडलिनी. यांना शक्तिचक्रक्रम म्हणतात. [शक्तिचक्रक्रमाने पिंड उत्पन्न होतो. तो परशिव पिंड व अनाद्यपिंड होय.]

परशिवपिंड = शिवाशी अभिन्नत्वाने वास करणारी शिवाची शक्ति.
अनाद्यपिंड = शक्तियुक्त अकुलशिव वा आदिनाथ शिव.

परशिव व अनाथ आदिनाथ हे जलबुडबुडयाप्रमाणे एकाकार होत. पिंडे पिंडाचा ग्रासु। तो हा नाथसंकेतीचा दंशु। परि दाऊनि गेला उद्देशु। महाविष्णु।। या ओवीत पिंडे पदाने ज्ञानदेवांनी परशिव व अनाद्यपिंडाचाच निर्देश केलेला आहे.

श्रीज्ञानदेवांच्या गुरुपरंपरेत पिंड संज्ञेने आदिनाथ शिवाप्रमाणेच जीवजगताचाही बोध होतो व त्याचा उल्लेख "पिंडाचा ग्रासु" संज्ञेने ज्ञानदेव करतात. विश्वात्मक देव म्हणजे शक्तियुक्त आदिनाथ शिव वा परशिव. ज्ञानेश्वरांच्या ग्रंथात येणारे हे उल्लेख प्रामुख्याने शक्तियुक्त आदिनाथ शिवाचे आहेत. आदिनाथ शिव वा परशिव ही एकमेवाद्वितीय सत्ता नाथसिद्धांनी मानलेली आहे. पदपिंडविवेक करताना कार्यकारणातीत व कुलाकुलातीत अव्यक्त परब्रह्म शिवसत्तेचे वर्णन गोरक्षांनी केलेले आहेः–

यदानास्ति स्वयं कर्ता कारणं न कुलाकुलम्
अव्यक्तंच परंब्रह्म अनात्मा विद्यते तदा ।।

श्रीगोरक्षनाथांच्या प्रतिपादनानुसार परब्रह्म हे अव्यक्त, अनाम, कुलाकुलातीत व कार्यकारणभावरहित आहे. हीच एकमेवाद्वितीय सत्ता होय. यालाच पद म्हणतात. हेच सदतिसावे तत्व होय या अव्यक्त परब्रह्मशिवापासून दुसरी स्वतंत्र अस्तित्व असणारी सत्ता नाही. या परब्रह्मशिवाखेरीज दुसरे काहीच निर्माण झाले नाही. यालाच सिद्धसिद्धान्त मतात " स्वयंसिद्ध " म्हणतात.

अनामेति स्वयं अनादि सिद्धम् एकमेव अनादिनिधनं सिद्धसिद्धान्त प्रसिद्धं ।
त्वम् अक्षरं परं वेदितव्यं त्वमस्य विश्वस्य परं निधानं त्वमव्यय. शाश्वतधर्मगोप्ता सनातनः पुरुषो मतो मे ।। १८ । ११

श्रीगोरक्षमताचाच अनुवाद श्रीज्ञानदेव करतात :–
तू धर्माचा वोलावा । अनादिसिद्ध तू नित्य नवा ।
मी जाणे सततिसावा । पुरुष विशेषु फुडा ।। ३०४ । १८

अनाम स्वयंसिद्ध परब्रह्मशिव हीच एकमेव सत्ता नाथसिद्धांनी मानल्यामुळे व भगवद्गीतेमधील अक्षर; सनातन पुरुषाचेही वर्णन याच सत्तेचे ज्ञानदेवांनी केल्यामुळे असे स्पष्ट होते की ज्ञानेश्वरादि सर्व नाथसिद्ध अद्वैती होते. याच अनाम, कार्यकारणातीत, स्वयंसिद्ध परब्रह्मशिवाचा उल्लेख सर्व नाथसिद्ध पद संज्ञेने करतात. "पद पदी प्रवेश" या ओवीत पद संज्ञेने श्रीज्ञानदेवांनी याच परब्रह्मशिवतत्वाचा उल्लेख केला असून हे तत्व सदतिसावे तत्व होय. श्रीगोरक्ष म्हणतात की, सत्य विचार केला असतां काही निर्माणच झाले नाही. पण, लोकव्यवहारार्थ आम्ही पदपिंडविचार सांगतो. अशाप्रकारे पदपिंडविवेक करताना श्रीगोरक्षांनी पारमार्थिक दृष्टीने एका परब्रह्मशिवाखेरीज काही निर्माणच झाले नाही असे ठासून सांगितले. या श्लोकावरून गोरक्षांनी चैतन्याहून भिन्नत्वाने जगताचा अभाव स्पष्ट करून अजातवादाचा पुरस्कार केला. वस्तुतः जगत्सृष्टि निर्माणच न झाल्याने अजातवाद ही गोरक्षांना अभिप्रेत आहे व अभिप्रेतच नव्हे तर त्यांनी स्वच्छच तसे म्हटलेले आहे. नास्ति सत्यविचारे अस्मिन् उत्पत्तिश्चाण्डपिडयोः । याचा वेगळा अर्थ कोणता ? श्रीज्ञानदेवांनीही पूर्वसूरींचा मागोवा घेत गुरुगोरक्षनाथाप्रमाणेच अजातवादाचा पुरस्कार केला. श्रीशंकराचार्यांचे परमगुरु श्री गौडपादाचार्यांनीही मांडूक्यकारिकेत अजातवादाचा सिद्धान्त स्पष्ट केला आहे. श्रीगौडपाद व मत्स्येंद्रगोरक्षप्रभृती पारमार्थिक दृष्टीने काही निर्माणच झाले नाही असे मानतात व गोरक्षपरंपरेतील अमरनाथ, गहिनीनाथ, निवृत्तीनाथ व ज्ञानदेवादि नाथसिद्धहि अजातवाद मांडतात.

श्रीगोरक्षनाथांनी अव्यक्त परब्रम्हशिवपदापासून शक्तिचक्रक्रमाने पिंडोत्पत्ती होते असे म्हटले आहे. पदापासून निर्माण होणाऱ्या पिंडाचे वर्णन करतानाही गोरक्ष म्हणतात की, केवळ लोकव्यवहारार्थ आम्ही पिंडोत्पत्ती कथन करतो, पण खरे पाहता परब्रह्मापासून पिंडोत्पत्ती उत्पन्नच झालेली नाही. केवळ लोकव्यवहारार्थ गोरक्षांनी कथन केलेला पिंडोत्पत्तीचा विचार निवृत्ती-ज्ञानदेवांनाही मान्य आहे.

अजातवादाप्रमाणेच विवर्तवादाचाहि पुरस्कार श्रीगोरक्षांनी करून परब्रह्मशिवाची अधिष्ठानसत्ता मान्य केली. परब्रह्मशिव हे कारण व पदापासून शक्तिचक्रक्रमाने निर्माण झालेला पिंड कार्य होय. कार्याचा कारणात लय होऊन अधिष्ठान रूप कारणच नित्य, शाश्वत, सत्य आहे. नाथपंथात परब्रह्मशिवाप्रमाणेच परशिवपिंड वा अनाद्य शिवाचा उल्लेख येतो व ज्ञानदेवादि नाथसिद्धांनी याच परशिवपिंड वा शक्तियुक्त आदिनाथाचा उल्लेख वारंवार केलेला आहे. नाथपंथाचे हे वैशिष्टय की त्यांनी परब्रह्मशिवाचा वा त्याच्यापासून शक्तिचक्रक्रमाने उत्पन्न झालेल्या परशिवपिंडाचा वा शक्तियुक्त आदिनाथाचे माहात्म्य वारंवार कथन केलेले आहे. शक्तियुक्त शिवच एकमेव, निरुपाधिक, मूळकारण आहे असे सांगितले आहे. अमृतानुभवातील देवोदेवीचे वर्णन करताना ज्ञानदेव म्हणतात–

ऐसी इयें निरुपाधिके । जगाचि जियें जनके ।।
तियें वंदिली मीयां मुळिके । देवोदेवी ।।

येथील मुळिके देवोदेवी पदाने श्रीज्ञानदेवांनी शक्तियुक्त आदिनाथ अकुल शिवाचा व " देवी " पदाने शिवाशी अभिन्नत्वाने वास करणाऱ्या शिवाच्या शक्तीचा उल्लेख केला आहे. या वर्णनातील परशिवपिंड व अनाद्यशिवपिंड या नाथपरंपरेच्या संज्ञा महत्त्वाच्या आहेत. कारण की, देवोदेवी पदाने ज्ञानदेवांना शिव आणि शक्ति अशी दोन स्वतंत्र भिन्न तत्वे अभिप्रेत नाही, किंवा शिवाने स्वतंत्र शक्तीला वा प्रकृतीला उत्पन्न केले असेही म्हटलेले नाही. म्हणून "मूळिके

देवीदेवी " पदाचा अर्थ उत्पत्ति विरहित अनादि मूळ कारणवस्तु असलेला शक्तियुक्त आदिनाथ होय.

शिवाच्या ठायी शक्ति असते व शक्तिच्या ठायी शिव असतो हा विचार नाथपंथाच्या तत्वज्ञानातील असून शिवशक्त्यैक्य चंद्रचंद्रिकेप्रमाणे असते. शिवाच्या योगे शक्तीला पूर्णत्व आले व शक्तीमुळे शिवाला परमेश्वरपद प्राप्त झाले.

जेणे देवे संपूर्णत्व देवी ।
जियेविण काही ना तो गोसावी ॥
किंवहुना योकोपजीवी एकचि जिये ।

शिवशक्ति नांवे दोन असली तरी एकच रुपाने नटतात व त्यांची सत्ता ही एकच असते.

जेया येकी सत्तेचे वैसणे ।
दोघां एका प्रकाशाचे लेणे ।
जिये येके अनादिपणे नांदते दोघे ॥

शिवाची सत्ता वेगळी व शक्तीची सत्ता वेगळी असे द्वैत ज्ञानदेव मान्य करीत नाहीत. शक्तियुक्त शिव हे जगाचे निमित्त व उपादानकारण आहे. नाथपंथात शिवाच्या निजा, परा, अपरा, सूक्ष्मा व कुंडलिनी या पाच शक्ती अवस्था मानतात व त्या शिवापासून भिन्न नाहीत. श्रीगोरक्षनाथांनीहि आदिनाथ शिव कुंडलिनी-शक्तीने युक्त असतो असे म्हटले आहे. कुंडलिनी ही केवळ ज्ञानरूप आहे. ती शिवापासून निर्माण झालेली स्वतंत्र शक्ती नसल्याने व शिवतत्वातच तिचा समावेश होत असल्याने नाथपंथात व पर्यायाने ज्ञानेश्वरांच्या तत्वज्ञानातही उपादान व निमित्तकारण शिव आहे. तन्तुपटन्यायाने शिवापासून निर्माण झालेल्या शक्तीने सृष्टी निर्माण केली असे नवनाथादि नाथसिद्ध वा गहिनीनिवृत्ती ज्ञानदेव कोठेही म्हणत नाहीत वा सत्कार्यवादी सांख्य किंवा विशिष्टद्वैतवाद्याप्रमाणे परिणामवादाचा चुकूनहि पुरस्कार मत्स्येंद्र गोरक्षादि नाथसिद्ध व निवृत्तीज्ञानदेवासारखे संत करीत नाहीत, तर मत्स्येंद्रगोरक्षाप्रमाणे विवर्तवादाचा स्वीकार करून निखळ गुणपरिणामवादच सांगतात.

शिवशक्तीचे मुळातच ऐक्य असतानाही केवळ शब्दभेददर्शक शिवशक्ती संज्ञा ज्ञानदेवांनी योजिल्या आहेत. नामरुपात्मक भेदाचा नायनाट करून एकार्थाने सर्व प्रकाशित करणाऱ्या शिवाला ज्ञानदेवांनी वंदन केले आहे. शिवापासून अभिन्नत्वाने वास करणाऱ्या शिवाला शक्तीने नामरुपात्मक असे जगद्रूपी अलंकार स्वांगावर चढविले. नाम व रुप हे नित्य व शाश्वत नसतात. पर-शिवपिंडाकारणात अलंकार रुपी सृष्टीकार्य विलीन होते असे कार्यकारणवादाने स्पष्ट करून जगत् ब्रह्माचा विवर्त होय असे ज्ञानदेव सांगतात. अशाप्रकारे श्रीगुरुगोरक्षनाथ प्रतिपादित शिवतत्वच ज्ञानदेवांनी आपल्या ग्रंथात स्पष्ट केले.

पारमार्थिक सत्तेचे वर्णन सिद्धावस्थेच्या भूमिके-तून ज्ञानदेवांनी केलेले असल्यामुळे अज्ञान अशी स्वतंत्र वस्तू ज्ञानदेव मान्य करीत नाहीत. अमृतानुभव ग्रंथात अज्ञानखंडन नामक प्रकरण आहे व काही अभ्यासक समजतात त्याप्रमाणे अज्ञानखंडनाने त्यांनी शांकरमत खंडित केले, पण वस्तुस्थिती उलट आहे. त्यांच्यासमोर शांकरमत जरुर होते पण काही अभ्यासक समजतात त्याप्रमाणे ते खंडनाकरिता नसून मंडनाकरिता होते. शांकरद्वैतानुसारच अज्ञानखंडन केल्याने त्यांनी शांकर-द्वैताचे मंडन केले. अज्ञानखंडनाप्रमाणे त्यांनी ज्ञान-खंडनही केलेले आहे व ज्ञानदेवांचे हे ज्ञानखंडन नवनाथातील एक थोर नाथसिद्ध चर्पटीप्रणित ज्ञान-खंडनासारखे आहे. ज्ञान व अज्ञान हे बंध होत हा विचार ज्ञानदेवांच्या गुरुपरंपरेत होता व चर्पटीने त्याप्रमाणेच श्रीगोरक्षनाथांनीहि

उपाधिः अन्यथा ज्ञानं तत्वं संस्थितिः अन्यथा ।
समस्तोपाधिनिर्मुक्तं तत् तत्वं योगिनो विदुः ॥

या श्लोकात ज्ञान अज्ञानाचा विचार केला आहे. सम-स्तोपाधि निर्मुक्त तत्वाचा योगी विचार करतात असे स्पष्ट करून श्रीगोरक्षांनी जीवाची अज्ञान दशा मान्य केली आहे. वर्ण उपाधियुक्त असतात असे गोरक्षां प्रमाणेच अमरनाथ म्हणतात व निवृत्ती ज्ञानदेवहि त्यांचाच अनुवाद करतात. मायोपाधि अविद्येने मूळ तत्वे कळत नाहीत पण मायोपाधिचा नाश होताच शुद्ध निर्मल व सत्य अशा एकमेवाद्वितीय तत्वाचाच बोध होतो. श्रीगोरक्ष व अमरनाथांचे अज्ञानविषयक प्रति-पादन निवृत्तीज्ञानदेवांच्या ग्रंथातहि आढळते. अज्ञाना-प्रमाणे ज्ञानहि बंध होय हा गोरक्षप्रतिपादित विचार श्रीचर्पटीनाथांच्या रचनेत आढळतो व गुरुपरंपरेतील या विचाराचेच उपबृंहण ज्ञानदेवांनी अमृतानुभव ग्रंथात केले आहे.

४. नाथपंथ व ज्ञानदेवांचे शिवशक्त्यद्वैत

श्रीज्ञानदेवांच्या ग्रंथात गुरुपरंपरेतील विचार यावेत यात अनैसर्गिक असे काहीच नाही. ज्ञानदेवांची गुरुपरंपरा नाथसंप्रदायाची आहे हे उघडच आहे. नाथसिद्धांचा तत्वज्ञानाऐवजी उपासनेवर भर आहे हा अभ्यासकांचा समज बरोबर असला तरी नाथसिद्धांनी तत्त्वविचार केलाच नाही असे नाही. नाथसिद्धांची रचना पाहिल्यावर असे प्रत्ययास येते की, मत्स्येंद्रगोरक्षादि नाथसिद्धांनी पदपिंडविवेक करून शिवशक्त्यद्वैत प्रस्थापित केले. परब्रह्मशिवपदापासून शक्तिचक्रक्रमाने पिंडोत्पत्ती होते. अशाप्रकारे परब्रह्मशिवपदापासून शक्तिचक्रक्रमाने अनाद्यपिंड शक्तियुक्त आदिनाथ, परशिव, शिवाशी अभिन्नत्वाने असलेली शक्ति आद्यपिंड, महासाकारपिंड, प्रकृतिपिंड व गर्भपिंड उत्पन्न होतात. गौरक्षवर्णित पदपिंडविचार नाथसंप्रदायाचे व्यवच्छेदक लक्षण असून निवृत्ती ज्ञानेश्वरांच्या ग्रंथात त्याचेच माहात्म्य सांगितलेले आहे. अतएव ज्ञानेश्वरांचे तत्वज्ञान म्हणजे ज्ञानदेवांनी स्पष्ट केलेला पदपिंडविवेक होय.

पिंड हा शिवशक्त्यात्मक आहे. पिंडाला शिवापासून अभिन्न असणाऱ्या शक्तीचा म्हणजे कुंडलिनीचा आधार आहे. पिंडात शिव व त्याच्या शक्तीचा वास असतो व पिंडस्थ कुंडलिनीशक्तिचे उत्थापन करून सहस्त्रारचक्रातील शिवाशी सामरस्य नाथयोगी करतात. शिवाची शक्ती परा, सत्ता, अहंता, स्फुरता व कला स्वरुप असते. नाथपंथातील पिंडविचार जेवढा विलक्षण आहे तेवढाच पिंडोत्पत्तीसाठी आवश्यक असणारा शक्तिचक्रक्रमहि आहे. गौरक्षवर्णित "शक्तिचक्रक्रम"च शक्तियुक्त आदिनाथशिवाचे स्वरूप स्पष्ट करणारा आहे व शक्तिचक्रक्रमसिद्धान्ताने नाथ पंथात शिवाच्या शक्तिला अतोनात महत्व मिळाले. अकुलशिवाच्या कुलशक्तिपासून चराचरात्मक व चिदचिदात्मक जगत् उत्पन्न होते. गोरक्ष म्हणतातः—

"यस्माच्च चराचरं जगदिदं चिद्‌चिदात्मकं प्रभवति !"

परशिवाच्या शक्ती प्रसरणतेमुळे जगत्सृष्टिचा उद्‌भव व लय होतो.

"सर्वशक्तिप्रसरसंकोचाभ्याम् जगत्सृष्टि :
संहृति : च भवत्येव न सन्देहः ।।

पिंडस्वरूप व पिंडाला आधारभूत असलेल्या व शिवापासून अभिन्नत्वाने वास करणाऱ्या शक्तीचे स्वरूप म्हणजे नाथसिद्धांचा चिद्विलास होय. शिवापासून अभिन्न असणारी शिवाची कुंडलिनी शक्ति वेदनशील ज्ञानरूप म्हणजे चिन्मात्र होय. शक्तियुक्त आदिनाथाची शक्ती, प्रसन्न, सुंदर व रमणीय असते. परशिवाची अभिन्न असलेली, प्रसन्न, रमणीय चिच्छक्ति व तीचा विलास म्हणजेच जीवजगत होय. जगत् हे पिंडरुप असल्यामुळे ते शिवशक्तिने परिपूर्ण होय. विलास म्हणजे शोभा. चिद्‌विलास ही संज्ञा ज्ञानदेवांनी परशिव पिंडस्वरूपासंबंधी योजली आहे. सर्वम् खलु इदम् ब्रह्म व चिद्‌विलास यांचा अर्थ एकच नव्हे काय ? जगताप्रमाणेच जीव हा पिंड होय व तोहि शिवरूप असतो. जीवशिवाचे ऐक्यच नाथपंथीय ज्ञानदेवांनी पदपिंडविवेक करून स्पष्ट केलेले आहे.

निवृत्ती ज्ञानदेवांच्या प्रतिपादनानुसार भासमान होणारे विश्व शिवाच्या अभिन्नत्वाने वास करणाऱ्या कुंडलिनी शक्तीचा विस्तार असून शिवशक्ति या परशिव पिंडाशिवाय विश्वाला स्वतंत्र अस्तित्व नाही. दृश्य जगत् स्वप्रकाशज्ञानस्वरूप आत्मतत्वाहून भिन्न नसल्याने ज्ञानी व विवेकी पुरुष जगताला ज्ञानरूप समजतात परंतु अज्ञानी मात्र भ्रमाने ज्ञानरुप जगाला शिवाच्या शक्तीहून वेगळे समजतात. गोरक्ष कालीन शैवागमी व शाक्तकापालिक असे समजत की शिवाची शक्ति सत्य असल्याने तिच्या पासून उत्पन्न झालेले विश्वही सत्य आहे. शाक्तकपालीक हे परिणाम मानणारे होते. परिणामवादात कारण स्वरूपात बदल होऊन कार्य भासते. पण कारणस्वरूपाचा त्याग न होता कार्य भासणे हे विवर्तवादात अभिप्रेत असते. नाथपंथात विवर्तवाद मान्य केलेला आढळतो. परशिव पिंड हे निमित्त व उपादान कारण होय असे गोरक्ष अमर व ज्ञानदेवांच्या ग्रंथावरून स्पष्ट होते.

श्रीगोरक्षनाथांनी आपल्या ग्रंथात पाशुपत, कालमुख व शैवमाहेश्वर या शैवागमातील संप्रदायांचे खंडन केले आहे. पाशुपत कालमुख पान्चार्थिक असून त्यांच्यावर व शैवमाहेश्वरावर वैशेशिक नैय्यायिकांचा प्रभाव आहे. हे तीनही शैवागमातील संप्रदाय असत्कार्यवादी न्यायवैशेषिक सिद्धान्ताचे पुरस्कर्ते असून कार्यकारणवादात आरंभवादी वा परिणामवादी आहेत, तर नाथपंथी अजातवाद व विवर्ताचे पुरस्कर्ते आहेत. नाथसिद्धांनी शिवापासून अभिन्न असलेली शिवाची शक्ति पिंडब्रह्मांडाला आधारभूत आहे असा

सिद्धान्त प्रस्थापित करून पिंडपदसामरस्याचा व पर्यायाने शिवशक्त्यद्वैताचा पुरस्कार केला.

नाथसिद्ध हे शिवशक्त्यद्वैतवादी होते. श्रीमत्स्येंद्रनाथांनी जो कुलाकुल विचार मांडला तो मूळचा मत्स्योदर कौल मार्गातील होता. मत्स्येंद्रनाथांनी योगिनी कौल साधना करून अकुलशिवाचे स्वरूप तंत्रागमाच्या आधारे स्पष्ट केले. अकुलशिवसत्ता एकमेवाद्वितीय असून जलतरंगन्यायाने अकुलशिवापासून कुलशक्ति उत्पन्न होते. शिवशक्ति एकाकार होत हा मत्स्येंद्रांचा प्रमुख सिद्धान्त आहे. कुलाकुलशिवशक्ति एकरूप आहेत हे स्पष्ट करताना मत्स्येंद्रनाथांनी प्रथम परशिव संज्ञा योजिली व गोरक्षांनी परशिवपिंडाचा उलगडा शक्तिचक्रसिद्धान्ताने केला. कुल व अकुलात तत्वतः भेद नाही. शिवशक्ति अविच्छन्नभावाने राहतात. पण वस्तुतः अकुलशिवापासून कुलशक्ति प्रादुर्भूत होते. शिवरूपी जलावरील शक्तिरूपी बुडबुडे दिसत असले तरी मूळचे परशिवतत्वच आहे, हे गोरक्षांचे विवेचन, अकुलशिव कुलशक्तीशी अविच्छन्नभावाने युक्त असतो; या मत्स्येंद्रनाथांच्या वचनाशी सुसंगत आहे. गोरक्षनाथांप्रमाणेच चर्पटी, चौरंगी, जालंदर नागार्जुनादि नाथसिद्धांच्या रचनेतहि परशिव पिंडाचे वर्णन येते. पिंड सर्वात असतो असा सिद्धसंकेत आहे. मत्स्येंद्रांचे पूर्वीचे व मूळ मत 'सिद्धमत' नांवानेच प्रसिद्ध होते व त्यांच्या सिद्धमतात परशिवपिंड सिद्धान्ताला मान्यता होती. परशिवपिंडाची निर्मिती शक्तिचक्रामुळे होत असल्याने मूळ अनादिशिव शक्तियुक्त होतो. प्रत्यभिज्ञादर्शनात परशिव असला तरी परशिवपिंड नाही. नाथपंथात व प्रत्यभिज्ञामतात हा प्रमुख फरक आहे. नाथपंथातील परशिवपिंडात जेवढे महत्व शिवाला आहे तेवढेच शक्तीलाही आहे. नवनाथातील चर्पटी, चौरंगी, जालंदर, नागार्जुनादि नाथसिद्धांनी सिद्धसंकेत स्पष्ट करताना पर, पद, पिंड शिवशक्तिसामरस्य इत्यादि संज्ञा योजिल्या व ज्ञानदेवानी आपल्या ग्रंथात ह्याच सिद्धसंकेताचे स्वरूप स्पष्ट केले आहे. अकुलशिवापासून प्रादुर्भूत होणाऱ्या कुलशक्तीचा विचार व शक्तिचक्राने निर्माण होणाऱ्या परशिवपिंडाचे विवेचन श्रीगोरक्षांनी पदपिंडविवेकाने केले.

श्रीगोरक्षांनी पिंड विचारात पिंडोत्पत्ति, पिंडविचार, पिंडसंवित्ति, पिंडाधार, पिंडपदसमरसभाव व नित्यपिंडावधूताचे विवेचन करून शिवशक्तिसामरस्य कथन केले. श्रीगोरक्षांनी पिंडाधारात असे स्पष्ट म्हटले आहे की, पिंडस्थ कुंडलिनी परमेश्वरीशक्ति आहे. पिंडाला शिवाच्या शक्तिचे अधिष्ठान आहे. शिवाची अविच्छन्नरूप शक्ति हे कारण व पिंड हे कार्य असा कार्यकारणभाव दोहोत असतो व कारणात कार्याचा लय होतो या न्यायानें पिंड शक्तियुक्त शिवांत समरस वा विलीन होतो. जीव व जगत् पिंडरूप असतात व पिंड शिवशक्त्यात्मक असतो.

नाथपंथातील पदपिंडाचेच यथार्थ स्वरूप ज्ञानेश्वरांच्या सर्व ग्रंथात आढळते. ज्ञानदेवांनी जसा पदपिंडभाव आपल्या ग्रंथात स्पष्ट केला तसाच ईश्वराद्वयवाद प्रतिपादन केला काय ? अद्वैतीशैवाचाच काश्मिरीशैव ईश्वराद्वय पंथ म्हणून अभ्यासकांस ज्ञात आहेच. त्याची एक शाखा जी प्रत्यभिज्ञादर्शन नांवाने विख्यात आहे त्यासंबंधी नाथपंथाची व पर्यायाने ज्ञानेश्वरांची धारणा काय हा प्रश्न महत्वपूर्ण म्हणून विचारार्ह ठरतो. या दर्शनाचा प्रवर्तक श्रीकंठ व दुर्वास असून त्याच्या परंपरेतील त्र्यंबकाने अद्वयाचा प्रसार केला. कालांतराने त्र्यंबकाच्या कन्या वंशांत कौलमताची साधना करण्यात आली. कन्यावंशातील मत अर्ध त्र्यंबक मत नांवाने प्रसिद्ध आहे. त्र्यंबक परंपरेतील सोमानंद, उत्पलाचार्य व अभिनवगुप्तांनी प्रत्यभिज्ञादर्शनाचा पुरस्कार केला. येथे हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, कौलमताची साधना अभिवगुप्तानीहि केली होती परंतु काश्मिरी शैवाचार्य कौलमताला फारसे अनुकूल नव्हते. म्हणून त्यांनी त्र्यंबकाच्या कन्यावंशजांनी पुरस्कारलेल्या मताला 'अर्धत्र्यंबक' मत नांव दिले. उलट गोरक्षमत्स्येंद्रनाथांनी नाथपंथाची उभारणी मत्स्योदर कौलसिद्धान्तावर केली. त्र्यंबकाच्या मूळ अद्वयमतावर मत्स्येंद्र पुरस्कृत अद्वैती कौलाचा प्रभाव होता हे स्पष्ट आहे पण यासंबंधाचे स्वरूप काय हे नीट लक्षांत घेणे आवश्यक आहे. तसेच त्र्यंबकाचे मूळ अद्वयमत व उत्पलदेव अभिनवगुप्तांचे प्रत्यभिज्ञा एकच काय याचाहि शोध घेणे आवश्यक आहे. म्हणून, परस्परोपकारित्व प्रारंभाला जरी दिसून येत असले तरीही अद्वैती कौल व पदपिंडविवेक करणारा नाथपंथ व ईश्वराद्वयवादी प्रत्यभिज्ञामत यांचा संबंध तसा भिन्नत्वाचा मानावा लागतो.

प्रत्यभिज्ञादर्शनात नवनाथांना मान्यता नाही. नाथपंथीयांनी शक्तिचक्र सिद्धान्ताने जी जशी पिंडोत्पत्ती स्पष्ट केली तशी पिंडोत्पत्ती प्रत्यभिज्ञादर्शनात

नाही. जीव व जगत हे पिंडरूप आहेत हा विचार काश्मिरी शैवांना अभिप्रेत नाही. जगत्सृष्टी विषयक ईश्वराद्वयवाद्याचे विचार नाथपंथाच्या पिंडस्वरूपाहून सर्वस्वी भिन्न आहेत. शिवाय मत्स्येंद्रशिष्य गोरक्षांनी विवर्ताचा पुरस्कार केला. प्रत्यभिज्ञादर्शनाला विवर्तवाद मान्य नाही.

५. ज्ञानदेवांचे शिवशक्त्यद्वैत व केवलाद्वैत

गोरखशिष्य अमरनाथांनी व गहिनीनाथांनी शिवशक्त्यद्वैत प्रमाणेच केवलाद्वैताचा पुरस्कार केला. वेदांत व सिद्धान्ताचे मीलन होऊन ज्ञानदेवांच्या तत्वज्ञानाची पार्श्वभूमी ज्ञानदेवांच्या अगोदरच्या पिढीतच झाली. श्रीज्ञानदेवांनी तेराव्या, चवदाव्या व पंधराव्या अध्यायात ज्ञानकांड स्पष्ट करताना प्रकृतिपुरुषविवेक व चराचरयोग निमित्ताने वेदान्ताचे प्रतिपादन केले आहे. डॉ. पेंडसे यांनी २१८ स्थळांची तुलना केली व आपले निष्कर्ष सांगताना त्यांनी विधान केले की ४२ ठिकाणी शंकराचार्य व ज्ञानेश्वरांचे साम्य आहे. ६८ ठिकाणी ज्ञानेश्वरांनी जे स्वतंत्र अर्थ केले ते नाथपंथाच्या सिद्धांताशी सुसंगत आहेत. एवढेच नव्हे तर ३८ ठिकाणी तर निर्गुण अर्थ शंकराचार्यांच्या पुढे जाऊन केले असे जे डॉ. म्हणतात ते अडतीस निर्गुणपर अर्थ नाथपंथाच्या सिद्धांताचे उपबृंहण होय असे आपल्या प्रत्ययास येते. ज्ञानेश्वरीत वेदांत व सिद्धांत म्हणजे नाथपंथाचे विवेचन आहे तर अमृतानुभव ग्रंथात नाथपंथी सिद्धांतावर ज्ञानदेवांचा भर आहे. ज्ञानेश्वरी व अमृतानुभव या दोन ग्रंथात परस्परविरोधी विचार नाहीत. त्याचप्रमाणे ज्ञानेश्वरीचे खंडनही अमृतानुभवांत नाही. ज्ञानदेवांनी अमृतानुभव ग्रंथात वाक्यपदीय कर्ता भर्तृहरीच्या शब्दब्रम्हविवर्ताचा संदर्भ शब्दखंडन आहे. ज्ञानदेवांनी शब्दखंडननिमित्ताने शब्दाद्वयवादावद्दल नापसंती दर्शविली व शांकरमताप्रमाणेच अज्ञानखंडन करून नाथपंथीय शिवशक्त्यद्वैतवादाचे प्रतिपादन केले. केवलाद्वैताशी पूर्ण सुसंगत व अविरोधी भूमिका घेऊन ज्ञानदेवांनी मत्स्येंद्रगोरक्षप्रणित शिवशक्त्यद्वैत मांडले आहे.

'अमृतानुभव' — एक रूपवेध

यशवंत साधु

> "Any thing is beautiful – which reveals truth,
> the spirit of Nature, the ideal, the universal, the typical."
> –आय. ए. रिचर्डस्

'अमृतानुभव' ही ज्ञानेश्वरमहाराजांची स्वतंत्र रचना. ज्ञानेश्वरी इतका हा ग्रंथ लोकप्रिय झाला नाही. कदाचित् ज्ञानेश्वर महाराजांची या ग्रंथापुरती भूमिका निराळी असेल म्हणून की काय ज्ञानेश्वरीइतके मोठेपण या ग्रंथाच्या वाट्याला आले नाही. तो अनुभवच इतका वरच्या कोटीचा आहे की पचविणे कठीण व्हावे. त्यातील तत्त्वज्ञान ज्ञानेश्वरीपेक्षा निराळे नाही. ज्ञानेश्वरीत ज्या अद्वैत तत्त्वज्ञानाची सिद्धी व्यतिरेकाने केली आहे तीच अद्वैत सिद्धी अमृतानुभवात समन्वयाने केली आहे. फरक आहे तो फक्त मांडणीचा. गीतेच्या व्याख्यानाचा श्रोतृवृंद डोळ्यासमोर ठेऊन गीतेतील प्रसंगानुरूप जीव–ब्रह्माचे ऐक्य रसपूर्ण शब्दात निवेदन करणे ही ज्ञानेश्वरीतील ज्ञानेश्वरमहाराजांची भूमिका आहे तर अमृतानुभव हा मुळातच 'सिद्धानुवाद' आहे. तो कोणत्या दोन व्यक्तींतील संवाद नाही. येथे संजय–धृतराष्ट्र, श्रीकृष्ण–अर्जुन, वक्ता–श्रोता अशी जोडी नाही. हा 'आपुलाचि वाद आपणासी' असा सिद्धानुवाद आहे.

अमृतानुभवातील १० प्रकरणातून (८०७ ओव्यातून) प्रगट झालेली मुख्य संकल्पना अद्वैताची आहे. तुम्हाला मला दिसणारे हे जग, दिसते तसे नसून त्यापेक्षा कांही निराळे आहे. त्यात वर वर पाहता भेद आहे. एक जीव दुसऱ्या जीवापेक्षा भिन्न दिसतो. एक पदार्थ दुसऱ्यापेक्षा आकाराने, नामाने, सामर्थ्याने, देश-काल–परिस्थितीने भिन्न दिसतो. म्हणूनच बाह्य-पदार्थां बद्दल लहान–मोठा, काळा–गोरा, गरीब–श्रीमंत, उच्च–नीच, वर्तमान–भूतकालीन, चर–अचर, पवित्र–पापी, चांगला–वाईट, कठिण–मृदू, सुखद–दुःखद अशी वेगवेगळी प्रतीती बहिर्मुख वृत्तीने प्रत्येकास येते. प्रत्येकाचे शरीर व त्यातील अंतर्बाह्य शारीरिक व मानसिक स्वयंचलित व्यापार (त्याचे जाणे व येणे) हे सुद्धा एक अनाकलनीय गूढ असते. पण सूक्ष्म दृष्टीने पाहिल्यास हा तिढा लवकर सुटतो. सर्वच सृष्ट पदार्थांचे तत्त्वतः पृथःकरण केल्यास सर्व वस्तूंच्या बुडाशी एक अनामिक शक्ती कार्य करीत असल्याचे जाणवते. त्या शक्तीचे प्रवर्तन अनादि कालापासून चालू आहे. अगदी विश्वाच्या प्रारंभापासून त्या शक्तीचा विलास चालू आहे. हा अपूर्व विलास, त्यातील रंगसंगती अंतर्बाह्य ज्याने जाणली त्याला वर-वर दिसणारा भेद क्षणिक वाटू लागतो. हा सृष्टीचा अपूर्व विलास ज्या अधिष्ठानावर अनादि काळापासून चालत आला आहे त्यालाच भारतीय तत्त्वज्ञानाने 'आत्मा' म्हटले आहे. हा आत्माच शिवशक्तीच्या रूपाने, तर कधी प्रकृती–पुरुषाच्या रूपाने द्वित्त होतो. अनेक स्वरूपाचे द्वैत, भेद या अधिष्ठानावरच भासतात. आत्मज्ञानाने हे सगळे भास खोटे ठरून विश्वातील सत्य, सुख, प्रकाश यांचा माणसाला शोध लागतो. सारे विस्कळित झालेले दुवे एकत्रित येतात. मी माझेपण विसरून चराचरातील चैतन्याशी एकरूप होतो. ज्या अज्ञानाने आजपर्यंत भेद दिसत होता तो क्षणात नाहीसा होऊन त्या अज्ञानाला निवृत्त करणारे ज्ञान सुद्धा लोप पावते अशी एक अनुभव अवस्था, ही अमृतानुभवातील मुख्य विचारधारा आहे. त्या पातळीवर शिव–शक्ती, गुरु–शिष्य, शब्द–शब्दाचा व्यापार, ज्ञान–अज्ञान, देव–भक्त, भोग्य–भोक्ता हे द्वैतच उरत नाही. जीवनातील संपूर्ण व्यवहारच अभेदरूप होतो. सकृद्दर्शनी या सर्व व्यवहारात असणारे द्वैत अशा अनुभवामृताच्या क्षणी पूर्ण लयाला गेलेले असते. असा हा अनुभवच अमृतरूप असतो. ज्ञानेश्वर-महाराजांनी हा अतींद्रिय अनुभव या ग्रंथात वेगवेगळ्या

निमित्ताने प्रत्येक प्रकरणातून वर्णिला आहे. कधी शिवशिवतीचे ऐक्य वर्णन करतांना तर, कधी गुरु-शिष्यातील अभेदत्व वर्णन करतांना, तर, कधी देवभक्तातील अद्वैत वर्णन करतांना, ज्ञानदेवांनी हा अनुभव कसा अपूर्व असतो हे दाखवून दिले आहे. अमृत जसे चवीला गोड, अवीट; परिणामाच्या दृष्टीने अमरत्व प्राप्त करून देणारे आणि अनुपमेय असते तसेच या पण अनुभवाचे असते. या आत्मानुभवाने संपन्न असणारा महात्मा जगातल्या सर्व वस्तूबरोबर व्यवहार करतो तो कोणत्या भूमिकेतून? हाही विषय अमृतानुभवात आला आहे. त्याचा व्यवहार असंग असतो. भोक्ता भोग्य विरहित त्याची इंद्रिये विचरतात. शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध या पंचविषयांचा विषय म्हणून तो भोग घेत नाही तर एक चैतन्यच त्याला सर्वत्र अनुभवास येत असते. त्याची एकूण विश्वाबद्दलची समजच अद्वैत–संपन्न असते असे ज्ञानदेवांनी दाखविले आहे. या स्वरूप स्थितीचे वर्णन करणारी वाणी सुद्धा जिथे कुंठित व्हावी अशा स्थितीचे वर्णन ज्ञानेश्वरांनी शब्दातून या ग्रंथभर करावे हा एक नवलावच आहे.

अमृतानुभवातील या अ–लौकिक, असाधारण व अतींद्रिय अनुभवाचे प्रगटीकरण करतांना ज्ञानदेवांचे कवित्व तितक्याच प्रकर्षाने जाणवते. ज्ञानेश्वरीत जसा प्रतिपदी काव्याचा विलास आढळतो, त्याप्रमाणे अमृतानुभवात सुद्धा तो स्पष्टपणे दिसून येतो. पण ज्ञानेश्वरीतील काव्याची मोहिनी इतकी जबरदस्त आहे की, आजवर अनेकांनी हा एक श्रेष्ठ काव्यग्रंथ म्हणून गौरविले आहे. प्रत्येक रसिक ज्ञानेश्वरीच्या काव्यात्मकतेबद्दल निस्संशय असतो. पण अमृतानुभवाच्या बाबतीत तसे नाही. त्यातील तत्त्वज्ञानाच्या मांडणीबाबत विद्वानांत तर्क वितर्क आहेत. या ग्रंथाच्या काव्यात्मकतेसंबंधी संशय व्यक्त केला जातो. यातील शिव–शक्तीचे अद्वैत, चिद्विलासवाद, मायावादाची पडझड वगैरे गोष्टीसंबंधी विद्वानात अनेक तऱ्हेचे संभ्रम आहेत. या ग्रंथाच्या रचनेच्या वेळी ज्ञानेश्वरमहाराजांच्या मनावर नेमक्या कोणत्या 'दर्शना'चा पगडा होता हे निस्संदिग्धपणे सांगता येत नाही. शांकर तत्वज्ञान, काश्मिरी शैवागम, नाथपंथ, पंढरीचा भक्तिपंथ यापैकी कोणत्या धारेत ज्ञानदेव इथे उभे आहेत हे निश्चितपणे आकलन होत नाही. यातील तत्त्वज्ञानाचे मूळ षड्दर्शने, उपनिषदे, शिवसूत्र, योगवासिष्ठ, भाष्यग्रंथ यापैकी कोणत्या ग्रंथात शोधावे असाही खूप वेळा संशय निर्माण होतो. जी गोष्ट तत्त्वज्ञानाची तीच गोष्ट अमृतानुभवातील काव्याची. काव्याच्या दृष्टीने सुद्धा या ग्रंथाच्या बाबतीत फारसे मनमोकळे व प्रसन्न अभिप्राय दिसत नाहीत.

"अमृतानुभव हा ग्रंथ म्हणजे एक शुद्ध रसायन आहे. यात शर्करा नाही आणि यास अनुपान नाही. येथे आपले काय मत आहे हे स्वच्छपणे थोडक्यात मांडले आहे.. इतर निर्भेळ व शुद्ध अर्काप्रमाणे हा जिभेला गोड लागत नाही ... भाषेच्या दृष्टीनेही ज्ञानेश्वरीतील मौज यांत नाही" (वि. ल. भावे, 'महाराष्ट्र सारस्वत' आ. ४, पृ. १५३ – १५४).

महाराष्ट्रीय ज्ञानकोशकार केतकर 'काव्य' या शब्दावरील व्याख्यानात लिहितात – "ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी किंवा अमृतानुभव, वामनपंडितांची यथार्थदीपिका यांना काव्यग्रंथ म्हणणे म्हणजे काव्यग्रंथाच्या स्वरूपाचेच अज्ञान प्रदर्शित करणे होय" (विभाग ११ पृ. क – ४४३). केतकरांचे वरील उद्‌गार फारच निराशाजनक आहेत.

"अमृतानुभवात दृष्टांतांची बहार आहे, तत्त्वज्ञानाची उंची आहे, आत्मानुभवाची सीमा आहे आणि क्वचित कोठे काव्यही आहे; हे सर्व खरे .. कवीच्या शब्दयोजनेतील मितव्यय येथे पराकोटीस गेला असून त्यामुळे ग्रंथ अति कठीण होऊन बसला आहे. एक समर्पक दृष्टांत देण्याची शैली सोडल्यास दुसरे कोणतेही काव्यांग अमृतानुभवात पोसलेले नाही. काव्यरसाची तर येथे उणीवच आहे. तात्विक विवेचनातही क्वचित शब्दावडंबर माजविल्याचा भास होतो. या ग्रंथाचे क्लिष्टत्व आणि नीरसत्वही त्याच्या लोकप्रियतेच्या आड आलेली स्पष्ट दिसतात. अत्युच्च तत्त्वज्ञान तर्कपद्धतीने व दृष्टांतांच्या सहाय्याने कसे मांडावे याचा मात्र अमृतानुभव हा एक आदर्श आहे." (डॉ. शं. गो. तुळपुळे : 'पांच संतकवी' पृ. २४ – २५).

वरील सर्व अभिप्रायात अमृतानुभवाबद्दल एक प्रकारची अढी दिसून येते. त्यातल्या काव्यवैशिष्ट्यांबद्दल फारसे कुणी प्रसन्नपणे बोलत नाही. पण वस्तुस्थिती अशी आहे की, ज्या अलौकिक काव्यगुणांमुळे ज्ञानेश्वरीचे मोठेपण सिद्ध होत असते त्या गुणांच्या बाबतीत अमृतानुभवसुद्धा मुळीच उणा नाही. 'बोली अरूपाचे

रूप दावीन' असे म्हणणाऱ्या ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरीत अद्वैत तत्वज्ञानाचे जागोजाग फक्त प्रास्ताविक केले आहे. त्याचा खरा समारोप अमृतानुभवातच झाला आहे.

ज्ञानेश्वरांची वाङ्मयीन आराधना अमृतानुभवाने परिपूर्ण झाली आहे. ज्ञानेश्वरी, चांगदेवपासष्टी, ज्ञानदेवांचे अभंग आणि अमृतानुभव या सर्व रचनेतून ज्ञानदेवांचे एक सलग वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व लक्षात यावे. केवळ ज्ञानेश्वरीतील रसपानाने तृप्त होणे अल्पसंतुष्टपणाचे लक्षण नव्हे काय ? ज्ञानदेवांचे संपूर्ण जीवनच एक वाङ्मयीन समर्पण आहे. त्याची सांगता अमृतानुभवाने झाली आहे. ज्ञानेश्वरमहाराजांना आलेला आत्मानुभव हा अमृताचा, अद्वैताचा, सामरस्याचा आहे. तो अनुभव इतरांत संक्रांत करण्याच्या धडपडीतून ही काव्यनिर्मिती झाली आहे. ज्ञानेश्वरमहाराजांची समग्र रचना साक्षेपाने पाहिल्यास त्यांच्या मनात एक खूण गाठ आहे. 'सोनियाचा दिवस आजि अमृते पाहिला' ही खूण उराशी बाळगून ते सारे कवित्व निर्माण होत असते. तो 'अमृताचा अनुभव' 'सोन्याचा दिवस' सर्वांना प्राप्त व्हावा ही धडपड ज्ञानदेवांच्या कवित्वामागे प्रकर्षाने जाणवते. त्यातूनच त्यांचे कवित्व स्फुरले आहे. येथे तत्त्वज्ञान हे निमित्त आहे. स्वानुभूती हे येथे काव्याचे माध्यम आहे. या कवीचे हृदय भावार्थदीपिकेत जसे स्वच्छ प्रतिबिंबित झाले आहे तसे ते अमृतानुभवात झाले नाही असे का म्हणावयाचे आहे ? ज्ञानदेवांच्या प्रतिभेला ज्ञानेश्वरीरचनेनंतर ओहोटी प्राप्त झाली असे का वाटते ? येथे प्रस्तुत लेखात काही उदाहरणाने पहावयाचे आहे की, अमृतानुभव हा सुद्धा रूपसंपन्न आहे. त्याचे अंतरंगसुद्धा काव्यात्मकतेने नटलेले आहे.

श्रीगुरूच्या कृपेने प्राप्त झालेली ज्ञानाज्ञानविरहित अवस्था कशी असते. त्या अवस्थेत भोक्ताभोग्यभाव कसा उरत नाही हे वर्णन करतांना ज्ञानेश्वर महाराजांनी हा विषय शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध या पंच संवेदनांवर आधारित प्रतिमांवर उभा केला आहे—

आता आमोद सुनास जाले। श्रुतीसि श्रवण रिगाले।
आरिसे उठिले। लोचनासी ॥

आपुलेनि समीरपणे। वेल्हावती विंजणे।
की माथेचि चाफेपणे। बहकताती ॥

जिव्हा लोधली रसे। कमळ सूर्यपणे विकाशे।
चकोरचि जैसे। चंद्रमा जाले ॥

फुलेचि जाली भ्रमर। तरुणीची जाली नर।
जाले आपुले शेजार। निद्राळूचि । (९–१ ते ४)

सुगंध व त्याला भोगणारे घ्राणेंद्रिय, शब्द व त्याला भोगणारे श्रवणेंद्रिय, आरसा आणि त्याला पाहणारा डोळा यांच्यातील अभेदाचा अनुभव वर्णन करतांना ज्ञानदेवांनी त्याच संवेदनाक्षेत्रातील प्रतिमाने योजून औचित्य साधले आहे. पंखा आणि वायु, मस्तक—चाफा, जिव्हा—रस, कमळ—सूर्य, चंद्र—चकोर, भ्रमर—फूल, नर—तरुणी, निद्राळू—शय्या या मिथुनातून परस्परपदार्थातील पंचेन्द्रियांचा भोग्य भोक्ता भाव तर सूचित होतोच. याशिवाय या पदार्थांतील काहींचे एक भावनिक नाते सुद्धा सूचित होते. चंद्र—चकोर, कमळ—सूर्य, भ्रमर—फूल, नर—तरुणी या युगुलातून केवळ भोग्य भोक्ता भाव सूचित होत नाही तर त्यावरोबरच उभयतातील मीलनाची, समरस्याची, आर्त उत्कटतेची भावना पण सूचित होते. या तरल संवेदनामाध्यमातून जीवन्मुक्ताचा भोग्य पदार्थावरोबर कसा अद्वैताचा व्यवहार नसतो हे स्पष्ट केले आहे. हे केवळ दृष्टांत आहेत असे म्हणता येत नाही.

शिष्यासाठी श्रीगुरुनिवृत्तीनाथांनी जे गुरुत्व स्वीकारले आहे ते वस्तुतः अभेदाच्या पातळीवरचेच आहे. फुलानेच सुगंध घेण्याकरिता नाक व्हावे तशातला हा प्रकार आहे (२–७५).

जीवन्मुक्ताची इंद्रिये विषय ग्रहणासाठी सरसावतात पण त्यांची प्रतीती विषयसुखाची नसून सर्वत्र चैतन्य हीच प्रतीती असते हे पटवून देतांना ज्ञानदेवांनी एक स्वभावोक्ति रचली आहे—

वेचूनि आणू कल्लोळ। म्हणोनि घापे करतळ।
तेथे तरी निखळ। पाणीच कावे ॥ (९–१२)

कुणी एक मनुष्य पाण्यावरील लाटा वेचण्याच्या मिषाने पाण्यात हात घालतो. पण त्याला लाटा तर मिळतच नाहीत, फक्त निखळ पाणीच हाताला लागते. त्याप्रमाणे ज्ञानी पुरुषाचा भोग्य पदार्थाशी संयोग घडतो पण तो नाममात्र असतो. 'कल्लोळ वेचूनि आणू' म्हणणाऱ्या माणसाच्या शारीरिक हालचाली वरील ओळीत सहजपणे टिपल्या आहेत.

असाच एक मनुष्य झोपला असतांना त्याला स्वप्न पडले. स्वप्नात आपण विलास भोगत आहोत असे त्याला दिसले. जागे होऊन आपण विलास भोगावेत असे त्याला वाटले आणि त्यासरशी तो उठला. पण कसले काय ? त्याचे सर्व विलास अदृश्य होऊन तो एकटाच उरला–

स्वप्नीचिया विलासा । भेटईन या आशा ।
उठिला तव जैसा । तोचि मा तो ।। (९–२३)

स्वप्नातील विलासांना जागेपणी कवटाळण्याची माणसाची अभिलाशी मनोवृत्ती, त्यामुळे त्याच्याकडून घडणाऱ्या सहज हालचाली ज्ञानदेवांनी येथे वर्णन केल्या आहेत.

कापूर हा सर्वांगाने व सर्वार्थाने परिमळच असतो त्याप्रमाणे आत्मज्ञानी पुरुषाचा इंद्रियव्यापार अनेक त्रिपुटीत (भोग्य–भोक्ता–भोग) चैतन्यरूपच असतो हे वर्णन करतांना ज्ञानदेव लिहितात–

हातापाशी स्पर्शु । डोळयापाशी रूपसु ।
जीभेपाशी मीठांशु । कोण्ही एकु ।।
तऱ्ही परिमळापरौते । मिरवणें नाही कापुराते ।
तैसे वहुतांपरी स्फुरते । तेचि स्फुरे ।। (९–१४, १५)

कापराचा हाताला होणारा मुलायम स्पर्श, डोळचाला प्रतीतीस येणारा शुभ्रपणा व जिभेला जाणवणारी गोडी हे तिन्ही प्रत्यय वरवर वेगळे वाटत असले तरी सर्वांची एकच प्रतीती ती म्हणजे सुगंध. येथे निरनिराळ्या इंद्रियांची अलग अलग अनुभूती कापराच्या संदर्भात वेगवेगळचा प्रतिमानाच्या रूपाने उभी आहे. हा कवी एखादी प्रतिमा निर्माण करतांना कांही अट्टाहास करीत असावा असे मुळीच वाटत नाही. सहजपणे तो मितशब्दांत आपले भाव जाणवून देऊन अलिप्त असतो.

शिवशक्तीचे ऐक्य वर्णन करतांना ज्ञानेश्वर महाराजांनी उभयतांवर पतीपत्नीच्या सामरस्याचे रूपकच केले आहे. हे रूपक वाचताना ज्ञानेश्वरीच्या तेराव्या अध्यायातील प्रकृती–पुरुषाच्या रूपकाचीच आठवण होते. शिवशक्ती हे म्हणण्यासाठी दोन आहेत पण या पतीपत्नीत अनादि ऐक्य आहे. स्त्रीपुरुष हा भेद येथे नावापुरता आहे. दोन टिपऱ्यातून एक नाद निर्माण व्हावा, दोन फुलातून सुगंध, दोन दिव्यातून एक प्रकाश, दोन ओठातून एक शब्द उत्पन्न व्हावा; (१–१८ ते १९) त्याप्रमाणे या दोघांच्या संयोगातून हे जग निर्माण झाले आहे. या उभयतात प्रियकर प्रेयसीचे नाते आहे. प्रियकर प्रेयसीत जसे परस्परांना सोडून राहणे अशक्य व्हावे, वियोग असहय व्हावा तशातलीच गत शिवशक्तीच्या बाबतीत आहे, मीलनाच्या क्षणी तर–

कैशी स्वसुखाची अळुक की ।
जे दोनीपण मिळूनि एकी ।
नेदेतीच कवतुकी । एकपण फुटो ।। (१–५)

अमृतानुभवाच्या पहिल्या प्रकरणातील हे पतीपत्नीचे अथवा प्रियकर प्रेयसीचे शिवशक्तीवर केलेले संपूर्ण रूपकच काव्याच्या दृष्टीने मजेदार आहे. जगाएवढे बाळ प्रसवून सुद्धा यांचे उभयतातील प्रेम कमी होत नाही. चराचर संसाराला आपल्याच ठिकाणी निर्माण करून सुद्धा या उभयतात तिसरेपण येत नाही.

मीलनाच्या वेळी स्त्रीपुरुषात न उरणारे द्वैत, लज्जासंकोच यांची संपूर्ण निवृत्ती (१–९), परस्परांच्या संगमातील अतूट गोडी या कल्पनासाहचर्यांची (Associations) योजना करण्यात ज्ञानेश्वर महाराजांची कल्पकता दिसून येते. पती हा निर्गुण निराकार असा जगावेगळा असल्यामुळे ही (शक्ती) लज्जित झाली आहे. अशा निर्गुण निराकार पतीला कसे शृंगारावे हा स्त्रीसुलभ प्रश्न तिच्यासमोर उभा आहे. मग स्वतःच्या स्वरूपापासून निर्माण झालेल्या जगालाच ती सजवते, नटवते, नामरूपाची लेणी लेववित. स्त्रीला बाळाविषयी वाटणारे प्रेम एक प्रकारे सुप्त पतिप्रेमाचाच अविष्कार असतो ही मानवसहज कल्पना मनात डोकावल्यावाचून रहात नाही–

पतीचेनि अरूपपणे । लाजोनि अंगाचे मिरवणे ।
केले जगाएवढे लेणे । नामरूपाचे ।। (१–३०)

स्त्री प्रसंगोपात्त स्वशरीराचा संकोच करून पुरुषाला प्रसन्न करते आणि एका उत्कर्टबिंदूच्या ठिकाणी पुरुष सुद्धा तिला तशीच दाद देतो हे मीलनाचे कल्पनासाहचर्य ज्ञानदेवांनी शिवशक्तीच्या ऐक्यासाठी योजून अपूर्व रसिकता प्रगट केली आहे–

अंगाचिया आटणिया ।
कांतु उवाया आणिला जिया ।
स्वसंकोचे प्रिया । रूढविली जेणे ।। (१–३२)

'अतींद्रिय परी भोगवीन । इंद्रियाकरवी' ही ज्ञानेश्वरमहाराजांची ज्ञानेश्वरीतील प्रतिज्ञा त्यांनी इथे

पूर्ण केली आहे. संसारात कधी पतीला वायकोची भीड पाळावी लागते कधी पत्नीला सुद्धा पतीची मर्जी सांभाळावी लागते. एखाद्या वेळी रागावून झोपलेल्या पतीला झोपेतून उठवून 'रससोय' खाऊ घालावी लागते (१–३४, ३६). संसारातील स्त्रीपुरुषांचे ऊन सावल्याचे नित्याचे खेळ त्यांचे साहचर्य ज्ञानदेवांनी शिवशक्तीच्या जगत् निर्मितीशी योजून आपले मानवी भावांचे सूक्ष्म निरीक्षण सूचित केले आहे. अमृतानुभवात केवळ नीरस रुक्ष चर्चा आहेत, हा गैरसमज दूर होण्यास 'या उदाहरणाने मदत व्हावी.

आपल्या स्वात्मस्थितीला धक्का न लागता कल्पित द्वैतात ज्ञानेश्वरमहाराजांनी जगाचे आदिकारण असलेल्या या शिवशक्तीला नमस्कार केला आहे. त्यांच्या दृष्टीने हा नमस्कार समुद्राच्या पाण्याने स्वतःच्या तरंगरूपी फुलांचा सुवास घेण्यासारखा आहे, (१–५९) कल्पनाच किती छान आहे ! सागर – त्यावर येणारे हलके हलके तरंग. फुलासारखे हे तरंग डोळ्यासमोर आकारू लागतात. क्षणातच विरघळणारे हे तरंग फुलाच्या क्षणिक मत्तगंधाची प्रतीती देऊन जातात. फुले, फुलांतील गंध व त्या गंधाचा आस्वादक हे सारेच इथे तरंगाकार, जलमय आहेत. या कल्पनातरंगात ज्ञानदेव वाचकांना कसे दंग करून टाकतात हे कळत सुद्धा नाही. यातून अद्वैताचा अनुभव तरंगून जातो तो वेगळाच.

केळीचा गाभा म्हणजे एक नाजुक गौरवर्णी बांधा. एकावर एक असे नुसते गोरेपान आवरण म्हणजे केळीचा गाभा. एक एक आवरण सोलून काढण्याच्या उद्योगातून शेवटी नुसती निराकार पोकळी रहावी हे कल्पनाचित्रच किती सूक्ष्म आहे ! नेहमीच्या सांकेतिक कल्पनेपेक्षा ही कल्पना निश्चित भिन्न आहे पण ज्ञानदेवांनी हे कल्पनाचित्र आपल्या शिवशक्तीच्या नमनाशी योजून (१-६४) रूपवेधी साहचर्य निर्माण केले आहे.

अमृतानुभवातील दुसरे प्रकरण हे श्रीगुरूचे सूक्तच आहे. नेहमीचा आदरभाव, नम्रता, अनन्यशरणागती हे भाव ज्ञानदेव इथे अद्वैताच्या परिभाषेत व्यक्त करतात. श्रीगुरूंनी मायारूपी कुंजराचा नाश करून मुक्तीरूपी पक्वान्नाची मला मेजवानी दिली आहे (२-३) हे म्हणतांना ज्ञानदेव कृतार्थतेने डोलत असल्याचे रसिकास जाणवलेच पाहिजे. येथे मुक्तीरूपी (मोती) पक्वान्न यातील श्लेष लक्षात यावा. श्रीगुरूची कृपादृष्टी हाच कुणी वसंत ऋतू आहे. वसंत ऋतूच्या आगमनाने जसे उपवनातील तरुवेलींना फुले फळे लगडावीत त्याप्रमाणे श्रीगुरुच्या कृपादृष्टीने शास्त्रातील सिद्धांताची सहज उकल मला झाली आहे. (२-१८) असे भावपूर्ण वर्णन करतांना शेवटी ज्ञानदेव गुरुशिष्यातील भेद विसरतात. श्रीगुरूंनी शिष्याला बोध करणे हा श्रीगुरूच्याच कल्पनेचा विलास आहे. व्यवहारात श्रीगुरू आणि शिष्य, एक ज्ञानी व दुसरा अज्ञानी, एक मुक्त व दुसरा बद्ध असा व्यवहार घडत असलेला दिसत असला तरी परमार्थतः गुरु–शिष्यात कायमचे अद्वैतच असते ही उत्क्रांत कल्पना केवळ अमृतानुभवाचाच खास विशेष म्हणावा लागेल. हे पटवून देतांना दृष्टांताचे नुसते स्फटिकाचे सर ज्ञानदेव रसिकांना सादर करतात. सोने आणि अलंकार, चंद्र आणि चांदणे, कापूर आणि सुगंध, गोडी आणि गूळ (२-६२, ६३)यात नाममात्र, व्यवहारतः भेद दिसतो. तत्वतः यातील प्रत्येकाचे परस्परातील अधिष्ठान दोन्हीपैकी कोणतेतरी एक द्रव्य असते. तसे शिष्य आणि गुरू या दोन्हींचे अधिष्ठान निर्विकल्प असे श्रीगुरूच आहेत. अमृतानुभवातील दृष्टांत हे स्फटिकासारखे पारदर्शक असतात. त्यातून प्रमेयाचे दर्शन स्वच्छपणे घडते. एऱ्हवी अद्वैत ही कल्पना रुक्षच आहे. इतर विचार जसा रुक्ष गद्यप्राय असतो त्याप्रमाणे अद्वैताची (जीव ब्रह्मैक्याची) कल्पना गद्यच आहे. पण त्याच्या सिद्धतेसाठी योजिलेल्या दृष्टांतांनी त्या विचाराला सौंदर्य प्राप्त झाले आहे. सोन्याला सुगंध यावा त्याप्रमाणे.

आता आणखी एक दृष्टांत पाहू. कल्पना करा की एखाद्याने दिवा मालवला व दिवा मालवतांनाच तो गतप्राणही झाला तर 'मी दिवा मालवला' असे कोण सांगू शकेल ? कारण येथे दिवा व दिवा मालवणारा एकाच वेळी शांत झाले आहेत. तसे अज्ञानाला संपविणारे ज्ञानसुद्धा इथे इतके व्यापक रूप धारण करते की वृत्तीच्या ठिकाणी ज्ञानाची म्हणून अशी स्वतंत्र जाणीव पण शिल्लक ठेवीत नाही. किंवा एखादा मनुष्य झोपी गेला आणि झोपीतच मरण पावला, तर त्याच्यालेखी 'मी सुखाने झोपी गेलो होतो' असे कोण म्हणेल ? (४-२८) त्याप्रमाणे आत्मज्ञानाने प्रकाशित झालेले अंतरंग अज्ञानजन्य अंधःकाराला तर घालवतेच पण हा ज्ञानदीप त्रिभुवनाला उजळून टाकीत असल्यामुळे त्याची म्हणून स्वतंत्र जाणीव उरत नाही. तुकारामाने वर्णन केल्याप्रमाणे –

सांडीली त्रिपुटी । दीप उजळिला घटी ।।

अशी ही अद्वैतानुभूती सर्वत्र, सर्वघन, व्यापक असते. असे हे अमृतानुभवातील दृष्टांत केवळ खडबडीत दाखले नाहीत तर त्यात ज्ञानेश्वरमहाराजांनी 'परतत्त्वस्पर्शा'ची जादू भरली आहे.

उपनिषदापासून आजतागायतपर्यंत आत्म्याचे रूपवर्णन सत्, चित्, आनंद या पदत्रयीने केलेले आहे. पण या पदाचे तात्पर्य आत्म्याच्या प्रतीतीत आहे. ही पदे श्रीगुरुमुखातून श्रवण केल्याने जीवाला ब्रम्हाची पदवी प्राप्त होते इतकेच नव्हे तर जीव सच्चिदानंद स्वरूप अशा आत्मभावालाच प्राप्त होतो. मग सत् चित् आनंद या पदांचे प्रयोजनच शिल्लक रहात नाही. दृष्ट्याला स्वतःचे रूप दाखवून ही पदे विराम पावतात. हे किती सुंदर दृष्टांतांनी साकार केले आहे ते पाहू. मेघ बरसतात. पाऊस पडतो. मेघांचे काम संपते. पावसाचे ओघ वाहू लागले की पावसाचे काम संपते. ओघ नदीला मिळाला की ओघ संपतो. नदी सागराला मिळाली की नदी स्वतःलाच हरवते (५–२१). किंवा फूल सुकते पण तिथेच फळ जन्मास येते. फळाचा नाश होऊन रसाचा परिपाक होतो. तृप्ती देऊन रसही नाहीसा होतो (५–२२). त्याप्रमाणे सत्, चित्, आनंद ही पदे क्रमाने एकानंतर एक स्वानुभूतीची तृप्ती देऊन संपत असतात. दृष्टांतातील सुंदर रचनाक्रम लक्षात घेता 'नवल बोलतिये रेखेची वाहाणी' हेच उद्गार बाहेर पडावेत. अमृतानुभवात अशी ही दृष्टांतांची नवलाई आहे. इथे 'फळ विउनी फूल सुके'। या ज्ञानदेवांच्या ओळी वाचतांना तांब्यांच्या 'फूल गळे फळ गोड जाहाले' या ओळीची आठवण व्हावी हा विलक्षण सुंदर योगायोग !

उसातील गोडी, फुलातील सुगंध, मिष्टान्नातील स्वादिष्टपणा, अंगअंगातील लावण्य, शरीरातील यौवन, कृतीतून निर्माण होणारे पुण्य या सर्वच कल्पना कशा टवटवीत व प्रसन्न आहेत (५–४० ते ४६). त्यांच्या नुसत्या उच्चारावरोबर दृष्टीसमोर नुसता वगीचाच साकार व्हावा. पण सर्व कल्पनातील गोडी, सुगंध, स्वाद, तारुण्य, लावण्य, पुण्य या संकल्पना कशा अखंड निराकार आहेत. त्यांना कशाचे अधिष्ठान असो अगर नसो त्यांचे म्हणून एक अस्तित्व कधी नाकारता येत नाही. त्याप्रमाणे चैतन्य सुद्धा चराचराच्या साक्षीने अनुभवास येते पण त्यावाचून सुद्धा त्याची तद्रूपता असतेच. पंचेन्द्रियांना सुखावणाऱ्या प्रतिमानांनी ज्ञानदेव जेव्हा एखादा विषय रंगवतात तेव्हा त्यातील रसाळपणाच्या लोभाने श्रवणांनाच जिभा फुटाव्यात असे वाटते. त्यातील रसग्रहणासाठी पंचेन्द्रियांत कलह निर्माण होतो; (ज्ञानेश्वरी ६–१६).

आत्मस्वरूपाविषयीचे अज्ञान म्हणजे नुसता एक अभावच आहे. कारण आत्मज्ञानाने आत्म्याचे खरे खुरे सच्चिदानंदरूप प्रगट होते व त्याक्षणी अविद्या, अज्ञान ही एक हास्यास्पद व अभावरूप घटना असते. गारुडी मंत्राने दागिने उत्पन्न करतो पण त्या अलंकाराने दरिद्री माणसाचे दारिद्र्य दूर होत नाही किंवा श्रीमंत माणसाजवळचे असे दागिने चोरीला गेल्याने तो नागवल्या जात नाही. मनात मांडे खाणे उपवासाचाच एक प्रकार असतो. मृगजळ हे असले काय आणि नसले काय, दोन्हीवेळी जमीन कधी ओली किंवा कोरडी असा फरक नसतोच. त्याप्रमाणे ही अविद्या जशी दिसते तशी असती तर भिंतीवर काढलेल्या चित्रातील पावसाने जमीन ओली झाली असती. अविद्येने होणारे जगतातील द्वैताचे भास खरे असते तर अंधार कालवून शाई करता आली असती व त्या शाईने लिहिता आले असते. शाई करण्यासाठी वेगळी खटपट कुणी केलीच नसती. घेतला थोडा अंधार आणि कालवला पाण्यात की लागला लिहायला (६–३२ ते ३६). पण असे कधी घडत नसते. त्याप्रमाणे अविद्या–आत्मरूपाचे अज्ञानसुद्धा एक निव्वळ अभाव आहे. या ठिकाणीसुद्धा प्रतिमानांची निवड करतांना ज्ञानदेवांचे कौशल्य दिसून येते. जादूगाराने तयार केलेले अलंकार, मनातील मांडे, मृगजळ, चित्रातील पाऊस, अंधार हे सर्व पदार्थच विश्वातील अभावरूप पदार्थ आहे. हे सर्व पदार्थ थोडा काळ इंद्रियांच्या प्रतीतीचा विषय होतात पण लगेच भानावर आल्यास त्यांचे अभावरूप तात्काळ स्पष्ट होते. अशा प्रतिमानांचे साहचर्य अविद्येशी निगडीत करण्यात ज्ञानदेवांचे कल्पनाचा तुर्य लक्षात येते. एकेक प्रतिमान मनश्चक्षू समोर प्रमेयाचे एकेक अंग उपांग स्पष्ट करून लोप पावत असते.

हे तुम्हाला, मला दिसणारे जग अनेकरंगी, अनेक ढंगी आहे. तत्वतः हे सारे अविद्येचेच रंगतरंग आहेत. पहात असतांना कुणालाही जगांतील नानाविध वस्तूंच्या विविध आकाराबद्दल खरेपणाविषयी कधी

म्हणून संशय सुद्धा येत नाही पण अविद्या या साऱ्या भासाला कारण असते. तिचे वास्तव स्वरूप ज्ञानदेव खालील प्रतिमेने चित्रित करतात.

इंद्रधनुष्या सिते । कवण धनवई घालिजेते ।
ते दिसे तैसे होते । साच जरी ।। (६–२५)[१]

आकाशात दिसणारे सप्तरंगी इंद्रधनुष्य आपण पहातो तेव्हा हुरळून जातो. तो सात रंगांनी धारण केलेला धनुष्याकार मोठमोठ्या धनुर्धाऱ्यांना आव्हानच वाटावे. आजवर अनेक प्रकारचे धनुर्भंग ऐकले पण इंद्रधनुष्याचा चाप ओढणारा वीरश्रेष्ठ कधी कुणी ऐकला नाही. आतापर्यंत होऊन गेलेल्या राम, अर्जुन इत्यादि धनुर्धाऱ्यांनी धनुर्भंग करून नावे अजरामर केली पण त्यांना मात्र या इंद्रधनुष्याचा चाप ओढण्याचे कसे मनात आले नाही याचे कवी मनाला नवल वाटते. हे सारे उत्प्रेक्षण (fancy) लगेच वास्तवाचा धक्का लागल्यावरोवर विरघळून जावे. कारण इंद्रधनुष्य जसे दिसते तसे कधीच नसते. ते खरोखर असते तर कोण-त्या तरी धनुर्धाऱ्याने त्यावर दोरी चढवलीच असती. तसे अविद्या ही मुळातच एक अभाव आहे. तात्पुरते तिचे कार्य भासते याला मात्र इलाज नसतो. या प्रतिमानातून सुद्धा ' रंगी सुरंगतेची आगळीक ' केवळ ज्ञानेश्वरीपुरती ज्ञानेश्वरमहाराजांनी ठेवली नाही तर तिचा विस्तार अमृतानुभवात सुद्धा प्रसंगविशेषी नमुनेदार पद्धतीने केला आहे हे लक्षात यावे.

ज्ञान आणि अज्ञान हे दोन शब्दच कसे प्रकाश-छायेसारखे आहेत. अज्ञान हे ज्ञानकाली टिकतच नसते पण अज्ञानदशेत मात्र अज्ञान आपले सार्वभौमत्व गाजवीत असते. काजव्याची चमक अंधारात असते. किंवा स्वप्नातील थाट स्वप्नापुरताच असतो. जागृत अवस्थेत सारे हास्यास्पद वाटावे. तसे अज्ञानदशेतील ज्ञानसुद्धा आडनावाचे ज्ञान असते. त्याचा जीवन्मुक्ती-साठी कधीच उपयोग नसतो. कुंभाराने केलेले मातीचे घोडे युद्धावर लढण्यासाठी उपयोगी नसतात, किंवा गारु-डयाच्या मायावी दागिन्यांनी शृंगार करता येत नाही, (६ – २ ते ४); त्याप्रमाणे अज्ञानदशेतील क्रिया मुक्तीला साधनीभूत ठरत नाहीत. इथे आलेल्या दृष्टां-तातून अज्ञान आणि अज्ञानजन्य कार्याच्या अनेक छटा स्पष्ट होतात.

अशा मनोज्ञ दृष्टांताबरोबरच मधून मधून नाट्य-पूर्ण प्रतिमान येते ते असे–

दीप्तीची लुगडी । दीपकळिके तू वेढी ।
हे न म्हणता ते उघडी । ठाके काई ।। (९–४५)

दीपकळिकेला ' तू प्रकाशाची लुगडी नेस ' असे न म्हटले तर ती ज्योत उघडी थोडीच राहणार आहे ? इथे दिव्याच्या ज्योतीला ' दीपकळिका ' संबोधण्यातच कवीची विदग्ध मनोवृत्ती लक्षात येते. ही दीपकळिका उघडी पाहून तिला वस्त्र वेढण्याची काव्यगत सूचना कवीच्या कल्पनासौंदर्याची परिसीमा स्पष्ट करते. हा कवी अनुभव ग्रहण करतांना त्याची उंची किती भार-दस्त असते हे लक्षात येते.

अमृतानुभवासारख्या गंभीर निवेदनात सुद्धा ज्ञाने-श्वरमहाराजांची प्रतिमा रसिकतेपासून ढळलेली नाही. स्त्रीचे तारुण्य, यौवनाचा बहर, पतीने तिचा केलेला अंगिकार आणि त्यामुळे तर आणखी अनावर झालेले यौवन यांचे एक इंद्रियगोचर प्रतिमान अमृतानुभवात आढळते ते असे–

प्रिया सावइले होये । ते आंगीचे आंगी न सामाये ।
येऱ्हवी तेयेंचि आहे । तारुण्य की ।। (१०–२२)

अशा मुसमुसणाऱ्या लावण्याच्या शेजारी वसंत ऋतू न आला तरच नवल –

वसंताचा आला । फळी फुली आपुला ।
गगनाचिया डाळा । पेलती झाडे ।। (१०–२३)

वसंत ऋतूचे आगमन, झाडांची गगनचुंबी उंची; फळाफुलांनी लगडून गेल्यामुळे झाडांचेही एक यौवन लक्षात यावे. सारेच कसे लोभसवाणे आहे. दोन्ही प्रतिमा शेजारी शेजारी आल्यामुळे संभ्रम निर्माण व्हावा. प्रियेच्या अंगी वसंत ऋतूचे आगमन झाले आहे की झाडांना यौवन प्राप्त झाले आहे ? अशा रूपवेधी प्रति-मानांमुळे डोळे धन्य होतात.

दाविता डोळयाही पुरो लागे धणी ।
ते म्हणती उघडिली का खाणी ।
रूपाचि हे ।। (ज्ञानेश्वरी ६ – १८)

ही प्रतिमाने कोणत्याही संकल्पनेसाठी येवोत त्यांचे म्हणून एक खास लावण्य कवीने त्यांना बहाल केले आहे. अशा रमणीय अर्थाचे प्रतिपादन करणारे शब्द क्लिष्ट, नीरस आहेत असे म्हणण्यास जीभ धजत नाही.

ज्ञानेश्वरमहाराजांच्या अमृतानुभवातील कल्पना-सृष्टीत सूर्याचे तेज, चंद्राची शीतळता, अग्नीची दाहकता,

सागराचे तरंग, मेघांची बरसात, नदीचे सागराशी मीलन, फुलाचे फळात रूपांतर, कोशकीटकाचे स्वतःलाच बद्ध करून घेणे इत्यादि विविध भौतिक घटक आहेत. ठिक-ठिकाणी कापराचा शुभ्रपणा, सुगंध, गोडी दृष्टांतरूप धारण करते. सोने आणि अलंकार, गुळाची गोडी, घट व घटाची माती, तेल आणि वात यांनी सुद्धा जागोजाग प्रसन्न व टवटवीतपणा आणला आहे.

वांझेचा पुत्र, आकाश पुष्प, कासवीचे तूप, बागुल-बुवा यांच्या निमित्ताने ज्ञानेश्वरमहाराजांनी कांही व्याज प्रश्न निर्माण करून या पारंपारिक दृष्टांतांना, आपल्या अमृतानुभवात चिरंतन सौंदर्य प्राप्त करून दिले आहे.

निद्रा–स्वप्न–जागृती या शारीरिक अवस्था, स्वप्नातील नानाविध रम्य भास यांची एक रम्य सृष्टीच ज्ञानदेवांच्या या अमृतानुभवात आहे.

तात्पर्य, अमृतानुभवातील ज्ञानेश्वर महाराजांचे अनुभवविश्वसुद्धा निखालस समृद्ध आहे. ज्ञानदेवांचे कल्पनावैभव इथे ऱ्हास न पावता उलट अधिक तेजाने तळपत आहे.

आय्. ए. रिचर्डस्‌ने केलेल्या व्याख्येप्रमाणे

"ती वस्तू सुंदर, की जी मधून सत्याचे, निसर्ग-तत्त्वाचे, आदर्शाचे, विश्वसामान्याचे, वर्गवैशिष्ट्याचे दर्शन होईल."

त्यानुसार अमृतानुभव हा सुद्धा एक सौंदर्यानु-भवच होय. या ग्रंथात केवळ शब्दावडंबर असून नीरस व विलष्ट तत्त्वप्रतिपादन आहे या समजुतीला धक्का पोचतो. हा ग्रंथ कठिण वाटतो तो यासाठी की यातील अद्वैताची संकल्पना हीच मुळात अतींद्रिय कल्पना आहे. त्यातल्या त्यात या ग्रंथाची बैठक थोडीशी निराळीच आहे. प्रतिपक्षाचे मतखंडण, वादसंवाद अशी भूमिका येथे मुळीच नाही. नाटकातील नटाचे स्वगत भाषण जसे असावे त्याप्रमाणे येथील भूमिका आहे. नटाचे स्वगत हे प्रेक्षकांसाठी असते असे म्हणता येणार नाही. नटाचेच मनोगत त्यातून व्यक्त होते. नटाचे प्रगट संवाद मात्र अख्या प्रेक्षकांसाठी असतात तसे अमृतानुभवातील उद्‌गार हे ज्ञानदेवांचे मनोगत आहे. हे मनोगत, ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरीत म्हटल्याप्रमाणे–

आता आत्मप्रभा नीचनवी ।
तेचि करूनि ठाणा दिवी ।
जो इंद्रियाते चोरूनु जेवी ।
तेयासी च फावे ।। ज्ञानेश्वरी ६–२३

त्यानिमित्ताने आलेला ज्ञानेश्वर महाराजांचा कल्पनाविलास सुद्धा ही केवळ बुद्धिगम्य गोष्ट नाही. आणि आजवर अमृतानुभवाकडे फार थोडे अभ्यासक वळले हेही त्याच्या क्लिष्टतेचे कारण आहे. मागील सातशे वर्षात फार तर १५ ते १६ अभ्यासकांचे लक्ष अमृतानुभवाने वेधले असेल. ज्ञानेश्वरीच्या पठण, मननाचा वारसा जसा मराठी माणसाला परंपरेकडून मिळाला आहे तसे अमृतानुभवाचे नाही. म्हणूनही या ग्रंथाचे क्लिष्टत्व सर्वसामान्य वाचकास वाटते.

दुसरी गोष्ट हा ग्रंथ ज्ञानेश्वरीइतका लोकप्रिय ठरला नाही, याचे कारण ज्ञानेश्वरी हे एखाद्या नटाने रंगभूमीवर केलेले प्रगट संवाद आहेत. त्यातील भाषा, निवेदन पद्धती व कल्पनासौंदर्य यांचे स्वरूपच मुळात जनसामान्याची जिज्ञासा तृप्त करणारे आहे. त्यातील कवित्वाचा आवाका परंपरेने सामान्य रसिकाच्या ओळखीचा झाला आहे. वारकरी संप्रदायाच्या प्रस्थान-त्रयीत ज्ञानेश्वरीला अग्रपूजेचा मान आहे. ज्ञानेश्वर-महाराजांच्या युगप्रवर्तक कार्याचा तो भाष्यग्रंथ आहे. ज्ञानेश्वर या व्यक्तीची व कार्याची ओळख या ग्रंथा-तूनच पटावी असे त्याचे स्वरूप आहे. थोडेसे प्रबोधन ग्रंथासारखे त्याचे स्वरूप आहे आणि शिवाय तो काव्य-ग्रंथ आहे त्यामुळे एकाच वेळी जिज्ञासू व रसिक यांचे चित्त वेधून घेण्याचे कार्य हा ग्रंथ गेली सातशे वर्षे करीत आला आहे. त्यामानाने "अमृतानुभव' एकदम वेगळा ग्रंथ पडतो. इथे कुणाच्या मनावर अध्यात्माचा संस्कार घडविण्याचा प्रश्नच संभवत नाही. 'इवलेसे रोप लावियेले द्वारी । तयाचा वेलू गेला गगनावेरी ।। मोगरा फुलला मोगरा फुलला । फुले वेचिता अतिभारू कळियासी आला' येथील काव्याचा बहर हा निखळ 'स्वान्तसुखाय' आहे. आपल्याच सूक्ष्म अनुभूतीशी ज्ञानदेव इथे तद्रूप झाले आहेत. त्यांचे रूपवेधी मन व त्या मनाने गुंफलेला शेला म्हणजे हा अमृतानु-भव आहे. ही ज्ञानदेवांची ज्ञानदेवांसाठीच रचलेली कविता आहे. हिचा आस्वादक सुद्धा त्याच कोटीचा असेल तर तो अनुभव घेऊ शकेल.

तैसे जे या अक्षरा । भेटती गाभारा ।
ते ओघ जैसे सागरा । आंतु आले ।। (१०–२८)

म्हणून अमृतानुभवसुद्धा ज्ञानेश्वरीप्रमाणेच मौलिक काव्यग्रंथ होय. भाजी मंडईत जशी गर्दी असते तशी मोतीबाजारात नसते. म्हणून मोतीबाजारातील मोत्यांचे महत्त्व कधी कमी ठरत नसते. मोती विकत घेणाऱ्याची सुद्धा एक ऐपत असते. अशी ऐपत असलेला एखादा रसिक मोत्याचे पाणी पदरात पाडून घेतो. तसे अमृतानुभवाच्या बाबतीत आहे अमृतानुभवातील विचारसौंदर्य न्याहाळण्यासाठी सुद्धा एक ऐपत हवी आहे. पहाणाऱ्यालाच पहाण्यापूर्वी एकदा आपल्याकडे निरखून आत पहाता आले पाहिजे. लाडक्या पण एकुलत्या एक मुलीचे श्रीमंत बापाने जसे भरल्या हृदयाने सालंकृत कन्यादान करावे त्याप्रमाणे ज्ञानेश्वर-महाराजांनी आपल्या 'भावार्थदीपिके'चे अक्षरशः मराठी रसिकास 'पसायदान' दिले आहे. पण आपल्या कैवल्यानुभूतीचा निजठेवा असणारा 'अमृतानुभव' मात्र चिरंतन साक्षी म्हणून ज्ञानदेवांनी शिल्लक ठेवला आहे. ज्ञानेश्वरमहाराजांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा खराखुरा वारस हा 'अमृतानुभव' आहे.

◊ ◊ ◊

ज्याला "साक्षात्कार" म्हणतात तो मला झाला असूनहि मी ज्ञानदेवां-कडे का वळलो हे सांगणारे फलटणचे कै. सदाशिव मनोहर जोशी यांनी केलेले

चांगदेव पासष्टीचे गूढार्थ विवरण

संकलक : सदाशिव मंगरूळकर

साधक तत्त्वमुमुक्षांना तत्त्वाववोघ होण्यास उप-युक्त असलेल्या "श्री चांगदेव पासष्टी" या श्री ज्ञाने-श्वरांनी रचिलेल्या ओव्या वाचून आपल्या जीवनांत फार मोठा मौलिक बदल झाला असे कै. श्री. जोशी म्हणत. " भाषा जुनी, अर्थबोघ होईना. प्रवेश होई ना"! ग्रंथ मिटला. ठेवून दिला. हे आपल्याला जमत नाही. यांतल्या कशाशी काय खायचंय हेच कळत नाही." असे आरंभी आरंभी श्री ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयाविषयी वाटूं लागल्याची प्रामाणिक तक्रार ते करीत पण जाणून घेण्याची तळमळ तीव्र असल्याने ते म्हणत, "मनाला लागलेली ही ओढ स्वस्थ वसू देईना. पहाटें जागें व्हावे. अंथरूणात उठून बसावे. कांही अभंग म्हणावे. 'परमे-श्वरा मला कांही तरी कळूं दे!' अशी आर्त मनाची मागणी मागावी. डोळ्यांतून एकसारखा अश्रूपात व्हावा, पांघरूण भिजावे इतके अश्रू !" पुढें जे. कृष्णमूर्तींच्या वाङमयाचा परिचय झाला. त्यामुळे निजसंशोधनाला मदत झाली. कै. जोशी पुढें म्हणतात, "श्री ज्ञानेश्वरी पुनः उघडली. तो काय ! भाषा नडेना, शब्द नडेना, शब्दाआड दडलेले प्रतीत होऊं लागले. मग 'अमृता-नुभव' श्रीशिवकल्याणाच्या टीकेसह वाचला. त्यांतील द्वंद्वमोह निरसन स्पष्ट झाले. चांगदेवपासष्टी वाचल्या-वर तर वाटले की चांगदेवपासष्टी ही श्री ज्ञानेश्वरांची चांगदेवाला दिलेली व्यथाहरण संजीवनी आहे. याच संजीवनीने माझीहि व्यथाहरण झाली. म्हणून या संजीवनीचा आविष्कार यथामति केला पाहिजे. !" येथूनच पुढें १९६६ साली कै. स. म. जोशी यांनी "गूढार्थ विवरण" लिहून 'चांगदेवपासष्टी'चा परिचय मराठी वाचकांना एका आगळ्या तऱ्हेने करून दिला !

"पासष्टी" ही संजीवनी कशी आहे हे श्री. ज्ञानेश्वरांच्या शब्दांत मांडायचे तर

> "जरी परमाणू एवढे । संजीवनी मूळ जोडे ।
> तरी वहु काय गाडे । भरणे येरे ।। "
> (अ. १३ श्लो. ११ ओवी ८३७)

हे संजीवनी मूळ म्हणजे "ज्ञान"! ज्ञान तरी कशाचे ? परमेश्वराचे कां ? परमेश्वर ही परिपूर्ण (Total) अशी शक्ति आहे की जिथे ज्ञाता, ज्ञेय अशी फूट नसते. त्या स्थितींत ज्ञानमयता असते. पण ती एकाची दुसऱ्याला अशी नसते ! मग प्रश्न असा येतो की परमेश्वराचे विषयी नामरूप कल्पून एवढा मोठा खेळ कां मांडला जातो ? मनुष्याला तसे केल्याशिवाय चैन पडत नाही म्हणून ! सत्य सांपडत नाही तर निदान त्याच्या कल्पनेशीच आर्त होऊन बसावेसे वाटते !

> "ते भक्त माते नेणती ।
> जे कल्पने वाहेरी न निघती ।।
> म्हणोनि कल्पितफळ पावती ।
> अंतवंत ।।"

असें ज्ञानेश्वरीत चक्क सांगितले आहे.

अहंप्रयत्नाने अहंचा कधी निरास होत नाही. प्रयत्नान्ती निरास झालेला "अहं" शिल्लक राहतो. म्हणजे प्रत्येक साधनाचे अन्ती प्राप्त साध्यांतून "साधवणारा" शिल्लक राहतो. ही आपत्ती स्पष्ट करण्यासाठी श्री ज्ञानेश्वरांनी "अमृतानुभव" ग्रंथ लिहिला. प्रत्येक प्रसंगापोटी अहंकार उद्‌भवतो हे सावधतेमुळे प्रतीत होते. एवढी एकच गोष्ट साधली तर

अहंभाव आपोआप गळून पडतो. याचे वर्णन श्री ज्ञानेश्वरीत फार मार्मिकपणें केले आहे.

" परिमळु निघालिया पवना पाठीं ।
मागें वोसफूल राहे देठी ॥
तैसे आयुष्याचिये मुठी ।
केवळ देह ॥" (अ. ९. श्लो २९ ओ. ४१३)

त्याचप्रमाणे "अहंभावो जाये । परि ऐक्य ते आधींचि आहे ।" ही ओवी महत्त्वाची आहे !

महायोगी, भगवद्भक्त व परमसिद्ध म्हणून प्रसिद्ध असलेल्या चांगदेवांपुढे समस्या तरी कोणती होती ? सत्ता, महत्ता आणि उच्च स्थान यांच्या प्राप्तीसाठी सदैव बेचैन असणे हीच ती समस्या होती. सिद्धि प्राप्त आहेत, सुख हातादाराशी आहे. पण समाधान नाही. "मी" चे प्रत्यक्षांत जें मूळ स्वरूप आहे त्याचा स्वत:जवळ मनुष्य जो पर्यंत छडा लावीत नाहीं तो पर्यंत तो सहजप्राप्त समाधानाला मुकतो. चांगदेव पासष्टी या समस्येचा निरास करते !

"मी" आणि "परमेश्वर" या दोन गोष्टी नाहींत. मीच परमेश्वरी अंश आहे असा निश्चय कर असे जे सांगितले जाते ते चूक आहे. सत्य आहे ते असे की जे कांही अनाम, अचिन्त्य, गुणातीत "आहे" तेंच सर्व आहे. तेथे मुळातच 'मी 'चा लोप आहे, अभाव आहे !

" लवण पाणियाचा थावो ।
माजि रिघोनि गेले पाहो ॥
तंव तेचि मा काय घेवो ।
माय जळा ॥ ४६ ॥
तैसे तुज आत्मयाते पाही ।
देखो गेलिया मीचि नाही ॥
तेथे तूं कैंचा काई ।
कल्पावयाजोगा ॥ ४७ ॥"

चांगदेव पासष्टीतल्या या ओव्या अत्यंत महत्त्वाच्या असून श्री ज्ञानेश्वर चांगदेवांना बोध करताना कोणत्या भूमिकेवर आहेत हे स्पष्ट होते.

देवदेवतार्चने, सगुणभक्ति, तीर्थ क्षेत्रें, नामरूपें, त्यांचीं प्रतीकें, स्वर्गनरकाच्या कल्पना, पूर्व आणि पुनर्जन्म बंध-मोक्ष यांची संपूर्ण निवृत्ति पासष्टीच्या बोधानें होते. हे चांगदेव पासष्टीचें अनन्यसाधारण महत्त्व आहे ! सत्यापेक्षा परमेश्वराच्या केवळ कल्पनेतच रमण्याच्या प्रतिष्ठेचा गौप्यस्फोट श्री ज्ञानेश्वरांनी पासष्टीत केला आहे.

"नामें जें म्हणितले तें तो नव्हे" असे विवरण करतांना श्री शिवकल्याण म्हणतात.

" नामरूप संबंधू । जाति क्रिया भेदू ।
हा आकारासीच प्रवादू । वस्तूसि नाही ॥ "

असें श्री ज्ञानदेव सांगतात. "अनात्म्याला" नांव देण्यांत भोग आहे. पण योग नाही. स्मरण जर फक्त ज्ञात गोष्टीचेंच होऊं शकते तर "अज्ञेय" परमेश्वराचें खरें स्मरण व्हावें तरी कसें ?

"जें आहे" ते अज्ञातच नव्हे तर अज्ञेय आहे. कारण त्या स्थितीला ज्ञाता, ज्ञेय असा भेदच नाही !

मानवी जीवनात आज मानवास प्राप्त असलेल्या बुद्धीच्या सदुपयोगापेक्षां विचार केला तर मानवी बुद्धिमत्ता ही शापच ठरल्यासारखी वाटते. परमेश्वराची कल्पना, त्याची निरनिराळ्या धर्मांत वाटणी, त्यावरून डोकेफोडी, विनाश, युद्धे, हेवेदावे, व्यक्तिगत स्वार्थ, सर्व नाशाची तयारी हे काय मानवी बुद्धीचे वैभव आहे ? निरनिराळ्या धर्म समजुतींनी त्या धर्मसमजुतींचे प्रावल्य असूनसुद्धा मानवावर काय सुपरिणाम केला आहे ? कसलाहि नाहीं.

खरं पाहिलं तर माणसाला काय हवं आहे ?

प्रत्येक जीवास शांतता, गरजपूर्ति, सुरक्षितता आणि आनंद एवढीच जीवनांत अवश्य असतात. पण स्वत:च्या धार्मिकतेचा टेंभा मिरविणारे आम्हीं या साध्या गोष्टी एकमेकांना लाभू देत नाही. सत्ता, मत्ता, अधिकार, स्थान, उच्चता, मुक्ति, कैवल्य, परमेश्वरप्राप्ति, सद्गति या अभिलाषेच्या पूर्तीसाठी मानवानी परमेश्वराच्या निर्मितीची कल्पना केली आहे आणि त्या कल्पनेच्या सान्निध्यांत सत्याला मात्र आपण पारखे झालों आहोत. असला परमेश्वर चोराला आणि सावाला सारखाच वाटतो. या वेड्या जगाला असल्या परमेश्वरापासून सोडवायला आणि आत्मप्रत्ययी होण्याच्या हेतुसाठी श्री. ज्ञानेश्वरांनी चांगदेव पासष्टी लिहिली ! आत्मरूप दर्शन त्याला देऊन व्यामोहापासून वांचविण्याचा प्रयत्न पासष्टीत केलेला आहे. परमेश्वराचे काल्पनिक स्वरूप समजाऊन घेता येते. पण त्याचे

(पुढील मजकूर २७८ पानावर)

ज्ञानवंतांच्या ज्ञानचक्षूतून ज्ञात झालेली ज्ञानेशांची ज्ञानेश्वरी

भा. न. मोकाशी

(१) "सर्व काव्याचा रावो" असं वर्णिलेल्या भगवद्गीतेचे ज्ञानेश्वरी हे आख्यान आहे. भागवतधर्म अथवा वारकरी संप्रदायाचे प्रवर्तक या नात्याने ज्ञानेश्वर महाराजांच्या या अलौकिक ग्रंथाला भक्तिसंप्रदायाने शिरोधार्य मानावे हे उचित आहे. ज्या सामान्य श्रोत्यांना अध्यात्मात रस वाटणे शक्य नव्हते अशा महाभागांना संत ज्ञानेश्वरांच्या अमृतातेही पैजा जिंकणाऱ्या मराठी बोलाने व त्यांच्या नित्यनूतन प्रतिभेच्या उन्मेषाने बहरून जावे असा एकूण ज्ञानेश्वरीचा थाट वाटतो.

(२) आर्त मानवाची दया येऊन त्यांना दिलासा देण्यासाठी गीतेचा अर्थ सांगण्याच्या निमित्ताने शांत रसाचा जो वर्षाव झाला तोच ज्ञानेश्वरी ग्रंथ.

"मग आर्तांचिनि वोरसें । गीताग्रंथ नमिसें ।
वर्षला शांत रसे । तो हा ग्रंथु ।।" ९८.१७८१

न्यायमूर्ती राम केशव रानडे म्हणतात त्याप्रमाणे ज्ञानेश्वरीत शांत रस हाच यजमान आहे. इतर रस पाहुणे आहेत.

(३) साहित्यसोनियाच्या खाणीतील परमभूषणच अशी ही अमर ज्ञानेशांची ज्ञानेश्वरी आहे असे म्हटले तरी चालेल. श्री ज्ञानेश्वरांच्या परिणत प्रज्ञेचा आविष्कार ज्ञानेश्वरीत ज्या काव्यात्मतेने प्रगट झाला त्याला उपमा नाही.

(४) आजपावेतो ह्या महान काव्यावर जेवढे लिहिले आहे तेवढे क्वचितच इतर ग्रंथांवर लिहिले असेल. ज्ञानेश्वरी अभ्यासून फक्त एक गोष्ट स्पष्ट होते आणि ती ही की महाराष्ट्रातील संतांचे मेरुमणि श्री संत ज्ञानेश्वर हे उपजतच ज्ञानसिद्ध असून ते पूर्णकाम जीवनमुक्त आहेत. केवळ एक ईश्वरी चमत्कार असेच त्यांचे जीवनकार्य बघून म्हणावेसे वाटते. २१–२२ वर्षांच्या अल्पायुष्यात "चांगदेव पासष्टी', "अनुभवामृत", "भावार्थदीपिका" (ज्ञानेश्वरी) आणि अनेक अभंग रचून त्यांनी जे अलौकिक ग्रंथ कर्तृत्व सिद्ध केले आहे त्या गोष्टीला जागतिक वाङ्मयात जोड नाही व तोड नाही. त्यांच्या लोकविलक्षण, प्रत्युत्पन्नमतित्वाचा व अनन्यसाधारण प्रतिभेचा फुलोरा ज्ञानेश्वरी ग्रंथात पानोपानी पाहावयास मिळतो.

(५) विशेषतः ज्ञानेश्वरीच्या अठराव्या अध्यायात त्यांचे जन्मजात अद्भुत काव्यशक्तीचे सारे पैलू विशेषत्वाने प्रकट झालेले आहेत. त्यांच्या कवित्वाचा व विभूतिमत्वाचा साक्षात्कार या अध्यायात पाहावयास मिळत असल्याने प्रस्तुत अध्यायास ज्ञानेश्वरीचा कळस असे जे गौरवाने म्हटले जाते ते अगदी यथार्थ वाटते.

(६) "अवघाचि संसार सुखाचा करीन" ही ज्यांची लोकविलक्षण प्रतिज्ञा व "हे विश्वचि माझे घर" ही ज्यांची सहज प्रवृत्ति, त्या ज्ञानेश्वरांनी विश्वकल्याणाकरिता वाग्यज्ञाने तोषलेल्या विश्वात्मक देवाकडून ज्या पसायदानाची मागणी केली आहे ती त्यांच्या वात्सल्याने ओथंबलेल्या सत् हृदयाच्या सुनिर्मल आविष्काराची निदर्शक नाही असे कोण म्हणेल ?

(पान २७७ वरून)

सत्यस्वरूप समजून घेता येत नाही, स्वतःचा गैरसमज समजून घेणें सर्वप्रथम अत्यावश्यक ठरते ! अंतःकरणाशी संपूर्ण अव्यभिचारी वृत्ती सांभाळून जीवनातील समतोल साधा आणि जगा. अंतःकरणाविषयीं बुद्धि कशी फारकत करीत असते याविषयी सतत जागरूक रहा. असे जागरूक असणें हाच खरा योगाभ्यास आहे. त्या योगे आपल्या हातून घडणारी कर्मे आपली वाट नीट काढतील. यालाच खऱ्या अर्थाने कर्मयोग म्हणतात. श्री चांगदेव पासष्टीतला गूढार्थ व संदेश हाच आहे.

◻ ◻ ◻

(७) हा ग्रंथ कसा वाचावा हे स्वतः ज्ञानेश्वरांनी खालीलप्रमाणे सांगून ठेवले आहे.

" जैसे शारदियेचे चंद्रकळे ।
माजीं अमृतकण कोंवळे ।
ते वेचिती मनें मवाळें । चकोर तलगें ॥
तियांपरी श्रोतां । अनुभवावी हे कथा ।
अति हळुवारपण चित्ता । आणुनियां ॥"

(८) थोडक्यात असे म्हणता येईल की, " म्हाटियेच्या नगरी । ब्रह्मविद्येचा सुकाळु " करण्यासाठीच माऊलीचा अवतार होता. " लोपले ज्ञान जगी । हित नेणती कोणी ॥" ही महाराजांच्या अवताराची पार्श्वभूमी. या कारणाकरताच त्यांनी अट्टाहासाने मराठी भाषेचे माध्यम स्वीकारले. अलौकिक शक्तीचा जन्मजात वारसा असूनही ज्ञानेश्वरांनी बहुजनांसाठी :

" मार्गाधारें वर्तावें । विश्व हें मोहरें लावावें ।
अलौकिका नोहावें । लोकांप्रति ॥" ३.१७१

याप्रमाणे आपले आचरण ठेवले.

त्यांच्या अवतारकार्यात ज्ञानोत्तर भक्तीला विशेष प्राधान्य आहे. ज्ञानेशांनी आपल्या प्रत्यक्ष आचरणाने व उपदेशाने उत्कट अशा क्रियाप्रधान, भावप्रधान व ज्ञानप्रधान भक्तीचा नेत्रदीपक आदर्श सर्वांच्या पुढे ठेवला आहे. हे सर्वोच्च जीवनमूल्य चिरंतन स्वरूपाचे असून, ज्ञानेश्वरी जगणाऱ्यांना " ते याचि देही याचि डोळा " दिव्यत्व संपादन करून देणारे आहे यात शंका कसली !

(९) ज्ञानवंतांच्या ज्ञानचक्षूंतून ज्ञात झालेली ज्ञानेश्वरी पाहणे रसिकांना व भक्तांना मोठे मनोरंजक, बोधक आणि रोचक वाटेल. या एकाच उदात्त उद्देशाने काही ज्ञानवंतांनी ज्ञानेश्वरीविषयक रचलेले शब्दसोपान खाली उद्धृत करण्याचा प्रपंच मांडलेला आहे.

(१) ज्ञानेश्वरी म्हणजे उच्च अध्यात्म, उत्कृष्ट तत्वज्ञान या उभ्याआडव्या धाग्यांनी विणलेली व जिला काव्याची जरतारी लाभलेली अशी बहुमोल शालजोडी आहे. मामासाहेब दांडेकर

(२) ज्ञानेश्वरी ही ज्ञानेश्वरी आहे. ती केवळ वागेश्वरी नाही. डॉ. शं. गो. तुळपुळे

(३) विश्वाच्या वाङ्मयात ज्ञानेश्वरीसारखा ग्रंथ झालेला नाही. कै. ल. रा. पांगारकर

(४) महाराष्ट्र वाङ्मयातील सर्वोत्कृष्ट असा हा ज्ञानेश्वरी ग्रंथ आहे. भाषा, साहित्य, सौलम्य, तत्वज्ञान, व्यवहार, नीतिमीमांसा, आत्मसाक्षात्कार इत्यादी कोणत्याही दृष्टीने " ज्ञानेश्वरी "कडे पाहिल्यास त्यात काही न्यून आढळावयाचे नाही.

काकासाहेब कारखानीस

(५) ज्ञानेश्वरी हा मराठी भाषेचा अलंकार आहे. द. वा. पोतदार

(६) ज्ञानेश्वरी म्हणजे सर्वांगसुंदर परमार्थरूप जीवन लेणे आहे. विनोबा भावे

(७) " आर्तांचेनि वोरसे " दुःखी लोकांना समाधान देण्यासाठी ज्ञानेश्वरी आहे. वैयक्तिक मोक्षासाठी नव्हे. बाळासाहेब भारदे

(८) ज्ञानेश्वरी ही ज्ञानेश्वराची काव्यकन्या आहे. रसिक वाचक हा त्यांचा जावई आहे. आपल्या काव्याचे सालंकृत कन्यादान करताना ज्ञानेश्वरांनी तिच्या अंगावर इतके अलंकार घातलेले आहेत की आपण मोहून जातो. न्या. राम केशव रानडे

(९) गीतेपेक्षा ज्ञानेश्वरीचे अधिक वैशिष्ट्य असे आहे की ते केवळ अध्यात्मशास्त्र नाही तर ते उत्कृष्ट काव्य आहे. काव्य आणि अध्यात्म ज्ञानेश्वरीत एकरूप झालेली आहेत. हे काव्य तीन पातळीवरून चालले आहे. ज्ञान, कर्म, भक्ती समन्वित योग हा या काव्याचा विषय आहे. या विषयाचे विवेचन करताना ज्ञानेशांनी रसानुकूल, नादमधुर, सखोल, अर्थभरित अशी शब्दयोजना करण्याची शैली किंवा रीती स्वीकारली आहे. वसंत ऋतु मधील बटमोगऱ्याची वाटोळी भरदार फुले जशी सुरेख व सुगंधित असतात तशा अर्थाने हा ग्रंथ त्यांनी रचला आहे. डॉ. शं. दा. पेंडसे

(१०) ज्ञानदेवांची भाषा फारच कोमल, मधुर, प्रौढ व वेचक आहे. वसंताच्या घरी जशी दलकुसुम संपत्ती लोळत असावी त्याप्रमाणे ज्ञानदेवांच्या संग्रही शब्दसंपत्ती व कल्पनासंपत्ती अलोट असलेली आढळात येते. त्यांच्या उपमा व रूपके प्रसंगोचित असतात. इतकेच नव्हे तर त्यात भावनेची भरारी व प्रतिभेची प्रभा या दोन्ही प्रत्ययास येतात. सारांश, तत्वज्ञानी, पंडित, कवि व भक्त या चारी भूमिका ज्ञानदेवांत एकवटल्या आहेत. वा. अ. भिडे

□ □ □

ज्ञानदेव आणि नामदेव

राजीव महाजन

नामदेवांच्या कार्याचा विचार करताना ज्ञानेश्वरांचा विचार ओघाओघाने करावा लागतोच. किंबहुना असेही म्हणता येईल की नामदेवांच्या कर्तृत्वाचे नव्हे सर्वच संतांच्या कर्तृत्वाचे श्रेय ज्ञानेश्वरांकडे जाते. श्री रामकृष्ण परमहंस हे जसे विवेकानंदांच्या व्यक्तित्वाचे शिल्पकार तद्वत्च ज्ञानदेव हे नामदेवांच्या व्यक्तित्वाचे शिल्पकार. स्वतः नामदेव सुद्धा असेच समजत असत असे त्यांच्या अभंगातील उद्गारांवरून दिसून येते. (देवाजीने घेतला त्वरे अवतार। म्हणती ज्ञानेश्वर तयालागी। नामा म्हणे माझा ज्ञानराज प्राण। तयाचे वंदीन चरण मी ।।) ज्ञानेश्वर म्हणजे प्रत्यक्ष पांडुरंगच ! महाविष्णूचा अवतार ! अशी सर्व वारकरी संतांप्रमाणे नामदेवांचीही जिवंत श्रद्धा होती. "वोळले चैतन्य सतरावे। पूर्ण नाम ओघ विठ्ठल देवे ! पव्हें घालुनी ज्ञानदेवें। जग तारिले कीर्तने ।। ९८० ।।" जगाला कीर्तनाच्या रूपाने तारण्याकरताच ह्या विठ्ठलाचा अवतार झाला आहे ही त्यांची प्रामाणिक समजूत होती. ज्ञानराज ही योग्यांची माऊली असून त्यांनी ज्ञानेश्वरीच्या रूपाने 'निगमवल्लि' प्रकट केली आहे ही त्यांची भावना होती (९१२).

ज्ञानदेवांप्रमाणेच त्यांचा परमश्रेष्ठ ग्रंथ ज्ञानेश्वरी ह्याविषयी सुद्धा त्यांच्या मनात अत्यंत पूज्यभाव वसत होता. ज्ञानेश्वरी ही "सोहंसुकृताच्या गाठी" सोडविण्याकरता तयार केलेली मराठी गीता देवीच होय (९०९). त्यात 'उघडा गुह्यार्थ सिद्ध केला' आहे (१०५७). "गीतेवरी टीका ग्रंथ केला सार। केवळ ईश्वर ज्ञानाचा हो" ह्या एकाच ओळीत त्यांनी ज्ञानेश्वर व ज्ञानेश्वरी विषयी वाटणारा आदर स्पष्ट केला आहे (१०६०). तत्कालीन परिस्थितीमध्ये ज्या विशिष्ट कार्याकरता ज्ञानेश्वरांचा अवतार झाला त्याच कार्याला सहाय्यक म्हणून नामदेवांचाही अवतार झाला. महाभारत काळात जशी कृष्ण व उद्धवाची जोडी तशीच यादवकाळात ही ज्ञानदेव–नामदेवाची जोडी !

ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीच्या रूपाने भारतीय तत्वज्ञानाचा वारसा मराठी भाषेत आणला म्हणजे ते भारतीय तत्वज्ञानाचे प्रवर्तक होते तर नामदेव हे त्याच तत्वज्ञानाचे प्रसारक व विस्तारक होते. ज्ञानेश्वरापासून तेज व स्फूर्ती घेऊन त्या बळावर सर्व संतांनी वारकरी पंथाचे लोण सामान्य जनतेपर्यंत पोहचविले. कार्याच्या दृष्टीने पाहता ज्ञानदेव व नामदेव ह्यांत पूर्ण अभेद आहे. ज्ञानदेव जसे ज्ञानी व योगी ह्यांचे राजे तसे नामदेव हे सामान्य जनतेचे राजे होते. ज्ञानदेवांनी 'ब्रम्हविद्येचा सुकाळ' केला तर नामदेवांनी 'हरिनामाचा सुकाळ' केला. ज्ञानदेवांनी महाराष्ट्राला तत्वज्ञान दिले तर नामदेवांनी ते तत्वज्ञान कसे आचरावे ह्याची शिकवण दिली. एक तत्वज्ञ तर दुसरा यशस्वी प्रचारक ! एकाचे सर्वच काही अलौकिक व असामान्य तर दुसऱ्याचे सारेच लौकिक व सामान्य !

अवघ्या बावीस वर्षाच्या आंत 'पिंडे पिंडीचा ग्रासु। तो नाथपंथाचा संकेतु।' अशी खडतर योगसाधना करून ज्याने आपले गुरुगुह्य जाणून घेतले, वारकरी संप्रदायला आपल्या तपश्चर्येचे तेज व पुण्य प्रदान करण्याकरता ज्यांनी जिवंत समाधि घेतली व आपल्या अल्पकालीन आयुष्यात आद्यशंकराचार्यांप्रमाणे परंतु महाराष्ट्रापुरते - अपूर्व कार्य केले. त्या ज्ञानेश्वरांची उंची व धारणा साधारण संसारी जनांच्या आटोक्यात येणे अगदीच अशक्य ! त्यांच्या कर्तृत्वाच्या तेजाने लोकांची दृष्टी दिपून गेली व लोक त्यांना परमेश्वर समजूनच पूजा करू लागले. परंतु आपल्या मागून केवळ आपली पूजा होऊ नये तर सर्वसाधारण लोकांनी सुद्धा ज्ञानदेव होण्याचा प्रयत्न करावा हीच त्यांची इच्छा होती. म्हणून जनतेला ज्ञानदेव बनण्यास काय केले पाहिजे ह्याची शिकवण देण्याकरता, सामान्य लोकांना ओळखीचे वाटणारे, संसारी लोकाना झेपणारे, त्यांच्या आटोक्यात असणारे, प्रत्यक्ष उदाहरण म्हणून जणू 'नामदेवांचा आदर्श' निर्माण झाला. सामान्य

माणसाप्रमाणे जीवनांतील सुखदुःखाचा अनुभव घेत घेत जीवनाचे अत्युच्च ध्येय कसे प्राप्त करून येता येते हेच जणू नामदेवांनी राष्ट्राला शिकविले. 'नामा'– सारख्या सुलभ उपायानेही 'ज्ञान' प्राप्त होते हाच त्यांचा नामदेवाच्या रूपाने दिलेला संदेश होय, 'नाम' हे साधन व 'ज्ञान' हे साध्य! किंबहुना 'नाम' आणि 'ज्ञान' ही परस्परांची भिन्न रूपेच होत असेच जणू त्यांनी सिद्ध केले. म्हणूनच ज्ञानदेवांपेक्षा नामदेवांचा उपयोग अधिक आहे. नामदेव हे ध्येयाच्या पैलतीराला नेणारे वाटाड्ये वाटतात.

ज्ञानदेवांचे सर्वच काही अलौकिक व असामान्य तर नामदेवांचे सारेच लौकिक व सामान्य! संसारात वागताना जसा एखादा सामान्य माणूस पुत्र, बंधू, पत्नी व पिता इत्यादी विविध भावांचा अनुभव घेतो तद्वत नामदेवांनी सुद्धा मानवी अंतःकरणात वास करणाऱ्या भिन्न भिन्न भावांचा उपयोग करून व त्याचे अधिष्ठान बदलवून परमेश्वर प्राप्त करून घेतला. बालभाव, दास्यभाव, सख्यभाव, व शेवटी ब्रम्हभाव (अद्वैतज्ञान) अशा एकाहून एक चढत्या श्रेणी त्यांच्या आयुष्यात आढळून येतात म्हणून आम्हा सामान्य संसारी जीवांना नामदेवांचे जीवन हे आपलेच जीवन, त्यांची सुखदुःखे ही आपलीच सुखदुःखे वाटू लागतात. त्यांची वाणी व करणी, त्यांचे विचार व आचार हे आपल्या ओळखीचे आणि आटोक्यातील वाटतात. ज्ञानेश्वरांचे उदाहरण म्हणजे सूर्यमंडळ गिळणाऱ्या बालहनुमानाच्या गगनोड्डाणासारखे अवघड वाटते तर नामदेवांचे उदाहरण म्हणजे आमच्या सारखीच साधी वाटचाल वाटते. ज्ञानेश्वर हे दिव्य व अपार्थिव कोटीतील वाटतात, उलट नामदेव सामान्य माणसाप्रमाणे पार्थिव वाटू लागतात. म्हणून त्याला नामदेवांप्रमाणे परमार्थाच्या प्रवासाची वाटचाल करावीशी वाटू लागते. असे असल्यामुळे नामदेवांमध्ये बहुजन समाजाला चेतना देण्याची शक्ती अधिक आहे. ज्ञानदेवांची भूमिका शोधाची, शास्त्रज्ञाची तर नामदेवांची भूमिका बोधाची! सामान्य लोकांना शोधापेक्षा बोधाचीच गरज जास्त असते. 'नामा' शिवाय 'ज्ञान' होऊ शकत नाही, 'नामदेव' झाल्याखेरीज 'ज्ञानदेव' बनता येत नाही हेच दोहोंच्या नामाभिधानातील मर्म आहे. ह्या दोन्हीही थोर व्यक्ती कार्याच्या दृष्टीने परस्परपूरक आहेत. ज्ञानदेवांनी घालून दिलेल्या मार्गाचे चालते बोलते उदाहरण म्हणजे नामदेव! ज्ञानेश्वर म्हणजे सिद्धांत तर नामदेव म्हणजे त्याचे स्पष्टीकरण, ज्ञानेश्वर हे साध्य तर नामदेव साधन!

नामदेवांचे थोर कार्य हेच की ज्ञानदेवांनी लावलेले वारकरी पंथाचे 'इवलेसे रोप' फोफावून त्याचे गगनव्यापी अशा प्रचंड वेलीत रूपांतर करण्याचे कार्य त्यांनी करून दाखविले; ज्ञानेश्वरांच्या कीर्तीची ध्वजा सर्वदूर पसरविली! म्हणूनच उत्तरेकडील कवी नामदेवांचा जेवढा उल्लेख करतात तेवढा ज्ञानदेवांचा करीत नाही. यावनी आक्रमणाने धीर खचलेल्या आणि निराश झालेल्या जनतेच्या ठिकाणी धर्मनिष्ठा उत्पन्न केली. ब्राह्मणापासून तो शूद्रापर्यंत, रावापासून तो रंकापर्यंत, परसाभागवतापासून तो जनाई–चोखोबापर्यंत सर्व थरांच्या लोकांना आपल्या भोवती गोळा करून व सर्वच थरातील एक एक आदर्श व सर्वोत्कृष्ट प्रत निर्माण करून जनतेला संसारात राहूनही सर्वेश्वर प्राप्त करता येतो आणि विपरित परिस्थितीतही धर्म आचरता येतो हे प्रत्यक्ष उदाहरणांनी सिद्ध केले; वारकरी पंथाचे तेज वाढवून त्याचे क्षेत्र वाढविणारा थोर पुरुष नामदेवच होय.

एका दृष्टीने नामदेवांचे कार्य ज्ञानदेवांच्या कार्याहून अधिक अवघड व व्यापक होते. कारण मुसलमानी आक्रमणापूर्वीच ज्ञानेश्वरांनी समाधि घेतली होती. तर नामदेवांना प्रत्यक्ष इस्लामच्या राजवटीतच इच्छित कार्य करावे लागले, म्हणून ते अवघड! आणि व्यापक म्हणण्याचे कारण हे की ज्ञानेश्वर हे मूर्तरूपाने अल्पकाळच जिवंत होते. उलट नामदेवांना मात्र दीर्घकालीन आयुष्य लाभले! कार्याचा मार्ग व दिशा ह्यांची आखणी कदाचित ज्ञानदेवांनी केली असेल. परंतु त्या मार्गाप्रमाणे संपूर्ण महाराष्ट्र जागृत करण्याचे कार्य नामदेवांवरच येऊन पडले. व ते त्यांनी यशस्वी करून दाखविले. आपल्या तीव्र धर्मनिष्ठेने, संघटन कौशल्याने आणि लोक कल्याणाच्या अतीव तळमळीमुळे सारा महाराष्ट्र जागृत करणे व त्याला स्वत्वापासून च्युत न होऊ देणे ही विलक्षण नवलाई नामदेवांनीच करून दाखविली. व ती सुद्धा टाळ, मृदंग आणि नामसंकीर्तन ह्या अतिसुलभ साधनांच्या बळावर! नामदेवांच्या

कर्तृत्वाची कीर्ती उत्तरेस पंजाबपर्यंत जाऊन पोहचली, शिखांच्या धर्मग्रंथात नामदेवांना स्थान मिळाले. (अर्थात त्यातील पदे ही आद्य नामदेवांची नसली तरी त्यातील उल्लेख मात्र आद्य नामदेवाचाच असावा हे उघड आहे.) गुजराथेत नरसी मेहता त्यांची कीर्ती गाऊ लागलेला आणि महाराष्ट्रात तर 'ज्ञाना'च्या बरोबरीने 'नामा'ला मान मिळून देवाच्या भजनावरोबरच त्याच्या ह्या लाडक्या भक्ताच्या नावाचेही भजन होऊ लागले. 'निवृत्ति ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई। एकनाथ नामदेव तुकाराम' हा भजनमंत्र आजही महाराष्ट्रात दुमदुमत आहे व साऱ्यांनाच तो माहित आहे.

श्री ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयाचा नामदेव वाङ्मयावरील परिणाम—

श्री ज्ञानदेवांच्या वाणीचा नामदेवांच्या वाङ्मयावर जो परिणाम झाला आहे तो दोन प्रकारचा आहे; एक तत्वज्ञानात्मक व दुसरा काव्यात्मक! वारकरी पंथाचा तत्वज्ञानात्मक ग्रंथ म्हणजे ज्ञानेश्वरी, अर्थात ज्ञानेश्वरी व संतांचे अभंग ह्यात तात्विक साम्य आढळल्यास आश्चर्य नाही व तत्वज्ञानाचा विचार येथे आपणास करावयाचा नाही. फक्त काव्यदृष्टया ह्या दोन थोर पुरुषांच्या वाङ्मयाचा परस्परांच्या वाङ्मयावर कसा परिणाम झाला ह्याचाच विचार इथे करावयाचा आहे.

(तुलनेसाठी दोघांच्याही रचनेतील साम्यदर्शक उद्धरणे समोरासमोर दिली आहेत.)

ज्ञानदेव	नामदेव
१) आकाशे सर्वत्र वसावें। वायूनें नावभरी उगे नसावे। पावकें दहावें। वर्षावें जळें॥ ज्ञा. ९–२८१ पर्वतीं बैसका न संडावी। समुद्रीं रेखा नोलांडावी। पृथ्वियां भूतें वाहावीं। हे आज्ञा माझी॥ ज्ञा. ९–२८२ म्यां बोलविल्या वेदु बोले। म्यां चालविल्या सूर्यु चाले। म्यां हालविल्या प्राणु हाले। तो जगातें चाळितां॥ ३	तुझिया सत्तेने वेदासी बोलणे। सूर्यासी चालणें तुझिया सत्ते॥ ऐसा तू समर्थ ब्रम्हांडाचा धनी। वर्म हे जाणोनि शरण आलो। मेघांनी वर्षावे पर्वती बैसावे। वायुने हिंडावे सत्ता तुझी। नामा म्हणे तुजवीण न हाले साचार। प्रभू तूं निर्धार पांडुरंग॥ ४६६
२) मोतिये मिळोनि बहुवे। एकावळीचा पाडु आहे। ज्ञा. अ. १८–५६	मकर कुंडले श्रवणी शोभती। एकावळी दीप्ति सृष्टि शोभे॥ ४७० × ३॥
३) तैसे माझिये भक्तीविण। जळो तें जियालेपण। ९–३६	भक्तिविणे जिणे जळो जिणे लाजीरवाणे ॥ १९७६॥
४) मौन गा तुझे राशिनांव। आता स्तोत्रीं के बांधो हाव। १७–१५	जिही तुज जाणितले। तिहीं मौन धरिले॥ नामा म्हणे ते पावले॥ भक्तियोगे॥ २०५२॥
५) कां कमलकंदा आणि दुर्दरी। नांदणूक एकेचि घरीं। परि परागु सेविजे भ्रमरीं। जवळिलां चिखलुचि उरे॥ ९–५८	दुर्दुरा कमलिनी एके ठायी बिढार। वास तो मधुकर घेवोनि गेला॥ १९५१ × ४

६) जो खांडावया घावो घाली ।
कां लावणी जयानें केली ।
दोघा एकचि साउली । वृक्ष दे जैसा ।।
नातरी इक्षुदंड । पाळितया गोडु ।
गाळितया कडु । नोहेचि जेवी ।।
अरिमित्रीं तैसा । अर्जुना तया भावो ऐसा ।
मानापमानीं सरिसा । होतु जाय ।।
९–१९९–२०१

जैसा वृक्ष नेणे मानापमान ।
तैसे ते सज्जन वर्तताती ।।
अथवा कोणी प्राणी येऊनी तोडिती
तया न म्हणती छेदू नका ।।
निंदा स्तुति रूप मानिती जे संत ।
पूर्ण धैर्यवंत साधू ऐसे ।। (१४७७)

७) अशाच प्रकारे ज्ञानेश्वरांचे अभंग व नामदेवांचे अभंग ह्यातही अनेक साम्य स्थळे दाखविता येतील. उदा० : – (सर्व क्रमांक आवटे गाथेप्रमाणे आहेत.)

ज्ञानेश्वरांचे अभंग	नामदेवांचे अभंग	ज्ञानेश्वरांचे अभंग	नामदेवांचे अभंग
७२८, ७३१	१६८	५३१	१८५८
८२६	१४०, ६८१	३२४	१५०१, १७१६
१५८१, १५९४	३४५	४९५, ४९६	२२६०, ६१, ६२

———

अशी ही साम्यस्थळांची यादी कितीतरी लांबविता येईल; आणि प्रयत्न केल्यास असे आढळून येईल की नामदेव – तुकारामांच्या बहुतेक अभंगांचे साम्य ज्ञानेश्वरांच्या ओवीशी अथवा अभंगाशी निश्चितपणे आढळते. काही अभंगांची पालुपदे ज्ञानदेव–नामदेवांच्या अभंगात सारखीच आढळतात. तर काही सुभाषितवजा ओळी सारख्या आढळतात.

उदाहरणार्थ :– (१) अवघाचि संसार सुखाचा करीन. (ज्ञान. ३२४, नाम. १५०१) २) देह जावो अथवा राहो (ज्ञान. – ३८५, नाम. – १५८१) ३) जववरी रे जववरी जंबुक करी गर्जना (ज्ञा. ५३१, नाम. – १८५८) ४) कुंचे पताका झळकती । टाळ मृदंग वाजती (ज्ञान. २०५, २०६; नाम. ४४) ५) आलेरे हरीचे डिंगर (ज्ञान. २०५, २०६; नाम. ४३)

तसेच विठ्ठल स्तुतीपर, पंढरीपर नाममहिमा, मनास केलेला उपदेश ह्यातही असेच विलक्षण साम्य आहे. तसेच वीज + वृक्ष, सुवर्ण + अलंकार, गंगा + सागर, सूर्य + किरणे, दीप + प्रकाश हे दृष्टांत ज्ञानेश्वर, नामदेव व तुकाराम ह्यांच्या वाङ्मयात सामान्यतः दिसून येतात. सोबत आई – मूल, कासवी व तिच्या दृष्टीतून स्रवणाऱ्या प्रेमावर जगणारी तिची पिले, गाय – वत्स, हरिणी – पाडस, मेघ – चातक, चंद्रिका – चकोर, जल आणि मत्स्य इत्यादि ज्ञानेश्वरीत ठिकठिकाणी आढळणारे काव्यमधुर दृष्टांत नामदेवांनी आपल्या अभंगातून परंतु अधिक सुबोध पद्धतीने व्यक्त केले आहे.

॥ ॥ ॥

आध्यात्मिक लोकशाहीचा संस्थापक ज्ञानराज

अरुणा कुगावकर

देवगिरीवर 'सकल कला निवासु। न्यायाते पोषी क्षितीशु।' असा रामराजा राज्य करीत होता, हे ज्ञानेश्वरीत नमूद केलेले आहे. म्हणजे ज्ञानेशाच्या काली महाराष्ट्र स्वतंत्र होता. ज्ञानेश्वरीत तत्कालीन समाजाची चित्रणे आलेली आहेत त्यावरून तो काळ संपन्न होता. द्राक्षवेलीला दूध घातले जात होते. सोन्याचा धूर निघत होता. समाजात अनेक शास्त्रे रूढ होती. विविध विद्या अभ्यासिल्या जात होत्या. वादविवाद होत त्यात अनुभवांपेक्षा आधारालाच महत्व असे.

जातिभेद तीव्र होते. जातीजातींचे आचार कठोरतेने पाळले जात. न पाळणाऱ्यास बहिष्कृत केले जाई. याज्ञिक, ब्राम्हण, जपी, तपी खूप मान्यता पावले होते. समाजात अनेक संप्रदाय होते. त्यांचे तत्वज्ञानावरून केवळ वादच नव्हे तर भांडणेही असत. मतमतांतरांच्या झगडयात सारा महाराष्ट्र बुडाला होता. मोरपिसांवर अनेक डोळे असावेत पण एकालाही दृष्टिसामर्थ्य असू नये त्याप्रमाणे आध्यात्मिक क्षेत्रात सर्वत्र अराजकता माजली होती. हेमाद्रीच्या चतुर्वर्ग चिंतामणीवरून त्या काळच्या पोकळ धार्मिक जीवनाची कल्पना येऊ शकते. २००० व्रते त्यात वर्णिलेली आहेत. व्रतं, वैकल्य, नवससायास, उद्यापन, भोजन आणि दक्षिणा या व्यतिरिक्त धार्मिक आयुष्य नव्हतेच. उच्चवर्ग अधिक अधिक श्रीमंत आणि उन्मत्त, उर्मट, उद्धट बनला होता तर नीच वर्णियांच्या लीनतेला दीनतेला सीमा उरली नव्हती. त्यामुळे सामाजिक स्वास्थ्य, समाधान नावालाही उरले नव्हते. कर्मठपणा, उच्चनीचता यांचीच शिकार होऊन बसला होता सारा समाज. देवपूजा, मोक्ष, कैवल्य, वेदाध्ययन या साऱ्या गोष्टी उच्च वर्णीयांची मिरासदारी होऊन बसल्या होत्या. नुसत्या वितंडवादाला महत्व आले होते. खरा व्यासंग कधीच लुप्त झाला होता. उरली होती फक्त धर्माची कुडी. त्या कुडीला कवटाळण्यातच धन्यता मानत होते समाजातले प्रतिष्ठित जबाबदार वर्ग. नीचांची अवस्था पराकोटीची वाईट होऊन बसली होती. त्यांना कुठलाच अधिकार नव्हता. कोणी वालीच उरला नव्हता त्यांना. बिचारे मग नीच देवदेवतांची उपासना करणे, त्यांना बळी देऊन संतुष्ट करणे यात मशगुल होऊन गेले.

या प्रमाणे गुणकर्मावरून श्रेष्ठता कनिष्ठता ठरण्याऐवजी ती जन्मावरून ठरवली जात होती. सगळा समाज पोखरला गेला होता. या निराशामय अंधःकारमय काळातच ज्ञानेशांसारख्या समाजोद्धारकाला जन्माला घालण्याची बीजे रुजली होती. हा काळ वंध्या नव्हता तर तेजप्रसवक्षम होता. ज्ञानेश्वरांनी स्वतः नीचाचे दुःख अनुभवले होते. त्या दुःखातले कंगोरे न् कंगोरे, खाचा न् खोचा त्यांना पूर्णपणे माहित होत्या. समाजकंटकावर पडून त्यांचेही पाय फाटले होते, रक्ताळले होते. या सामाजिक दुःखाच्या चरत जाणाऱ्या जखमा बांधण्याची आवश्यकता आहे ही तळमळ त्यांना लागली. या जखमांवर मलमपट्टी करण्याचे सामर्थ्य निश्चित त्यांच्याजवळ होते. त्यासाठी नाथपंथी हटयोगी मार्ग सोडून ते भक्तिप्रधान वारकरी पंथात आले. स्वतःला अभिप्रेत असा एखादा श्रेष्ठमार्ग असणे व सामान्य जनांना झेपण्यासारखा नाही म्हणून एखादा सोपा मार्ग सांगणे असा प्रकार त्यांनी केला नाही. त्यांना स्वतःला अभिप्रेत आणि जिव्हाळयाचा असणारा प्रेमभक्तीचा पंथच त्यांनी सर्वजनांना सांगितला. येथे आत एक गुरुगुह्य निराळे व बाहेर दुसरे निराळे तत्व असा प्रकार नाही. वारकरी संप्रदाय म्हणजे एखादा संकुचित वृत्तीचा व एकांगीपणाचा आविष्कार नसून विश्वात्मक पण विश्वोत्तीर्ण अशा प्रेमाची अनुभूती जीवनात वारंवार घेण्याचा मार्ग होय. अशा या विशाल व प्रेमानुभूती देणाऱ्या मार्गाचा पुरस्कार ज्ञानेश्वरांनी केला. वारकरी भक्ती द्वैती होती तिला अद्वैताची बैठक ज्ञानेश्वरांनी प्राप्त करून दिली. वारकरी पंथाचे तत्वज्ञान ज्ञानेश्वरांनी घडवले तेही आचरणाला सोपे, कर्मकांडाची कटकट रहित, नित्य व्यवहार संभाळून उपासना करता

यावी असे. देवाच्या द्वारी या पंथाने उच्चनीचपणा ठेवला नाही. आध्यात्मिक लोकशाही पंढरीच्या वाळवंटी सुरू केली. या वाळवंटावर विठ्ठलाला साक्षी ठेवून ज्ञानेश्वर आणि चोखामेळा उराउरी भेटत. देवाच्या द्वारात सगळे समान झाले. सर्वांसाठी अध्यात्माची कवाडे सताड उघडी केली या संतमहंताने, वारकरी पंथाच्या माध्यमातून ! या पंथाचा पाया घातला ज्ञानेशाने आणि कळस चढवला तुकोबाने. विलक्षण लोकसंग्रह मिळत गेला. नामाच्या गजरात भीमातीर गर्जून गेले. नामसंकीर्तनाच्या वळावर मोक्षपद वहाल करणाऱ्या या पंथाची कास अगदी दीनातला दीनही धरू लागला.

या भोळचाभाबडचा जनाला वेदांची द्वारे बंद होती. मज्जाव होता त्यांना. तेव्हा ज्ञानेश्वरांनी गीतेची कास धरली, फक्त त्रिवर्णाच्याच कानी लागणाऱ्या कृपण वेदांना ठोकरून. गीर्वाणभारतीमध्ये असणारी गीता लोकभाषेत आणण्याचे आणि ती समर्थपणे पेलू शकण्याचे कौतुक एकटा ज्ञानेशच करू जाणे. त्यांना स्वत:ला का ती मूळ स्थितीत समजावून घेणे कठीण होते ? का संस्कृतवर त्यांचे प्रभुत्व नव्हते ? सातशे श्लोकांचा संस्कृत ग्रंथ नऊ हजार ओव्यात मायभाषेत शब्द अर्थ आणि रसवद्ध करण्याचा हा खटाटोप, हा आटापीटा कशापाई ? ‘बुडती हे जन, न देखवे डोळे’ केवळ या कळवळचापायीच. त्यांच्यासाठीच तर ही बंडखोरी सरस्वतीचा हा लाडका पूत करू धजला. स्वत:च्या अनुभवांचे संकलन करणारा, घटापटाची चर्चा करणारा एखादा अवघड ग्रंथ तोही संस्कृत भाषेत निर्माण करणे या कुमारास अशक्य का होते ? या बुडणाऱ्या, अंध, अज्ञानतिमिराने ग्रासलेल्या जनतेला ज्ञानप्रकाश मिळवून देण्यासाठीच तर हा अट्टाहास. गीता सामान्यांच्या रंध्रारंध्रात मुरावी म्हणून तिचा आस्वाद कसा घ्यावा, चित्त देऊन ती ऐकावी कशी, गुरुमहती, शिष्य प्रवृत्ती, कृष्णार्जुन संवाद इत्यादि सारा प्रपंच त्यांनी विस्तारानी मांडला. मूळ विषयात स्वत:च्या कल्पकतेचे अनेक रंग भरले. पात्र, प्रसंग, संवाद यांनी विषयाला जिवंतपणा आणला. मानवी रागलोभांचे वर्चस्व प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्णावर लादले. का ? तर सामान्यांना ते तत्वज्ञान कवेत धरता यावे. तळहातावरील रत्नाप्रमाणे त्याला सर्व बाजूंनी पारखता यावे. त्याचे कुठलेही अंग जनसामान्यांना अगम्य वाटू नये. आणि त्याच्या पूर्ततेसाठी अमृताशी पैज मारणारे शब्द वेचले, रसांचे कल्लोळ उठवले, आणि प्रसादाची परिसीमा गाठली, आध्यात्मिक लोकशाहीच्या प्रस्थापनेसाठीच केवळ.

ज्ञानेशांच्या कार्यामुळे सर्वजातीतून संत जन्माला आले. भक्तीने रंगले. ज्ञानचा ढेकर अंत्यजही देऊ लागले. “रत्नजडित अभंग ओवी अमृताची सखी। चारीवर्णातून फिरे सरस्वतीची पालखी।” असा अनुभव आला. समाज एकाकार झाला. एकरस झाला. ऐकात्म्याच्या साक्षात्काराची माधुरी नि सामर्थ्य त्याला प्राप्त होऊ लागले. ज्ञानदेवांनी वारकरी ,संप्रदायाच्या रूपाने केवढे कार्य केले ! इथून महाराष्ट्राच्या भक्तीची गंगा उगम पावली. इथून महाराष्ट्राला आपण सारे एक आहोत उच्चनीचता खोटी याचा साक्षात्कार झाला. इथे महाराष्ट्राला आपल्या भव्यतेची स्वप्ने पडू लागली. इथे सारे भक्तीने भिजले. इथल्या भक्तीला भावडेपणा ठाऊक नाही. इथल्या कर्माला केवळ रूढीचा अभिशाप नाही. इथल्या योगाला अहंकाराचा दर्प नाही. इथल्या ज्ञानाला विरक्तीचा स्पर्श नाही. इथे कर्माला भक्तीने गोडी आणली आहे. इथे ज्ञानाला कोवळीक लाभली आहे, केवळ ज्ञानेशांच्या पुण्याईमुळे.

ज्ञानाची बीजे समाजाच्या सर्व थरांतून रुजत गेली, ती अंकुरली, फोफावली. दासी जनी, गणिका कान्होपात्रा, सेना न्हावी, गोराकुंभार, इ. सर्वच जातीतील संत पुढे आले. ज्ञानेश्वरांची री ओढून स्वत:च्या कुवतीप्रमाणे जनउद्धार करू लागले. स्वत:ची दु:खे वेशीवर मांडू लागले. ऐहिक जीवनापेक्षा पारमार्थिक जीवन समृद्ध करण्याचा संदेश देऊ लागले. आणि जीवन समृद्धीचा सोपा सुलभ मार्ग सांगू लागले. ज्ञानाच्या पणतीने पणती पेटत गेली. सारा वहिष्कृत समाज उजळत गेला. ज्ञानामृत पिऊन तृप्ततेची ढेकर देऊ लागला. आत्मिक सामर्थ्याने समृद्ध बनला. ज्ञान गंगा आणि भक्तिगंगा दुथडी वाहू लागल्या. नव्या चैतन्याने समाज झळकू लागला आणि पुढे मुसलमानांच्या सैतानी आक्रमणातही भक्कमपणे उभा राहून सत्व टिकवू शकला. कारण तो ज्ञानराजाने घातलेल्या भक्कम पायावर उभा होता. अनासक्त होता. पारमार्थिक जीवनात गढला होता. म्हणून तर इस्लामी ऐहिक सुखविलासाला बळी न पडता सत्व जपू शकला.

संतांची अवहेलना करताना आम्ही सहज म्हणून जातो, या टाळकुट्या संताळ्यांनी आमचा देश बुडवला, पुरुषार्थ बुडवला, क्रियाशीलतेचे खच्चीकरण केले. भोळा भाबडा भाव जागृत केला. हे विठ्ठल विठ्ठल करीत बसले आणि मुसलमानांनी सारा देश गिळंकृत केला. प्रवृत्ती-वादी वृत्ती उरलीच नाही. ' ठेविले अनंते तैसेची रहावे ' या वृत्तीमुळे कुठे प्रतिकाराची भावनाच उरली नाही, प्रज्वलीत झाली नाही. आणि देश परचक्राच्या रणधुमा-माळीत चिरडला गेला. अशा मतांना राजवाड्यांसारखे मान्यवर प्रतिभावंत दुजोरा देतात. तेव्हा वाटते खरेच त्या काळात समाजात प्रवृत्तीधर्माची रग उरलीच नव्हती का ? हा सारा दोष संतांच्याच माथी का मारा-यचा ? सगळा देशच निवृत्तीवादी झाला होता. सगळा समाज पोखरला गेला होता. हचा समाजाची कीड झट-कून टाकण्याचे महत्वाचे कार्य या संतांनी केले. प्रवृत्ती निवृत्तीची त्यांनी सांगड घातली, समन्वय साधला. शियील, सुस्त समाजात जागृती निर्माण करण्याचे, तो एकसंघ, एकात्म बनवण्याचे दुर्घट कार्य या संतांनी साधले. न्या. रानडे म्हणतात, ज्ञानेश्वरांपासून तुकोबां-पर्यंत देव, धर्म, संस्कृति यांची प्रीति वाढवली. त्याचा परिणाम असा झाला की मुसलमानांचे राज्य येऊनही आपल्या धर्मावरचा विश्वास आदर ढळला गेला नाही. आपल्या धर्मप्रेमाच्या वळावर त्यांनी मुसलमानांना हरवले. शिवाजी जन्माला घालण्याची पार्श्वभूमी त्यांनी तयार केली. सामाजिक संघटना संतांनी केली. भागवत धर्माच्या झेंड्याखाली सर्व लोक एकत्र आले. संतांच्या या कार्याला कुठेही तोड नाही. संतांचे वाङमय झोपडी झोपडी पर्यंत गेले.

वि. द. घाटे म्हणतात ग्यानवा तुकाराम आणि कंपनीने महाराष्ट्राला अॅस्प्रोच्या गोळ्या वाटल्या. स्पृश्यास्पृश्यतेच्या वेदना तात्पुरत्या थांववणाऱ्या, पण त्यामुळे दुखण्याचे मूळ नष्ट होत नाही. संतांनी फक्त अध्यात्मात समानतेचा पुरस्कार केला. पण सर्व समाजात नाही. तो समाज, तो काल आठवता सुधारणा करण्यात घाईगर्दी केल्याने परिणाम काय भोगावा लागतो याचे उत्कृष्ट उदाहरण चक्रधर आहे. चक्रधराने कुठलेच विधिनिषेध न मानता स्वतःचा पंथ उभा केला. पण ज्या समाजात हा पंथ उभा करायचा त्याची कुवत त्याने अजमावली नाही. या सुधारणा एकदम समाजाच्या पचनी पडणाऱ्या नव्हत्या म्हणून त्या प्रवर्तकालाच समाजाने कंटकाप्रमाणे दूर फेकून दिले. समाजात सुधारणा घडवून आणताना समाजाच्या धारणेची नाडी अचूक सापडणे आवश्यक असते. तीच नाडी वारकऱ्यांना सापडली. त्याच्या अनुषंगाने त्यांनी समाज सुधारणा घडवून आणली. आध्यात्मिक क्षेत्रापुरतीच लोकशाही प्रस्थापित केली. बाह्य स्थिती अनुकूल असल्याशिवाय नुसत्या विचारप्रवर्तनाने सामाजिक क्रांती कधीच घडून येत नाही म्हणून सामाजिक प्रश्नांच्या वाटेला न जाता धार्मिक क्षेत्राकडेच आपली दृष्टी वळविली. कर्मकट-कटीच्या जंजाळातून समाजाला मुक्त केले. त्यातच त्यांना अमोघ यश प्राप्त झाले. जातीय विषमतेची तीव्र धार त्यांनी बोथट केली. शास्त्रीय चौकट न दुभंगवता ! स्त्री, शूद्रांना अध्यात्माचे द्वार खुले केले. अंत्यज अग्रज हा भाग काढून टाकला आणि माणूस समान आहे हे सिद्ध करून टाकले.

ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी पूर्ण झाल्यावर पसायदान मागितले ते अखिल विश्वासाठी; मानवजातीसाठी, ' भूतां परस्परे पडो मैत्र जीवाचे । ' या ध्यासासाठी. सर्वसामान्यांच्या उद्धारासाठी. त्यांच्यावद्दल कळवळा दाटून आल्यानेच हा एवढा ज्ञानेश्वरीचा प्रपंच घडला. सर्वांना देवाच्या द्वारी रूजू होता यावे म्हणून तर ही धडपड. आध्यात्मिक लोकशाही प्रस्थापित केली ती या योगीराजाने. आणि पुढे त्याच्या अनुयायांने तिला वळकटी आणली आणि विस्तारित केली.

आजच्या विफल भासणाऱ्या जीवनात तीव्रतेने आठवण येते ती या संतांची. आज जिकडे तिकडे जातीद्वेष सुरू आहेत. एककेंद्रीयता कुठेच उरली नाही. प्रत्येकजण स्वतःच्या जातीपुरते पाहतो आणि एवढ्यावरच न थांवता जातीद्वेष करतो आहे. या शापातून मुक्त करण्यासाठी सर्वत्र खऱ्या अर्थाने लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी, गुणकर्मावरून माणसांचा उत्कर्ष प्रकर्षित होण्यासाठी या संतांच्याही पुढे जाऊन कार्य करण्याची आवश्यकता आज भासते. आज आम्हाला ज्ञानेश्वरांच्या पसायदानाची नितांत गरज आहे. विश्वव्यापी विचार करण्याची ज्ञानराजाची आज पावलो पावली आठवण होते. मनःशांतीचे विश्रा-मधाम म्हणून महत्व वाटते ज्ञानेशाच्या ज्ञानेश्वरीचे.

विश्वरूपदर्शन

अंजली विनीवाले

विश्वरूपदर्शन. अर्जुनाच्या भावजीवनातला एक भव्योदात्त, अद्‌भुत क्षण. देव आणि भक्त यांच्या नात्याची अत्युच्च मर्यादा. गीतेतला हा क्षण ज्ञानेश्वरीत अधिक गहिरा होतो. ज्ञानेश्वरीतील विश्वरूपदर्शन बघितलं की गीतेत त्याचे केवळ मुद्दे सांगितले आहेत असं वाटतं. [अर्थात गीता व ज्ञानेश्वरी यांच्या निर्मितीमागची परिस्थिती वेगळी होती.]

'पश्य मे पार्थ रूपाणि शतशोऽथ सहस्रशः।
नानाविधानि दिव्यानि नानावर्णाकृतीनि च ॥'

गीतेत, 'नानाविधानि दिव्यानि' म्हणजे कसं? हे आपल्या कल्पनाशक्तीवर सोडलेलं असतं. विस्ताराला जागा सोडलेली असते. गीतेतील अशी अनेक स्थळं ज्ञानेश्वरांनी विस्तारली आहेत. पाचसहा स्वरांच्या साह्याने गायक रागाची वेगवेगळी अंगं, त्याचे लहान-मोठे आकार उभारतो, तसं ज्ञानेश्वर करतात. मूळा-मध्ये गीतेत 'नानाविधानि' असं नुसतं वर्णन येतं. तर ज्ञानेश्वर खरोखरच नानाविध रूपं दाखवून देतात :–

'एकें शांतें सदमदें । स्तब्धें एकें सानंदें ।
गर्जतें एकें निःशब्दें । सौम्यें एकें ॥

'एकें कृशें एकें स्थूळें' अशा साध्या आकारा-पासून सुरवात करतात. आणि 'एकें सरागें जैंसि सेंदुरें। डवरले नभ' इथपर्यंत अनेक आकारवलयं निर्माण करतात. देवाच्या रूपाची विविधता एकदम आपल्या अंगावर सोडतात. वर सांगितल्याप्रमाणे कधी आकारां-तून तर कधी वेगवेगळया रंगच्छटांतून. 'एके तप्ततांम्र तांबडी । एकें श्वेतचंद्रचोखडीं' भूमिका अशी की कृष्ण अर्जुनाला आत्मस्वरूपाविषयी सांगतो आहे. परंतु वाचतावाचता आपल्याला जाणवतं की एका वेगळया पातळीवर ज्ञानेश्वरांचा श्रोत्यांशी संवाद चालला आहे. देवाचे रूप त्यांच्या भाषेत प्रकट होत आहे; उदा०:– 'जेयातें सांघावेया वेद बोवडे । पाहावेया काळाचे आयुष्य तोकडे' असा खास ज्ञानेश्वरांचा उद्‌गार मधूनच येतो.

ज्ञानेश्वरांची भूमिका दुहेरी आहे. एका बाजूने ते निवृत्तिनाथांचे शिष्य व भक्त आहेत. ही भूमिका अर्जुनाच्या भूमिकेशी समांतर आहे. दुसऱ्या बाजूने ते समोरच्या श्रोत्यांचे एक प्रकारे गुरु किंवा शिक्षक आहेत. (विनम्र भावाने त्यांनी तसे म्हटले नाही तरीही) ही भूमिका कृष्णाच्या भूमिकेशी समांतर. ज्ञानेश्वरांच्या दुहेरी भूमिकेचा या अध्यायात विशेष प्रत्यय येतो. विश्वरूपदर्शनाचा भव्योदात्त क्षण विविध प्रकारे अनुभवणारा अर्जुनही त्यांनी चांगला समजून घेतला आहे, आणि आपली अनेकविध स्फुरणं मुक्तपणे दाखवणारा श्रीकृष्ण देखील समजून घेतला आहे.

विश्वरूपदर्शनाने भांवावलेला, भयचकित, विनम्र, गंभीर झालेला, मुळापासून हादरून गेलेला अर्जुन ज्ञाने-श्वरांनी कसा उभा केला आहे? याचाच विचार मी मुख्यतः करणार आहे.

पहिल्या दहा अध्यायांतून एक गोष्ट अर्जुनाच्या मनावर पक्की बिंबली आहे. – या जगातल्या साऱ्या घडामोडी, युद्धं, महायुद्धं, मृत्यू, जन्म, वेगवेगळया क्रियाप्रतिक्रिया या साऱ्याला आपण निमित्तमात्र कारणीभूत आहोत. या घटनांमागची सूत्रं आपल्या हातात नसतातच. आपण सारं अपरिहार्यपणं देवाच्या आज्ञेनुसार करतो. अकराव्या अध्यायाच्या सुरवातीला अर्जुन याची कबुली देतो. आत्मपरीक्षण करतो. आपल्या चुकांची, मोहांची त्याला जाणीव होते. 'नाथिलें आपणपें येक मानिलें । आणि नव्हतेया नांव गोत्र ठेविलें॥

आपल्या ठेंगण्या, खुरट्या रूपाशेजारी त्याला कृष्णाचे प्रचंड रूप उभे दिसते. साहजिकच ते रूप संपूर्ण स्वरूपात पाहाण्याची उत्सुकता त्याच्या मनात निर्माण होते. हे औत्सुक्य एका ज्ञानवंत, जिज्ञासू भक्ताचं औत्सुक्य असतं. त्याच्या मनाची तहान लहानसहान गोष्टींनी भागणारी नसतेच मुळी.

'तूझें विश्वरूप आकळे । ऐसें करावे गोपाळें ।
तरी चि आर्तीचे डोहोळे । पुरती देवा ।।'

आपल्या मर्यादांची त्याला जाण नाही अशातला भाग नाही. पण तरीही ज्ञानलालसा दुर्दम्य आहे. शिवाय देवाच्या उदारपणावर त्याचा भरोसा आहे. 'तू अपात्रीं हीं उदारू' असं तो देवाला, पूतनेचं, शिशुपालाचं उदाहरण देऊन सांगतो. देवाच्या उदारपणावरील विश्वासामुळेच 'तुझें विश्वरूप आघवें। माझिये दीठीसि गोचर होआवें' अशी इच्छा तो प्रकट करतो. या प्रसंगीचे अर्जुनाच्या मनातील हेलकावे ज्ञानेश्वरांनी चांगले टिपले आहेत. कधी अर्जुन देवाला आपल्या मर्यादा आपल्या तोंडाने सांगतो, कधी देवाच्या उदारपणाला आवाहन करतो आणि कधी स्वत:च्या उणीवांची पूर्ण जाणीव असल्याने 'आपल्याला कदाचित् विश्वदर्शन होऊही शकणार नाही.' असं त्याला वाटतं. वाया चि पंचमालापें बधिरा। सुख केऊते देणे।

मग अर्जुनाला दिव्यचक्षू मिळतात. कृष्णार्जुनांच्या नात्यातील काही खेळकर, मिस्किल पदर ज्ञानेश्वरांनी इथे उलगडून दाखवले आहेत. दिव्यचक्षू देण्यापूर्वी देव म्हणतो,

'आम्हीं विश्वरूप तरि दाखविलें। परि नेदखसि तूं' आणि लहान मुलाने पुन:पुन्हा वेगवेगळ्या मार्गांनी हट्ट करावा तसं अर्जुन करतो. 'तुम्हीं बकाकरवि चांदिणें। चरौ पाहां' 'हां हो उठूनियां आरिसा। आंधळेया पुढे दाखऊं वैसां।'

'मला विश्वरूपदर्शन कसं करवायचं? ते तूच ठरव' असं अर्जुनाला सुचवायचं असतं. दिव्य डोळे मिळतात तेव्हा अर्जुनाच्या दृष्टीची क्षितिजंच मावळतात. सारंच अद्भुत, भीती वाटावी इतकं भव्य असतं. 'दिशांचे ठाये हारपले। अधोर्ध्व काइ नेणों जालें।' एकाच वेळी वेगवेगळ्या, परस्परभिन्न गोष्टींचे परिणाम होऊन अर्जुनाचं मन भिरभिरायला लागतं. देवाची कधी आत्यंतिक सुंदर, मनोहर रूपं पाहून त्याचं मन थरारावं तर एकदम त्याच्यापुढे अक्राळविक्राळ, भयदायक रूपं आकारतात. मनाची प्रतिक्रिया तरी काय व्हावी? हेच समजेनासं होतं. प्रदर्शनात हरवलेल्या लहान मुलासारखी स्थिती होते. अगदी दिव्यचक्षू लाभूनही मनाचा तोल सांभाळणं त्याला कठिण होतं. 'कि आनंदाचि वनें सांसिनली' 'नां तरि भयाचि दुर्गें पानासिली।' असं ज्ञानेश्वरांनी या अवस्थेचं वर्णन केलं आहे. सूक्ष्मदर्शकयंत्रातून अगदी बारीक वस्तूचं magnified स्वरूप आपल्याला दिसावं, तसं अर्जुनाला सारं दिसलं. हात डोळे नाक कान अशा अवयवांतून सरळ दिसणारं कृष्णाचं एक शरीर वाढतावाढता इतकं मोठं होत गेलं की,—

'मग म्हणे चरण ते कवणीकडे।
केऊते मुकुट दोहंडे।'

अशी स्थिती आली. या स्थितीत प्रकाश, तेज, सौंदर्य, भीती साऱ्याचाच अतिरेक झाला. 'जेयांचेया किरणांचेनि खरेपणें। नक्षत्रांचे होति फुटाणे.' हे प्रखर तेज अगदी जवळून पाहणारा, अनुभवणारा अर्जुन कसकसा बदलत गेला याचे एक चित्र विश्वरूपदर्शनाच्या बरोबरीने ज्ञानेश्वर सतत रेखाटत असतात.

'वारिषियेचिये प्रथमदशे।
वोहळलेया शैलाचें सर्वांग जैसें।
विरूढे कोवळां अंकुरीं तैसे। रोमांच आले॥'

ज्ञानेश्वरांच्या भाषेच्या कोवळिकेबद्दल येथे पुन्हा काय बोलावं? बोलण्यासारखं काही उरतच नाही. अर्जुनाच्या अवस्थेचं त्यांनी केलेलं वर्णन उद्धृत करणं इतकंच फक्त हातात उरतं. अर्जुनाच्या आयुष्यातला हा एक फार वेगळा अनुभव असतो. तो चकित होतो. शहारून जातो. त्याचा तो असा उरतच नाही. त्याचे अष्टसात्विकभाव कसे हळुवारपणे, फुंकर घालावी तसे जागृत होतात.

'माझि सांपडलेनि अलिउळें।
जळावरी कलिका जेवि आंदोळे।
तेवि श्वासोर्मीचेनि वळें। कांपतसे॥'

अर्जुनाचं सारं अस्तित्वच उचंबळून येतं. इतका प्रचंड महायोद्धा एका अगाध दर्शनानं अगदी कोवळा होऊन जातो. आताआता पर्यंत सखा वाटणारा श्रीकृष्ण या क्षणाला सारं व्यापून उरतो. त्या विश्वरूपात अर्जुनाचं अस्तित्वही सामावून घेतलं जातं. 'पार्थाचें पाहाणें आणि न पाहणें। तेयाही सकट नारायणें। व्यापूनि घातलें।'

अर्जुन आता एका नव्या दृष्टीने देवाकडे पाहू लागतो. विश्वामागच्या एका विशाल निसर्गशक्तीने आपल्यासाठी युद्धात आपलं सारथ्य करावं या गोष्टीमुळे तो सद्गदित होतो. त्याचं मन कृतज्ञतेनं भरून येतं.

'ऐसा पवाडू मांडौनि विश्वाचा। तू कोणु पां एथ कैंचा।
ऐसें पाहे तंव आमचा। सारथी तो तू॥'

अर्जुन उत्स्फूर्तपणे श्रीकृष्णाची स्तुती करू लागतो. ही स्तुती आंधळेपणाने केलेली नसते. एका प्राकृतिक शक्तीचा प्रत्यक्ष अनुभव घेऊन नंतर मनात जाणवलेल्या गोष्टी तो स्तुतीतून उच्चारत असतो. देवाबद्दल त्याला जाणवलेलं एकएक सत्य तो बोलून दाखवू लागतो. 'तूं कोण्हाचा ही नव्हसि । अनादिसिद्धु ।' किंवा 'तुवाविण कोण्हीकडे परमाणु हि एतुला कोंडें । अवकाशु पाहात असे परि न संपडे । व्यापिले ऐसे तुवा ।'

या विश्वरूपदर्शनात एक क्षण असा येऊन ठेपतो की त्यावेळी अर्जुनाला हे प्रखरपण असह्य होतं. पाहावं तिकडे सूर्यांचे समुदाय व युगान्त करू पाहणाऱ्या विजा. तृतीय नेत्रातून धगधगणारी देवाची संहारशक्ती. 'आता दिव्यज्ञानाचा हि डोळां । पाहवे ना ।' अशी अर्जुनाची स्थिती होते. त्या तेजाबद्दल वाटणारं महाभय व कसलं तरी गूढ दु:ख त्याच्या मनात दाटून येतं. पहिल्या मनोहर रूपापेक्षा हे काही वेगळंच रूप असतं. त्यात एक प्रकारची उग्रता असते. रुद्र, वसू, गंधर्व, यक्षकिन्नर, समोरची अफाट कौरवसेना, कर्ण, दुर्योधन यांसारखे पराक्रमी वीर या अफाट रूपात गिळले जाताना अर्जुनाला दिसतात. 'आले मरणरसाचे लोंढे आम्हावरी' या उग्र प्रलयभैरवा खाली; दिव्य नेत्र मिळूनही अर्जुन गुदमरून जातो. समोरच्या वाढत जाणाऱ्या रौद्ररूपापुढे तो संपूर्ण शरणागती पत्करतो.

'तुज शरण आलों सर्वप्राणे.'

आदी मध्य अंत नसलेलं हे अफाट रूप तू आता आवर असे तो विनवू लागतो. 'आता जापाणीं जापाणीं आपुले अस्तोव्यस्त हें.'

संपूर्ण शरणागतीची (submission) ही भावना मानवी मनातील एक फार प्राचीन व स्वाभाविक प्रेरणा आहे. प्रचंड वादळं, वणवे, हिमवर्षाव यांसारखी रौद्र निसर्गरूपं पाहून आदिमानवानं भाकलेली करुणा, त्याची प्रार्थना व अर्जुनानं केलेली प्रार्थना ही एकाच प्रकारची आहे. एखाद्या उदात्त शक्तीपुढे विनम्र होणं, तिला शरण जाणं यात एक आनंद, शांती व समाधान असतं. विनम्र होताक्षणी ज्याच्याबद्दल भीती वाटते तीच गोष्ट आपला आधार बनते. अर्जुनाच्या प्रार्थनेत असंच घडतं.

अर्जुनाच्याच इच्छेखातर देवाने त्याला असं मुक्त दर्शन दिलेलं असतं. आता शरण आलेल्या अर्जुनाच्या प्रार्थनेलाही देव प्रतिसाद देतो. 'भिगुळवाणे डोळे' करून भेवडवणारा देव पुन्हा अर्जुनाचा प्रिय सखा बनतो. 'म्हणौनि उठि उठि वेगां । शहाणा होइं' अशा सौम्य-शांत शब्दांत त्याला युद्धप्रवृत्त करू लागतो. या क्षणाचं ज्ञानेश्वर वर्णन असं करतात.– 'तें अर्जुनें मोटकें आइकिलें । आणि सुख कि भय चि दुणावलें । हे नेणों परि कांपिनलें । सर्वांग तेयाचें ।'

अर्जुनाला देवाची स्तुती काय करावी हेच आठवेना व स्तुती केल्याशिवाय राहवे नाही. 'आणिकि स्तुति नाठवे । आणि निवांतां हिं न ऱ्हावे ।' त्याच्या मनातील भीती जरा कमी होऊन प्रेमभाव पुन्हा उचंबळून येतो. एकाच वेळी देवाशी अनेक नाती कल्पावी असं त्याला वाटू लागतं. देवच सखा, मायबाप, स्वामी, प्राणाशी भिडणारी सारी सोयरिक देवाशीच. हा क्षण दोघांच्या मीलनाचा. देवाला आलिंगन द्यावं, त्याच्याशी आत्यंतिक जवळिक साधावी असं अर्जुनाला वाटू लागतं. 'परि आतां ऐसी चाड जीवि । जे तुजसि गोठी करावी । जवळिक हे भोगावी । आलिंगुनि तूतें ॥'

यानंतरची अर्जुनाची स्तुती किंवा प्रार्थना याचं स्वरूप पूर्वीच्या प्रार्थनेपेक्षा वेगळं. आताची प्रार्थना म्हणजे देवाच्या भेटीमुळे मनात आलेली आनंदगीतं आहेत.

"जैसा परिमळु जाला मरगजा । कां आनंदासि निगालिया दोनि भुजा । एणें आघवेनि मकरध्वजा । जोडली बरव ॥"

विश्वरूपाचे सोहळे भोगून अर्जुनाचे डोळे निवतात. प्रसन्न होतात. विश्वरूप पाहाताना खदखदलेले विविध भाव – विस्मय, भीती, कारुण्य, दु:ख – आता शांत होतात. कृष्णही तसाच प्रसन्न होतो. यावेळी दोघांचीही मनं एकाच लयीत स्थिरावतात. हा क्षण ज्ञानानंतरच्या शांतीचा; आणि प्रत्यक्ष विश्वरूपदर्शन होत असतानाची स्थिती ही ज्ञानाची स्थिती. संतांच्या Dark right of the Soul शी काही बाबतीत साम्य. अंध:कारमय रात्र ही संतांच्या बाबतीत ज्ञानस्थितीच होती. प्रकाशाचा अतिरेक, आत्मरूपाची जाणीव; विश्वात्मक तत्त्वाची जाणीव म्हणजेच ही अंधाररात्र. अर्जुनाच्या ज्ञानावस्थेचं वर्णन ज्ञानेश्वर एका शब्दात करतात. अर्जुनाला ज्ञान होतं म्हणजे 'विश्वलाघव' दिसतं. श्रीकृष्ण विश्वलाघव दाखवून पुन्हा मनुष्यस्थितीत येतो. त्याचं वर्णन ज्ञानेश्वर असं करतात :

(पुढील मजकूर पृ. २९० वर)

ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी आणि वारकरी पंथ

भास्कर व्यंकटराव गिरधारी

'ज्ञानदेवे रचिला पाया' असा जो अभंगाचा चरणार्थ आहे त्यात ज्ञानदेवांनी भागवत धर्माचे मानवतेचे मंदीर उभविले त्याचा पाया घातला असा उल्लेख आहे. हे देवालय दगड विटांचे नाही आणि त्याचा पायाही मोठ्या दगडांचा नाही. ज्ञानदेवांनी वारकरी पंथाला तत्वज्ञानाचे अधिष्ठान प्राप्त करून दिले. वारकरी पंथ मंदीराची एका भरभक्कम पायावर तात्विक उभारणी करून दिली असा याचा अर्थ आहे. याचाच अर्थ ज्ञानेश्वरांच्या एकूण वाङमय संपदेमधील 'ज्ञानेश्वरी' या काव्यप्रबंधाने वारकरी पंथ संस्कारित आणि प्रभावित झालेला आहे असा होतो. प्रस्तुत लेखात या वारकरी पंथात 'ज्ञानेश्वरी' चा प्रभाव, परिणाम व मानाचे स्थान याचा विचार करावयाचा आहे.

'ज्ञानदेवे रचिला पाया' या चरणार्धात ज्ञानेशांचे, त्यांच्या ज्ञानेश्वरीचे या पंथातील महात्म्य लक्षात येते. ज्ञानेश्वरांचे असामान्यत्व आणखी एका गोष्टीत सामावलेले आहे, ते म्हणजे वारकरी आणि नाथ या दोन्हीही पंथात त्यांना मानाचे पान, अध्वर्यु म्हणून स्थान दिले जाते. एकाच व्यक्तित्वाला मिळालेला हा उभय पंथातील मान ही एक आगळी घटना आहे. नाथपंथाचे अनुग्रही असूनही योगमार्गाचा कित्ता न गिरवता 'बहुजनहिताय' त्यांनी ज्ञानयुक्त भक्तिमार्गाचाच आवर्जून पुरस्कार केला. वारकरी पंथाची सकस तत्त्वांवर उभारणी केली. त्यांच्या ज्ञानेश्वरीत भोळ्या भावड्यांच्या भक्तीला उच्च तत्त्वज्ञानाची पातळी आणि व्यक्तिजीवनाला नीतीमूल्यांची पातळी लाभतांना आढळते.

ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी म्हणजे मराठी साहित्यातील एक अद्वितीय लेणे आहे. त्यांच्या या ग्रंथाचे स्वरूप शुद्ध कलात्मक वाङमयीन, लालित्यपूर्ण काव्यात्म तसेच तत्त्वज्ञानप्रधान, चिंतनात्मक, वैचारिक सुद्धा आहे.

ज्ञानेश्वरीच्या भाष्यकारांना आणि अभ्यासकांना ज्ञानेश्वरी हा तत्त्वज्ञानाला प्राधान्य देणारा काव्यप्रबंध जसा वाटतो तसाच तो कलात्मक श्रेष्ठ काव्यानुभव देणारा ग्रंथ आहे. असेही वाटते. तेव्हा कवित्व आणि चितकत्व या दोन्हीही संदर्भात प्राधान्य असलेल्या ज्ञानेश्वरीचा वारकरी पंथावरील प्रभाव आणि परिणामही असाच संमिश्र स्वरूपाचा आहे. वाङमयीन आणि वैचारिक अशा दोन्हीही प्रकारचे परिणाम ज्ञानेश्वरीचे पंथावर आहेत.

या पंथातील ज्ञानेश्वरीचे महत्त्व आणि श्रेष्ठता लक्षात घेता या ग्रंथाचा वारकरी पंथाच्या विचारसरणीवर परिणाम निश्चितच झाला असला पाहिजे असे म्हणता येते. त्याचप्रमाणे वारकरी पंथाच्या

(पृष्ठ २८९ वरून)

'अथवा दृमाकारु सांटवे । बीजकणिके'

श्रीकृष्णाचे मानुषरूप पाहून तर अर्जुन संपूर्ण शांत, समधात होतो. आनंदाशिवाय तेथे काहीच उरत नाही.

माझां हृदयरंगणीं । होतसे हरिषलतांची लावणी
सुखें सि बुझावणी । जाली मज ।।

अर्जुनाच्या मनातला अहंकार, कर्तेपणाची भावना, मोह, स्वजनप्रेम सारं काही कृष्णभक्तीत विलीन होतं. केल्याशिवाय राहवत नाही, असं प्रेम म्हणजे भक्ती.

"सा (भक्तिः) परानुरक्तिरीश्वरे"
हा भक्तीचा व्यापक अर्थ इथे जाणवतो.
'ते चि भक्ति ऐसी । पर्जन्याची सूटिका जैसी
धारावांचूनि अनारिसी । गोठि नेणे'

विश्वरूपदर्शन हा क्षण असं एक प्रचंड चित्र आहे. मला खूप वेळा वाटतं एखाद्या चित्रकाराने या क्षणाचं पेंटिंग करावं.

आधाराने जन्माला आलेल्या लेखनसाहित्यावरही ज्ञानेश्वरीचे परिणाम झालेले आढळतात. या दृष्टीने प्रस्तुत ठिकाणी ज्ञानेश्वरीचे स्वरूप दर्शन घडविणे इष्ट होईल.

ज्ञानेश्वरी हे नुसते श्रीमद्‌भगवद्‌गीतेचे केलेले मराठीकरण नव्हे तर मूळ ७०० संस्कृत श्लोकांना ज्ञानेश्वरीत ९००० ओव्यांचे भावार्थरूप व्यापकपण लाभले. याचा अर्थ भगवद्‌गीतेच्या निमित्ताने ज्ञानदेवांनी स्वतःच्या संपन्न साक्षात्कारी व्यक्तित्त्वाला, आपल्या अनुमतीला, ठाम मताला अत्यंत कुशलतेने अभिव्यक्त केले आहे. गीतेतील योगापेक्षा ज्ञान, कर्म आणि भक्ती हेच मार्ग त्यांना विशेष महत्त्वाचे वाटले.

ज्ञानेश्वरीतील तत्त्वज्ञानाची बरीच जडण घडण 'भाष्यकारातें वाट पुसतु' म्हणजे 'आचार्यांच्या' ग्रंथाधारे करण्यात आलेली आहे. शिवाय ज्ञानेश्वरांच्या गुरुपरंपरा (नाथपंथ) प्राप्त तत्त्वज्ञानाचाही परिणाम त्यांच्या तत्त्वज्ञानावर होणे अपरिहार्य होते.

नाथपंथ पूर्ण अद्वैती असून कृष्णाच्या उपासनेचा आचार, ज्ञानेशांच्या गुरुपरंपरेतील गहिनीनाथांच्या शाखेत चालू होता. याच परंपरेतून प्राप्त झालेली अद्वयानंदानुभूती ही ज्ञानेश्वरांच्या अद्वैत मताचे मुख्य कारण आहे. ज्ञानेश्वरांच्या या पूर्णाद्वैताचे स्वरूप--

'तया आत्मयाच्या शाखा । न पडेचि दुसरी रेखा ।
जरि विश्वा अशेखा । भरले आहे ॥' किंवा
'जालेनि जगें मी झांके । तरी जगत्वें कोण फाके ।
किळें बरी माणिकें । लोपिजे काई ॥
अळंकारातें आलें । तरी सोनेपण काइ गेलें ।
की कमळ फाकलें । कमळत्व मुके ॥
म्हणौनि जग परौते । सारूनि पाहिजे मातें ।
तैसा नोहे उखिते । आवघें मीचि ॥' हे असे आहे.

ज्ञानेश्वरांच्या या पूर्ण अद्वैतवादी तत्त्वज्ञानात शंकराचार्यांच्या 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या ।' ह्या मायावादी सिद्धान्ताला मान्यता नाही. किंबहुना ब्रह्म आणि जग असा वेगळेपणा ते मानीतच नाही. हे सर्व नामरूपात्मक दृश्य विश्व त्या आत्मतत्त्वाचाच प्रकाश आहे.

'तैसा मी वाचून नाही । विश्वी इये' किंवा
'हें आंतुबाहिरी मिया कोंदले ।
जग निखिल माझेचि ओतले ॥'

आत्म्याचे ज्ञान करून घेण्यासाठी दृश्य विश्वाचा निरास करण्याचे कारण नाही त्यासाठी त्यांनी रत्नाचे उदाहरण घेतले. रत्नाच्या प्रकाशाने रत्न कधीही झाकले जात नाही. प्रत्यक्ष परमेश्वरच या विश्वात भरून राहिला आहे. तेव्हा या नामरूपात्मक विश्व प्रकाशाने आत्मा झाकला जात नाही.

'जे जे भेटे भूत । ते ते मानिजे भगवन्त ।
हा भक्ति योगु निश्चित । जाण माझा' हीच

त्यांनी मानवी जीवनातील अंतिम निष्ठा मानली.

ज्ञानेश्वरीतील अध्यात्मविषयी डॉ. शं. दा. पेंडसे यांनी 'ज्ञानेश्वरांनी परमात्मतत्त्व हे सर्व शून्याचा निष्कर्ष आहे असे वर्णन केले आहे' असे जे म्हटले आहे ते म्हणूनच पटू शकते. ज्ञानेश्वरांनी ज्ञान, कर्म, भक्ती याविषयी आपल्या ज्ञानेश्वरीत विस्ताराने विचार मांडला आहे. ज्ञानोत्तर भक्तीच त्यांना अभिप्रेत आहे. ज्ञानाला प्राधान्य देऊन, हे ज्ञान प्राप्त करीत असतांनाच विहित कर्म आचरावे, परमेश्वराची अनन्य भावे भक्ती करावी असे ज्ञानेशांनी प्रतिपादन केले आहे. वारकरी पंथाचा जणू आचारधर्मच त्यांनी ज्ञानेश्वरीतून ठरवून दिला होता असे वाटते. अहिंसेची व्याख्या करतांना ते म्हणतात--

आणि जगाचिया सुखोद्देशे ।
शरीर वाचा मानसें ।
राहाटणे ते अहिंसे । रूप जाण ॥

त्यातही हीच आचारसूचना आहे. अद्वैतावस्थेत देखील भक्ति उरते -- हेच या ओवीतून ते सांगतात.

तैसी क्रिया कीर न साहे ।
तऱ्ही अद्वैती भक्ति आहे ।
हे अनुभवाचि जोगे । नव्हे बोला ऐसे ॥

ज्ञानेश्वरांनी विहित कर्मातील सकामतेचा, कर्मठपणाचा निषेध केला आहे. त्यांनी समाजहिताला पोषक होणारी कर्मे सोडण्याची शिकवण दिली नाही. नैष्कर्म्य आणि निष्क्रियता एक नव्हे. नैष्कर्म्याचा कर्माशी मुळीच विरोध नाही. उलट ज्ञानेश्वरांच्या मताप्रमाणे तर निष्कर्म्य सिद्धीला कर्मे आवश्यक आहेत.

जे चालणें वेगावत जाये ।
तो वेगु बैसावयाचि होये ।
तैसा कर्मातिशयो आहे ।
नैष्कर्म्या लागी ।

ज्ञानेश्वरांचा हा कर्मयोग निवृत्तीपर आहे. असे असले तरी इतर पंथीयांच्या दृष्टीने तो प्रवृत्तीपरच आहे. परमार्थासाठी प्रपंच सोडून जाण्याची, संन्यास घेण्याची गरज नाही.

> आता गृहादिक आघवें ।
> ते काही न लगे त्यजावे ।।

' साधकाने आत्मशुद्धीसाठी तर सिद्ध पुरुषाने लोक-संग्रहासाठी कर्म करीतच राहिले पाहिजे ' या गीता-प्रणीत कर्मयोगाचाच ज्ञानेश्वरांनी पुरस्कार केला आहे. भक्तीकडे आत्मोन्नतीचा एक सुलभ मार्ग म्हणून ज्ञाने-श्वर पहातात. कारण आत्मोन्नती किंबहुना मोक्ष हेच जीवितसाफल्य आहे. तेव्हा ज्ञान प्राप्त झाल्यानंतर — विहित कर्माचरण करीत असतानाच, साधकाने भक्ति-मार्ग चोखाळावा. भक्तींचे अनेक प्रकार जरी असले तरी ज्ञानेश्वरांनी नामभक्तीला प्राधान्य दिले. त्यामागे भक्तीचे इतर प्रकार तत्कालीन बहुजन समाजाला हाता-ळता येणार नाहीत, अशी ज्ञानेश्वरांना जाणीव असावी. अर्थातच त्यांचा कटाक्ष सगुणोपासनेकडून निर्गुणोपासने-कडे आहे.

> ' स्वकर्माच्या चोखोळी ।
> मज पूजा करोनी भली ।
> तेणे प्रसादें आगळी ।
> ज्ञान निष्ठेते ।।
>
> ते ज्ञान निष्ठा जेथ खातवसे ।
> तेथ भक्ति माझी उल्लासें ।
> तिया मजसी समरसें ।
> सुखीया होय ।। '

अशी आपली भक्ती-विषयीची कल्पना मांडीत असतांनाच ज्ञानेश्वरांनी नाम-महात्म्याचाही पुरस्कार केला आहे. ज्ञानेश्वरांचे हेच तत्त्वज्ञान ' पूर्णाद्वैत ' किंवा ' चित्स्फूर्तिवाद ' म्हणून ओळखले जाते.

ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीतील तत्त्वज्ञानाचा वार-करी पंथाच्या तत्त्वज्ञानावर काही विशेष प्रमाणात जो परिणाम झालेला दिसतो त्याचे स्वरूप साधारणपणे हे असे आहे. परंतु वारकरी पंथाच्या साहित्य संपदेवरील ज्ञानेश्वरीचा परिणाम हा केवळ तत्त्वज्ञानपर नाही तर तो वाङ्मयीन देखील आहे. तेव्हा त्या दृष्टीने ज्ञाने-श्वरीच्या वाङ्मयीन शिल्परूपाचाही विचार प्रस्तुत ठरतो.

ज्ञानेश्वरीचा विषय हा गृहीत भूमिकेवरून, निर्मिती प्रेरणावरून मुळात जरी तात्त्विक — आध्यात्मिक असला तरी त्यात रसोत्कट प्रसंग थोडेथोडके नाहीत. किंबहुना ग्रंथाचे स्वरूप लक्षात घेता असे वाटते की हा ग्रंथ केवळ तत्त्वज्ञान विशद करणारा नसून ते सरस्वतीला अर्पण केलेले नाना रसाविष्कारित व अनेकविध सुगंधित असे अत्युत्कट कलारूप भावपुष्प आहे. स्वतः ज्ञानेश्वरां-नीच ज्ञानेश्वरीत याचा उलगडा केला आहे.

> जें स्वप्नांतीत स्वभावे ।
> ते बोलीचि जरी फांवे ।
> तरीं आणिके काय करावे ।
> कथा सांगे ।।
>
> तेणे कारणे मी बोलेन ।
> बोली अरूपाचे रूप दावीन
> अतींद्रिय परी भोगवीन ।
> इंद्रिया करवी ।।

ही ' अरूपाचे रूप दाविण्याची ' आणि ' इंद्रिया-करवी अतींद्रिय भोगविण्याची ' भाषा कलानुभवाचीच आहे. बोलीतून हे सारे ' अ बोली ' चे कथन ज्ञानेश्व-रांनी केले आहे.

जीव, जगत आणि ईश्वर यांच्या संबंधीच्या किंवा व्यक्ती, समाज व ईश्वर यांच्या संबंधीच्या विशिष्ट भावनांनी आणि विचारांनी ज्ञानेश्वरांचे हृदय काठोकाठ भरले होते. अद्वयानंदाचा विचार मांडीत असतांना त्यांनी जग कसे असावे याची रेखाटलेली कल्पनाचित्रे प्रतिभा-मंडित म्हणून सुंदर आहेत. कथनकौशल्य तर जागो-जाग ज्ञानेश्वरीत प्रत्ययाला येते. संपूर्ण ज्ञानेश्वरीच्या कथन—निरूपणात ज्ञानेश्वरांनी आपल्या गुरु विषयी आदर आणि श्रोत्यांविषयीचा आत्यंतिक हळुवारपणा शेवटपर्यंत कायम ठेवला आहे हे एका संवेदनशील सहृदयालाच शक्य आहे.

ज्ञानेश्वरीच्या वाङ्मयीन शिल्पाच्या अंतरंगात शिरून शोध घेतल्यास सर्वत्र वाङ्मयीन मूल्ये या ना त्या रूपात वावरतांना दिसतात.

मराठी भाषेविषयीचा आदर व मराठीच्या साम-र्थ्याची जाणीव तर त्यांनी ज्ञानेश्वरीत जागोजाग व्यक्त केली आहेच परंतु त्याबरोबरच

' दाऊ वेल्हाळें देशी नवी ।
जें साहित्यातें वोजवी ।।
अमृतातें चुकी ठेवी । गोडसपणे ।। '

असेही म्हटले आहे.

स्वप्रतिभाजनित प्रत्येक कल्पनाच काय पण एकेक नित्यनूतन श्वासोच्छ्वासही प्रबंध व्हावा ' म्हणौनि माझे नित्य नवे । श्वासोच्छ्वासही प्रबंध होआवे ' अशी ज्ञानेश्वरांची अपेक्षा होती. कवित्व आणि अपूर्व वस्तूनिर्मितीची सुजाणीव त्यांच्याठायी होती. ही कल्पनाचित्रे सहजस्फूर्त व बहारदार भाषाप्रभूची वाटतात. ज्ञानेश्वरांना याच भाव, कल्पना आणि शब्दसौंदर्याची जाणीव होती. शब्द हे साहित्याचे मूल द्रव्य – माध्यम पण त्याचे व्यापकपण ' जैसे बिंब तरी बचकेचि एवढे ।
परि प्रकाशासि त्रैलोक्य थोकडे ।
शब्दांची व्याप्ति तेणे पाडे ।
अनुभवावी ।। '

अशा शब्दांतून समर्थपणे ज्ञानदेव व्यक्त करतात. त्यांची प्रतिमा सृष्टी (the world of image) ही अत्यंत समृद्ध विस्तृत व विविध स्वरूपी आहे. ज्ञानदेवांनी भावाभिव्यक्तीसाठी योजिलेल्या असंख्य सृष्ट मूर्त व अमूर्त प्रतिमांवरून याची कल्पना येते. ज्ञानेश्वरीत रंगासक्ती आणि नादचित्रांचा हव्यास आहे, रसिकत्वी परतत्वस्पर्श आहे, विदग्ध रसवृत्तीने केलेला प्रसन्न शैलीचा आविष्कार आहे.

अशा ह्या ज्ञानेश्वरीच्या वाङ्मयीन रूपाचा संक्षेपाने शोध घेतल्यानंतर वारकरी पंथावरील परिणामांचा विचार करावयाचा आहे.

वेदोक्त भागवत धर्माचे महाराष्ट्रीय स्वरूप म्हणजेच वारकरी पंथ आहे असे आपल्यास म्हणता येईल. या वारकरी पंथातील लेखन व साहित्य वाचतांना, ऐकतांना किंवा अभ्यासतांना असा अनुभव येतो की ते भावभक्तीपर आहे, प्रासादिक आहे. ज्ञानेश्वरीतून ज्ञानदेवांनी याच गोष्टींचा अवलंब आणि पाठपुरावा केलेला दिसतो. याचा अर्थ ज्ञानेश्वरांचे तात्विक चिंतन आणि वाङ्मयीन विभावन पुढील संतांनी अधिक समाजाभिमुख केले. वारकरी पंथातील संतांनी अभिव्यक्तीच्या विविध परी जरी स्वीकारल्या तरी त्यांचे साहित्य एकाच स्वरूपाचे वाटते ते यामुळेच असे म्हणता येईल. ज्ञानेश्वर–नामदेव कालखंडात विशेषत्वाने उदयाला आलेली विविध जाती जमातीतील संतमेळ्यांची वाङ्मयीन निर्मिती नाममहात्म्यावर आणि भक्तीपुरस्कारावरच भर देतांना आढळते. हा ज्ञानेश्वरीतीलच भक्तीमार्ग होता हे सहज जाणवते. भक्तीमार्गाच्या जोडीला ज्ञानेश्वरीतील कर्ममार्गाचाही आवर्जून पुरस्कार समाजाच्या विविध स्तरांतून आलेल्या या संतांच्या मेळ्याने केला. वारकरी पंथातील प्रत्येक संताने आपल्या अध्यात्मिक ज्ञानाच्या आणि अनुभवाच्या कुवतीनुसार–सामर्थ्यानुसार ज्ञानेश्वरीतील कर्म आणि भक्तीमार्गाचा विचार केला हे स्पष्टपणे जाणवते. संतमेळ्याच्या–वारकरी पंथातील पुढीलांच्या – व्यक्तित्वावर आणि साहित्यावर ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीचा ठसा, तिचा एक जबरदस्त संस्कार उमटलेला आहे असे निश्चित म्हणता येते.

◻ ◻ ◻



माझा ज्ञानीयांचा राजा

मधुकर आष्टीकर

अंक पहिला

दृश्य १ ले

माझा मऱ्हाटाचि बोल कवतुके ।
परि अमृतातेहि पैंजा जिंके ।
ऐसी अक्षरे रसिके । मेळवीन ।।

अमृतालाही पैजेने जिंकणाऱ्या मराठमोळ भाषेत आबालवृद्ध बहुजन समाजाला वेदांचे तत्त्वज्ञान सांगायला निघालेल्या आणि तेही वयाच्या केवळ सोळाव्या वर्षी– आत्मविश्वासाने निर्भयपणाने – अशा ज्ञानीयांच्या राजा, तुला शतशः प्रणाम. आम्हा पंढरीच्या वारकऱ्यांच्या राजा, तुला कोटिशः प्रणाम !

बोला – ग्यानबा तुकाराम – ग्यानबा तुकाराम – (दिंडीचा गजर) ग्यानबा तुकाराम – हृया जयघोषाची लय खूप वाढत वाढत जाते आणि शेवटी 'पुंडलिक वरदे हरि विठ्ठल'चा जयघोष होतो.

(दुरून कुण्या भाविकाचा भरीव आवाज)

"पतिपावन विठ्ठलाच्या लेकरांनो, पंढरीच्या वारकऱ्यांनो ! ज्या ज्ञानीयाचा तुम्ही आता गजर केलात त्याचीच कथा हृया चंद्रभागेच्या वाळवंटात मी तुम्हाला ऐकवीत आहे." (अभंग ऐकू येतो)

"पुण्याइची खनी । पतितपावनी ।
नदी इंद्रायणी तिच्या काठी भेट ।
सिद्धाचे सिद्ध बेट । तिथं संसाराचा वेत ।
मांडी रखमाई विठ्ठल । मायबाप ज्ञानेशाचे ।"

[हे स्वर हवेत विरत असतानाच –अरण्याचे दृश्य – नदी वाहतेय, पल्याड झोपडी – विसोब व एक शास्त्री काठाने येताहेत]

विसोबा : शास्त्रीबोवा, ही इंद्रायणी नदी. अथांग गार पाणी माउलीचं. शेतं कशी भरघोस पिकतात हिच्या पाण्यामुळं.

शास्त्री : हो हो, नदी म्हणजे वरदानच गावाला. आईच ती जगाची – बाकी अरण्यही फार भयंकर आहे हं हिच्याकाठी.

विसोबा : तर ! रानडुकरं, अस्वलं, वाघ, लांडगे या महाभयंकर प्राण्यांचा वास आहे इथं.

शास्त्री गाव जवळच आहे ना इथून ?

विसोबा : एकदम एवढं घाबरू नका. अजून दिवस कलायला दीड घटका आहेत.

शास्त्री : (पलीकडे पाहत) पण काय हो विसोबा, हृया एवढ्या घनदाट अरण्यात ही झोपडी दिसतेय ?

विसोबा : हुं

शास्त्री : मोठी पुण्यवान आणि देवांची लाडकी म्हणायची ही माणसं ! वाघांच्या जबड्यात सुखेनैव काळ कंठताहेत !

विसोबा : कसली आलीत पुण्यवान अन् देवांची लाडकी! अहो पापी, महान पापी ! रौरव नरकातली किडामुंगीच !

शास्त्री : पण हृया भयंकर प्राण्यांच्या तडाख्यात ती जीवंत राहतात म्हणजे . . .

विसोबा : अहो, ते भयंकर प्राणीसुद्धा हृया पाप्यांना खायला धजत नाहीत ! एवढे भयंकर पापानं बरबटलेले, चांडाळाहून चांडाळ आहेत हे लोक.

शास्त्री : कोण आहेत पण असे ?

विसोबा : तो पहा तो विठ्या . .

शास्त्री : नदीत उभं राहून, मोठ्या भक्तिभावानं सूर्याला अर्घ्य देतोय तो नं ?

विसोबा : हं – तोच, तोच विठ्या चांडाळ.

शास्त्री : छे, हो – मला तर मोठा पुण्यवान, भाविक, सोज्वळ सज्जन दिसतो.

विसोबा : शास्त्रीबुवा, दिसतं त्याच्या नेहमी उलटं असतं. अहो, उगाच का गावातून हाकलून

लावलाय त्याला आम्ही ? वाळीत टाकलाय साऱ्या समाजानी त्याला ! हो ! . . .

शास्त्री : असं ?

विसोबा : तर, अहो पार धर्म बुडवला त्यानं. नाचक्की केली वेदांची, रसातळाला नेली पार संस्कृती. विसकटून टाकली समाजाची घडी.

शास्त्री : असं काय केलं पण त्यानं ?

विसोबा : मोठ्या ऐटीत संसार सोडून काशीला गेला. संन्यासी झाला अन् चार दिवस दिमाखात मिरवला. पण पाचव्या दिवशी आली बायकोची आठवण, अन् आला सोडून काशी. पळत पळत बायकोपाशी.

शास्त्री : आणि ती बायको वाटतं त्याची ? अगदी रखमाईचं रूप . .

विसोबा : शीः, नाव तेवढं आहे रखमाबाई—बाकी तिचा गुण एकही नाही. अहो संन्याशाशी संसार केला. चार कारट्यांना जन्म दिला. ते पहा ते–ते येताहेत इकडेच—ते सगळ्यांत मोठं कारटं— निवृत्त्या अन् तो त्याच्याच मागं येतोय–अहं आता पुढं झाला आहे तो. तो ज्ञान्या. छी: पाप— मूर्तिमंत पाप. आडवी आलीत आपल्याला—आता जेवायला नाही मिळायचं शास्त्रीबुवा रात्री. उचला पाय झपझप.

(पुढे ज्ञानेश्वर—मागं निवृत्ति—ज्ञानेशाच्या हाती फुलपात्र. त्यांत दूध. निवृत्तीच्या काखेत झोळी त्यात पीठ.)

ज्ञानदेव : लौकर चल रे दादा. आई नि बाबा उपाशी आहेत परवापासनं—जड झालीय होय पीठाची झोळी तुला ? दे माझ्याजवळ नाहीतर.

निवृत्ति : नको. तू हो लवकर झोपडीकडं. मुक्ता भुकेनं व्याकुळ झाली आहे दुपारपासनं. सारखी दूध दूध करून रडते आहे. दूध पोहोचव आधी.

(ज्ञानेश्वर पुढे होतो)

विसोबा : ए गध्या ऽ ! सारखा आडवा आडवा काय येतो आहेस ? चांडाळ, अरे का वाटा अडवता लोकांच्या ? मरत का नाही विष खाऊन ? मोकळे होतील आमचे मार्ग—

ज्ञानदेव : मार्ग नेहमीच मोकळे आहेत विसोबा. मनुष्यच मोकळा नसतो त्या मार्गानं जायला. मायेत गुरफटलेला असतो. लोभ, मोह, मत्सर, मद, राग, स्वार्थ यांनी बांधलेला असतो. पण त्याला मार्गच अडलेला वाटतो. मी काय तुमचा मार्ग अडवणार ?

शास्त्री : बाळ किती चुरुचुरु बोलतोस. एवढं तत्वज्ञान, एवढ्याशा वयात कळायला लागलं तुला ?

विसोबा : हं. पुरे पुरे ढोंगी—गोसावडा. काय आणलंस ते?

ज्ञानदेव : दूध, मुक्ताताईला भूक लागलीय माझ्या.

शास्त्री : तुला धाकटी बहीण पण आहे होय ?

ज्ञानदेव : हो.

विसोबा : नसायला काय झालं ? पण दूध कुठून आणलंस ?

ज्ञानदेव : गावातून.

शास्त्री : इतक्या दुरून ? नदी ओलांडून ? रान तुडवून रखरखीत ऊन अंगावर घेऊन ! पायात वहाणाही नाहीत तुझ्या.

विसोबा : पण कुणी दिलं दूध तुला ? सगळ्या गावाला खरं म्हणजे ताकीद दिलीय की कुणीही तुमची कुठलीही गरज भागवायची नाही म्हणून — आणि तुम्हालाही बजावलं होतं ना की तुम्हीही गावात फिरकायचं नाही म्हणून ? काय ?

ज्ञानदेव : पण आमची गाय कालपासनं दिसेनाशी झालीय अन् माझ्या इवल्याशा ताईला तर खूप भूक लागली होती. तिच्या जिवाची तडफड तडफड होत होती. म्हणूनच गावात गेलो आम्ही.

विसोबा : तरी जायला नको होतं तुम्ही. — (संतापून) — पण गावात तरी कोण आणि कसं धजलं तुला दूध द्यायला, आम्ही एवढी सक्त ताकीद दिल्यावर ?

ज्ञानदेव : आली कीव एका माऊलीला. माझ्या डोळ्या-तून अश्रूंच्या धारा वाहत होत्या—कुणी तरी—एक थेंब तरी द्या हो दुधाचा माझ्या कोवळ्या ताई-साठी—असं काकुळतीनं ओरडत होती माझी क्षीण वाणी — विनवण्या करीत होती माय माऊलींची — तेव्हा एका माऊलीला कीव आली — ती पदराखाली झाकून हे अमृत घेऊन आली — माझ्या

ताईसाठी. भुकेनं व्याकुळली आहे माझी ताई – भुकेपायी जीव टाकतेय माझी ताई.

विसोबा : मग आता मरायला पाहिजे – ती तुझी तड-फडणारी ताई–

(आणि तो विकट हासून त्याच्या हातातलं दुधाचं फुलपात्र खाली पाडतो. दूध सांडवतो.)

शास्त्री : (चमकून ओरडतो) विसोबा !

(ज्ञानेश्वर मात्र हसून शांत)

विसोबा : संन्याशाची कारटी ! धर्मावरचं संकट ! ! समाजाला काळीमा ! ! !

निवृत्ति : ज्ञाना – थेंबभरही नाही का रे उरलं ? अश्वत्थाम्याला पाजलं तसं आपल्या ताईलाही पाजू हे पीठच पाण्यात कालवून – दूध म्हणून—

विसोबा : आँ ? म्हणजे त्या झोळीत पीठ आणलंय वाटतं भरून ? कशाला ? तुमचे पापी पिंड पोसायला ? ठेचली पाहिजेत कारटी.

(खसकन झोळी हिसकावून घेतो. पीठ सांडते)

निवृत्ति : आई ! बाबा ऽऽ !

विसोबा : म्हणे हे पीठ पाण्यात कालवून ताईला पाजतो. तुझ्या बापाचंच आहे किनई ते पीठ ? (हसून) म्हणे पाण्यात कालवतो – मी आता इंद्रायणीत कालवतो हे सगळं पीठ – दुधाची करतो मी सगळी इंद्रायणी !

(झोळी इंद्रायणीकडे भिरकावून देतो. जोरानं हसतो.)

आता – पाज तुझ्या ताईला इंद्रायणी. (पुन्हा हसतो) चला शास्त्रीबोवा.

(गोंधळलेल्या, डोळे अश्रूंनी ओलावलेल्या शास्त्रीबोवाला तो ओढीतच नेतो. ‘दादा’ व ‘ज्ञाना’ म्हणून हांक मारीत ज्ञानेश्वर आणि निवृत्ति एकमेकाकडे जातात व घट्ट मिठी मारतात. गळ्यात गळा घालून स्फुंदू लागतात. एवढ्यात विठ्ठलपंत येतात.)

विठ्ठल : निवृत्ति ज्ञाना ! (दोघांनाही पोटाशी घट्ट घेतात.) रडायचं काय असं ? पांडुरंगच कोपलाय. मी पापी, म्हणून माझ्या लेकरांचा छळवाद होतोय. जळो हे जीणं – पांडुरंगा – जळो हे जीणं.

(मुक्ता झोपडीच्या दारात येते)

मुक्ता (आनंदून नाचत) दादा आला ! दूध आणलं ! (धावत येते. विठ्ठलपंत तिला कडेवर घेतात) मला आधी दूध पाहिजे – भूक लागलीय खूप – दादा दूध आणलंय न तू ? नाही ?

(ती रडायला लागते.)

विठ्ठल : उगा उगा, दादानं नाही आणलं दूध. दादा नव्हताच गेला आणायला दूध – आई गेलीय आणायला. आता आणते आई दूध. तू रडू नकोस –चल झोपडीत. (ती ऊं ऊं करीत हुंदके देतेच. सगळं झोपडीकडे वळतात तोच सोपान –‘आई बाबा’ करीत रडत येतो – आईही येते.)

आई : काय झालं सोपान ?

सोपान : मला मारलं – काठीनं मारलं – सपासप मारलं. आग आग होतेय ग !

आई : (सोपानच्या पाठीकडे पाहून) सोपान ऽ ! आईग केवढाले वळ उमटलेत अंगावर माझ्या तान्ह्याच्या ! (विठ्ठलपंत – ज्ञाना, निवृत्ति झोपडीतून धावून येतात)

ज्ञानदेव : का मारलं रे एवढं ?

सोपान : मी आपली गाय सोडवून आणत होतो म्हणून. सगळे मारीत होते आपल्या गायीला. मी मध्ये पडलो. मलाही मारलं. ओढून नेत होते जबरदस्तीनं गायीला. ती काही ऐकेना तेव्हा तिला इतकं मारलं की शेवटी मेली ती. मारली. मारूनच टाकली तिला त्या लोकांनी (जोरजोराने रडतो).

आई : कपिला ! माझी कपिला मारली लोकांनी ?

विठ्ठल : आता नाही सहन होत हे पांडुरंगा, आता नाही सहन होत. कुठवर चालायचं हे असं ? नाही नाही – आज हयाचा सोक्षमोक्ष झालाच पाहिजे. लेकरांचे हाल थांबलेच पाहिजेत. त्यांचा काय अपराध ? त्यांना न्याय मिळालाच पाहिजे – ऐकलंत ? आज आम्ही गावात जाणार. शास्त्र्यांशी निर्वाणीचं बोलणार. गुरुराजांना लेकरासाठी न्याय मागणार – पांडुरंग ! पांडुरंग !

(हळू अंधार पडू लागतो. पडदा पडतो.)

दृश्य दुसरे

(गुरुराजांचं घर दिसू लागतं. शास्त्रीबुवांचे घराची बाहेरची पडवी. ओटी वरती उंच आसन. शंखध्वनी होतो. मग एक गलेलठ्ठ बटू तो शंख वाजवतो. त्याचे गुरु गांजाच्या धुंदीत शून्याचे संशोधन करीत पसरलेले आहेत.)

शिष्य : (शंखध्वनी बंद होताच) धर्ममार्तंड, पापदोर्दंड, ब्रह्मवर्चस्वचंड, पुण्यादिदिग्गजगंड, श्री. शास्त्रीवर, शुकतुंड, गौर्नाथ, गुरुराज; आपल्या चरण कमळी लोलायमान होत्साता हा वटु उलूलूक आपणास पंचांग प्रणिपात करून विनवीत असे —

(नमस्कार करतो.)

गुरु : वत्स उलूलूक, उत्तिष्ठ, काय समयहा ! भास्कर खग नभवर्ती मध्यविंदूवर आगमनवन्त जाहला, तथापि —

शिष्य क्षमस्व गुरुराज, गांजाची गोळी !

गुरु : गांजा ? अब्रह्मण्यम्—अब्रह्मण्यम् !!

शिष्य : अपराध जाहला महाराज. गांजा म्हणावयास नको होते. श्री शिवशंभुप्रसादगुटिका म्हणावयास पाहिजे होते.

गुरु जिभेला सवय नाही तुझ्या...

शिष्य : गांजाची पूर्वी होती, पण आज काल तुम्ही शेवटच्या झुरक्यापर्यंत पीत असत...

गुरु : न, न, पीत नसंतु ! प्रसाद सेवन करीत असंतु. प्रसाद अर्धवट टाकू नये. अस्तु—झटकन आण तू प्रसाद.

शिष्य : घ्यावा गुरुराज.

(चिलीम देतो. हावरटासारखा पाहत उभा राहतो. गुरु चिलीम ओढतो.)

गुरु : द्वार रक्षितु कवण असतु ?

शिष्य : कुणीही नसतु गुरुराज.

गुरु : मग त्वा तात्काळ गमन करीजे. द्वार रक्षिजे.

(बटु नाइलाजानं जातो पण लगेच परत येतो)

शिष्य : श्रीमंत शेठशंकर साहुकाराचे चिरंजीव अध्ययनार्थ येत असतु.

(श्रीमंत येतो)

गुरु : श्रीमंत सुस्वागतम्. येइजे.

श्रीमंत : गुरुराज गांजा पीतु ?

गुरु : (चिलीम चटकन वाजूला ठेवतात) न, न, न, ' शिवशंभूप्रसादगुटिका ' सेवन करीत होतो — शान्तं पापं ! शान्तं पापं ! किमर्थं आगमनं झालं श्रीमंत ?

श्रीमंत : झक मारण्या ! किमर्थ पुसंतु ? मज अध्ययन कर्म असतु. तुज विदित नसतु ? दक्षिणा कसा घेतु ?

गुरु : ही कुठली अध्ययन वेळा ? आता मध्यान्ह जाहला. सर्व वटु अध्ययन संपवून स्वगृही गेलेत.

श्रीमंत : जाऊ देत ते सगळे. आम्ही आत्ताच अध्ययन करंतु.

शिष्य : श्रीमंत, पायात वहाण ? मुखी विडा ?

श्रीमंत : तुझ्या वापाचा खाल्ला नसंतु. तुझे का पोट दुखंतु ?

गुरु : अस्तु, अस्तु. पण आपण आसनावर तर बसा.

श्रीमंत : किमर्थ ? आम्ही कुठेही वसू. नाही, उभेच राहू. आम्ही असेच अध्ययन करू. तू शिकवी रे.

गुरु : अस्तु, अस्तु. अध्ययन प्रारंभो भवतु. कालचा श्लोक पाठ केला ?

श्रीमंत : कोणता ?

गुरु : कोणता ?...अस्तु अस्तु हं वंदिजे. श्रीमंत कालचे स्तवन म्हणा...

श्रीमंत : कान्ता कारं.

गुरु : कान्ता नव्हे, शांता.

श्रीमंत : आम्ही कान्ताच म्हणतु —" कान्ताकारं भुजगजनशं पद्यमाजं "— पुढे येत नसंतु.

शिष्य : वर्ष जाहले. आपण याहासी शिकवीतु. साधा श्लोकही वदवून घेऊ न शकतू ?

गुरू : आम्ही तरी काय करू— मतिमंद लेकरू. ही संकर संतति. कैसी मति नांदेल ?

श्रीमंत काय म्हणतु ? मज मती नसतु ? तुलाच मती नसतु !

शिष्य : श्रीमंत काय हें चाळे ? गुरूंचा आशीर्वाद असल्याशिवाय...

श्रीमंत : कोण गुरू ? मी आशीर्वाद देतू. (पाय उंच करतो).

(विसोबा व शास्त्री येतात. हें पाहताचच चपापतात.)

विसोबा (शास्त्रीबुवाकडे पाहतो) अगदीच कामातून गेलंय ते कारटं. आपण लक्ष देऊ नका त्याच्याकडे. वेडगळ, अजागळ. जा इथून.

श्रीमंत : आम्ही आमच्या बाबांना सांगतु. अं ऽ ऽ अं. (रडत रडत जातो)

विसोबा गुरुराज साष्टांग दंडवत. (दोघेही दंडवत घालतात).

शास्त्री : आपण अशाला घरात तरी का येऊ देता ?

बटु : शिष्य असती ते गुरुराजांचे. एक वर्षापासून गुरु-राज त्यांना शिकवीत आहेत.

शास्त्री : एक वर्षांपासून गुरुराज शिकवीत आहेत ? गुरुजनावद्दल काडीचाही आदर नसलेला हा कसला शिष्य ? आणि शिष्याला एका वर्षात विनयशील बनवू शकत नाही तो कसला गुरू. ?

गुरू : (रागावून) शास्त्रीबुवा, मर्यादातिक्रमण होत असतु. विसोबा, शास्त्रीबुवा तुमचे पाहुणे, म्हणून आम्ही चूप वसणे. अन्यथा धर्मकार्यी अनादर, विघ्न करणारेस आम्ही जवर दंड करतु. विसोबा ह्यासी आमचे श्रेष्ठत्व वदतु. आम्ही कोण ? आमचा अधिकार काय ? आमचे सामर्थ्य काय, ह्याचा ह्यास गंध नसतु. मनात आणतु तर ह्या विठयावत तुमची अन्नान्न दशा करतु.

विसोबा : नको नको. क्षमस्व गुरुराज. मी त्यांच्या वतीनं आपली क्षमा मागतो. पण आपण विठ्याच्या अन्नान्नदशेवद्दल आता म्हणालात ना ? त्यात तिळमात्र सत्य नाही. चांगला पोसला आहे तो विठ्या. आणि माजली आहेत त्याची ती चारही कारटी.

गुरू : अन्नपाणी वंद केले तरी पोसली आणि माजली असतु ?

विसोबा : कुणी वंद केलं अन्नपाणी गुरुराज ?

गुरू : आम्ही सर्व समाजानी वाळीत टाकले त्यासी. तुम्ही सर्व जाणतु.

विसोबा पण काय उपयोग ? त्यांना गावातून दूध मिळतं. पीठ मिळतं.

गुरू : अस्सं ? तुम्हाला कुणी सांगितलं असतू ?

विसोबा : कुणी सांगायला कशाला पाहिजे ? मी ह्या डोळ्यांनी पाहिलं.

गुरू : आणि तुम्ही त्या पाप्यांच्या पोटात ते सर्व उघ-ड्या डोळ्यांनी जाऊ दिलं म्हणतु ?

विसोबा नाही, नाही. मी ते सगळं हिसकून फेकून दिलं. मातीत घालवलं.

गुरू : वाहवा, धन्य विसोबा, धन्य असतू. कारट्यांच्या तोंडातला घास काढून घेतलात. तुम्ही आज फार मोठे धर्मकृत्य केलं. तुम्हाला शतकोटी आशीर्वाद. परंतु, त्यांना दूध आणि पीठ देण्याचं धर्मविघातक पापकर्म या गावात कवणे केले ?

विसोबा तेच कळत नाही की आमच्या रागाची पर्वा न करता हे करायासी कोण धजलं ?

गुरू : त्यासी तात्काळ शोधून देहदंड सांगीजे. मूर्तिमंत पापाचे वर्तन करितु ?

विसोबा : पण मी म्हणतो, देणाऱ्यापेक्षाही मागायला जाणाऱ्याचाच यात दोष अधिक नाही का ? देणारा एखादा नवीन आलेला असेल गावात. ठाऊक नसेल त्याला की ही पापाची कारटी. पण ह्या चांडाळांनी जाणून बुजून गावात मागायला येण्याचा घोर अपराध का करावा ?

गुरू : वरोवर बोलतु, विसोबा वरोवर बोलतु. त्या संन्याश्यासी, त्याच्या कारट्याशी दंड द्यायाच होवा !

विसोबा आणि तो फार जबर द्यायला हवा.

(विठ्ठलपंत पांडुरंग पांडुरंग म्हणीत आत येतात)

गुरू : कोण ?

विसोबा : तोच विठ्या, नाव घेताच चांडाळ हजर.

विठ्ठल : गुरुराज, साष्टांग प्रणिपात.

गुरु : शिव शिव शिव ! ओटीवरून दूर हो पाप्या ! आमच्यापासून दहा हात दूर रहावयास हवं तू –

विसोबा : त्या खेटरापलीकडे उभा राहत जा म्हणून शंभरदा सांगितलं असेल आजवर तुला. तरी पुन्हा गुरुराजांच्या ओटीवर चढलासच !

गुरु : ओसरी बाटवलीस आमची. उल्लूक, गोमूत्र सिंचन करा ओसरीवर.

(विठ्ठलपंत, गोंधळून, 'क्षमा करा क्षमा करा' म्हणत मागे सरतो.)

शास्त्री : काय बोलताहांत आपण हे ? मघा त्या श्रीमंताच्या चाळचांनी आपली ओटी अपवित्र झाली नाही आणि आज हा तेजस्वी ब्राम्हण –

विसोबा : तेजस्वी ब्राम्हण, छट् बदमाश संन्याशी ! एकदा संन्यास घेऊन पुनः संसाराला लागला. चार कारटचांचा बाप झाला. धर्म पार बुडवला ह्या पाप्यानं, आणि हा म्हणे तेजस्वी ब्राम्हण –

शास्त्री नसेल तेजस्वी ब्राम्हण पण हाडामासाचा एक स्वच्छ देह. देवाचाच एक अंश. तुमच्या आमच्या सारखा एक माणूस –

विसोबा : तुम्हाला नाही कळायचं हे पाप शास्त्रीबुवा.

शास्त्री : तरी पण कुठल्या ग्रंथात सांगितलं आहे माणसाला असं वागवणं बोला ? आम्ही एवढा शास्त्रार्थ शिकलो. . .

विसोबा : पण तेवढाच अर्थ नसेल कळला तुम्हाला. ते शास्त्रात आहे. हे सगळं शास्त्रानुसार चाललं आहे. ह्याच्या वाऱ्यालाही उभं राहणं महाभयंकर आहे. ह्याला दूरदूरच हाकलायला पाहिजे. जा, जा, नीच विठ्या तू इथून. थोबाड दाखवू नकोस पुन्हा ते अभद्र.

विठ्ठल : पण मला तुमच्याशी –

विसोबा : सांगितलंना एकदा नीच इथून म्हणून.

विठ्ठल पण मला तुमच्याशी काही बोलायचं आहे.

विसोबा : पण आम्हाला तुझ्याशी काही बोलायचं नाही.

विठ्ठल : असं काय करता ? मी चुकलो असेन. मी पाप केलं असेल, आणि त्याबद्दल मी आजवर खूप सोसलंही आहे, आणि अजूनही हाल सोसतोच आहे. मला त्याबद्दल काही म्हणायचं नाही. पण माझी गोजिरवाणी निष्पाप लेकरं–त्यांना मात्र उगाच मरणप्राय यातना सोसाव्या लागताहेत. त्यांचा विचाऱ्यांचा काही एक दोष नसतांना. माझ्या काळजाचं पाणी पाणी होतं. त्यांचे हाल पाहून उर फुटून निघतो माझा.

विसोबा (हसून) आणि तरी वर जिवंतच राहतो तू ? दगड ! पाषाण, कठोर क्रूर काळजाचा आहेस चांडाळा तू. पुरे झाली तुझी वटवट – जा नीघ इथून.

विठ्ठल : पण माझ्या लेकरासाठी –

विसोबा : नीघ म्हणतो ना ऽ ऽ !

विठ्ठल : पण त्या निष्पाप चिमुरडचांसाठी –

विसोबा : वऱ्या बोलानं निघतोस का हाणू लाय कंबरडचात आणि खेटर टाळक्यात ?

(खेटर उगारतो)

शास्त्री (ओरडून) विसोबा –(विसोबा चपापतो) गुरुराज, काय तमाशा चाललाय हा – ?

गुरु : आम्हा त्या चांडाळाचे वचन मान्य नसतु.

शास्त्री : नसो, पण म्हणून तुम्ही त्याला खेटरानं मारणार ? लाथा मारून बाहेर घालविणार? नका मान्य करू त्याचं म्हणणं, पण साधं ऐकूनही नाही घेणार त्याचं बोलणं ? वेद-पारंगत शास्त्रार्थ-विशारद, धर्म कर्म निष्णात गुरुराज, साधी सहिष्णुताही नाही बाणवू शकलात अंगी आपण ? व्यर्थ केलात मग हा सारा खटाटोप. साधी अडाणी अशिक्षित माणसं बरी तुमच्यापेक्षा. विसोबा, हीच का कीर्ती न्यायची तुमच्या गुरुराजाची आम्ही आपल्या क्षेत्री ?

गुरु : नाही नाही तसं नव्हे, बोलू देत विसोबा, शिणवू देत त्याला त्याचं थोबाड.

विसोबा : हं बोल विठ्या, बोल.

विठ्ठल : गुरुराज, संन्यास सोडून मी संसारात पुनः रमलो. महत् अपराध केला. आपण सर्व विद्वान माझ्यावर कोपलात. मला समाजातून वाळीत टाकलंत. अघोर शिक्षा दिलीत. तो वनवास, ती अन्नपाण्यावाचून होणारी तडफड अन् थंडीवाऱ्यानं जीवाची होणारी तगमग, आम्ही खूप सहन केली. पण आता आमची कोवळी चिमुरडी मुलं – माझा निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान, मुक्ता ह्यांना नाही सहन करवत हो ते हाल. हुशार

आहेत मुलं, शाहणी आहेत फार. पाहवत नाहीत त्यांच्या यातना अपार. तेव्हा विनंती करायला आलोय की त्या इवल्या इवल्या मुलांना, निष्पाप जीवांना तरी आपण थोडी दया दाखवा. आणि त्यांच्या मुंजी करून त्यांना समाजात घ्या.

विसोबा : बोल म्हटल्याबरोबर हातभर तोंड फाडलंस ! अरे लाज नाही वाटली ते शब्द उच्चारायला ? म्हणे माझ्या मुलांना तरी दया दाखवा. तुझी मुलं ? संन्याशाची मुलं ? अरे रौरव नरकातले किडे अधिक पुण्यवान त्यांच्यापेक्षा !

शास्त्री : विसोबा, त्यांना तोंड फाडलं म्हणता आणि तुम्ही तरी काय आवर घालता आहात आपल्या तोंडाला ? विठ्ठलपंतांनी आपली विनंती गुरुराजांच्या चरणी सादर केली. काय तोंड फाडलं त्यात ? गुरुराजांना त्यावर बोलू द्या.

गुरु . पण आम्ही तरी काय बोलिजे ? काय शास्त्रीबुवा, वाणी बधिर होतसे. मति कुंठित होतसे ! शास्त्रार्थच मिळत नसे. संन्याशाने पुन्हा संसार करावा हेच अघटित घडले असे. संन्याशांच्या संततीचा विचारच तरी धर्मात कसा असेल बरे ?

शास्त्री : पण काही भूतदया, जीवदया आहेच की नाही धर्मात ? मी पाहिलीत ती लेकरं. तळमळला माझा जीव. हळहळलं माझं मन. त्या तडफडत्या जीवांना पाहून. आपण शास्त्राधार शोधलाच पाहिजे. एकेक शास्त्रमर्यादा हळुवार मनानं, बुद्धीपणाला लावून, बाजूला केलीच पाहिजे.

गुरु : मलाही वाटतं शास्त्रीबुवा तसं. कोवळी अर्भकं पाहून माझा जीव कासावीस होत नसेल असं का समजता तुम्ही ? पण समाज धारणेसाठी काही वेळेस मन कठोर करीजे असे भगवंतेचि कथिले आहे ना ?

शास्त्री : पण, निष्पाप प्राणीमात्रांसी प्रेम कीजे, दया कीजे हेहि भगवंतेची कथिले आहे ना गुरुराज ? हे विठ्ठलपंत असतील अपराधी पण ती लेकरं– ती तर नाहीत ना अपराधी ?

गुरु : पण शास्त्राधारे संन्याशाचे संततीचे अस्तित्वच कसे मानीजे ?

शास्त्री : डोळ्यांनी दिसतं ते का नाकारावं ?

गुरु : वृथा वितंडवाद कासया कीजे ?

विसोबा : आमच्या दृष्टीनं हा विठ्या आणि ती रखमी जिवंत आहेत तोवर ह्या कारट्यांना अस्तित्वच नाही.

शास्त्री म्हणजे त्या कोवळ्या मुलांचा विचार व्हायचा असेल तर–

विसोबा : ह्या विठ्यानं आणि त्या रखमीनं ताबडतोब मरायला पाहिजे.

विठ्ठल : गुरुराज ! (शास्त्री चमकतात).

विसोबा : म्हणजे मग करता येईल, आईबापाविना बेवारस संतति म्हणून त्यांच्या कारट्यांचा विचार.

शास्त्री : (भांबावून) ह्या विठ्ठलपंतानी आणि रखमाईनं मरायला पाहिजे ?

विसोबा : हो हो मरायला पाहिजे. एकवार नव्हे त्रिवार मरायला पाहिजे !

शास्त्री : नाही, नाही, गुरुराज ! आपण–

विसोबा : त्यांना कशाला वदवायला लावता ते अभद्र शब्द ? मीच सांगतोय ना त्याच्या वतीनं की ह्या विठ्यानं त्या रखमाईनं आत्ताच्या आता स्वत:ला उभं पेटवून जाळून घ्यायला पाहिजे.

शास्त्री : नाही नाही. गुरुराज तुम्ही. . .

विसोबा : होय, सांगतात की विठ्यानं नि रखमाईनं मरायला पाहिजे.

शास्त्री : गुरुराज.

विसोबा : त्यांनी मरायलाच पाहिजे.

शास्त्री : (अत्यंत आतुरतेनं) गुरुराज बोला.

विठ्ठल : (शांतपणे) बोला गुरुराज.

(किंचित शांतता)

गुरु : देहान्त प्रायश्चित्त. विठ्यानं नि रखमाईनं देहान्त प्रायश्चित्तच घ्यायला पाहिजे – त्यांनी मरायलाच पाहिजे.

[विसोबा–विकट हास्य – गुरुराज ताबडतोब उठून आत निघून जातात–शास्त्री चकित – विठ्ठलपंत भांबावून – तोंड झाकून निघून जातात.]

दृश्य ३ रे

[पुनश्च ती विठ्ठलपंताची झोपडी. पण आता आतला भाग. ज्ञानदेव मुंज्याच्या थाटात बसलेत. पळसाचा दांडा खांद्यावर. साधा दोरा मुक्ताई खांद्याभोवती, गळ्याभोवती, बगले-खालून गुंडाळते आहे. त्यानं काज-ळाच्या मिशा वेड्यावाकड्या काढ-ल्यात. सोपान, निवृत्ति व आई, मुक्ताईची गंमत पाहतात.]

मुक्ता : आहारे मुंज्या । काय तुझ्या गमजा ।।
जानव्याचा दोरा । मोठा तुझा तोरा ।।

ए, पण असा गप्प काय बसलास ? मंत्र म्हण. बाबा म्हणतात न संध्येच्या वेळी.

ज्ञानदेव : ओ ऽ ऽ म भुर्र भुर्र... (सोपानादि हसतात)

मुक्ता : हसायला रे काय झालं ? उद्या तुमची पण अशीच मुंज व्हायचीय–हो किनइ ग आई ? तुम्हाला पण असाच दोरा बांधावा लागेल अन् मंत्र म्हणावे लागतील.

निवृत्ति : हो, पण आम्ही हसलो ते ज्ञानाच्या भुर्र भुर्रला–भुर्र भुर्र काय ?

ज्ञानदेव : गायत्री मंत्र आहे तो.

मुक्ता : अन् बाबा–भुर्र भुर्र असाच म्हणतात.

सोपान : पण तेव्हा नाक दाबून ठेवतात.

निवृत्ति : आणि ह्या आचमन पळीनं एका हातातून दुसऱ्या हातावर पाणी घेतात.

(ज्ञानदेव तसं करतात)

सोपान : पण नाक दाबलंच नाही.

मुक्ता : त्याचे दोन्ही हात पाणी पिण्यात गुंतलेत नं. मी दाबते नाक.

(ती नाक दाबते)

ज्ञानदेव : (श्वास कोंडलाय) भुर्र र् र् र्...(शेवटी प्यॅंऽ करून तोंडातलं पाणी उडवतो. सगळे हसतात.)

सोपान : अशी फजिती होणार असेल तर आपण नाही बुवा मुंज करणार.

मुक्ता : ए, फजिती झाली तर झाली थोडी – पण खीर खायला मिळेल नं गोड गोड उद्या.

सोपान : खीर ? खीर तर आई वडील मेले म्हणजे ते काय करतात नं – तेव्हा खायला मिळते. (सगळे चरकतात.)

मुक्ता : शीः, असा अभद्र काय बोलतोस रे. उद्या छान मुंजी ठरल्यात. मुंज्याला आई खीर खाऊ घालते मांडीवर घेऊन – किनई ग आई ? तूच म्हणा-लीस किनई मघा.

आई : हो हो. सगळ्या मुंज्यांना खीर घालीन मी.

सोपान : दादाला–ज्ञानोबाला. मला – पण ताईला नाही. ताईला फुक्का.

मुक्ता : फुक्का कसा ? – माझी पण मुंज करायची.

सोपान : मुलींची मुंज नसते – खीर मिळत नसते. (चिडविण्याचा अभिनय)

मुक्ता : असते.

सोपान : नसते.

(असते नसते थोडा वेळ होते. मुक्ता चिडते.)

मुक्ता : जा, मग तुमचीही मुंज नाहीच होत उद्या, पहा कधी. (सगळे गंभीर)

ज्ञानदेव : अग, तुझी नसली मुंज तरी – माझ्यातली थोडी खीर देईन मी तुला.

मुक्ता : माझा ज्ञानोबा छान आहे. हा सोपान्या (जांभई देत) वाईट आहे. (सोपान, निवृत्ति सगळेच जांभई देतात).

आई : बरं बरं–पुनः भांडणं नकोत हं – झोपा आता. केवढी मोठ्ठी जांभई आलीय.

[आईच्या एका मांडीवर मुक्ता, मध्ये सोपान व दुसऱ्या मांडीवर ज्ञानोबा डोकं ठेवून झोपतात. निवृत्ति बाजूला झोपलाय. आई त्याच्या डोक्यावरून हात फिरवते.]

ज्ञानदेव : आई, बाबा का नाही ग आलेत पण अजून ?

निवृत्ति : किती रात्र झालीय !

मुक्ता : मुंज ठरवायला गेलेत नं ? गुरुराजाकडे.

सोपान : गुरुराज ? तो मोठा वाईट आहे. मला फार राग येतो त्याचा. एक दिवस किनई मी त्याच्या लांब मिशाच ओढल्या.

मुक्ता : काय गप्पा मारतोस रे ? केवढी टोकं आहेत त्याच्या मिशांना. तुझ्या बोटात काट्यासारखी रुतली असतील ती.

सोपान : असू दे. तरी पण ओढल्याच होत्या मिशा.

मुक्ता : अँ ऽ हूं—स्वप्नात.

सोपान : हो, हो स्वप्नातच. दोन बुक्के पण मारले होते त्याला. (उठून बसतो). गेला लेकाचा पळत.

मुक्ता : तूच पळाला असशील तसा. अँ ऽ हूं (उठून).

सोपान : हे काय ग, सारखं आम्ही काहीही म्हटलं तरी त्याला नाहीच म्हणते. आम्हाला स्वप्नातसुद्धा त्या दुष्टाला बुक्का मारू देत नाही ही. हिचं काय जातं ?

आई (दोघांनाही झोपवत) बरं बरं. निजा बरं आधी. (दोघांच्याही डोक्यावरून समाधानानं, मंद हसत हात फिरवते). चिमण्या माझ्या.

ज्ञानदेव : बाबा अजून नाही आले म्हणून काळजी मात्र खरंच वाटते. काय मौंजीवाचून अडलंय आमच्या ?

आई : मुंज झाली की ज्ञानी होतो.

ज्ञानदेव : अन, एरव्ही काय होता येत नाही ज्ञानी ? ज्ञान मिळवायला असले कुठलेही विधि नकोत. मनापासून ज्ञान मिळवायची तेवढी इच्छा पाहिजे.

आई : पण गुरू पाहिजे असतो ज्ञान द्यायला. अन मौंजी-शिवाय गुरुगृही जाता येत नाही.

ज्ञानदेव : कां. . .?

आई : गुरू येऊ देत नाही.

ज्ञानदेव : मग तो खरा गुरू नाही. शिष्याची योग्यता त्याच्या गळयातल्या जानव्यानं का करायची असते ? आणि आई, खरं सांगू तुला, ज्ञान मिळ-वायला घर नसलं, शाळा नसली, कपडे नसले, दिवे नसले तरी काही विघडत नाही. मिजास आहे ही नुसती. दिखावूपणा आहे हा सगळा. ज्ञान मिळवायला फक्त मनापासून तळमळ पाहिजे. ध्यास लागला पाहिजे ज्ञानाचा. मग दगडाचा-सुद्धा गुरू बनतो. आणि आमाळाखालचं मोकळं रान गुरुगृह म्हणून चालते. एकलव्याचा आदर्श आमच्या पुढे आहे ना. बाबा नाही का सांगत ती गोष्ट महाभारतातली एकलव्याची.

आई : हो. तरी पण मौंजी झाल्या म्हणजे तुम्ही गावात समाजात मिसळू शकाल, असं म्हणतात हे. कारण तुम्ही मग शुद्ध व्हाल.

ज्ञानदेव : आम्ही आधीचेच शुद्ध आहोत आई. आमचं मन शुद्ध आहे. मौंजीनी आणखी काय शुद्ध व्हायचे आहोत ? आणि मनच जर पापी असेल, दुष्ट विचारांनी भरलेलं असेल, त्याला कुणाचंही बरं पहावत नसेल, तर मुंजीनं काय शुद्ध व्हाय-चाय तो ?

आई (गहिवरून) किती शहाणा आहे माझा राजा; नको बोलूस रे चिमण्या असा चुटूचुटू. माझीच दृष्ट लागेल तुला एखाद वेळ. झोपरे. चार लेकरं—स्वर्ग आहे माझा—अनमोल ठेवा ! किती आनंद आहे माझ्या झोपडीत. उद्या एकदा समाजानं तुम्हाला शुद्ध करून घेतलं की जीव भांड्यांत पडेल माझा. उपासमार टळेल तुमची, यातना संपतील तुमच्या. ज्ञाना कितीरे आनंद होतो या कल्पनेनं ! तुम्ही समाजात घेतले जाल, तुमचा कुणी राग करणार नाही. तुम्ही खूप शिकाल, तुम्ही असे सारे विद्वानांच्या सभांत बसाल, धर्माची कोंडी सोडवाल. माझा ज्ञान्या तर फारच बाई हुशार निघणार आहे. हो किनई रे ? झोपला वाटतं ? आम्ही दुरून गंमत पाहू सारी. तुझे बाबा पण मोठ्या तोऱ्यात फिरतील हं. जवळच आहे तो दिवस आता. कशी अधीर झाल्येय मी तो दिवस पहायला. (तेवढ्यात विठ्ठल-पंत येतात) आलात तुम्ही. उद्याच ठरवलीत नं मौंज ? सांगा नं. असं काय बघता साऱ्या मुलांच्या तोंडाकडं ? झोपेतल्या मुलांच्या तोंडाकडं इतकं टक लावून पाहू नये. मौंज झाल्यावर शुद्ध होतील मुलं. संन्याशाची मुलं रहाणार नाहीत उद्या ही. समाजाचे घटक होतील नं ? मुलांची कीव आली नं शास्त्रीबुवांना ? मग करू म्हणाले नं ते ह्या चिमण्यांचा विचार ?

विठ्ठल : अं, हो !

आई : (खूप आनंदून) ऐका, ऐका चिमण्यांनो. संपला तुमचा वनवास, तुमच्या यातना, आता उद्या तुम्ही शुद्ध होणार, समाजात जाणार, शिकणार, खूप ज्ञानी होणार. ऐकलंस न ज्ञान्या ?

विठ्ठल : अग अग, उठतील नं ती सारी.

आई : उठू देत नं ! आनंदाची वातमी ऐकू देत नं.

विठ्ठल : नको.

आई : तुम्हाला डोळे भरून पाहू देत नं. ज्ञाना, सारखी काळजी करीत होता तुमची. रात्र झालीय, आले नाहीत अजून, सारखा तुमचा ध्यास घेतला होता त्यानं, आता तुम्ही आलात. पाहू देत त्याला तुमच्याकडं एकदा.

विठ्ठल : आणि शेवटचंच. (ती एकदम दचकते)

आई : म्हणजे . . .

विठ्ठल : नाही, पण तेही शक्य नाही. एकदाही आणि शेवटचंही पाहणं शक्य नाही.

आई : आई जगदंबे ! काय बोलता तुम्ही हे ? मला नाही समजला त्याचा अर्थ. नका बोलू पण असं धडधडतो ऊर, कोरड पडत्येय घशाला. अमंगळ वाणी . . .

विठ्ठल : अमंगळ नाही, मंगळासाठी आहे ती. आपल्या लेकरांच्या भल्यासाठी आहे ती. तुला आपला निवृत्ति, ज्ञाना, सोपान, मुक्ता शुद्ध व्हावीत, त्यांचा वनवास संपावा, यातना संपाव्यात, समाजानं त्यांना जवळ घ्यावं, आपल्या कुशीत घ्यावं असंच वाटतं नं ! मग तुझी मांडी सोडायला पाहिजे त्यांना !

आई : आई ग, काय समजू मी हृयाचा अर्थ ?

विठ्ठल : कसा सांगू मी तरी ? (कंठ दाटून) आपण दोघांनी तात्काळ नाहीसं व्हायला पाहिजे हृया जगातून. हृया रात्रीच.

आई : (अश्रूपूर्ण) माझ्या पाडसांना सोडून ? हृया चिमण्यांना असहाय, अनाथ करून ?

विठ्ठल : हो ! न्याय दिलाय शास्त्रीबुवांनी. देहांत प्रायश्चित घ्यायला पाहिजे म्हणाले तुम्ही. . . . (संयपणे) आता रातोरात निघायचं ठरविलंय मी. प्रयागला गंगेत उडी घ्यायची. संपवायची ही जीवनयात्रा.

आई : आणि ही माझी चिमुरडी, उद्या कुणाच्या तोंडाकडे पाहतील ? केविलवाणी चोंच उघडतील तर कोण घालील त्यात चारा पाणी ?

विठ्ठल : नको नको. गिळा ते सारं, माया आवंढ्यात गिळा. परमेश्वर घालील पाखर त्यांच्यावर. . . वेळ नको जायला अधिक, माया गुरफटते, जीव गुंततो अधिकाधिक, चला.

[रखमाई आंतल्या आंत ढसढसा रडते. एकेकाचं डोकं मांडीवरून उचलून खाली ठेवते, एकेक चेहरा रडत रडत न्याहाळते. विठ्ठलपंतही उपरण्याआडून तेच करताहेत. रखमाई उठते. पुनः लेकरं न्याहाळते. अंबाबाईजवळ जाते, नमस्कार करते करंडघातलं कुंकु कपाळी लावते.]

आई : अंबे, आई . (हुंदका आवरेनासा होतो) लेकरं तुझी आहेत ग ! तुझीच आहेत (निघते), एकदा मुक्ताईला छातीशी घेऊ देत. (तिच्याजवळ जाते धावरूनच).

विठ्ठल : पण उठेल नं ती.

आई : हो खरंच . (दूर सरते).

विठ्ठल : चल, लौकर तोड मायापाश.

आई : हो. (निघते). मुंज व्हायची होती उद्या. खीर खायची होती उद्या त्यांना. थांबा, वाढून ठेवते ती, बाहेर.

[सोपान व मुक्ता झोपेत बोलतात]

मुक्ता : ए, फजिती झाली तर झाली थोडी, पण खीर खायला मिळेल नं गोड गोड उद्या.

सोपान : खीर ? खीर तर आई-वडील मेले म्हणजे ते काय करतात नं, तेव्हा खायला मिळते.

[आई चरकते. खीर तशीच मडक्यात टाकून पदराआड तोंड दडवीत निघते. दाराशी येताच पुनः दोघंही मागं वळून मुलांच्याकडे पाहतात. आई 'मुक्ता' म्हणून व विठ्ठलपंत 'ज्ञाना' म्हणून आवंढा गिळतात व भरकन बाहेर जातात. समई विझते. अंधार होतो. 'मुक्ता – आई' म्हणून किंचाळते.]

पडदा पडतो

[अंक पहिला समाप्त]

अंक दुसरा

दृश्य १ ले

(गुरुराजांचे घर. पहिल्या अंकातलेच दृश्य. गुरु व विसोबा बोलत बसले आहेत.)

विसोबा : अहो, रात्रीतून गांव सोडून पळाला तो विठ्या बायकोला घेऊन. आपला दराराच तसा. सगळ्या गावानं त्यांना बजावलं की तुम्ही धर्माची आज्ञा पाळलीच पाहिजे. देहान्त प्रायश्चित्त घेतलंच पाहिजे. घावरले नि पळाले जीव घेऊन देशोधडीला.

गुरु : आणि त्यांची ती कारटी ?

विसोबा : आठवडयांत त्यांचीही तीच गत होणार.

गुरु : तो निवृत्ति अन् ज्ञाना फार शेफारलीत हं. भजने करती, अभंग रचती.

विसोबा : ती कारटी कसला अभंग रचणार !

गुरु : विठ्ठलाचा – भक्तीमार्गाचा, उपदेशाचा – मोठा रसाळ अभंग रचती. अत्यंत भक्तीभावनेनं गोड आवाजाने गाती.

विसोबा : तुम्ही ऐकलंत स्वतः ?

गुरु : आम्हास कुठली सवड असले ढोंगी चाळे ऐकाया ? पण लोक आमच्या जवळ येऊन त्यांची स्तुति करती. भाळून टाकले त्या कारटयांनी जणु ! काही लोक तर संत म्हणायला लागलेत त्यांना.

विसोबा : त्या ढोंगी गोसावडयांना संत म्हणायला लागलीत ? (हंसतो)

गुरु : हसण्यावरी नेवो नयेत हा विषयु ! ढोंगी गोसावडयांची कारटी डोक्यावर बैसली तर धर्मु नाशेल, पाप प्रवर्तेल, समाज मरेल.

विसोबा : नाही नाही असं नाही व्हायचं. दोन दिवसात खोड जिरवतो कारटयांची.

गुरु : पळाली पाहिजे ती गाव सोडोनी !

विसोबा : नाही नाही. गांवच काय त्यांना पळवतो हे जग सोडोनी.

गुरू : म्हणजे ?

विसोबा : अन्नपाणी बंद करवितो त्यांचे. कुत्रे सोडून लचके तोडवितो एकेकाचे. रात्री झोपडीला आग लावून देतो.

गुरू ; (हंसून) नमः शिवाय नमः शिवाय (विसोबा उठून तडक हसत हसत जातो. जातांना गुरुदेवांच्या चरणी नमस्कार करतो.)

गुरू : परमेश्वर प्राप्तीचा सोपा मार्गु ! दावितो – हा मूर्ख ज्ञान्या, निवृत्या, विठ्ठलभक्तीचा मार्गु, देव काय टाळ कुटिल्याने भेटतो ? आश्चर्यम् ! महदश्चर्यम् ! (शिष्य येतो).

शिष्य : गुरुदेव, तुमचा नाशु ! विनाशु !

गुरू : ऐसा भूतबाधा झालीयावत् काय ओरडिसी ? अभद्र बोलीसी ? कैसा नाशु ?

शिष्य : लोक निवृत्तीते, ज्ञानीयाते गुरु म्हणिती. आपले पुत्र त्यांच्याकडे धाडिती, ज्ञानिये त्यासी शिकविती, ज्ञान देती–अता आपलीया पाठशाळेत कोण येतील ? ते फुकट शिकविती आपली दक्षिणा बुडेल. मग अुदरू कैसा भरेल ?

गुरू : भरेल, भरेल ! चिंता नसावी–विसोबा सर्व ठीक करीतु असे.

शिष्य : कैसे करीतु असे ?

गुरू : त्या कारटीयांसी अन्नपाण्यावाचुनी मारोनी.

शिष्य : ऐसे नच घडेल. लोक त्याते माधुकरी देती. मिष्टान्न देती. मोदक घृत–फेण्या–घेवर–अतीव स्वादु ! (जिभल्या चाटतो) काल आम्ही स्वाद घेतला–ज्ञानीयाने आम्हासी प्रसाद दिधला.

गुरू (कोपोनी) मुर्खू ! माधुकरीचे अन्न भक्षितु, भीक भक्षितु ? त्या गोसावडीयाने स्पर्शिले अन्न भक्षितु ? साक्षात चांडाळीयाने स्पर्शिलेले ते अन्न. अन्न नसतु, घाण असतु.

शिष्य : गुरु, अन्नासी ऐसे न बोलिजे तुम्हीच सांगीजे. अन्नपर ब्रम्ह जाणिजे म्हणोन ! शिवाय ते ज्ञानीये कैसे स्वच्छ पवित्र.

गुरू : त्यासी पुनः पुनः ज्ञानीये कासया म्हणीजे. गोसावडीये म्हणीजे.

शिष्य : तैसेचि गुरू, पण ते शुद्ध असतु. त्यांचे तेज काय वर्णू ! आपलीया श्रीमंताहुनी काय ते अधिक वाईट असती ? श्रीमंताचे घरचे अन्न तुम्ही भक्षितु, सर्व विटाळ काळवितु श्रीमंत.

गुरु : अुलुलूक ! वाणीसी आवार घालीजे. श्रीमंत धन देती. दक्षिणा देती–सर्वेश्वर असती–मनात आणती–तर तुमचा आमचा सर्वनाश करीति.

शिष्य : आणि नाहीतरी उदईक करणारची ते आपुला सर्वनाश. तुमच्यावरी ते बहुत कोपले असती.

गुरु : किमर्थम ?

शिष्य : इतुका काळ तुमच्यापाशी शिकलीयावरही त्यांचा पुत्र अजागळची राहिला, त्यासी काहीही ज्ञान नसतु. उलटपक्षी अत्यंत माजला, वाईट वर्तन करो लागला. मदिरापान आणि वारांगनांचे नृत्य पाहो लागला. गुरूराज, नृत्यांत मजा येतो !

गुरु : (संतापून) म्हणजे, तू वारांगनेचे घरी रात्री जातोसी ! आमची शिकवण विसरतोसी ?

शिष्य तुमची शिकवणच काय पण वारांगनेच्या घरी प्रत्यक्ष तुम्ही माझ्या समोरच बैसला आहात तेहीं विसरतो. (गुरु दचकतो.)

गुरु : शान्तं पापं, शान्तं पापं ! (चिडून) उलुलूक–गुरू-निंदा तुम्हाते न शोभतु. आम्ही वारांगनेच्या गृही शुद्ध मनाने जातु. शिवाय तिच्यात आमच्यात दुजेपणा नसतु. ती नी मी एक असतु. ब्रम्ह असतु. सर्व खलु इदं ब्रम्ह. ती ब्रम्ह मी ब्रम्ह.

श्रीमंत (प्रवेशून) हा विंचू पण ब्रम्ह. गुरू विंचू नि तू पण एक असतो. हा विंचू तुंला भेटाया येती. ब्रम्ह ब्रम्हाते भेटती.

गुरु : हे काय श्रीमंत ? मला विंचू दंश करेल.

श्रीमंत : कैसा करेल ? कां करेल ? तू नि विंचू एक असती. सर्व प्राणीमात्राचे ठायी एकच ब्रम्ह असती –तू गुरू हा महागुरू ! !

गुरु : वेदान्ताची थट्टा आरंभिलीसी ? तुम्हा ज्ञान दिधले ते ऐसा दुरुपयोग करण्यासी ?

श्रीमंत : कोणते ज्ञान दिधले ?

गुरु : उगीचच शास्त्राच्या दोन परीक्षा उत्तीर्ण झालात ?

श्रीमंत : परीक्षा उत्तीर्ण जाहलो ते काय त्वा ज्ञान दिधले म्हणौनी ? आम्ही चौपट दक्षिणा दिधली, तुज मोहरा पीतांबर दिधले म्हणौनी.

शिष्य तुमच्यात ज्ञान घेण्याची पात्रताच नाही, त्यास गुरू काय करेल ?

श्रीमंत माझ्यात पात्रता नाही हे जाणीले, तरी गुरूने मज शिष्य म्हणून स्त्रीकारले, नाकारिले का नाही ? ज्यासी ज्याची पात्रता नसे त्यासी ते ज्ञान देऊ नये, मग कां दिधले मज ? माझ्या बापासी भिवोनी ? सत्तेसी भिवोनी ? धनाचीया लोभे ? अरे, मी सांगतो. या गुरूसी, ज्ञान देण्याची पात्रताच नसती. जो खरा ज्ञानीयाचा राजा तो रेडीयासी देखील ज्ञानी करून सोडील.

गुरू : असो, असो. पण श्रीमंत, आज तुम्हाला पाठ शिकावयाचा नसत ?

श्रीमंत : असत. पण तुझ्याजवळ नसत. त्या ज्ञानीयाच्या राजाजवळ – खरा गुरु – योगीराज म्हणती जन त्यासी. शहाणे केले त्याने आम्हासी, आम्ही जात तिकडे – (जातो).

शिष्य : ऐकिले गुरु, आता सावकार देखील त्या कारटीयांच्या नादी लागले. अता आपण ठार मेले.

गुरू : नाही, नाही ऐसे कदापि होणार नाही. विसोबा त्यांची सोय घालेल. आम्ही पण आता त्या कारटीयांचा काटा काढिण्या कटिबद्ध होत. शिष्यवर, त्वा काही चांडाळ एकत्र आणीजे. त्यांना ज्ञान्याच्या अंगावरी थुंकण्या सांगीजे. त्यांच्या माधुकरीच्या ताटात माती कालविण्या सांगीजे. त्या कारटीयासी कोणत्याही प्रकारे अन्न न मिळो दिजे. त्यासी त्रासोनी त्रासोनी सोडीजे जा. आमचे महत्त्व वाढविले पाहिजे ऐसे कीजे. (शिष्य जातो, जातांना गुरूला नमस्कार करतो.) (शास्त्री येतात).

शास्त्री : गुरुवर्य, पैठणक्षेत्रीचे विद्वान महापंडित आज गावात आले आहेत. आपणाला त्यांना भेटायचं आहे ना ?

गुरू : होय, होय. त्यांचेकडून एक प्रशस्तीपत्र पण मिळवायचे असत.

शास्त्री : मिळेल. शास्त्रार्थ चर्चा, वेद चर्चा, काव्य चर्चा, धर्म चर्चा अशी कुठली तरी महान चर्चा त्यांच्याशी करा, त्यांना तुमची विद्वत्ता दाखवा की ते तात्काळ प्रशस्तीपत्र देतील.

गुरू : अन्यथा, न देतील ? ऐसी कुठलीही चर्चा न करिता कैसे देतील ते सांगीजे. धन देऊ. वस्त्रालंकारे त्यासी भूषवू.

शास्त्री : हे काय बोलता गुरुवर्य ? पैठण क्षेत्रीचे ते पंडित असे धनलोभी आणि भूषणलोभी नाहीत.

ते ज्ञानी, निरीच्छ, निरपेक्ष आहेत. तुमची विद्वत्ता त्यांना दाखवा. शास्त्रार्थ मांडा.

गुरु : आम्हास शास्त्रार्थ ठाऊक नाही, फक्त अर्थ ठाऊक आहे. ऐसे करू नाहीतर. त्यांच्या अध्यक्षतेखाली तुम्ही आमचा सत्कार करीजे. पंडित, महा पंडित बंड पंडित, दंड पंडित ऐशा बहु बहु पदव्या देईजे. महावस्त्र आम्हा देईजे.

शास्त्री : पण माझ्याजवळ धन कुठे आहे हे कराया गुरुवर्य ? तुमचा सत्कार करायचा तर. . .

गुरू : त्याचा खर्च तुमच्यावर पडणार नसत. खर्च आम्ही करू. आपण लोकासी धन वाटावे आणि त्यांच्याद्वारा सत्कार करवून घ्यावा ऐसी मान्य रीतची असे. तुम्ही फक्त सत्कार समिती स्थापन कीजे. तुम्ही अध्यक्ष होईजे.

शास्त्री : पण मी आपल्याबद्दल काय नि कसं बोलू ?

गुरू : ते सर्व मी लिहून देईन. चिंता नसावी.

शास्त्री : तुम्ही स्वतःच स्वतःची स्तुती कराल ?

गुरु : नाहीतर काय, लोकांना दुसऱ्याची स्तुती करायला रिकामपण कुठे असते बरे ?

शास्त्री : पण समारंभाला लोक जमले पाहिजेत नं ?

गुरू : कार्यक्रमानंतर सर्वांसी दुग्धपान देण्यात येईल ऐसे लोकासी कळवावे म्हणजे लोक जमतीलच.

शिष्य : (आनंदाने उडया मारीत प्रवेशून) गुरु, आनंदु, अतीव आनंदु ! विसोबा विजयतु ! विसोबानं तर मजाच केला. ज्ञान्या नि निवृत्तीला सळो की पळो करून सोडीला. त्यांची सर्व माधुकरी चांडाळाकरवी मातीत घालविली. आज उपवास घडणार त्या चारही कारटयांना. शिवाय ज्ञान्यासी तर कुत्रे कडाडून चावले विसोबाचे. रक्ताची धार वाहिली, विसोबाच्या नेत्री आनंदाश्रू वाहिले. आम्ही आनंदुनी टाळया पीटीले.

गुरू : अरेरे, आम्हाला का नाही पाचारीले ते दृश्य पहावयासी ? आमच्या नेत्रांना संतोष जाहला असता.

शिष्य : अजूनही चला. माधुकरीची रिकामी ताटे नि रडका चेहेरा घेऊन चाललेली ती कारटी दिसतीलच नदीकाठी. ज्ञान्या लंगडतो आहे, रक्त वाहतं आहे, माशा पायाभोवती घोंघावत चावत आहेत. हाल हाल सोशीताहेत. चला ती गंमत पहायला.

शास्त्री : त्या अनाथ, पोरक्या, पण शहाण्या बालकांचा छळ पहाण्यात तुम्हाला मजा वाटते ?

गुरू : संतोषही वाटतो, चला शिष्यवरा. (दोघेही जातात.)

शास्त्री : केवढा दुष्टपणा हा ! परमेश्वरा, तुला डोळे नाहीत का ? त्या अजाण बालकांचे, हे असे हाल कां करतोस तू ? नाही नाही, हे बंद व्हायला पाहिजे. (तोही जातो.) (पडदा पडतो)

दृश्य २ रे

[ज्ञानदेवादिकांची झोपडी. अगदी पाहिल्याच अंकातले दृश्य. सोपान, मुक्ता भुकेनं व्याकुळ झालेली. सारखी दादाची वाट पहाताहेत.]

मुक्ता : (इवलासा चेहरा करून) सोपान केव्हा येईल रे ज्ञाना ? मला खूप भूक लागलीय, डोकं दुखायला लागलंय.

सोपान : येईलच ग आता. आज किनई उशीरच होणार होता त्यांना यायला.

मुक्ता : कां. . .?

सोपान : त्या श्रीमंतानं सांगितलं मला. तो सारखा खाण्याच्याच गोष्टी करतो. खिशात काही काही खायचं भरून आणतो.

मुक्ता : तुला देतो त्यातलं काही ?

सोपान : हं, पण मी घेत नाही. दादा म्हणतो, शिकतांना लक्ष खाण्यात नसावं.

मुक्ता : पण भूक लागली असताना शिकण्यात तरी कसं लक्ष लागेल रे ?

सोपान : भूक आवरली पाहिजे. शिक्षण घेणं हे खडतर व्रत आहे. मन आवरलं पाहिजे. शरीर झिजवलं पाहिजे. ज्याला सुखात लोळावसं वाटतं त्याला ज्ञान मिळूच शकत नाही, असं दादा सारखा सांगतो.

मुक्ता कठीण आहे रे मग ज्ञान मिळवणं. मला तर भूक लागली की कुठ्ठं लक्ष लागत नाही. बघ नं आता कसं काही सुचेनासं झालंय मला. (थोडया

वेळाने) सोपान, तू म्हणालास, दादा पण म्हणाला त्या दिवशी सकाळी, आई–बाबा बाहेर गेलेत, गावाला. अन् लौकरच येणार आहेत म्हणून ! मग ते तरी का नाही येत रे अजून ?

सोपान : येतील ग ! गाव जवळ का असतं. खूप चालावं लागतं. पाय न् पाय दुखतात.

मुक्ता : आईला तर मुळीच चालवत नाही. नदीवर पाय मुरगळला होता तिचा. शिवाय थकून झोपून गेली होती नं आई आपली. उपास, उपास सारखे व्हायचे. मधेच कुठे घेरी येऊन पडली तर नसेल ना रे आपली आई ?

सोपान : नाही ग, बाबा आहेत न सांभाळायला बरोबर.

मुक्ता : अं हं. (थोडं घुटमळून) ए सोपान, रागावणार तर नाहीस न तू ? एक विचारू ? खरं सांगशील ?

सोपान : हो, विचार.

मुक्ता (रडका चेहरा करून) खरंच, आई–बाबा गावाला गेलेत ? पुन: खरंच परत येणार आहेत ? (सोपानचा चेहरा कावराबावरा होतो) की... (रडू कोसळून लोकं) म्हणतात, मी ऐकलं चोरून, की आई–बाबांनी जीव दिला. ते मेले. आता नाही दिसायचे कधी पुन: आपल्याला (रडू लागते).

सोपान : मुक्ताई माझी सोनी. (तिला जवळ घेतो. पाठीवरून हात फिरवीत) शहाणी आहे. रडायचं नाही असं.

मुक्ता : आम्हाला खूप भूक लागलीय. अन्न पण नाही नि आई पण नाही. आई असती तरी.. .आई ऽऽ

सोपान (अश्रू न आवरून) आई ! (विसोबा केळी खात येतो).

विसोबा : ॲई ! भागुबाई तुमची ॲई. जीव दिला तिनं. कुरतडून कुरतडून खाल्ली तिला सुसरीनं. असे लचके लचके तोडून. अशी भयाण दिसली... शी: शी: !

मुक्ता : अहं, माझी आई भयाण नाही, छान आहे. साधी, शांत किनई रे सोपान ! पण तुम्ही पाहिलंत माझ्या आईला ? खूप वेळ पाहिलंत ?

विसोबा : शी:, बघवत नव्हतं तिच्याकडं. थोडंसुद्धा उभं नव्हतं रहावत. घाण सुटली होती त्या पापी शरीराची.

सोपान : चूप रहा. आणखी टवाळी करू नकोस आमच्या आईची. (विसोबा हसतो. साल खाली फेकतो).

मुक्ता : केळी खातोस ? आमचा ज्ञाना आणणार आहे केळी. आणखी काय काय म्हणालास रे सोपान तू ? [ती सारखी विसोबाच्या खाण्याकडं पहातेय. तिला हवसं वाटतं ते खायला. मागावसं वाटतं पण ती मन आवरते.]

विसोबा : माती, दगड, विटा...

मुक्ता : शी:, असं हो काय बोलता ?

विसोबा : बघ तो आलाय तुझा ज्ञान्या – विचार त्याला काय आहे त्याच्या झोळीत ते– (हसतो) आणि ते बघ त्याच्या पायातनं रक्त वाहतय– (ज्ञान्या येतो).

मुक्ता : (आनंदून) माझा ज्ञाना आला – माझा ज्ञाना आला–(जवळ जाते) मला भूक लागली रे केव्हाची. दे लौकर खायला.

ज्ञानदेव : आणखी थोडी थांब... निवृत्तीदादा येतोय.

मुक्ता : तू काही नाही आणलंस ? ऊं: जा...तुझ्या ताटात माती ? माती वाढली आज मावशींनी ?

ज्ञानदेव : नाही. मावशीनं सुग्रास अन्न घातलं होतं पण विसोबामामांनी त्यात माती कालवली. (विसोबा हसतो.)

सोपान : हसतो वर दुष्ट (ज्ञानदेव शांत–हास्यवदन)

मुक्ता : आणि तुझ्या पायातनं रक्त वाहतय ?

ज्ञानदेव : कुठे ? माझ्या पायावर वहातय फक्त, माझ्या पायातनं नव्हे; बघ दिसतेय जखम कुठे ?

(मुक्ता रक्त पुसते – पाय स्वच्छ दिसतो. विसोबा चरकतो.)

विसोबा (कांहीसा स्वत:शीच) कुत्रे चावले चांगले पण जखम नाही ?

ज्ञानदेव : कुत्रे चावले. अहंकाराचं रक्त वाहून गेलं. मायेची साल गळून पडली, उरलं काय मग ? जखम होणार कशाला ? चैतन्याला ? ब्रम्हयाला ?

मुक्ता : (आनंदानं नाचते) ज्ञानाला लागलं नाही, ज्ञानाला जखम नाही.

ज्ञानदेव : अगं नाचू नकोस. पडशील. आधीच भुकेनं गळून गेली आहेस. सोपानाला पण भूक लागली

असेल माझ्या. (त्याला जवळ घेतो) थोडी कळ काढ राजा आणखी. आता निवृत्ति आणेल ताट. सारे जेवू मग...

विसोबा : अस्सं, म्हणजे निवृत्या पुन: माधुकरी मागायला गेलाय तर! एकदा तर मातीत घालविलं त्याचं ताट. अता पुन्हा गेलाय होय, पुन्हा कालवतो माती त्यात. (झरकन वळतोव स्वत:च मघा टाकलेल्या केळाच्या सालीवरून घसरतो. दणकन आदळतो)...अयायीगं (उठायला जातो पुन्हा पाय लचकून खाली बसतो. पुन: उठायला पहातो पण जमत नाही. ज्ञानदेव पुढे होऊन त्याला हाताचा आधार देतो.)

ज्ञानदेव : उठा विसोबा, डोळे उघडा. मायेची साल ती. अज्ञानाची घसरंडी. जीव असाच आपटी खातो, दूर फेकावी ही साल.

विसोबा : बरं—बरं. त्या निवृत्याचं अन्न मातीत घातल्या-शिवाय मला चैन पडायची नाही.

(विसोबा लंगडत लंगडत जातो)

सोपान : कशाला आधार दिलास तूं त्या दुष्टाला?

ज्ञानदेव : पतिताला हात देणं कर्तव्यच आहे माणसाचं.

सोपान : पण ह्यानं माती कालवली आपल्या अन्नात.

ज्ञानदेव : म्हणून काय राग धरायचा त्याचा? ऊस पाहिलास तूं? माळी त्याला पाणी घालतो—त्याला तो गोड रस देतो, आणि दुसरा येतो तो त्यावर कोयत्याचे घाव घालतो. त्या ऊसाची खांडोळी खांडोळी करतो. पण म्हणून ऊस काय त्याच्यावर रागावून त्याला कडू रस देतो? नाही ना? ऊस पाणी घालणारा असो की त्यावर घाव घालणारा असो दोघांनाही गोडच रस देतो. झाडाचं पण नाही का तसंच. त्याची सावली माळयाला नि लाकूडतोडयाला सारखीच पाखर घालते. विसावा देते. माणसानंही सगळयांशीच चांगलं वागावं, सुजनाशी, दुष्टाशी; कुणाचाही राग करू नये, कुणालाही तोडून बोलूं नये. उलट होईल तेवढी मदत नेहमी सगळयांनाच करीत असावं. (निवृत्ति येतो.)

निवृत्ति : (येतानाच) माया फार माजली ज्ञाना. अहं-काराचे डोंब उसळले गगना.

ज्ञानदेव : मी हें कधीच उमगलो. पण तुम्ही मानीच ना. आता तरी आज्ञा असावी गुरुराजा.

निवृत्ति : तथास्तु.

मुक्ता : कसली निरर्थक बडबड लावलीत रे? खायला नाही आणलंस ना तूही दादा?

निवृत्ति : अहं...कारण मला कळलं की माझी मुक्ता-बाई. तिला मांडे खूप आवडतात. अन तेही स्वत: केलेले. तर ती आज घरी मांडे करणार आहे. पोटभर स्वत: नि तिचा दादा पण खाणार आहे. काय ज्ञाना?

ज्ञानदेव : हो तर.

मुक्ता : म्हणे हो तर—कशाचे करणार मांडे?

ज्ञानदेव पिठाचे.

मुक्ता : आहे कुठं पीठ?

निवृत्ति : का? अहंकार दळिला, माया भरडिली, ज्ञानीयाच्या जात्यावर; मग त्याचं पीठ कुणी खाल्लं?

ज्ञानदेव : खाल्लं कुठे? ते भरलंय झोळीत.

मुक्ता : अय्या हो! पीठच पीठ, पण खापराचा तवा हवा न मांडे भाजायला?

ज्ञानदेव : आता आणून देतो. सोपान काटक्या आणेल गोळा करून विस्तव पेटवायला, जा सोपान. (सोपान जातो) आणि हास माझ्या मुक्ताई आता. (तिला कडेवर घेऊन गरागरा फिरवतो.)

मुक्ता : सोड सोड, मला आता पीठ भिजवायचंय, भूक लागलीय, अन तूही लौकर आण खापराचा तवा.

ज्ञानदेव : तर तर—हा निघालोच.

(जायला लागतो तो विसोबा हजर.)

विसोबा : तर तर—म्हणे हा निघालोच. तुझ्या बापा-चाच माल आहे की नाही खापराचा तवा म्हणजे! नाही मिळायचं खापर तुला कुठे. नाही जायचं तूं कुठ गावाकडे. तंगडी तोडून ठेवीन पुन: गावा-कडे गेलास तर.

मुक्ता : असं हो काय करता? आम्हाला भूक लागलीय खूप.

विसोबा : मरा मग भुकेनं तडफडून. उपकार आहेत का गावाला? म्हणे भूक लागली! तुमच्या जन्मानं

सगळया समाजाला आग लागलीय. (सोपान येतो.)

सोपान : हया काटक्या. आणि एका कुंभारानं हे खापर दिलंय मांडे भाजायला.

विसोबा : कुंभारानं ? कुठला कुंभार ? इथं कुठं आला कुंभार गांव सोडून ? कुठाय तो ?

सोपान : तो उभा आहे.

विसोबा (पडद्यात पाहून) अरे चांडाळा, तुला कुणी सांगितलं इकडं खापर आणून द्यायला. आणि हा रस्ता तरी कुणी दाखवला हया ज्ञानाच्या घराचा ? आणि तूं एवढया लौकर इथं येऊन् तरी कसा पोहोचलास ?

ज्ञानदेव : भगवंताची कृपा, गुरुची कृपा झाल्यावर रस्ता नीट सापडतो. भक्त लौकर आपल्या गावी पोहोचतो.

विसोबा : बोल, बोल रे कुंभारडया. अॅं ! एवढयात कुठं गेला कुंभार ? अत्ता होता इथं.

ज्ञानदेव : भास, सगळे आभास अज्ञानाचे, मायेपायी. कोण कुंभार ? कुठला ? खोटया संसारातले खोटेच कुंभार. फसव्या मायेच्या संसारातले हे फसवे मायावी आभास.

विसोबा : काय पहातोय मी हे ? काय अनुभवतोय ? पण मी फसायचा नाही असा. मला भुरळ पाडू नकोस, ज्ञान्या मी तुला खापर मिळू द्यायचा नाही. सोपान्या, आण ते खापर इकडे. नाही ? (विसोबा धावून जातो. ते खापर ओढतो–फोडतो–हसतो) खोटं, फसवं आहे नं सगळं तर हे खापरही खोटं–फसवं मायावी समज, फोडलं मी ते.

ज्ञानदेव : छान केलंस. खरंच खोटं होतं ते.फसवं. मायावी. बरं केलंस फोडलंस. असंच मायेचं खापर फोडावं, संसार सोडावा. आणि खरं खापर जोडावं.

मुक्ता : अता मांडे कसे करायचे रे पण ? मला तर खूप भूक लागलीय.

विसोबा : आता फक्त मनातले मांडे खा मनातले. हयांच्या गप्पांचे. बडबडीचं पीठ नि मनांतले मांडे छान जेवण होईल तुमचं. (हंसतो)

सोपान : आमचं खापर फोडलंस आणि वर हसतोस दुष्ट.

मुक्ता : (रडत) आता आम्ही मांडे कशावर करायचे,

ज्ञानदेव : रडतेस कशाला मुक्ताई ? तुला मांडे करायला खापरच हवं नं ? हूं, ही माझी पाठ. बघ कशी आहे सपाट अगदी खापरासारखी. कर हयावर मांडा.

विसोबा : (हंसतो) वेडपट चाळे चालवलेत. वेडा झालाय हा ज्ञान्या ! भुकेपायी डोकं फिरलंय हयाचं (पुन्हा हसतो).

ज्ञानदेव : बघतेस काय मुक्ताई ? काढ पीठ, भिजव अन् कर हया पाठीवर मांडा.

मुक्ता : पण तो भाजेल कसा रे ? तवा गरम असतो– लाल लाल.

ज्ञानदेव : माझी पाठ पण गरम आहे न तापलेली लाल लाल. (पाठ लाल प्रकाश देते)

विसोबा : काय ? जादू करतोस काय रे गोसावडया ? बघू, खरंच तापलीय का पाठ ते ? (हात ठेवतो –चर्रर चटका बसतो) आई ग ऽऽ

मुक्ता हात जळाला तुझा ?

ज्ञानदेव : अहं–अहंकार...

विसोबा (एकदम ज्ञानेश्वराचे पाय धरतो). माझ्या ज्ञानीयांच्या राजा, खरंच जळला माझा अहंकार, सरला माझा संसार. (पडदा पडतो).

दृश्य ३ रे

(गुरुवर्यांचे घर. दृश्य पहिल्या अंकाचेच. गुरुवर्य कोपऱ्यात तोंड करून काही खात असतो)...

शिष्य : (प्रवेशून) गुरुवर्य, (गुरु दचकतो) मागे वळी जे. एकदा तरी मागे वळी जे. अता सदाची तोंड फिरवणे प्राप्त. जगाला दाविण्या तोंडचि नसे. काळे फासिले. मुखासी आपुल्या.

गुरु : (खात खात) कैसे बोलीजे ?

शिष्य : सदैव भक्षिण्यात काळ घालीजे, तुम्ही वाईट. आम्हा नावडे, आम्हा–(आ करतो तोच गुरू त्याच्या तोंडात खाद्यपदार्थ टाकतो. शिष्याचे बोलणेच बंद होते) मोदक ? स्वादु, गोड, अतीव स्वादु, सुमधुर. गुरुवर्य तुम्ही चांगले, आम्हा तुम्ही अतीव आवडे.

गुरु : पण मघा कासया जीव घाबरा होतसे तुझा ?

शिष्य थांबिजे मोदक भक्षितो, मग कथितो (खातो) विनाशु जाहला गुरु, विनाशु, तो विसोबा

गुरु : त्या कारट्यांसी पळविता जाहला ?

शिष्य : नाही गुरु, तो स्वतःची पळाला. संसार सोडून पळाला. ज्ञानीयाच्या चरणी नतमस्तक होऊन पळाला. ज्ञानीयांच्या राजाने चमत्कार केला, पाठीचा तवा करोनी मांडा भाजिला.

गुरु : तो लबाडु. तो ज्ञान्या अतीव लुच्चु. मायाजाल करीजे. भूतपिशाच्च साधना करीजे, त्याचे कधी न बरे होईजे.

शिष्य : पण आधी आपले तरी बरे पाहिजे. लोक ज्ञानीया अतीव अनुकूल. त्यासी मिष्टान्न देत. अता विसोबाही नसत.

गुरु : पण आम्ही कुठे मरत ? आम्ही असत. आम्ही त्यास छळीत. (कानात काहीतरी सांगतो). ऐसी कठोर शिक्षा करवीत. तोंड दाविण्या जागाचि नसे त्याजला मग. (बाहेर पहात) तो पहा, तो ज्ञान्याचि माधुकरी घेवोनी चालला. त्यासी बोलविजे. आणि आम्ही सांगितले ते ध्यानी ठेवीजे. (शिष्य जाऊन ज्ञानेश्वराला घेऊन येतो. गुरु ध्यानस्थ असतो.)

शिष्य : गुरुवर्य, ज्ञानीयांचा राजा आलासे.

ज्ञानदेव : कशाला आराधनेत व्यत्यय आणता त्यांच्या ? ध्यान लावलंय त्यांनी. मी जातो. घरी मुक्ताई उपाशी आहे. वेळ झालीय माधुकरीला आधीच.

गुरु : कोण पातला ? अत्र आगच्छतु.

शिष्य : जा, तिकडे बोलावताहेत तुम्हाला गुरु. (ज्ञानेश्वर माधुकरीची झोळी बाजूला ठेवून गुरूकडे जातो. चरणी नम्र होतो. इकडे शिष्य झोळी व माधुकरी घेऊन आत पसार होतो.)

ज्ञानदेव : साष्टांग प्रणिपात तुज गुरो, गुरु : साक्षात्परब्रम्ह, तस्मै श्री गुरवे नमः। (पुनः चरणी नम्र होतो) बालकावर दया असो द्यावी. आपण कशाला बोलावलंत मला ? (शिष्य पुनश्च झोळी व ताट आणून ठेवतो) आपण ध्यानमग्न आहात. शिष्यानं बोलावलं म्हणून मी आलो. येईन पुनः केव्हा तरी. आपण ध्यानभंग होऊ नये. येतो. (पुनः मस्तक नमवितो तोच गुरु ताडकन लाथेने ढकलतो.)

गुरु कुणी बडबड आरंभिली ? (डोळे उघडून) तू ऽ चांडाळ ! आमचा ध्यानमंगु केला ? ब्रम्हानंदसुख. अनुभवीत होतो. तुवा सारा भंग केला. पाप्या, कुठे भरशील हे पाप ? अधमाधमा, शिवाय मला विटाळ केलासी. शिष्या, ह्याला आमचा पाय लागला. ह्या चांडाळासी आमचा स्पर्श जाहला. आंघोळीसी पाणी देईजे.

ज्ञानदेव (चिडून) पण, तुम्हीच मला बोलावलंत.

गुरु : मिथ्या, मिथ्या संभाषण कीजे. (शास्त्री येतो) शास्त्रीबुवा, देखीजे हा ज्ञान्या, तुम्हासी ह्याची कीव येते. देखीजे कैसा मातलासे. आम्ही ध्यानमग्न होतो तो आत पातला. आमचा ध्यानभंगु केला. आम्हासी काय काय नको ते अभद्र बोलला. गोसावडा, चांडाळ, पापी, अधमाधम ऐशा शिव्या ह्याने मजला दिधल्या.

ज्ञानदेव : (चिडून) मिथ्या ! खोटं, अगदी खोटं !!

शिष्य : गुरु, हे पाहिले, ह्याने आपले द्रव्य चोरिले. ह्याच्या माधुकरीच्या झोळीत आपले द्रव्य असिजे.

गुरु : बाप वो ! माझे द्रव्य. (आसनाखाली चाचपडून पहातो) हो, हो ! माझेचि द्रव्य. आसनाखाली द्रव्य होते, ते ह्याने चोरिले.

ज्ञानदेव : मी ? कशाला तुमचं द्रव्य चोरू ?

गुरु . अरे, ते आम्हासी काय विचारतो ? पाहू, पाहू शिष्यवरा. ह्याची झोळी पाहू. (शिष्य दाखवितो) दुरून, मला स्पर्श नको त्या फडक्याचा. ते किती दिसाचे खरकटे ! द्रव्य ? माझेचि द्रव्य. पहा शास्त्रीबुवा, माधुकरीचे निमित्त करोनी घरात घुसतो आणि चोऱ्या करितो हा चांडाळ.

ज्ञानदेव : धादांत खोटं, वृथा आळ.

गुरु : पहा शास्त्रीबुवा, तरी बरे, तुम्हा समक्ष हे सर्व होतसे. पहा द्रव्य आहे ना ? वर वृथा आळ घेतला म्हणितो, काही लाजलज्जा नसतु. संन्याशाचा पोर, चांडाळ, चोर, निर्लज्जपणाचा अवतार. (ज्ञानेश्वराला हे सारं असह्य होत आहे. तो आतल्या आत कुढतो आहे. डोळे मिटून

आवंढे गिळतो आहे.) चांगला दंड दिला पाहिजे ह्यासी.

शास्त्री : आपला काही तरी गैरसमज झालेला दिसतोय गुरुवर्य. ज्ञानेश्वर तसा नाही. ही वैरागी पोरं, ज्ञानी लेकरं, द्रव्याचा लोभ कुठून असणार त्यांना ? योगीराज आहेत हे. मनात आणतील तर द्रव्याच्या राशी उभ्या करतील तुमच्यापुढं.

गुरु : अवो बाप्पा, तुम्हीही ह्यासी मिळाला, चोराची तुम्ही साथ करिता. आश्चर्य ! महदाश्चर्य !! शिष्यवरू, पाहिला कैसा कालमहिमा असे. चोरचि शिरजोर होतसे.

शास्त्री : तसं नाही गुरुराज, पण ज्ञानेश्वर तुम्हाला शिव्या देईल आणि द्रव्य चोरेल ह्यावर स्वप्नातही विश्वास बसू शकत नाही. काहीतरी घोटाळा होतो आहे. ज्ञानेश्वर काय खरं आहे ते सांग—

गुरु : तो काय बोलतो चांडाळ !

शास्त्री : आपण शिव्या आवरा आधी. आपल्या वेदमंत्रांनी पवित्र झालेल्या मुखात ह्या शिव्या शोभत नाहीत.

गुरु : अंगी कोप दाटला. अतीव कोप जाहला. ह्याने आधी शिव्यांचा वर्षाव केला. वर द्रव्याचाही अपहार केला —

शास्त्री : असं तुम्हास वाटतं. खरं तसं नसावंच. ज्ञानेश्वरा, खरं सांग काय झालंय ते.

ज्ञानदेव : मला नाही सांगायचं काही, उबगलोय मी. कंटाळा, कंटाळा आलाय मला ह्या जगाचा. असह्य होतंय हे आता. रोज छळ, रोज छळ. आज तर मर्यादाच राहिली नाही काही. खोटेपणा कपटजाल आणि तेही गुरुवर्यासारख्या धर्माधिकाऱ्याकडून व्हावं ? शिव शिव संपलं सारं. आई गेली. बाबा गेले. पण ह्या छळाला अंतच नाही. नाही सहन होत आता मला काही. नको नको हा जीव (एकदम वळून — बाहेर निघून जातो)

गुरू : पकडा पकडा त्यासी ! चोर पळोनी चालिला. शिष्यवरा (शिष्य जाऊ लागतो.)

शास्त्री : थांबा शिष्यवर, जाऊ द्या त्याला.

गुरू : जाऊ द्या ? चोरासी जाऊ द्या ? भले अरे त्यासी पकडा. हात पाय मुसक्या बांधोनी दरबारी न्या. एवढ्या मोठ्या चोरीपायी त्यासी देहदंड द्या. हातपाय तोडा त्याचे. सोडा शास्त्रीबुवा, शिष्यवरासी सोडा त्या चोरासी पकडू द्या.

शास्त्री : नाही. काही तरी कपट नाटकाचा संशय येतोय मला.

गुरू : अरे चोरा, तूंहि ह्या चोरीत साथीदार आहेस तर ! शिव्या अरे हाही महाचोर आहे. ह्यानेच ज्ञान्याला फूस दिली चोरीची. अर्धे द्रव्य ह्याने घ्यायचे ठरविले होते अरे. आम्हाला अंतर्ज्ञानाने सर्व समजले. ह्या सुवर्णमुद्रा, ही सुवर्णअंगठी, ही हिऱ्याची अंगठी हे सारे हा चोरू पहात होता. ह्यालाही दरबारात नेले पाहिजे. तो ज्ञान्या नि हा परदेशीय शास्त्री महाचोर. थांबा, मीच आणतो राजाधिकाऱ्यासी चोरासी पकडावया — (जाऊ लागतो तो श्रीमंत येतो.)

श्रीमंत : मागे व्हा. तुम्हासि ते श्रम पडाया नको. म्या बोलाविले असे राजाधिकाऱ्यासी.

गुरू : तुम्ही कशाला ?

श्रीमंत : चोराशी पकडावया.

गुरु : पण चोर तर पळालाही.

श्रीमंत : नाही पळत होता—

शिष्य : म्हणजे ?

श्रीमंत : चोर सत्ताधिकाऱ्यासी बोलावण्याचे निमित्त करोनी अताची पळत होता (गुरु दचकतो).

शास्त्री : म्हणजे, ह्या गुरुवर्यांना तुम्ही चोर म्हणता ?

श्रीमंत : अर्थात ! (गुरूला) परवा तुम्ही मला मोदक खावया दिधले, त्यात अफू घालोनी आणि मज निद्रा येताची माझी सुवर्ण अंगठी, हिऱ्याची अंगठी आणिक कमरेच्या सुवर्णमुद्रा काढोनि घेतल्या ?

शास्त्री : काय म्हणता ? (गुरु शिष्याला डोळ्याने खुणावतो. शिष्य द्रव्याची झोळी सावरतो)

श्रीमंत : आणि ही पहिलीच वेळ नसे. मागेही दोनदा असेच जाहले. गुरु म्हणोनी सोडोनि दिले तेव्हा. पण आता तू आमचा गुरु नसत, ज्ञानीयांचा राजा आमचा गुरु.

गुरू : पण हा माझ्यावर आळ घेताहात तुम्ही. श्रीमंत वाया गेलाती तुम्ही. निराधार आरोप करोनी

अनुक्रमणिका

धर्माधिकाऱ्यासी छळणे बरे नव्हे.

श्रीमंत : निराधार आरोप ? कसा निराधार आरोप ? (शिष्य झोळी लपवून आत जात असतो) ए गोसावड्या शिष्या थांब, ती झोळी अत्र आनय.

शास्त्री : तुम्ही संस्कृत बोलू लागतात ?

श्रीमंत : ज्ञानीयांचा राजा गुरु केला. त्यांच्या वरदहस्ते संस्कृत भाषेचा राजा जाहला. (शिष्याला) हे पहा सारं माझं द्रव्य. हृचा आंगठ्या, हृचा सुवर्ण-मुद्रा. चोर, महाचोर, पण झोळी तर माझ्या गुरूची ज्ञानराजाची दिसते. ती पण चोरली वाटते हृचानं. अरे झोळ्या चोरून अधिकार मिळत नसतो.

शास्त्री काय कपट हे गुरो ? स्वतः चोर आणि त्या ज्ञानराजावर चोरीचा आळ घेतला ? त्यासी छळिले इथे किती ?

श्रीमंत : कवणे छळिले माझ्या गुरोसी ? हृचाने ? अरे ढेकणा, मत्कुणा ऐसे लपोनी रक्त शोषिसी ?

गुरु : क्षमा कीजे श्रीमंत, अपराधाची क्षमा कीजे. शास्त्रीबुवा, हे सर्व विसरोनी जावे.

श्रीमंत : आमच्या ज्ञानराजासी छळिले ते ? म्हणिजे की विसरोनी जावे ?

गुरु : त्यांची मी क्षमा मागेन, त्यांच्या चरणी नत होईन. पण क्षमा कीजे. राजाधिकाऱ्यासी हे न कथिजे. हे द्रव्य तुमचे तुम्ही नेईजे. मजला क्षमा कीजे. पुनः ऐसे न घडीजे ऐसे करीन. शास्त्रीबुवा, हे कुठेही न बोलीजे. माझी अपकीर्ति न करीजे. वचन देईजे. तुमच्या चरणी नत होत. मज क्षमा कीजे.

शास्त्री : पण त्या बालयोग्याला तुम्ही किती बोललात ? किती छळ केलात त्याचा. त्याची माधुकरी फेकून दिलीत, झोळीत चोरीचं द्रव्य टाकून आळ घेतलात, उपाशी राहतील ती लेकरं आज.

श्रीमंत : उपाशी ? नाही नाही. ऐसे न होईल. चल रे गोसावड्या, आमच्या घरचे अन्न घे सोबत अन ज्ञानीयांच्या राजाकडे चल. स्वतः त्यांच्या चरणी नम्र हो प्रथम. मग अन्न अर्पण कर. चल, अन्यथा राजधिकाऱ्यासी चोरी सांगीन. महा अपकीर्ती करीन. दंड करवीन...

गुरू : नको नको श्रीमंत...मान्य आहे मजसी. तुम्ही म्हणता ते सर्व मान्य आहे मजसी, चला.

श्रीमंत : तुम्हीही चला शास्त्रीबोवा ज्ञानराजाकडे. पहा ते तेज. तो योगी.

शास्त्री : हो हो. नमस्कार त्या तेजासी.

(सर्व जातात. पडदा पडतो.)

(दृश्य चौथे)

(ज्ञानेश्वराची झोपडी. तिचे दार अता बंद आहे. आतून 'ओम–प्रणव, ओम नमः' असे ध्वनी ऐकू येत आहेत. ज्ञानराजाचे आहेत ते..)

निवृत्ति (सोपानाला पाठकुळी घेऊन येतो) झोपडीचे दार बंद दिसताहे आतून. ज्ञानदेवाचं ध्यान चाललंय असं दिसतं. सोपान, तुझा ज्ञानदादा मोठा योगीराज होणार आहे हं. त्याला त्रास द्यायचा नाही. त्रिकाळ वंदन करायचं. त्याच्या पायाचं तीर्थ घ्यायचं. (हे सगळे तो जोरानं बोलतो. उद्देश असा की आत ज्ञानराजाला ते ऐकू जावं. पण व्यर्थ. उलट ज्ञानदेवाचा प्रणवध्वनि जोरात व रागात असल्यासारखा ऐकू येतो.) अबबब, रागात दिसते स्वारी.

सोपान : दार उघड ना रे. जेवायचं नाही का ?

निवृत्ति : हो हो, ज्ञानदेवा, दार उघडा. आज हा प्रणवाचा जप काय लावलात ?

ज्ञानदेव : (आतून) माझा ध्यानभंग करू नये. मी दार उघडायचा नाही.

निवृत्ति : पण आजच हे ध्यानप्रकरण काय आरंभिलं आहेस ?

ज्ञानदेव : (आतून) तुम्हाला कळतं ते. का उगीच वेड पांघरता ?

निवृत्ति : वेड मी का पांघरलं आहे ? मला कळलंय तू माझ्यावर रागावला आहेस. गावकरी तुझा असह्य छळ करिताहेत. तुझ्या विरुद्ध खोटं नाटं कुभांड रचून तुला जीवन नकोसं करून सोडताहेत. पण म्हणून हा का उपाय आहे त्यावर ? अन तुला कळत का नाही हे ? मग का उगीच हे खेळ आरंभिले आहेस ?

ज्ञानदेव : (आतून) असू दे वेड. मला वाद घालायचा नाही. पण मी दार उघडणार नाही.

सोपान : असं काय करतोस रे ज्ञानदादा, मला भूक लागलीय.

ज्ञानदेव : निवृत्तिदादानं माधुकरी आणली असेल बाहेर ती खा.

सोपान : नाही नं. त्याला माधुकरी मिळाली ती लोकांनी हिसकावून मोरीत फेकली.

ज्ञानदेव : (आतून) हेच हेच सारं नको आहे व्हायला. आणि होतं आहे म्हणूनच नको आहे हा संसार मला. मी देवाच्या घरी जाईन.

सोपान : असं रे काय बोलतोस दादा. आई गेली, बाबा गेले, अन् आता तूही आम्हाला टाकून जायचं बोलतोस ? मग आम्हाला कोण आहे रे सांभाळायला.

ज्ञानदेव : (आतून) तो देव आहे. त्याला पाहिजेय की त्यानंच मनासारखं जग चालवावं. न्याय–अन्याय एकाच जात्यात भरडावा, साधूंना छळावं, दुष्टांना मोकळं रान द्यावं.

निवृत्ति : देवावर सुद्धा रागावलाय आज ज्ञानदेव. ज्ञान्या, अरे आपल्या सोपानासाठी तरी दार उघड.

ज्ञानदेव (आतून निर्धारानं) नाही, नाही, नाही. मी आज दार उघडणार नाही.

सोपान : (आर्तपणे) असं रे काय करतोस. मला भूक लागलीय दादा. (हुंदके देतो).

ज्ञानदेव : (आतून) नाही उघडणार दार. (अगदी करारी पण रडका आवाज).

निवृत्ति : (खिडकीतून पाहून) घळाघळा अश्रू वाहताहेत माझ्या ज्ञानाच्या डोळ्यातून. खरंच रे अतोनात छळ झालेला दिसतोय माझ्या राजाचा आज. पण राजा,

ज्ञानदेव : (आतून) नाही नाही...

सोपान : दार उघडा दादा (ओरडतोच).

मुक्ता : (धावत येऊन) काय रे आरडाओरड चाललीय, घुणं धुता धुता धावत आले.

निवृत्ति : ज्ञानदेव आतून कडी लावून बसलाय.

सोपान : रागावलाय.

निवृत्ति : नाही उघडत म्हणतो दार.

सोपान : देवाघरी जाईन म्हणतो.

मुक्ता : का ?

निवृत्ति : छळलंय जगानं आज खूप त्याला. बघ कसे मोत्यासारखे टपटप सर ओघळताहेत अश्रूंचे मिटल्या डोळ्यातून. (मुक्ता खिडकीशी येऊन पाहते).

मुक्ता : दादा, (थोडया वेळानं) बोलायचं पण नाही ? तुझ्या मुक्ताईवर पण रागावलास ? देवाघरी जातोस ? एकटा ? आई बाबा एकेकटे गेले तेव्हा तू म्हणाला होतास ते स्वार्थी आहेत. आता तू ? जायचंय देवाकडं तुला, तर आम्हालाही ने सोबत. घे आत आम्हाला पण...उघड ताटी.

ज्ञानदेव : (आतून) नाही, नाही.

मुक्ता : सोपानला भूक लागलीय. मी पण धुणं धुवून शिणलेय रे. पायात काटे रुतलेत नदीतले, खूप दुखतोय पाय, परवा तू किती पटकन काढलास काटा. अगदी एवढासुद्धा दुखू दिला नाहीस. छानच आहे माझा ज्ञानराजा. आता पण काढून दे रे काटा.

ज्ञानदेव : नाही. मला तुमची कुणाचीच माया आता ठेवायची नाही. तुमचा माझा आता काहीही संबंध नाही.

मुक्ता : (रडत) असं रे काय तोडून बोलतोस, मी तुझी मुक्ता, इवलीशी. नाही तुझी ? नाही ? (ढसढसा रडते) दादा, ज्ञानराजा, उन्ह लागतय रे चटं चटं, काटा सलतोय. जीव कासावीस होतोय. उघड रे ताटी, उघड नं.

"ताटी उघडा ज्ञानेश्वरा"

(अश्रू पुशीत गोड हाक मारते) माझ्या ज्ञानीयांच्या राजा, लोकांनी तुला छळलं म्हणून हा अविचार ? एवढा ? अरे लोक नि तू काय वेगळा आहेस ? सगळं जग आपलंच आहे. मग रागवायचं कुणावर ? सांग, सोड रे राग. उघड रे दादा दार.

संत तोचि जाणा जगी ।
दया क्षमा ज्याचे अंगी ॥
लोभ अहंता न ये मना ।
जगी विरक्त तोचि जाणा ॥

इह परलोकी सुखी ।
शुद्ध नाम ज्याचे मुखी ॥

मिथ्या कल्पना मागे सारा ।
ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥

दादा, तू जगाला उद्धारायला निघालास ना? आई बाबा गेले तेव्हा म्हणालास, त्यांच्यावरचा कलंक काढायला पाहिजे. नाही रे निघाला तो पण अजून. मोठेपण नाही आलं तेवढं अजून. नाही सोपं ते.

चणे खावे लोखंडाचे ।
मग ब्रह्मपदी नाचे ।
मन मारुनी उन्मत करा ।
ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।

ज्ञानदेव तूं. तुला का मी ज्ञान देऊ? राग सोड, सोड रे राग...

शुद्ध ज्याचा भाव झाला ।
दुरी नाही देव त्याला ॥
गंगाजळ हृदय करा ।
ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।
तुम्ही तरुनी विश्व तारा ।
ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।

ज्ञानेश्वरा, ताटी उघडा! उघडा दार! मी हाक मारत्ये रे तुझी मुक्ता, चिमुरडी मुक्ता! लडिवाळ मुक्ता!! नाही उघडायचास? (निर्धारानं) मग मला तरी काय करायचंय जगून. मला तरी काय लोभ ह्या कुडीचा — शरीराचा.

लडीवाळ मुक्तावाई । जीव मुदुळ ठाइच ठाई। ही मी पण चालले. माझ्या ज्ञानीयाच्या राजा, तुझी मुक्ता.

(जोराचा हुंवरडा फोडते व निघायला लागते. तोच ताटी उघडून ज्ञानेश्वर बाहेर येतो.)

ज्ञानदेव : मुक्ता, माझी मुक्ता! (तिला पोटाशी धरतो.)

[दोघं कडकडून भेटतात. डोळ्यांतून दोघांच्याही अश्रू]

(पडदा पडतो)

[अंक दुसरा समाप्त]

—o—

अंक ३ रा

दृश्य १ ले

(गुरुवर्यांचे घर. दृश्य पहिल्या अंकाचेच. गुरुवर्य चिंताक्रान्त बसलेले आहेत. शिष्यवर चोरून काही तरी खातो आहे.)..

गुरु : शिष्यवरा, कालपासोनी एकही विद्यार्थी संथा घ्यावया येत नसे. काय सारेची ज्ञानीयाचे शिष्य झालेती? (शिष्य बोलू पहातो पण तोंडात खाद्याचा बोकणा भरलेला म्हणून बोलता येत नाही.) बोल, अरे चूप का?

शिष्य : हो. (पण हे बोलताच, तोंडातून लाडूचा तुकडा बाहेर पडतो).

गुरु : शिष्या, पिण्डी? कोठून आणिलीत पिण्डी?

शिष्य : हृयास प्राकृतात लाडू म्हणतात लाडू, कीर्तनाची समाप्ति होती काल, तेव्हा लाडूचे जेवण दिधले होते.

गुरु : पण जेवण काल होते. त्यातले लाडू आज — अता कैसे, खातोसी?

शिष्य : कालपासोनी अतापर्यंत एकसारिखा खातची आहे मी. हृया अंगरख्यासी आतोनी लांवसा चोर खिसा असे. त्यात मी भरोनी घेतले होते.

गुरु : किती?

शिष्य : बहुत.

गुरु : सर्व संपले?

शिष्य : बहुतेक. खिशात एखादा तुकडा असेल...

गुरु : मग शोधत का नाहीस?

शिष्य : शोधतो.

गुरु : मज पाहू. (स्वतः पहातो) अरे, संपूर्ण पिण्डी असत. आण इकडे. आताच दिवस उजाडला. आंघोळही झालेली नसे कुणाची. म्या तर अजून तोंडही धुतले नसे. आणि तूं पारोशाने पिण्डी भक्षितोसी? धर्म सोडिलासी? तुज पाप लागेल. जा. तोंड स्वच्छ धुवोनी ये. लाडू विटाळला असे. फेकोनी दे.

शिष्य : द्या.

गुरु : नको. मी फेकोनी देईन. तुझा काय भरवसा ! तिकडे जावोनी पुन: खाशील. जा.

शिष्य (जातो. जातांना) मोरीत फेकीजे..गटारात किंवा..(जातो).

गुरु : हो हो गटारांतचि टाकतो. (शिष्य गेलासे पाहून लाडू तोंडात टाकतो.) अहाहा, स्वादु ! अतीव स्वादु !! मधुमधुर !!

[चावतानाच शिष्य परत येतो. तोंडात लाडू म्हणून फुगवलेल्या तोंडाने गुरु रागाने पाहतो.]

शिष्य गुरु, (गुरु हाताच्या खाणाखुणांनी "काय ?" व "जा निघ" हृया खुणा करतो) पण तिकडे तोंड धुण्या पाणीच नसे. लाडू गटारात फेकिला ?

गुरु : हुं हुं (मानेनेही हो हो करतो) अरे.. (लाडू घशात अडकतो, खोकतो.)

शिष्य : लाडू गटारात अडकला वाटते ?

गुरू : गटारात नव्हे, आमच्या घशात. पाणी आण प्यावया. (शिष्य जातो. शास्त्री येतो.)

शास्त्री : काय झालं गुरुवर्य ?

गुरु : अता समाधि लाविली होती, सर्व देवादिकांची तिथे भेट जाहली. सर्वांचे कुशलु विचारले. त्यांची सभा चालली होती. सभेनंतर काही खाणे पिणे झाले. मलाही त्यांनी मोदकु खावया दिला. पण मी तो खात असताच हृया शिष्याने माझा समाधिभंगु केला. मोदकु घशातचि अडकला. (खोकतो) पाणी. (शिष्य पाणी आणतो) शिष्या ब्रह्ममोदकु अडकला होता. (पाणी पितो.)

शिष्य : ब्रह्ममोदकु नव्हे, लाडू–लाडू म्हणतात त्यासी.

गुरु : नाही, हे ब्रम्ह मोदकु. आमच्या घशात अडकले होते ते परब्रम्हाचे प्रसादु, मोदकु...

शिष्य : नाही गुरु, विचारा हृया शास्त्रींना. काहो, काल कीर्तनाच्या समाप्तीचं जेवण झालं त्यात लाडू केले होते किनई ? तुम्ही होताच जेवायला.

शास्त्री : हो, लाडूच होते ते. गुरुंनी पण खाल्ला ?

शिष्य : तोच लाडू, त्यातलाच. अहो, माझ्या खिशातलाच. मी तिकडे तोंड धुवायला गेलो...

गुरू : आणि तो मी फेकून दिला गटारात आणि समाधि लावली तेवढ्यात...

शिष्य : कासया खोटे बोलता. मी तिकडे तोंड धुण्या गेलोच नाही. आड लपोनी पहात होतो. तुम्ही लाडू फेकला नाही. तोंडात घातला.

गुरु : शिष्या हा सगळा भास असे. मायेचा खेळ तुज दाविला असे. सगळे जग भास आहे. मिथ्या आहे, खोटे आहे. मग लाडू तरी कसा खरा असणार ? तोही भास होता. मी खात होतो हाही भास होता. तुला भास झाला मी लाडू खात आहे म्हणून..

[श्रीमंत येतो]

श्रीमंत : गुरु कुठे आहे ? मी कुठे आहे ? अरे हे तर गर्दभ ?

गुरु : नाही नाही, मी गुरु आहे, खरोखर गुरु आहे.

श्रीमंत : मग मज कैसा गाढवाचा भास जाहला ?

गुरु : चेष्टा करू नकोस. तुला कसे भलते भास होतात ?

श्रीमंत : शिष्यासी कैसे भलते भास होताती ? त्वा ब्रम्ह मोदकु खाल्ला पण शिष्यासी भास जाहला की त्वा लाडू भक्षिला. तैसाचि तू गुरु पण मज गाढवाचा भास जाहला. (शास्त्री हसतो)

गुरु : (चिडून) त्या ज्ञान्याने तुला असाच चावटपणा करिण्यासी शिकवले काय रे ?

श्रीमंत : नाही. पण ढोंग ओळखण्या शिकवले. ज्ञान दिधले. खरे ज्ञान दिधले.

गुरु : पाहू, पाहू त्याचे खरे ज्ञान.

श्रीमत : तू काय पाहसी रे गोसावडीया. तो योगीराज.

गुरु : पाहू त्याचा कैसा योग.

श्रीमंत : अरे, काल त्याच्या पाया पडला, त्याची क्षमा मागितली आणि आज पुन्हा त्याची निंदा करतोसी ?

गुरु : अरे, अडिला नारायण गाढवाचे पाय धरितोची.

श्रीमंत : त्या ज्ञानीयाला गाढव म्हणतोसी ?

गुरु : होय. असे काय ज्ञान दाखविले त्याने ?

शास्त्री : अपार, अपरंपार ज्ञानभंडार दिधले त्याने. कालपर्यंत निवृत्तिनाथ नि ज्ञानराज यांची कशी

सुंदर कीर्तनें जाहली. कालच त्यांची समाप्ति होती. काय रसाळ अभंग रचिला ज्ञानीयानं. गोकुळातल्या गोपीचं वर्णन काय बहारीचं. श्रीहरी सांपडेना तिला. भेटीसाठी तडफडतेय ती ! आभाळात मेघ आहेत, वारा वाहातोय, चांदणं धरतीवर ओसंडतय, तुम्ही सख्यांनो, श्रीहरी शोधा, मला भेटवा, व्यर्थ आहे त्या वाचून हे सारे. आग आग होतेय माझ्या अंगाची. कशाला लाविले हे चंदन ? आग भडकलीय त्यानं. ऐका ते शब्द—

घनु वाजे घुणघुणा । वारा वाहे रुणझुणा ।
भावतारकु हा कान्हा । वेगी भेटवा का ।
चांदु वो चान्दणें । चांपे वो चन्दने ।
देवकी नंदने वीण । नावडे वो ॥
चंदनाची चोळी । माझे सर्व अंग पोळी ।
कान्हो वनमाळी । वेगी भेटवा का ॥

श्रीमंत : खरंच, किती रसाळ आहे हा अभंग. पण मला याहीपेक्षा, ती गोपी कावळ्याचा शकुन ऐकून मैत्रिणीला प्रश्न विचारते नि तिला म्हणते; अग, बाहेर कावळा ओरडतोय तेव्हा कुणी पाहुणा नक्की येणार. माझा पंढरीराया पाहुणा येणार. येऊ दे बाई. काऊ, उड रे काऊ. तुझे पाय सोन्यानं मढवीन—

पैल तो गे काऊ कोकताहे ।
शकुन गे माये सांगताहे ॥
उड उड रे काऊ तुझे सोन्याने मढविन पाऊं ॥
पाहुणे पंढरीराऊ घरा कै येती ।
दुधे भरुनि वाटीं लाविन तुझीये ओठी ।
सत्य सांगे गोष्टी विठो येइल काइ ॥

गुरू : (हसून) हा म्हणे रसाळ अभंग. बायकांची जात्यावरची गाणी. निरर्थक, रुक्ष, प्राकृत, गावंढळ, आणि हेच का त्याचे ज्ञान ? (पुन्हा जोरजोरानं हसतो).

श्रीमंत : गुरो, हसू नकोस, तुला दाखवतो त्याचा चमत्कार. अता आणतो त्या ज्ञानीयाला इथे.

शास्त्री : थांबा, तुम्हाला नको जायला. पैठणचे धर्माधिकारी इथे येताहेत. त्यांच्या पुढेच ती चारही बालके येणार आहेत, अता त्या धर्माधिकाऱ्यांना आपलं कोडं विचारायला, आमची मौज करता येईल का हे विचारायला. ते पहा धर्माधिकारी आलेच. साष्टांग प्रणिपात गुरुराज ! (शास्त्री त्या धर्माधिकाऱ्याला प्रणिपात घालतात.)

[पाठोपाठ श्रीमंत व गुरुवर्य व शिष्यवरही त्यांना प्रणिपात करतात. धर्माधिकाऱ्यांबरोबर आणखी तीन-चार शास्त्री पंडित आहेत.]

धर्मा : सर्वांचे कुशल असो. शास्त्रीबुवा, बाहेर चार बालके उभी आहेन. आम्हाला भेटायचं आहे त्यांना. येऊ देत ती आत. (शास्त्री जातो).

गुरू : शी: शी:, कसली घाण ती बालकें. संन्याशाची मुले. साक्षात् पाप. शिंची उपद्रव देतात लेकाची.

धर्मा : मुखी नेहमी चांगले शब्द असावेत शहाण्यांच्या. अभद्र वाणी शिवो नये मुखा. मंगल बोलत जा.

[शास्त्री, निवृत्ति, ज्ञान, सोपान व मुक्ता येतात. धर्माधिकाऱ्यांना साष्टांग नमस्कार घालतात.]

ज्ञानदेव : सर्व पंडितांना आमचा साष्टांग प्रणिपात.

धर्मा : किती कोवळी सुरेख बालकं आहेत ही. जशी सोनचाफ्याची कळी किंवा अमृताची पुतळी. की बहरला मळा कोवळेपणाचा ? नव्हे, नव्हे हो. शरदातील दर्वबिंदूनी न्हालेले हे चंद्रबिंबची. का मूर्तिमंत आसनस्थ तेज ? बाळांनो, काय हवंय तुम्हाला ?

शास्त्री : काल नाही का सांगितलं मी, की त्यांच्या मुंजी व्हाव्यात असं त्यांना वाटतं.

गुरू : (हसून) मुंजी ? क्षुद्राहून क्षुद्र ही कारटी.

धर्मा : (रागाने पाहून) गुरुवर्य; शांति असो द्यावी. शास्त्रीबुवा, पण आम्हाला खंत वाटते. काल आम्ही सर्व शास्त्राधार पाहिले. ह्या पंडितांनीही चर्चा केली, पण शास्त्राधार मिळत नाही. ह्यांच्या मुंजी लावता येणार नाहीत.

ज्ञानदेव : मग आम्ही काय करावं ?

धर्मा : देवाची भक्ति.

ज्ञानदेव : मुक्तीला साधन ?

धर्मा : भक्ति, तुम्ही आधीच चोखाळलाय तो मार्ग बालकांनो. मला कळलंय, अभंग रचता, कीर्तन करता. हरिभजनात रंगून गुंगून जाता. योग्य करता. मुक्तीचा नवा मार्ग तुम्ही काढलात.

खरोखर नाव शोभतं तुम्हाला ज्ञानदेव. ज्ञानी आहात.

गुरू : नाव कसचं शोभतं धर्माधिकारी? अहो ज्ञानदेव नाव ठेवलं की झाले ज्ञानदेव अशी ह्यांची धारणा ! ज्ञानदेव नाव आमच्या एका पखालजीनं रेड्या-चेहि ठेवले आहे. तो पहा चाललाचि आहे मार्गे रेडा. त्याचेही नाव ज्ञानदेवची असे. मग काय तोही असाच ज्ञानी असेल ?

ज्ञानदेव : हो हो, असेल म्हणजे काय आहेच. त्याचं नी माझं चैतन्य एकच आहे तेव्हा तोही माझ्याइतका ज्ञानी आहेच. नव्हे तो नी मी नावही एकच, तेव्हा अगदी सर्वस्वी एकच आहोत.

गुरु : (शिष्यासह हसून) रेडा आणि तू एकच आहे हें मात्र खरे बोललासि. तुझे ज्ञान नि रेड्याचे ज्ञान सारखेची.

ज्ञानदेव : हसता काय असं ? रेड्याचं नि माझं ज्ञान तोलता ? आहेच अगदी सारखं नव्हे, तोही ज्ञान-देवच आहे. मीच आहे तो. अगदी माझ्याच सारखा बोलेल तो.

गुरु : आणतोच त्याला हाकलीत इथे आता मग. (जातो व रेड्याला आणतो, आणताना चाबूक मारतो.)

ज्ञानदेव : (विव्हळून) आ ऽऽ

शास्त्री : चाबूक रेड्याला पण आग तुमची झाली ज्ञानदेवा !

मुक्ता : नव्हे. वळ पण उमटलाय दादाच्या पाठीवर. (ती उपरणे वर करते, सर्व वळ पहातात. थक्क होतात.)

गुरु : हा आला रेडा. हं ज्ञान्या, बोलव त्याच्या तोंडून, काय बोलवतोस ?

ज्ञानदेव : म्हणाल ते.

गुरु : तुला काय येतं ?

ज्ञानदेव : विचाराल ते.

गुरु : वेद येतात ?

ज्ञानदेव : हो.

गुरू : म्हण अग्नि ऋचा.

ज्ञानदेव ॐ, अग्नि मीळे पुरोहितम्

यज्ञस्य देवमृत्विजम्,
होतारम् रत्नधातमम् ।

धर्मा : वा:, सुरेख ! किती स्वच्छ वाणी ! कसे सुंदर नि बरोबर आहेत उच्चार !

गुरू : बरं बरं. पण आता हा ज्ञान्या रेडा काय उजेड पाडतो ते पाहू. बोलेल कां हा रेडाही असाच वेद...

धर्मा : काय भलती परीक्षा घेता बालकाची ? पुरे झाली, झाली तेवढी...

गुरू : नाही नाही. खरी परीक्षा इथेच आहे. हा रेडाही वेद बोलिला ऐसाची तरच हा खरा ज्ञानदेवो.

ज्ञानदेव : मग बोलेलची रेडा तैसाची. कारण ब्रम्ह सर्वत्र एकचि. हा रेडाही ज्ञानदेवचि. बोलरे ज्ञानदेवा.

म्हण अग्नि सूक्त, ॐ म्हण...

रेडा : ॐ...अग्निमीळे, पुरोहितम्,
यज्ञस्य देवमृत्विजम्
होतारम् रत्नधातमम् ।...

(धर्माधिकाऱ्यासह सर्व एकदम ज्ञानदेवाचे पाय धरतात.)

सर्व : ज्ञानराज तुम्हाला आम्ही शरण आहोत. तुम्ही विश्वोद्धार कर्ते आहात.

मुक्ता : माझा ज्ञानीयांचा राजा !

(पडदा पडतो)

दृश्य २ रे

(नेवासे गांव, मोहनीराज क्षेत्र, प्रवरा नदी, निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान, मुक्ता व सारी भक्त मंडळी, टाळ मृदंग वीणा गजर, आतून अभंग, आतूनच ज्ञानेशाचा आवाज "दादा, लहानपणी बाबांच्या सोबत पंढरीचा पांडुरंग पाहिला होता. देखणं रूप. हरी आणि हर, विष्णु आणि शंकर. दोन्ही देव एका ठिकाणी दिसतात पंढरीला. विष्णूनं शंकराला मस्तकावर धारण केलेलं.

रूप पहाता तरी डोळसु ।
सुंदर पहाता गोपवेषु ।।

महिमा वर्णिता महेशु ।
जेणे मस्तकी वंदिला ।।

अभंग संपता संपता प्रवेश करतात...)

ज्ञानदेव : किती सुरेख आहे हे नेवासे गांव, मोहनीराज इथे विसावले. त्यांचं हे क्षेत्र.

सोपान : मोहनीराज, कोण रे दादा ?

ज्ञानदेव : अमृतासाठी देवात अन राक्षसांत भांडण झालं होतं तेव्हा विष्णूनं मोहिनीचं रूप घेतलं होतं. आदि मायेचं रूप, ते हे मोहनीराज.

निवृत्ति : त्यांना पण हे नेवासं आवडलं विसावा घ्यायला ?

ज्ञानदेव : कां आवडू नये ? ही सुरेख प्रवरा नदी, पवित्र स्वच्छ असं तिचं पाणी. अमृताची खाणी !

सोपान : राहू या आपणही काही दिवस इथं.

ज्ञानदेव : हो. दादाची, ह्या संतांची इच्छा असेल तर राहू या. इथंच ह्याच देवळात.

निवृत्ति : हो पण, ज्ञानदेवा, इथं तू एक काम करायला हवं.

ज्ञानदेव : कोणतं ?

निवृत्ति : गीता, भगवद्‌गीता, सगळ्या वेदांचं सार. परमार्थ साधण्याचा महान मार्ग सांगितलेला त्यात. जन्ममरणाचा फेरा चुकवून, मोक्षप्राप्ती, जीवनाचं कल्याण साधण्याचा महान योग सांगितलेला त्यात. पण कुणाकरिता आहे तो ग्रंथ ? ज्यांना संस्कृत येतं त्यांच्याच करिता. ह्या भोळ्या भावड्या भाविक सामान्य जनतेला कुठलं संस्कृत यायला ? ती विचारी दूर राहिलीत ह्या ग्रंथापासून. मुकलीत विचारी ह्या परमार्थाच्या तत्वज्ञानाला. तेव्हा तू तो गीताग्रंथ मराठीत सांग. ही परमार्थाची गंगा. भोळ्या भावड्या बहुजनसमाजापर्यंत ने. त्यांचा उद्धार कर...

शास्त्री : कठीण काम आहे ते निवृत्तिनाथ. ज्ञानदेवाचं वय ते काय अवघे सोळा. आणि मराठी भाषा. मराठमोळ्यांची खडबडीत भाषा.

ज्ञानदेव : नाही, ही मराठी खडबडीत रांगडी नाही, ही अमृताला पैजेने जिंकणारी मधुर आहे.

माझा मरहाटाचि बोल कवतुके ।
परी अमृतातेही पैजा जिंके ।
ऐसी अक्षरे रसिके मेळवीन ।

आणि वयाबाबत म्हणाल तर निवृत्तिदादा माझा गुरु आहे. त्याच्या कृपेने, गुरुकृपेने काय असाध्य आहे या जगांत ? गुरु म्हणजे कामधेनु...

जयाते कामधेनु माये ।
तयाते अप्राप्य काही आहे ।
म्हणौनि मी प्रवर्तू लाहे । इये ग्रंथी ।।

(निवृत्तीच्या पाया पडतो. निवृत्ति आशीर्वाद देऊन उठवतो.) मी अताच सुरुवात करणार गीतार्थ लिहायला..

निवृत्ति : बसा मंडळी, शास्त्रीबुवा.

शास्त्री : नको. मला आजपासून ही शास्त्री उपाधी नको. माझी विद्वत्ता कुठे पासंगाला पुरते ह्या ज्ञानदेवांच्या ? मला फक्त सच्चिदानंद म्हणा. माझं नाव आहे ते.

ज्ञानदेव : पण तुमचा अधिकार मोठा आहे. तुमचा विनय तुमच्या विद्वत्तेला अधिकच शोभा आणणारा आहे. जशी तुमची इच्छा. पण आम्ही तुम्हाला नुसतं सच्चिदानंद म्हणणार नाही. आम्ही तुम्हाला सच्चिदानंदबावा म्हणू.

शास्त्री : (चरण स्पर्शून) ही महान गुरुकृपा झाली. पण शिष्याला काही गुरुसेवाही मिळावी.

निवृत्ति : ज्ञानदेव गीतार्थ सांगतील तो तुम्ही लेखणीने लिहून काढावा.

शास्त्री : ह्या परते भाग्य कोणते ? (शास्त्री लेखणी व कागद घेऊन लिहायला बसतात. ज्ञानोबांनी ध्यान लावलंय).

ज्ञानदेव : ॐ नमोजी आद्या—

आता अभिनव वाग्विलासिनी ।
चातुर्यार्थकला कामिनी ।
हे शारदा विश्व मोहिनी ।
नमिली मिया ।।
अहो अर्जुनाचिये पांती ।
जे परिसणेया योग्य होती ।
तिही कृपा करोनी संती ।
अवधान देयावे ।।

शारदेचिये चंद्रकळे । माजी अमृतकण कोवळे
ते वेचिती मने मवाळे । चकोर तलगे ।

(ह्याच वेळी हळू हळू अंधार होतो. थोडेसे तंबोऱ्याचे तार छेडले जातात. मग निवेदन. 'आणि हा गीतार्थ ग्रंथ, रसाळ ज्ञानेश्वरी नेवाशालाच लिहून पूर्ण झाली. वयाच्या सोळाव्या वर्षी. हळू हळू पुनः प्रकाश उजळूं लागतो व त्या वेळी)

दुरितांचे तिमिर जावो ।
विश्व स्वधर्म सूर्ये पाहो ।
जो जे वांछिल तो ते लाहो । प्राणिजात ॥

ही ओवी ऐकू येते—(पडदा पडतो.)

(दृश्य ३ रे)

(मध्यंतरी सतारीची गत व निवेदन : " ज्ञानेश्वरी पाठोपाठच ज्ञानदेवांनी अमृतानुभव ग्रंथ लिहिला. काय त्याचं वर्णन करावं ? स्वतः ज्ञानदेवच म्हणतात...

ज्ञानदेव म्हणे । अनुभवामृते येणे ।
सणु भोगिजे सणे । विश्वाचेनि ।)....

(आळंदी, पडक्या भिंतीवर चौघेही—ज्ञानदेव, निवृत्ति, सोपान, मुक्ता, उन्हं खात बसली आहेत)

मुक्ता : सोपान, जरा बाजूला सर. उन्ह येऊ दे माझ्याही अंगावर.

ज्ञानदेव : मायेच्या सावलीला कंटाळलाय तिचा जीव. परब्रह्माचं उन्ह खायचंय तिला अता.
(तेवढ्यात एक शिष्य येतो.)

शिष्य : मी चांगदेवांचा शिष्य आहे. चांगदेवांनी आपल्याला हे पत्र दिलंय.

मुक्ता : चांगदेव ?

ज्ञानदेव : होय महान योगीराज आहेत ते. तापीच्या तीरावर रहातात.

शिष्य : हं. मोठा मठ आहे त्यांचा. कितीतरी शिष्य आहेत.

ज्ञानदेव : अधिकार पण फार मोठा आहे त्यांचा. (पत्र निवृत्तिनाथाला देतो.) कर्मकांड, ज्योतिष, शिल्प, वैद्यक, स्मृति, गारुड, व्याकरण, तर्क ह्या सर्व विद्या त्यांना चांगल्या अवगत आहेत.

निवृत्ति : हे घे सोपान. (पत्र देतो)

सोपान : (पाहून) घे ग मुक्ता.

मुक्ता : (पाहून) पत्र ? (हसते) असं कसं पत्र ? हा तर कोरा कागद. तूं वाचलास दादा ? तू पण ? (दोघेही हो हो म्हणतात) सोपान, तूं ?

सोपान : कोरा कागद वाचायला मी काय दादासारखा वेडा झालोय.

मुक्ता : दादा वेडा आहे होय ?

ज्ञानदेव : हो. कारण कोरा कागद वाचून मी त्याला उत्तर पण लिहिणार आहे नं.

मुक्ता : अरे, कोरा कागद काय विचारणार आहे ? अन कसा विचारणार आहे ?

ज्ञानदेव : योग्यानं योग सामर्थ्यानं उत्तरं लिहिलीत त्यावर दादा. अता..

निवृत्ति : लिही. कायजे तुला वाटतं ते उत्तर दे.

ज्ञानदेव : (दादाला वंदन करतो) अं—(त्याच कागदावर नुसते डोळे फिरवतो).

स्वस्ति श्री वटेशु । जो लपोनी जगदाभासु
दावी मग ग्रासु । प्रगटला करी ॥

(हळू हळू अंधार होतो. तंबोऱ्याचे स्वर व ओव्या चालू रहातात)

तया पुत्र तूं वटेश्वराचा ।
रवा जैसा कापुराचा
चांगदेवा तुज मज आपणयाचा ।
बोलू आईके ॥

(आणि मग निवेदन : —चांगदेवाला लिहिलेल्या ह्या ६५ ओव्या चांगदेवपासष्टी म्हणून आज प्रसिद्ध आहेत. वेदान्ताचा तो अर्क आहे. मराठी भाषेचं ते लेणं आहे—निवेदनानंतर पुनः झंकार व पुनश्च पूर्ववत दृश्य. ती पडकी भिंत व त्यावर ती चौघेही. एकदम, नगारे, कर्णे, सनया, शिंगे, शंख वाजताहेत.)

मुक्ता : सकाळी सकाळीच काय वाजतय रे हे ?

(गावकरी धावत येतात. ह्यांत शास्त्री, गुरु, शिष्य ही सारी जुनी मंडळीच आहेत.)

अनुक्रमणिका

शास्त्री : (धापा टाकीत) चांगदेव आलेत.

गुरु : योगीराज.

शास्त्री : वाघावर बसून !

मुक्ता : जीवंत वाघावर ?

शास्त्री : हो हो. हातात चाबूक आहे नागाचा. हजारो शिष्य आहेत बरोबर. नगारे, सनया, शंख वाजताहेत जोर जोरानं.

ज्ञानदेव : आपल्या आळंदीला आलेत कशाला ?

शास्त्री : तुम्हाला भेटायला. हा शिष्य आलाय त्यांचा समोर.

शिष्य : चांगदेव योगीराज, तुम्हाला पत्राचा जाब विचारायला येत आहेत.

ज्ञानदेव : आम्ही उत्तर दिलं होतं.

शिष्य : नाही कळले ते.

मुक्ता : एवढा योगीराज, अन त्याला सरळ साधी मराठी ओवी नाही समजली. पण मग गुरूकडं अर्थ विचारायला यायचं तर एवढा लवाजमा बरोबर कशाला आणायचा. वाघावर बसायचं, नागाचा चाबूक घ्यायचा. वाद्यांचा गजर करायचा. हजारो शिष्यांचा तांडा आणायचा. कशाला हा गर्व. एवढा म्हातारा योगी पण अहंकार नाही गेला त्याचा. आम्हाला आपलं योगसामर्थ्य दाखवतोय होय ?

सोपान : आपल्याला भिववतोय तो. जीवंत वाघावर बसून यायचं, सापाचा चाबूक करायचा. आपलं वैभव दाखवायचं. म्हणजे ज्ञानदेवदादा घाबरेल. उत्तर लिहिण्यात चूक झाली असं म्हणून त्याचे पाय धरेल.

मुक्ता : अस्सं वाटलं होय त्याला. मग नाही भेटायचं म्हणा त्यांना. जा रे शिष्या.

ज्ञानदेव : असं नाही मुक्ता. ते महान योगी आहेत. अधिकार मोठा आहे त्यांचा. आपण त्यांना सामोरा गेल्यानं काही कमीपणा नाही यायचा.

मुक्ता : पण तो वाघावर बसून आलाय. शक्तिसामर्थ्य मिरवीत, आणि आपण काय पायीच जायचं ?

ज्ञानदेव : हं हूं.

मुक्ता : मग ?

ज्ञानदेव : ह्याच भिंतीवर बसून. ही भिंत नेईल की आपल्याला.

शिष्य : भिंत नेईल ? भिंत चालेल ? आश्चर्य ! जिवंत वाघाला नमवणं एकदा जमेल, जिवंत नागाला खेळवणं एकदा शक्य होईल, पण दगडामातीची निर्जीव पडकी भिंत चालवायची ? हलायची ही ? (तो आश्चर्यानं पहातो.)

ज्ञानदेव : हो हलायची ही. सांगा योगीराजांना आम्ही आलोच म्हणून.

(वाद्यांचा गजर जवळ व जोरात येतो. मधेच वाघाची डरकाळी येते.)

शिष्य : (आत पाहून) ते आलेच योगीराज जवळ.

ज्ञानदेव : आम्हीही निघालोच. मग, चला भिंतीबाई.

[ओंकार ध्वनी ऐकू येतो व त्या नादात भिंत हळूच पुढे सरते.]

चांगदेव : (एकदम प्रवेशून) धन्य ज्ञानराजा, मी शरण आहे. (ज्ञानदेवाचे पाय धरतो. ज्ञानदेव त्याला उठवतो.)

ज्ञानदेव : मुक्ते, हे तुझं लेकरू. सांभाळ ह्याला, कर ह्याला उपदेश. आमचं कार्य आता संपलं. बस्स, आता सारे संत एकत्र करायचे आणि पंढरीला वारी न्यायची. नामदेवाला भेटायचं तिथं. पंढरीचा रावो पहायचा डोळे भरून तिथं.

[टाळ मृदंग वाजू लागतात. हळूहळू अंधार होतो. ओव्या ऐकू येऊ लागतात.]

अवघाचि संसार सुखाचा करीन ।
आनंदे भरीन तिन्ही लोक ।।
जाइन गे माये तया पंढरपुरा ।
भेटेन माहेरा आपुलीया ।।

[ज्ञानबा – तुकाराम हा गजर सुरू होतो.]

(पडदा पडतो)

(अंक तिसरा समाप्त)

नामदेव-ज्ञानदेवांचे समकालीनत्व

दे. व्यं. चौहान

संत नामदेवाचा जन्म व त्यांचे निर्याण यांची वर्षे व त्यांचा काल, एका परीने, संशयास्पद नाहीत. नामदेवाच्या जन्म आणि मृत्यु यांच्या तिथि, अनुक्रमें कार्तिक शुक्ल ११, शक ११९२ आणि आषाढ कृष्ण १३, शक १२७२ अशा आहेत. नामदेवाच्या समकालीन किंवा पुढील पिढीत झालेल्या महाराष्ट्रातील संत कवींच्या अभंगातून या तिथि उपलब्ध होतात. तिथ्यांची हीच परम्परा वारकरी सम्प्रदायात मानली व अनुसरली जाते.परंतु नामदेवाच्या जन्मतिथिसंबंधाने विद्वानांत मतभेद निर्माण झालेले आहेत. त्याचे कारण असे की संवत्सराच्या उल्लेखात प्रमोद ऐवजी प्रभव संवत्सराची नोंद आढळते (पहा भारद्वाज, पृष्ठ २). जन्मतिथीबाबतच्या या मतभेदाची संगति आता लावण्यात आलेली आहे (पहा इनामदार, पृष्ठ ३० व पुढे). आणखी एक अधिक गंभीर असलेला आक्षेप भारद्वाज यांनी घेतलेला आहे (पृष्ठ ८८ व पुढे) व तो भाषिक स्वरूपाचा आहे. हाच आक्षेप दिवंगत डॉ. रा. गो. भांडारकर यांनीही घेतलेला आहे. ते म्हणतात—.

" नामदेवाच्या जन्माची मानण्यात आलेली तिथि शक ११९२ ची म्हणजे इ. स. १२७० आहे. यामुळे तो, ज्ञानदेवी ग्रंथाचा कर्ता असलेल्या ज्ञानदेवाचा समकालीन ठरतो. ज्ञानदेवी इ. स. १२९० त पूर्ण करण्यात आली होती. परन्तु ज्ञानदेवी ग्रंथाची भाषा निश्चितपणे आर्ष असून नामदेवाच्या वाणीवर आधुनिकतेची अधिक छाया दिसून येते.... तुरुकांनी देवदेवतांच्या मूर्ति भंगिल्या असा उल्लेख नामदेवाने आपल्या एका पदात केलेला आहे. ही गोष्ट, मराठभूमीत मुसलमानांनी पाय रोवल्यानंतर नामदेव होऊन गेला, या घटनेचा अधिक प्रत्यक्ष पुरावा होय. म्हणून नामदेव, सम्भवतः इ० सनाच्या चौदाव्या शतकात किंवा त्याच्या शेवटी होऊन गेला " (पाहा इनामदार, पृष्ठ ३६–३७). संशोधनात चिकित्सक प्रवृत्तीचे किती महत्त्व आहे याचे वर्णन करीत असतांना भाण्डारकरांनी याच आक्षेपाचा पुनरुच्चार केलेला आहे (पाहा भाण्डारकर, पृ. ३२४). त्यांत भाषेच्या दृष्टीने व्याकरणविषयक बदल व शब्दांच्या वापराची तक्रार केलेली आहे.

नामदेवाचे वर्ष व त्याची भाषा याविषयी भाण्डारकरांनी अन्य विषयांची चर्चा करीत असताना आपली मते व्यक्त केलेली आहेत. संबंधित साधनांचा स्वतंत्रपणे चिकित्सक अभ्यास करून त्यांनी हे निष्कर्ष काढलेले नाहीत. परंतु त्यांच्या निधनोत्तर, त्यांच्या महत्तर संशोधकीय व्यक्तिमत्त्वामुळे, त्यांच्या मतप्रदर्शनामुळे या विधानाला महत्त्व प्राप्त झाले. नामदेवाच्या जन्मतिथि लेखनात संवत्सरनामात झालेल्या चुकीवरील भारद्वाज यांच्या आरोपाचे निराकरण भिंगारकर व अन्य अभ्यासकांनी केलेले आहे.

आपल्या स्वतःच्या युक्तिवादाने नामदेवाचे जन्मवर्ष शक १३०९ असल्याचे भारद्वाज यांनी प्रतिपादिले आहे. अगदी कमी बोलायचे असे ठरविले तरी हा प्रयत्न विपर्यस्त व चिकित्सक पद्धतीला न शोभण्यासारखा आहे, हे उघड आहे. त्यांनी सुचविलेले नामदेवाचे मृत्युवर्षही याच कोटीतले आहे. भाण्डारकारांचा दृष्टिकोन केवळ भाषिक युक्तिवादावर आधारलेला आहे. नामदेवाच्या भाषेवर आधुनिकतेची अधिक छाया पडलेली दिसून येते व त्याच्या भाषेत फार्सी शब्दांचा वापर आढळतो, अशी त्यांची तक्रार आहे.

येथे या समस्येचा, प्रामुख्याने भाषिक दृष्टिकोनातून, विचार करावयाचा आहे. कांही अचिकित्सक व पूर्वग्रहदूषित वर्तुळातून आज देखील नामदेवाचा काल ज्ञानेश्वराच्या काळाच्या नंतरचा आहे असे प्रच्छन्नपणे मानण्यात येते. म्हणून या प्रश्नाची पुनश्च छाननी करणे अगत्याचे बनते (पाहा, पत्रिका, पृ. ११).

भारद्वाज आणि भाण्डारकर यांनी नामदेवाच्या अभंग साहित्याला आपला आधार बनवून निष्कर्ष

काढलेले आहेत. त्यांनी नामदेवाची हिन्दी पदावली परीक्षिली आहे असे मुळीच आढळून येत नाही. तुरुक सारख्या काही ढोबळ शब्दावरून त्यांनी अनावश्यक अर्थ काढलेला आहे. नामदेवाच्या भाषेकडे आपण दोन दृष्टिकोनांतून पाहू शकतो. प्रथमतः साधारण भाषा व द्वितीयतः तान्त्रिक किंवा काहीशी भाषिक दृष्टि. नामदेवाच्या अभंगाच्या भाषेवर अधिक आधुनिकतेचा देखावा आहे, हे प्रथमदर्शनी मान्य केले पाहिजे. आरंभीच हेही नोंदविले पाहिजे की नामदेवाच्या अभंग व इतर साहित्याची चिकित्सक आवृत्ति सिद्ध करण्याचा प्रयत्न आजवर झालेला नाही. त्याच्या अभंगात आढळणारे आर्ष स्वरूप व भाषिक वैशिष्टचे यांची दखल घेण्याचा समाधानकारक प्रयत्नही झाल्याचे दिसून येत नाही. त्याच्या हिन्दी पदावलीचीही तीच अवस्था असल्याचे आढळते. डॉ. इनामदार यांनी प्रस्तुत केलेली समीक्षा फार दूरगामी आहे असे म्हणता येत नाही (पाहा इनामदार, पृ. ८९–९४) याची चर्चा मागाहून येत आहे. नामदेवाच्या हिन्दी पदावलीतील मराठी अवशेषांची नोंद करणे हेच त्यांनी मुख्यतः साधले आहे. परंतु नामदेवाच्या अभंग साहित्यावर आधुनिकतेची कृत्रिम पुटे का बसली याविषयीचे डॉ. इनामदार यांचे विश्लेषण व स्पष्टीकरण तर्कशुद्ध व वस्तुस्थितिनिदर्शक आहे. हे विश्लेषण काही अंशाने खुद्द ज्ञानेश्वरीला देखील लागू पडते. आणि तुकाराम व त्याच्या पश्चात अशा लोकप्रिय संत कवींच्या साहित्याला तर ते अधिक उठावदारपणे लागू पडते.

अमीर खुस्रो हा हिन्दी (उर्दू) भाषेचा आद्य कवि नामदेवाचा समकालीन होता. त्याचा जन्म शक ११७६ (हिजरी ६५१) मधील व मृत्यु शक १२४७ (हि. ७२५) तला होय. डॉ. इनामदार यांनी नामदेवाच्या भाषेतील आर्ष वैशिष्टचे व भाषिक स्वरूप यांच्या झिजणुकी बाबत जो युक्तिवाद उपयोजिला आहे तशीच हाताळणी डॉ. वहीद मिर्जा यांनी अमीन खुस्रो यांच्या हिन्दी पदांबद्दल केलेली आहे. याच युक्तिवादाचा आश्रय करून, खुस्रौच्या नावावर मोडणाऱ्या अनेक श्लोकांतून, काही साहित्य खुस्रोचेच होय अशी निवड केलेली आहे. या साहित्यावर देखील आधुनिकतेचा हात फिरलेला असून तत्कालीन हिन्दी भाषेच्या भाषिक वैशिष्टयांचा लोप झालेला आहे. या मुद्यावर नामदेव व अमीर खुस्रो निश्चितपणे एकाच भूमिकेवर वावरत आहेत. नामदेवावर करण्यात आलेली टीका अमीर खुस्रोवरही करण्यात आलेली आहे. प्राचीन प्रदीर्घ परम्परेचा आश्रय घेत, खुस्रोची काही निर्विवाद पदे व त्याच्या भाषेतील आर्षता यांच्या आधारावर, खुस्रो हिन्दी भाषेचाही कवि होता, असा डॉ. मिर्जा याने निष्कर्ष काढलेला आहे (पाहा मिर्जा, पृ. २३०).

भाषिक समीक्षण

नामदेवाच्या अभंग व पद साहित्यांतील आर्ष शब्द व भाषिक वैशिष्टयांची झिजणूक त्यांच्या लोपापर्यंत पोचलेली असली, तरी त्याची हिन्दी पदावली मात्र या प्रभावापासून मुक्त असून बरीच सुरक्षित आहे. तीतील वैशिष्टयांची झिजणूक फारच कमी झालेली आहे. याचे अंशतः कारण असे की नामदेवांची ६१ पदे, शिखपंथाच्या गुरुग्रंथसाहेबात समावेश पावलेली आहेत. या धर्मग्रंथाचे संकलन – जरी बऱ्याच उशीरा झालेले असले तरी – ते शक १५२६ वर्षात गुरु अर्जुनदेव यांच्या हातून घडून आले (पाहा शिख, पृ. ६३). या नामदेवाच्या पदांना धार्मिक पावित्र्य प्राप्त झाल्याने व त्यांचा वाचकवर्ग, अभंगांच्या मानाने मर्यादित असल्याने, त्यात कमी परिवर्तन घडून आलेले आहे.

आता आपण नामदेवाच्या हिन्दी पदावलीच्या भाषिक वैशिष्टचे व आर्षतेकडे वळू. या समीक्षणासाठी पुणे विद्यापीठाने प्रकाशित केलेली व भगीरथ मिश्र आणि राजनारायण मौर्य या दोन विद्वानांनी सम्पादिलेली प्रत (संक्षेप–पदावली) वापरण्यात आली आहे. दिलेल्या संदर्भातील आकडयांपैकी पहिला अंक पदाचा व दशांशानंतरचा त्या पदातील चरणाचा आहे.

विभक्ति प्रत्यय

नामदेवाच्या या पदावलीतील प्रथमेच्या एकवचनी प्रयुक्त उकारान्त (प्रसंगी ओकार) प्रत्ययाचा उल्लेख इनामदार यांनी आपल्या भाषिक चर्चेत केलेला आहेच (पाहा, इनामदार, पृ. ९२). हा उकार मराठीतून नामदेवांनी घेतला असे इनामदारांनी म्हटले असले तरी ते सर्वतः खरे नव्हे. कारण हा उकार जुन्या हिन्दीचे वैशिष्टच म्हणून वावरत आलेला आहे. हे जुन्या ग्रंथांवरून सहजतया दिसून येते. कुतबशतक या ग्रंथाचा लेखनकाळ माहित नसला तरी संपादकाने तो साधारणतः शक १३५० चा असावा असे म्हटले आहे (पाहा गुप्त, पृ. २६).

तसेच इब्राहीम नामा, लेखनकाल शक १५२५ (हिजरी १०१२) या ग्रंथाच्या क्रमांक ३८९, ४०१, ५०२, ५४१, ६१२ इत्यादी श्लोकांत या उकाराचा वापर आढळतो. ही जुन्या हिन्दीची अवशिष्ट परम्परा आहे. इब्राहीम नाम्याच्या भाषेपेक्षा कुतवशतक पुस्तकाची भाषा अधिक जुनी व म्हणून आर्षपदयुक्त आहे हे येथे ध्यानात घेण्यासारखे आहे.

हिन्दी पदावलीचे अत्यन्त महत्वपूर्ण भाषिक वैशिष्टय म्हणजे तृतीयेसाठी वापरण्यात आलेला नि प्रत्यय होय. हिन्दी (उर्दू) भाषेत आढळणाऱ्या तृतीयेच्या या ने प्रत्ययाच्या समस्येची चर्चा आम्ही अन्यत्र एका प्रबन्धात केलेली आहे (पाहा प्राच्य, पृ. ३४९). या निवन्धात दक्खिनी हिन्दीतील (दकनी उर्दू) हा तृतीयार्थी ने प्रत्यय मराठी भाषेतून ऋण म्हणून घेतलेला आहे असे प्रतिपादिले आहे. शक १८९१ साली कलकत्ता येथे भरलेल्या अखिल भारतीय प्राच्यपरिषदेत आम्ही वाचलेल्या दुसऱ्या निवन्धात, नामदेवाच्या पदावलीतील रूपांची कुतवशतकातील रूपाशी तुलना करून, उत्तर भारतातील हिन्दी भाषेत सर्वप्रथम संन्त नामदेवाने हा नि प्रत्यय (आधुनिक ने) वापरला असे दाखविलेले आहे. कुतवशतक पुस्तकात या ने प्रत्ययाचा सम्पूर्ण अभाव आहे. हे दोन्ही निवन्ध आता प्रकाशित झालेले आहेत (पाहा चौहान, पृ. ३२२ व ३३३).

ने आणि से या हिन्दी प्रत्ययाच्या दोन्ही हेतूसाठी इ-इं, ए-एं, हि-हिं, हु-हुं, तसेच उ या प्रत्ययरूपांच्या वापराखेरीज, नामदेव नि-प्रत्ययाचाही तृतियान्त प्रत्ययासाठी प्रत्यक्ष उपयोग करतो. आजच्या मराठी व हिंदीतील ने या प्रत्ययाचे ज्ञानेश्वरकालीन मराठी भाषेतील रूप नि असेच होते. विवेकसिंधु, ज्ञानेश्वरी, शिशुपाल वध, रुक्मिणीस्वयंवर, चोंभाकृत उषाहरण, श्रीपतिभट्टविरचित ज्योतिषरत्नमाला आणि अन्य प्रमाण ग्रंथात शक ११०० पासून शक १३५० पर्यंतच्या कालात या नि प्रत्ययाचाच वापर सर्वत्र दिसून येतो. ने हे रूप मागाहून उद्गत झाले. त्याचे अनेकवचनी रूप नि तर अधिक उशीरा आले. नामदेव आपल्या हिन्दी पदांतून या नि प्रत्ययाचाच वापर करतो. आजच्या हिन्दीतील ने प्रत्ययाच्या अर्थानेच नामदेवाने केलेला वापर खालील प्रमाणे होय– '

(अ) (१) पहली जोति जु नैननि देवी
(पद्य ६१.४)
(२) नैननि पाया (पद्य ८७.१)
(३) श्रवननि पाया (पद्य ८७.१)
(४) इन लोगनि मारि भगायो हो
(पद्य १३१.१)

(अ) या ठिकाणी ही गोष्टही ध्यानात घ्यावी की, एका ठिकाणी नि प्रत्ययाचा उपयोग से प्रत्ययाच्या अर्थाने – केवळ मराठीतल्याप्रमाणे करण्यात आलेला आहे. पाहावे–

रामनाम जपिवौ श्रवननि सुनिवौ (पद्य ९.१)

डॉ. इनामदारांनी या तृतीया नि प्रत्ययाची चर्चा केलेली नाही (इनामदार, पृ. ९२). शक १४८८ (हिजरी ९७३) च्या अगोदर रचिलेले पिरतनामा नावाचे एक छोटेसे काव्य बीदर निवासी कुत्बुद्दीन फीरोज नामक कवीने लिहिलेले उपलब्ध व प्रकाशित आहे (पाहा पिरतनामा). या काव्यांत ने प्रत्ययाचा वापर मुळीच केलेला नाही. वस्तुतः ने प्रत्ययाच्या वापरासाठी १६ प्रसंग उपलब्ध होते. परंतु अन्य प्रत्ययाने हे काम भागविलेले आहे. या काव्यातील इतक्या उशीरा, या ने प्रत्ययाचा अभाव महत्वपूर्ण व बोलका आहे.

यावरून ही गोष्ट अपरिहार्यतेने निश्चित होते की, प्रथमतः हा ने प्रत्यय जन्माने मराठी आहे व नंतर तो हिन्दीत गेला आणि द्वितीयतः नामदेवाने शक कालाच्या तेराव्या शतकात त्याचा नि या रूपाने सर्वप्रथम हिंदीत वापर केला. पिरतनाम्याच्या भाषिक वैशिष्टयांची चर्चा आम्ही नवा–ई अदव या मुंबईतून निघणाऱ्या उर्दू त्रैमासिकाच्या आक्टोबर, १९६७ च्या अंकात विस्ताराने केलेली आहे (पृ. १६).

षष्ठी

हिंदीतील षष्ठीसाठी प्रयुक्त होणाऱ्या दुसऱ्या प्रत्ययाखेरीज नामदेवाने न (किंवा त्याच्या विकृति) प्रत्ययाचा षष्ठीसाठी उपयोग केलेला आहे. जुन्या मराठीत तो अप्राप्त आहे. जुन्या नव्या आर्यभारतीय भाषात हा प्रत्यय मध्य आर्यभारतीय भाषातून अवशेष रूपाने आलेला आहे, ही गोष्ट लक्ष्य आहे. तो संस्कृतातील षष्ठीच्या नाम्, णाम् या रूपाचा सगोत्र आहे. पदावलीत हा वापर खालील प्रमाणे आहे.

न–नाथन बोलषै (पद्य ६४·२)
मृघन खेत (६८·२)
पतित पतितन (८०·१)

नि – भगतिनि बँरिया (६८·२), सुरनि सुमृति, संतनि सुष (८६·२)

नै – तिनै सिरो (८१·१), बेदनै वाणी (११४·१)

नौ – नामानौ स्वामी (९५·७), पदनौ हेतारथ (११२·३), नामदेव नौ स्वामी (१३६·६),

न्है – तेन्है पगि (११२·३), जेन्है मुघडौ(१३६·१), तन्हौ तृपति (१३६·४)

डॉ. इनामदारांनी षष्ठीच्या या प्रत्ययाची नोंद घेतलेली नाही.

कुतबशतक पुस्तकातही या न प्रत्ययाचा वापर आढळतो. परंतु तो कमी प्रमाणात आहे. अखिनु वट्टडो(३१), का कीजइ तबीबियानु (५९·५), लाजनु सोचणा हुआ(७३·५), लाजनु संकुचि आया(१०८·५).

इब्राहीम नामा काव्यात (शक १५२५ हि. १०१२) सुद्धा या प्रत्ययाचा वापर दिसून येतो. तो खालील बैतात आढळतो.

> महक बास बावन हर एक तर्फ भर (५८८)
> पैन अभरन उनन अंग ज़र (५७४),
> तुम्हन पास (८६), उनन ते (४६८),
> उनन चाल (४६७), उनन पावुं (६४३), उन बिचार (६०५),
> उनन दर्द (५०९), हमन ठावुं (५५१), हमन बन (५१९),

सर्वनाम

या वर्गात प्रथम पुरुषी एकवचनी हू (मी) हे आर्ष रूप असलेले आढळते. शकाब्दाच्या १५ व्या शतकापासून हळूहळू त्याचा लोप झालेला आहे. नामदेवाच्या हिन्दी पदांत या सर्वनामाचा वापर प्राचुर्याने आढळतो. याच्या अनेक विकृति आढळतात, हे रूप सं. अहम् शब्दापासून व्युत्पन्न आहे. हिन्दी पदावलीतील खालील रूपे पाहावी–

हूं (५०.१), हौं (१३१.१; १४१.१, २), हउ (१४९.२; १५२.४), हउं (१५८.१).

स्व. गुप्त यांनी कुतबशतकात याची नोंद घेतलेली आहे (पाहा गुप्त, पृ. ४३). तेथे हूं हे रूप दोनदाच आले आहे (९).

इतर जुन्या अव्ययांखेरीज, जे हे उभयान्वयी अव्यय पदावलीत पुष्कळ वेळा आलेले आहे, त्याच्या अनेक विकृति व रूपे आहेत. मागाहूनच्या काळात त्याचा हळू हळू लोप झाला. संक्षेपापायी क्रियाविशेषणे आदींचा उल्लेख येथे गाळला आहे. जे हे अव्यय संस्कृत यद् शब्दापासून व्युत्पन्न आहे. पदावलीत त्याचा आढळ आहे–

> जो (२३.१;९१.१), जौ (९१.३,४), ज (९२.१), जु (६१.१; ४.६, १७.२); जुं (६१.३); जे (७८.४; ८१.२; ९१.१,२); जै (९१.३)

नामदेव की या उभयान्वयी अव्ययाचाही उपयोग करतात (पाहा पदावली ९५.१ आदि). ज्ञानेश्वरकालातच हे अव्यय मराठीत रूढ होते. हे अव्यय ज्ञानेश्वरानेही वापरले आहे. याची चर्चा आम्ही विस्ताराने पूर्वीच केलेली आहे (पाहा चौहान, पृ.२०८-२१४). शिवाय या अव्ययाचा इतिहास, व्युत्पत्ति व विकास यांचा मागोवा अन्यत्र घेण्यात आलेला आहे (पाहा कत्रे, पृ. ८५). याचा मराठी अनुवाद आता भारत ईराणी संश्लेष या पुस्तकात (पुणे, शक १८९५, पृ. १७१ व पुढे) प्रकाशित झालेला आहे. या अव्ययाचा विकास, मुसलमानांच्या आगमनापूर्वी, मराठीत झालेला होता. हे शक गणाच्या माध्यमाने घडून आले.

क्रिया रूपे

नामदेव पदावलीत आढळणाऱ्या भूतकालिकात जुन्या खडीबोली व हिंदीतील रूपांचा विशेष भरणा आहे. ब्रज, कोशली (अवधी), राजस्थानी, हरयानी इत्यादि बोलीहून खडीबोलीचे वेगळेपण निर्णीत करणारी ही क्रिया रूपे होत–

करीया, उधरीया (५४.३), उधार्यौ (५४.४), कथीया (७६.३), मिलि रहिया (७७.३), काढया (८२.१), फलिया (१०१.२), पकडया (१०७.१), परस्या, दरस्या (१७७.३), लह्या (१३६.३), मनिआ, जनिआ (१२०.४), परोइआ, होइआ (१५४.३), समानिआ, जानिआ (१५४.६), मानिआ, पछानिआ (१५४.७), रहिआ, जानिआ, बखानिआ (१६२.१).

भविष्य

हिन्दीत नित्य आढळणाऱ्या गा-रूपाखेरीज, नामदेवाच्या पदावलीत सि-रूप भविष्यकाळ दर्श-

विष्यासाठी वापरण्यात आलेले आहे. हे रूप संस्कृत — इष्यति या प्रत्ययापासून निघालेले आहे. याचे एक उदाहरण मिलसी (मिलेगा १०२.१) असे मिळते. भविष्यत् चे हे रूप दख्खिनी हिन्दीत शककालाच्या सोळाव्या शतकापर्यंत तगून राहिलेले आढळते.

भूतकालिके

विशिष्ट भूतकालवाचके हे खडीबोलीचे वेगळेपण आहे. ते दख्खिनी हिंदी व जुन्या हिन्दीतही आढळते. या भूतकालिकावर मराठी छायाही दिसून येते —

बैसनो (मराठी बैसुनु ३१.४), करजोडी (११२.३), खेइ (५१.४), होइ (६२.८), पैसि (१०३.५), जोडिनै (११२.३), द्वै करि (११७.१), जाई (१३६.१), अंहडे दीन्है (१३८.२), पात झरि परै (१३९.१), जानि बूझि विख खाईए (१४२.२), भजि लीजे (१४३.१) आदि.

आर्ष रूपे

नामदेवाने वाराणसी या तीर्थनामाचे बानारसी असे रूप दोनदा वापरले आहे (पदावली ९१.१; १५९.१). या नगराचे संस्कृत रूप वाराणसी असून तेच आजदेखील रूढ आहे. अमीर खुस्रौ यानेसुद्धा बानारसी हेच रूप वापरले आहे हे लक्ष्य आहे. (पाहा खुस्रौ, पृ. १६७). खुस्रौ म्हणतो—

नीस्त निहाँ आँ कि सूए— हिन्द निगर
कर्द अबू मअ़शर दानिन्दह गुज़र
आमद व दह साल दर आमोख्त सुखन्
दर हद-ई बानारसी आन् शहर-ई कुहन्

बिल्हण कवीने आपल्या विक्रमाङ्कदेवचरितात वाणारसी असाच पाठ वापरलेला आहे. कवीने हे चरित शक १००७ च्या पूर्वी लिहिल्याचे बुह्लरने लिहिले आहे. या चरिताची मूळ प्रतही शक १२०८ ची आहे. हा बाणारसी पाठ असा आलेला आहे.

वाणारस्यां पुरि परिहृतो येन तस्यां द्युसिन्धौ
स्नात्वा दैवोपनतकुनृपालोकनोत्थः कलङ्कः ।।
१८.९२

माझे मित्र डॉ. ग. वा. तगारे (इतिहास आणि संस्कृति पुस्तक ४०, १९७४) यांनी वाणारसी शब्दाच्या आणखी प्राचीनतेची चर्चा केलेली आहे. हेमचन्द्र सुरि (शक १०१० ते १०९४) याने वाराणसी शब्दातील र आणि ण ध्वनींचा व्यत्यास नोंदला आहे. ही नोंद शकाब्दाच्या ५ व्या शतकापर्यंत पोंचते, असे दिसून येते.

यावरून या गोष्टीचे सूचन होते की नामदेव, खुस्रौ व हेमचन्द्राच्या काळात पश्चिम भारतात वानारसी हे रूप रूढ होते. यावरून नामदेव हेमचन्द्र व खुस्रौ यांच्या काळाजवळचा होता, हेही नजरेत भरते. नामदेवाने अरबी पैगम्बर शब्दाचे पैकम्बर असे रूप वापरले आहे (प. ४४.२). तसेच मुसलमानांच्या मस्जिद या अरबी शब्दाचे अपभ्रष्ट रूप मसीति (९४.३) असे वापरले आहे. या दोन्ही शब्दांत पैशाची प्रभाव वावरत असल्याचे दिसून येते. मसीति शब्दाला विशिष्ट इतिहास आहे. त्याची चर्चा येथे करणे योग्य नव्हे. मस्जिद शब्दाच्या अपभ्रष्ट अशा मिज़गित या पष्तो रूपावरून तो नामदेवाजवळ मसीति बनलेला आहे. पष्तो भाषेतील त्याच्या रूपाबद्दल चर्चा अन्यत्र आढळते (पाहा हबीबी, पृ. ५१). निशानु वजाई (६८·१, ७१·१; २१४·४). या वाक्यातील निशान हा शब्द संस्कृत निःस्वान (म्हणजे तुतारी) शब्दाचे तद्भव रूप आहे. हा शब्द जुनी मराठी, खडी बोली, ब्रज व कोशली इत्यादीत नित्यप्रयुक्त होता. एक रीख्ता द्विपंक्ति नामदेवाच्या पदात आली आहे (१५८·२). अमीर खुस्रौने संस्कृतमधील करम्भक शैलीच्या अनुकरणरूपाने रीख्ता शैली नव्याने फार्सी भाषेत वापरली होती. परंतु पद क्रमांक १५७ व १५८ नामदेवाचे नसावेत असे मला वाटते. कारण त्यात अरबी फार्शी शब्दांची रेलचेल दिसून येते.

मुस्लिम संपर्क

नामदेव ज्ञानेश्वरानंतर एक शतकाने मागाहून झाल्याचे रा. गो. भांडारकरांचे विधान धाष्टर्याचे व अनैतिहासिक आहे. या मुरलेल्या व सव्यसाची विद्वानाने हे विधान अभावितपणे केले असे म्हणावेसे वाटते. ज्ञानेश्वर दिवंगत झाल्याच्या सुमारास वायव्य भारतावर मुसलमानांचे हल्ले सुरू होऊन तीन शतकांचा काळ लोटलेला होता. शक ९२१ च्या सुमारास महमूद गजनीने पंजाबवर हल्ला केला होता. त्याचा देहान्त ९५२ मध्ये झाला. तोपर्यंत त्याने भारतावर अनेक हल्ले केलेले होते. त्यानंतर महंमद घोरीनेही हल्ल्याचे धोरण चालू ठेविले होते. शक ११२८ त मुसलमानांनी दिल्लीलाच आपली राजधानी केली. पुढील ५० वर्षात

पंजाब, सिंध, उत्तर गुजरात (नहरवाला, अनहिलपाटक) राजस्थान व बहुधा समग्र उत्तर प्रदेशाचे मुसलमान स्वामी बनले. ज्ञानेश्वरी लिहिली गेल्यानंतर केवळ ४ वर्षातच देवगिरी पडला. नामदेवाच्या मृत्यूचे साम्प्रदायिक वर्ष (शक १२७२) खरे मानले तर नामदेवाने ५६ वर्षे महाराष्ट्रातील इस्लामी सत्तेखाली घालविली होती. शक १२४२त विजापुरात मशीद बांधल्याचा मराठी कोरीव लेख लिहिला गेला. शक १२४७ मध्ये महाराष्ट्रात खानापूर (पुणे) येथील मशीद बांधली गेली. यावरून असे स्पष्ट होते की शक १२५० मध्ये सगळा महाराष्ट्र मुसलमानी सत्तेखाली आलेला होता. यानंतरही नामदेव जवळजवळ २५ वर्षे जीवित होते. यावरून इस्लामी सत्तेचा अनुभव येण्यासाठी नामदेवाला भरपूर अवधी मिळालेला होता. तुरुक, तुरक यासारखे शब्द व देवदेवतांच्या देवळांची धूळधाण त्याला चांगलीच पाहायला मिळाली होती.

याखेरीज त्याच्या ६१ पदांना शिख पंथाच्या आदिपंथात स्थान मिळावे व त्याला आवश्यक असलेली प्रतिष्ठा प्राप्त व्हावी, इतक्या प्रदीर्घ कालापर्यंत नामदेवाचे पंजाबात वास्तव्य राहिलेले होते. इतिहासनिविष्ट या गोष्टींची दखल घेतली असता, भांडारकर व इतरांचा, नामदेवाला उत्तरकालीन मानण्यासाठी निर्मिलेला मुस्लिम सम्पर्क वाद बुद्धीला न पटण्यासारखा आहे. त्यात संशोधनबुद्धीला आवाहन करण्यासारखे काही नाही.

फार्सी शब्द

नामदेवाच्या पदावलीतील क्रमांक ९४, १५७ व १५८ ची पदे प्रक्षिप्त आहेत असे मला वाटते. शेवटच्या पदात रोख्ता (करम्भक शैली) द्विपंक्ति आलेली आहे. अशी पदे रचण्यासाठी फार्सी भाषा फार चांगल्या रीतीने अवगत असावयास पाहिजे. ही पदे वगळल्यास, दुसऱ्या पदातून एखादादुसरा फार्सी शब्द इतर पदांतून आलेला आहे. ३०० वर्षे इस्लामी सत्तेखाली असलेल्या प्रांतात प्रदीर्घ कालपर्यंत वास्तव्य झाल्यानंतर कोणाही माणसास या शब्दांचा परिचय घडून येईल. हे शब्दसुद्धा सामान्य जीवनात वावरणारे आहेत. संतमालेत वावणाऱ्या नामदेवाला इस्लामी सूफी पंथातील शब्दांचा सहवास घडणे सहज आहे. साबन, मुलमा, बाजी, दोजग, जामा, दुनी (दुनया), तमासै, आलम, नदरि (नजर—दृष्टि), गुन्हेगार, कसिब (कसाब), साहिब, कागद (कागज्), पीर, पैकम्बर, मौज, रोजा, कलमा अलह (अल्लाह), खसम, गरीब इत्यादि शब्द दैनंदिन जीवनातलेच आहेत. यात सुफी जीवनाचाही परिचय आहे. ५० वर्षांच्या कालावधीत महाराष्ट्रात राहणाऱ्या व दूर दूरचे प्रवास करणाऱ्या मराठी माणसालाही या शब्दांची चांगली ओळख झाली असती. नामदेवाचे वास्तव्य पंजाबात सुदीर्घ कालपर्यंत राहिलेले असल्यामुळे, त्यांचा परकी भाषेतील या शब्दांशी परिचय घडून येणे ही सहज शक्यता आहे. हे सर्व शब्द तद्भव रूपात वापरलेले आहेत, हेही येथे लक्ष्य होय.

समारोप

नामदेवाच्या हिंदी पदावलीतील, ने आणि से या दोन्ही अर्थासाठी झालेला, नि या प्रत्ययाचा वापर, आणि नामदेवानंतर किमान १०० वर्षे उशीरा उत्तरेत लिहिल्या गेलेल्या खडीबोलीच्या कुतबशतक पुस्तकात आणि तसेच दक्षिणेत किमान २०० वर्षे मागाहून झालेल्या पिरतनामा ग्रंथात असलेला, या प्रत्ययाचा संपूर्ण अभाव ही वस्तुस्थिति नामदेवाचा काल बराच जुना आहे असे दर्शविते. नामदेवाची हिंदी भाषा कुतबशतकाच्या भाषेइतकीच जुनी व आर्ष आहे. यावरून हे दोन्ही ग्रंथ शकाब्दाच्या चौदाव्या शतकाच्या मध्याच्या पूर्वीचे आहेत असे सिद्ध होते. नामदेवाच्या भाषेची ख्वाजा बन्दे नवाज (मृत्यु शक १३४४—हिजरी ८२५) याच्या भाषेशी तुलना केली तर नामदेवाच्या भाषेचे रूप बरेच जुने व आर्ष आहे असे दिसून येते. नामदेव व अमीर खुस्रौ हे समकालीन आहेत असे त्यांच्या भाषांवरूनही आढळून येते. नामदेवाची साम्प्रदायिक चालत असलेली मृत्यु तिथि, भाषिक समीक्षणाच्या आधारानेही, अगदी विश्वासार्ह व सत्य आहे, असे अपरिहार्यपणे निर्णीत करणे योग्य आहे. म्हणून गेल्या ७०० वर्षांपासून सम्प्रदायात मानण्यात येते त्याप्रमाणे नामदेव ज्ञानेश्वरीरचयित्या ज्ञानदेवाचा समकालीन होता असे म्हणणे प्राप्त आहे.

संक्षेप व संदर्भ – इनामदार – *संत नामदेव*, हे. वि. इनामदार, पुणे श. १८९२. इब्राहीम – अब्दुलकृत *इब्राहीमनामा*, दे. व्यं. चौहान, मुंबई श. १८९५. कर्वे – सु. मं. कर्वे *अभिनंदन ग्रंथ*,
(पुढील मजकूर पृष्ठ ३३० वर)

ज्ञानेश्वर आणि वीरशैव

सुधाकर मोगलेवार

'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' कार्यासाठी या महाराष्ट्रात ज्या अनेक धर्मपंथांची परंपरा उदयास आली त्यात भागवत अथवा वारकरी संप्रदायास अग्रस्थान द्यावे लागेल. सुमारे १३ व्या शतकात कर्नाटकात वीरशैव धर्म–पंथ आपल्या तेजोबलाने वृद्धीस आला होता. आणि वीरशैव व भागवत या दोन्ही धर्मपंथाचे कार्य लोकभाषा, लोकवाङ्मय, जाती विरहिता तसेच एकेश्वरवाद या दृष्टीने समान आढळत होते. अर्थात दोन्ही संप्रदायाची भाषा जरी कन्नड व मराठी अशी परस्परविरोधी आढळली तरी पण कार्याचे दृष्टीने अभिन्नत्व आढळत असल्याने वीरशैव धर्मपंथाचे प्रतिबिंब भागवत संप्रदायावर बहुअंशाने पडलेले आढळते. ज्ञानेश्वर, एकनाथ किंवा तुकाराम यासारख्या संतविभूतींचा या धर्मपंथाशी अतिशय निकटचा संबंध आलेला आढळतो.

याचे कारण असे की, १२ व्या शतकात वीरशैव धर्मपंथाचा जीर्णोद्धार करणाऱ्या प्रधान मंत्री म. बसवेश्वराचे केंद्रस्थान 'बसवकल्याण', अनुभवमंटपातील शिवशरणांच्या मालिकेतील प्रमुख शिवशरण म्हणून मान्यता पावलेल्या सिद्धरामाची तपोभूमी सोलापूर, भागवत संप्रदायाच्या 'कानडा विठ्ठल'चे व त्यांच्या निःसीम भक्तांचे श्रद्धास्थान पंढरपूर, ज्ञानेश्वर माऊलीचे आळंदी आणि शैवभक्तीवर श्रद्धा ठेवणाऱ्या नाथ, वीरशैव व शक्ति आदी संप्रदायी शरणांची तपोभूमी श्रीशैल (कदलीबन) ही सर्व पवित्रस्थाने एकमेकापासून तशा अर्थाने फार दूर अंतरावर नाहीत. १२ व्या शतकात मात्र ही सर्व स्थाने विशाल महाराष्ट्रात अंतर्भूत झाली होती. त्यावेळी 'बसवकल्याण' क्षेत्र तर शिवभक्ताच्या शिवशरणांच्या कार्यप्रणालीने शिवमय झालेले दिसत होते. बहुअंशाने त्यावेळी कन्नड प्रदेशाच्या संसर्गाने कन्नड लोकभाषा वैभवाचे शिखरावर 'वचन वाङ्मया'च्या रूपाने विराजमान झाली असली तरी मराठीचा उदय नुकताच झाल्यामुळे अल्प प्रमाणात का असेना मराठी भाषा लोकांच्या तोंडी आढळत असे. त्यामुळे मराठीबरोबरच कन्नड या दोन्ही भाषा त्यावेळच्या शिवभक्तांना अवगत झालेल्या असाव्या. या दोन्ही भाषांचे प्रतिबिंब वारकरी संप्रदायावर उमटले यात तिळमात्र संशय नाही.

ज्ञानेश्वराचे पूर्वी या महाराष्ट्रात शैव संप्रदायाचे दृष्टीने केवळ दोन धर्मपंथ आघाडीवर होते. एक वीरशैव आणि दुसरा नाथ. नाथपंथ तसा पाहिला तर शैवपंथच. कारण या पंथाचा प्रणेता जो मच्छिंद्रनाथ यांची जन्मकथा या संदर्भात उल्लेखनीय वाटते. शिवाने पार्वतीला जीवनोपदेश करीत असता महाविष्णूने मच्छाचे रूपाने तो ऐकला. शंकराला हे कळताच त्यांनी त्याचेवर जलसिंचन केले आणि मच्छिंद्रनाथाचा जन्म झाला. शैवपंथाला जे २८ आगम मान्य आहेत त्यात शिवाने पार्वतीला जो उपदेश केलेला दिसतो त्याचेच विवेचन आढळते. अर्थात तत्वज्ञानाचे बाबतीत नाथ व वीरशैव यांचे दैवत एकच – शिव. आगम दोघानांही मान्यच. फरक एवढाच की, आगमातील पूर्वांग शैव पंथियांना मानते व उत्तरांगातील तत्त्वज्ञानावर वीरशैवांची निष्ठा आहे. षट्स्थल, अष्टावरण व पंचाचार ही शैवपंथाहून वेगळेपणा दाखविणारी वैशिष्टये वीरशैवात आढळतात. शैवागमातील प्रतिमापूजा–स्थावर लिंगपूजा वीरशैवाना मान्य नाही. ते 'इष्टलिंग' अंगावर सदोदित धारण करून त्याची पूजा करतात. या दोन्ही पंथांचा मध्य नाथपंथानी स्वीकारला. वीरशैवांनी अमान्य केलेला हटयोग मात्र नाथपंथाने स्वीकारला. वीरशैवांनी 'शिवयोग' मान्य केला. मच्छिंद्रनाथाचे शिष्य गोरखनाथ आणि बसवेश्वरांनी स्थापन केलेल्या अनुभव मंटपाचे अध्यक्ष प्रभूदेव उर्फ अल्लमप्रभू हे दोघेही गुरुबंधू कदलीबनात तपश्चर्येला होते. त्यामुळे या दोघांच्या आचार विचाराचे प्रतिबिंब परस्परावर पडलेले आहे. अल्लम प्रभूची 'शिवयोगावर तर गोरखनाथाची हटयोगावर श्रद्धा. अशा वेळी दोघांचा वाद होऊन शेवटी अल्लम-

प्रभूने गोरखनाथाला 'शिवदीक्षा' दिल्याचा उल्लेख ब्रह्मदासाच्या 'लिलाविश्वंभर' ग्रंथात विस्तृत रीतीने निवेदन केला आहे. याचा परिणाम असा झाला की, गोरखनाथांची शिष्यपरंपरा वीरशैव धर्मावर एवढी आकृष्ट झाली की, त्यांनी आपल्या ग्रंथात वीरशैव धर्माचरणाचे तत्वज्ञान विशद केले. निवृत्तिनाथ हे नाथ-परंपरेचे असल्याने गुरु परंपरेने ज्ञानेश्वर नाथ संप्रदायाचे आहेत असे म्हटले जाते परंतु ही परंपरा वीरशैवमय स्वरूपाची असल्याने ज्ञानदेव देखील वीरशैव तत्वज्ञान व आचारधर्माशी परिचित होते असे दिसते.

तसे पाहिले तर आळंदी हे ज्ञानदेव माऊलीचे कार्यक्षेत्र. परंतु आळंदी 'शिवपीठ' असल्याची ग्वाही श्री. रा. चिं. ढेरे यांनी दिलेली आहे. बालमुकूंद केसरीच्या 'अलका महात्म्य' या ग्रंथात या शिवपीठाचे वर्णन आहे. नामदेव गाथ्यात 'अलकापुरी' या नावाने या शिवपीठाचा महिमा हे शिवपीठ अगस्ती ऋषीचे मूळ स्थान, शिवाचे निर्मळ मूळपीठ, शिवागमात सांगितलेले पंढरपुराहूनही जुनाट पीठ अशा शब्दात वर्णन केला आहे. अर्थात हे पीठ शैवागमास मानणाऱ्या वीरशैव, नाथपंथादी संतांच्या कक्षेत असल्यामुळे आचार-विचारांचा प्रभाव तेथील संतमंडळीवर पडल्यावाचून राहिला नाही. त्यात ज्ञानेश्वर देखील एकरूप झाल्यास नवल नाही. ज्ञानदेवाचे गुरू निवृत्तिनाथ नाथपंथी गहिनीनाथाचे शिष्य कां झाले? आणि गुरुपरंपरेने ज्ञानदेव नाथपंथी का? या प्रश्नाचे उत्तर शोधतांना आळंदी क्षेत्राचे महात्म्य व नाथपंथाची ही पूर्वपरंपरा लक्षात घेतली पाहिजे.

नाथपंथाच्या परंपरेत वीरशैव तत्त्वज्ञान कसे एकरूप झाले याचा विचार करणे अगत्याचे आहे. ज्ञानदेवांनी याच गुरुपरंपरेच्या वाङ्मयाचा पुरेपूर उपयोग आपले ग्रंथनिर्मितीसाठी केलेला आढळतो. गोरक्षनाथांनी आपल्या 'सिद्धसिद्धान्त पद्धती'त शिव-भक्तीचे स्वरूप विशद केले आहे. वीरशैवांनी मानलेला 'शक्तिविशिष्टाद्वैत' सिद्धान्ताचे स्वरूप या ग्रंथात पुरेपूर पहायला मिळते. तसेच त्यांच्या 'अष्टांगयोगा'चे स्वरूप वीरशैवांच्या 'अष्टावरण' तत्वज्ञानाशी साम्यत्व दर्शविते. शिवशक्तीचे स्वरूप ज्ञानदेवांनी 'अमृतानु-भवा'त 'शिवशक्ति समावेशन' नावाने विशद केलेले दिसेल.

गोडी आणि गुळु। कापुर आणि परिमळु।
निवडूं जाता पांगळू। निवाडू होय ॥ १–२३ ॥
जैसी सूर्यो मिरवे प्रभा। प्रभे सूर्यत्वचि गाभा।
तैसी भेद गिळीत शोभा। ये एचि जे ॥ १–२५ ॥
शिवशक्ति समावेशे। नमन केले म्यां ऐसे।
रंगागर्भ आकाशे। रिघाला जैसा ॥ १–६४ ॥

तसेच 'अष्टांग योगा'चे वर्णन ज्ञानेश्वरीत आप-णाला आढळतेच. ॐकार वर्णन देखील ज्ञानदेवाने केलेले आहेच. त्याचे रूप आपणास शैवभक्तीत पाहायला मिळत नाही काय?

गोरक्षनाथाची शिष्या 'मुक्ताबाई' ही कदली बनात राहत असे. महानुभाव संस्थापक श्री चक्रधर स्वामी तपश्चर्येसाठी जेव्हा शैलपर्वतावर गेले होते त्यावेळी याच मुक्ताबाईने त्यांचे स्वागत केले होते. याच मुक्ताबाईचा शिष्य चांगावटेश्वर होय. आणि त्याचा शिष्य विसोबा खेचर. (गोरक्ष–मुक्ताबाई–चांगदेव–कृष्णनाथ–विसोबा खेचर) या विसोबा खेचरने वीरशैव तत्त्वज्ञानाचा 'षट्स्थल' ग्रंथ लिहिला असून या ग्रंथावर संशोधन केल्याबद्दल श्री. ढेरे यांना पुणे विद्यापीठा-कडून डॉक्टरेट पदवी प्राप्त झाली आहे. अर्थात चांगदेव व विसोबा खेचर यांचे ग्रंथातील तत्त्वज्ञान वीरशैव तत्त्व-ज्ञानाशी निकटचे भासते. या 'षट्स्थल' ग्रंथात विसो-बांनी चांगदेवाचे उपास्य दैवत 'वटेश्वर शिवाचे' स्वरूप विशद करतांना शिवाच्या पंचमुखातून पंचमहाभूतांची उत्पत्ति झाली असे दर्शविले आहे. एवढेच नव्हे तर प्रत्यक्ष चांगा वटेश्वराने आपल्या 'तत्वसार' ग्रंथात पंचभूतांची उत्पत्ति विसोबाच्या अर्थानुसारच सांगि-तली आहे.

आता पंचभूतिकोत्पत्ति। यांचि सांघैन विस्पत्ति
एक एकाप्रति। जन्म जाले ॥
ईशान म्हणिजे आकाश। वायु म्हणिजे तत्पुरुष।
अघोर तेज प्रकाश। वामदेव म्हणिजे।
पृथ्वी सद्योजाता पासैनि। ऐसें पंचब्रह्मीं होउनि।
येणेंचि अनुक्रमे गगनि। विलयो पावे ॥
(तत्वसार ६३०–६३५–६३६)

अर्थात विसोबा खेचर व चांगा वटेश्वर यांचे व्युत्पत्तीतील ईशान, सत्पुरुष, अघोर, वामदेव व सद्योजात हे शब्द वीरशैव तत्वज्ञानाशी साम्यत्व दर्शवितात. वीर-शैव तत्वज्ञानात देखील शिवाच्या पंचमुखातूनच वरील

नावाने व्युत्पत्ति आहे. प्रत्यक्ष चांगावटेश्वर हे तर वीर-शैव ज्याप्रमाणें आपल्या इष्टलिंगाची पूजा डाव्या हस्त-पीठावर लिंग ठेवून करतात त्याप्रमाणेच नदीतील काळ्याभोर मातीचे लिंग हस्तपीठावर ठेवून पूजा करीत असत. यावरून हे दोघेही वीरशैवाशी किती एकरूप झाले होते हे स्पष्ट होते. चांगा वटेश्वराने ज्ञानदेवाला कोरे पत्र लिहल्यावर त्याचे उत्तर ज्ञानदेवाने ६५ ओव्यात लिहिलेल्या 'चांगदेव पासष्ठी 'च्या रूपाने दिले खरे; पण त्या ग्रंथात 'तत्त्वमसि' तत्त्व सांगितले आहे ते तत्वसार ग्रंथातील तत्वज्ञानास जवळचे वाटते. एवढेच नव्हे तर तत्त्वज्ञान 'एकमेवाद्वितीयं ब्रह्म नेह नानास्ति किंचन; जीवो ब्रह्मैव नापर:' या रूपात ज्ञानेश्वरीत पाहायला मिळते. त्यामुळे या गुरुपरंपरेतून आलेल्या तत्त्वज्ञानाशी ज्ञानदेव एकरूप झालेले होते हे स्पष्ट झाल्यावाचून राहत नाही.

'ॐ नमोजी आद्या' असलेल्या ज्ञानदेवांनी ज्या देवतेवर चंद्रभागेच्या वाळवंटावर आपल्या वारकरी संप्रदायाचा पाया रचला तो 'कानडु विठ्ठल' मूळचा कर्नाटकीच ना ? 'विठोने शिरी वाहिला देवराणा' आणि 'शिवाने हृदी वाहिला रामराणा' यावरून त्याचे शैवत्व डोळ्यासमोर झळकू लागते. पूर्वी कर्नाटकात शैव-वैष्णव वाद फार मोठ्या प्रमाणात विकोपाला गेला होता. तो नाहीसा व्हावा याच हेतूने विठ्ठल देवता बहुजनासमोर ठेवली गेली. नाथपंथाने शैव-वैष्णवास एकसंघ करण्याचे महान कार्य केले. तीच परंपरा पुढे ज्ञानदेवादी संतांनी स्वीकारली. महाराष्ट्रातील संतांची वृत्ती जेवढी शैववादी तेवढीच वैष्णववादी दिसून येते. अशा वेळी ज्ञानदेवांनी वैष्णवग्रंथ आधारास घेऊन गुरु-परंपरेतून मिळविलेले शैव-तत्त्वज्ञान त्यात विशद करून शैववैष्णव रूपाचे मिश्रण करून टाकले आणि भक्तातील भेद नाहीसा केला.

ज्ञानेश्वर वीरशैव तत्त्वज्ञानाशी किती प्रमाणात परिचित होते याचे दर्शन घडविणारे त्यांचे चार अभंग डॉ. पंडित आवळीकरांनी उद्धृत केले आहेत.

विदेह आत्मलिंगा गुरुकृपेचा तुषारू
पूर्ण पुर्ण भरिला घट हळुहळु बिंदु उदारु
वरूषला लिंगावरी तेणे तुष्टला श्रीगुरु
प्रसन्न निवृत्ति राजा ज्ञान देउनि उदारु ।।१।।
..विराले अभिमान ममता झाली समाप्ती ।
खुंटलिया उर्मी दाही स्नपन झालें लिंगाप्रती ।।४।।

किंवा

गुरुलिंग जंगम स्याने दाविला आगम
एकाग्र करी मन । तेणे होईल समाधान

या अभंगात 'गुरुमहात्म्य' विशद केले आहे. वीरशैवात गुरुमहात्म्याला परमेश्वराएवढेच महत्व दिलेले आहे. त्यामुळे ज्ञानदेवांनी हा भाव तेवढयाच भक्तिपूर्ण भावाने रेखाटलेला दिसतो. ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीत 'लिंगांग सामरस्य' ही वीरशैवांची संज्ञा वापरलेली आहे.

मग ब्रह्मरंध्री थिरावैनि । अहंभावाचिया बाह्या पसरुनि ।
परमात्मलिंगा धावौनि । आंगा घडे ।।
तवं पंचमहाभूतांची जवनीक फीटे । मग दोहोंसीही होय झटे ।
तेथें गगना सकट आटे । समरसि तिए ।।
ज्ञा० ६–३०५–६.

यात परमात्मलिंग, आंगा घडणे व समरसि या तीन शब्दांद्वारे लिंग आणि अंग यांचे सामरस्य कसे होते हे ज्ञानदेवांनी वीरशैव तत्त्वज्ञानद्वारे स्पष्ट केले आहे. श्री. वा. ल. पाठक यांनी ज्ञानेश्वरांचा १४८ ओव्यांचा 'पंचीकरण' नावाचा नवा ग्रंथ प्रकाशित केला आहे. या ग्रंथातील ४ थ्या समासात 'अजपा ब्रह्मांडीची' या विषयाचे विवेचन वीरशैवांच्या षट्स्थल तत्त्वज्ञानाला पुरेपूर लागू पडते.

आतां औटपीठीचा मार्ग एक बाई ।
निशिदिनीं पाही शोध करा ।।१।।
औटहाट प्रमाण सत्य कीं हे जाण ।
त्यातील जें स्थान ऐकें एक ।।२।।
महालिंग स्थान टाळू एक संधी ।
तेथें एक सिद्धी तेजोमय ।।३।।
मार्ग तेथ परतले दोही भागी ।
पश्चिमी महालिंगी मार्ग ऐसा ।।४।।
सत्रावीचे शिखरी मार्ग एक गेला ।
तो म्यां देखियला याच देही ।।५।।
महालिंगी मार्ग अंत नाही ज्याचा ।
शोध करितां वाचा कुंठितचि ।।६।।
ज्ञानदेव म्हणे हा विचार पाहा ।
जाणता दाविका विरळा एक ।।७।।

ज्ञानदेवाची बहिण मुक्ताबाई हिच्या १५ ओव्यांच्या अभंगाचा उल्लेख श्री. ढेरे यांनी केला आहे. त्यात आचार, लिंग, गुरु, सिर्वालगा, प्रसादलिंगासी इत्यादी प्रकारे आलेली परिभाषा वीरशैवमय होय. एकनाथ, तुकाराम यांचे अभंग देखील कानडी भाषेत आढळतात. तत्कालीन संपर्कामुळे ज्ञानेश्वरांना कन्नड भाषा अवगत असावी आणि त्यांनी कानडी भाषेत अभंग लिहिल्याची अधिक शक्यता आहे. अर्थात त्यातील तत्त्वज्ञान शैवमयच राहणार.

ज्ञानेश्वरानंतर त्यांच्या ग्रंथांचा अभ्यास वीरशैव संतांनी केलेला दिसतो. वीरशैव धर्मावर कळस चढविणाऱ्या मन्मथस्वामींनी ज्ञानदेवांचे ग्रंथ अवलोकन केलेले दिसतात. त्याचे प्रतिबिंब मन्मथांच्या अनुभवानंद तसेच स्वयंप्रकाश या दोन्ही ग्रंथांत जाणवू लागते. त्यांच्या 'ज्ञानबोध' ग्रंथातील साम्य विशेष उल्लेखनीय आहे.

ज्ञानेश्वर–जें जें देखे भूत । तें तें मानिजे भगवंत ।।
जीवातळीं आंथरित । जीव आपुला ।।
पायी कांटा नेहटे । मग डोळियांमाजी उमटे ।।

मन्मथ– जें जें देखिजे भूतमात्र । तें तें आत्मसूत्र ।।
जीवात्तळीं जीव अंथरी ।
दु:खितया सुखी करीं ।।
जैसी ठेच लागतां आंगोटियासी ।
जळयेते जैसें डोळियासी ।।

एवढेच नव्हे तर मन्मथांच्या या ग्रंथांवर मुकुंदराजाच्या 'विवेकसिंधू' ची छाप कशी पडली आहे हे डॉ. पंडित आवळीकरांनी उदाहरणे देऊन स्पष्ट केले आहे. परंतु मुकुंदराजाचे परमगुरु 'हरिनाथ' यांनी वीरशैवातील 'पाशुपत' शाखेचे आचरण केल्याची हकिगत विवेकसिंधूच्या शेवटच्या प्रकरणात आढळते. अर्थात विवेकसिंधू ग्रंथातील तत्त्वज्ञान हे देखील वीरशैव तत्त्वज्ञानाशी मिळते जुळते वाटल्यास नवल नाही. त्याचा आरोप तत्त्वज्ञानाचे दृष्टीने मन्मथावर लावणे योग्य होणार नाही. याच विवेकसिंधू तत्त्वज्ञानाचे किंचित प्रकारे का होईना, प्रतिबिंब ज्ञानदेवांच्या ग्रंथांवर पडलेले दिसत नाही काय ? एवढेच नव्हे तर मन्मथांच्या 'परमरहस्य सारामृता'तील श्रोतृंप्रार्थना, गुरुवंदन, गुरुसेवा, इत्यादीचा क्रम वाचतांना ज्ञानेश्वरीची आठवण झाल्याशिवाय राहत नाही.

एकंदरीने पाहता गुरुस्थानी असलेल्या नाथपंथाचे माध्यमातून ज्ञानेश्वरांनी वीरशैव–तत्त्वज्ञान आचारधर्माचा परिचय करून घेऊन आपल्या ग्रंथांत त्याला वैष्णवरूप दिले असे म्हणावे लागेल. त्यांचे ऋणाची जाणीव ठेवून वीरशैव संतानी आपल्या वाङ्मयाची निर्मिती करण्यास त्यांचे ग्रंथ आधारभूत मानले. म्हणून ज्ञानेश्वर हे वारकरी संप्रदायास जेवढे प्रिय तेवढेच वीरशैवांना प्रिय वाटतात यात संशय नाही.

U U U

(पृष्ठ ३२६ वरून)

खंड २, पुणे १९७१. खुस्रो – खुस्रोकृत *नुह सिपिहर*, वहीद मिर्जा. मुंबई १९४८, गुप्त – *कृतवशतक*, माताप्रसाद गुप्त, वाराणसी, १९६७. चौहान – *मराठी आणि दक्खिनी हिंदी*, दे. व्यं. चौहान, पुणे, १८९३. पत्रिका – *महाराष्ट्र साहित्य पत्रिका*, क्रमांक १७५, पुणे, १८९२. पदावली – *नामदेव की हिंदी पदावली*, भगीरथ मिश्र व राजनारायण मौर्य, पुणे १९६४. भांडारकर – *कलेक्टेड वर्क्स ऑफ भांडारकर*, खंड १, उटगीकर, पुणे १९३३. भारद्वाज – *ज्ञानदेव व ज्ञानेश्वर*, शि. ए. भारदे, पुणे १९३१. मिर्जा– *अमीर खुस्रो*, (उर्दू) वहीद मिर्जा, अलाहाबाद १९४९. शिख – द *सिख रिलीजन*, खंड ३ माकालिफ दिल्ली १९६३. हबीबी – *पश्तो व लविकान – ई गजना* अ. हृ. हबीबी, काबूल १३४१(इ. १९६२).

□ □ □

'ज्ञानदेवी'तील गुरु–शिष्य–सत्पथ

दा. ना. आसमवार

वाचे बरवें कवित्व । कवित्वीं वरवें रसिकत्व
रसिकत्वींहि परतत्व । स्पर्शु जैसा ।।
ज्ञाने० अ. १८.३४५

ज्ञानेश्वरांनी आपल्या 'भावार्थ दीपिके'त ह्या ओवीद्वारे परतत्त्वस्पर्शाची जी महती गायिली आहे त्या द्वारे त्यांच्या जीवितकार्याच्या उद्दिष्टांची पुरेपूर कल्पना येते. या दृष्टीनेच त्यांनी 'मन्हाटियेचां नगरी । ब्रह्म-विद्येचा सुकाळु करी' (१२.१६) अशा तऱ्हेची आपली मनीषा व्यक्त केली आहे. परमार्थज्ञानाला सर्व संतांनी अतोनात महत्त्व दिले आहे. अज्ञानग्रस्त सामान्यजनांना ज्ञानेशांच्या भावमय वाणीतून ब्रम्हविद्यामृत–रसास्वाद विनासायास अवगाहता येण्याची संधी लाभल्यामुळे त्यांना 'ज्ञानराज माउली' असे यथोचित संबोधन भाविकांकडून सहजगत्या लाभले आहे.

ज्ञानेश्वरीत आत्मज्ञान विषयाचा विस्तार केलेला असला तरी त्यात काव्यात्मकता काही थोडीथोडकी नाही. किंवहुना ज्ञानेश्वरांनी–

माझा मन्हाटाचि बोलु कवतिकें ।
परि अमृतातेंही पैजेंसीं जींके ।
ऐसीं अक्षरेंचि रसिकें । मेळवीन ।।६.१४।।

अशा रीतीने केलेली प्रतिज्ञा कसास लावून साहित्यसुवर्णाच्या खाणी आपल्या 'भावार्थ दीपिके'च्या माध्यमातून उघडल्या. ज्ञानेश्वरीत काव्य व तत्त्वज्ञानाचे धागे एकमेकात अशा रीतीने गुंफले गेलेले आहेत की त्यामुळे वाचकास नित्यनूतन स्वरूपाचे चिरसौंदर्य प्रतीत व्हावे.

ज्ञानेश्वरीत साधलेल्या काव्य व तत्त्वज्ञानाच्या समन्वयातूनच परमार्थज्ञानाच्या आदान प्रदानकार्यात गुरुशिष्यांच्या अंगचे गुण व गुरुशिष्यातील परस्परसंबंध या विषयावरही बराच प्रकाश पडतो.

ज्ञानेश्वरीतील श्रीकृष्ण व अर्जुन आणि निवृत्ति-नाथ व ज्ञानेश्वर या पात्रांच्या जोडगोळीद्वारे आपणास गुरुशिष्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विचार करता येतो. श्रीकृष्ण व अर्जुन ही तर पौराणिक पात्रेच आहेत; परंतु त्यांचे परस्परांशी वर्णिलेले संबंध ज्ञानेश्वरांनी स्वानुभवाच्या आधारे, प्रत्यक्षानुभूती प्रमाण मानूनच वर्णिलेले आहेत हे सहजगत्या कळते. निवृत्तिनाथांना ज्या नाथ संप्रदायातून दीक्षा मिळालेली होती त्या नाथ संप्रदायात गुरूला महत्त्वाचे स्थान आहे. गोरक्षनाथांचे शिष्य गहिनीनाथ यांचा अनुग्रह निवृत्तिनाथांना लाभ-लेला होता आणि या परंपरेनुसारच निवृत्तिनाथ हे प्रत्यक्षात ज्ञानेश्वरांचे थोरले बंधू असताही पारमार्थिक क्षेत्रातील गुरु होते.

हे गुरुभक्तीचे महिमान ज्ञानेश्वरांच्या अंगी रुजले व पुढेही संपूर्ण मध्ययुगीन साधनेत ते अखंडपणे नांदत राहिले. ज्ञानेश्वरीत सद्गुरुवर्णनाची अनंत स्थळे आहेत. गुरूचे वर्णन करताना ज्ञानेश्वरांच्या हृत्सागराला प्रचंड आवेगाने भरती येते आणि त्यामुळे ते ओव्यांच्या ओव्या सहजलीलया लिहून जातात. या त्यांच्या स्वभाव-धर्माला अनुलक्षून श्री. ग. कृ. आगाशे लिहितात, "गुरूचे शिष्यावर काय प्रेम असेल ते असो; पण शिष्य ज्ञानदेवांच्या रोमरोमात गुरुभक्ती इतकी तुडुंब भरली होती की त्यांच्या प्रत्येक रोमरंध्रागणिक जर त्यास जिभा असत्या तर तेथून गुरुभक्तीचे बोलच बाहेर पडले असते असे म्हटल्यास अतिशयोक्तीचे भय बाळगण्याचे कारण नाही." (ज्ञानेश्वरीचा उपसंहार, पृ. ५३) यामुळेंच आपल्या अध्यात्मग्रंथाला काव्यात्मकतेने नट-वितानाही अलंकारयोजनेतूनसुद्धा गुरुशिष्य–स्वभावाला परिपोषक अशा सिद्धांतांची पेरणीही ते जागोजागी करीत असतात.

ज्ञानेश्वरीतील दहाव्या अध्यायाच्या प्रारंभीच ज्ञानेश्वरांनी सद्गुरूस नमन करून त्यास 'विशदबोध-विदग्धा,' 'विद्यारविंदप्रबोधा' आणि 'पराप्रमेयप्रमदा-विलासिया' अशी विशेषणे वापरली आहेत. गुरु हा शुद्ध व पवित्र स्वरूपाचे ज्ञान चातुर्यपूर्ण रीतीने प्रकट करणारा,

विद्यारूप कमळास प्रफुल्लित करून त्याचा सौंदर्यस्वाद घेण्यास पात्र बनविणारा आणि परावाणीच्या अर्थाशी विलास करणारा असा असावा. या अर्थनिष्पत्तीतूनच 'अध्यात्मशास्त्री इये । एक अंतरंगचि अधिकारिये' (१८.१७२८) या अन्यत्रीच्या वाग्वचनांची कल्पना येते आणि परमार्थमार्गीच्या सद्‌गुरूची योग्यता कशी अत्युच्च श्रेणीची असावी लागते ह्याचाही अदमास येतो. या ठिकाणी रामदासांची गुरुविषयीची कल्पना विचारात घेणे इष्ट होईल. 'गुरु तो सकळांसी ब्राह्मण । जऱ्ही तो जाला क्रियाहीन । तरी तयासीच शरण । अनन्यभावें असावें ॥' हे रामदासांचे बोल आहेत. गुरु जोडताना तो ब्राह्मण आहे किंवा नाही हेच पहावयाचे असते; मग तो सदाचरणी नसला तरी चालेल. ह्या रामदासी भूमिकेच्या पार्श्वभूमीवर ज्ञानेश्वरांनी वर्णिलेल्या गुरूच्या पारमार्थिक श्रेष्ठतेचा विचार करावा म्हणजे ज्ञानेश्वरांची ह्या संबंधीची भूमिका कशी व्यापक आहे, हे लक्षात येईल.

ज्ञानेश्वरांनी सगळा भर गुरूच्या अंगभूत गुणविकासावर व सदाचरणशीलतेवर दिला आहे.

म्हणौनि कुळेंजातीवर्ण । हें आघवेंचि गा अकारण ।
एथ अर्जुना माझेंपण । सार्थक एक ॥९.४५२॥

—हे ज्ञानेश्वरांनी प्रस्थापित केलेल्या भागवतधर्माचे ब्रीदवाक्य आहे.

सद्‌गुरुची परमार्थमार्गातील श्रेष्ठता मान्य करूनही ज्ञानेश्वरीतील अनेक उल्लेखांवरून त्याचे परमार्थमार्गातील मोठेपण व्यवहारज्ञानात मुळीच आडवे येत नाही असे दिसून येईल. शिष्याने लहानशी गोष्ट केली तरी त्या छोटयाशा कार्याचेही कौतुक गुरूकडून होत असते.

तऱ्हीं विश्व प्रगटितेया गभस्ती ।
हाथिवेनि कि जे काइ आरति ।
कां चूळोदकें अपांपती ।
अर्घ्य न दीजे ॥९.१३॥

सूर्याच्या प्रकाशापुढे काडवातीची आरती काय प्रकाश देणार किंवा समुद्रास ओंजळभर पाण्याचे अर्घ्य देण्याने त्यात काय भर पडणार ? परंतु ते करताना जो अंतःकरणाचा प्रामाणिकपणा आढळून येतो त्याचे मोल मान्य केलेच पाहिजे व याच न्यायाने गुरूकडून शिष्याचा केव्हाही अव्हेर होत नसतो.

जैसें शिष्यातें गुरु । सर्वथा नेंये अव्हेरुं ।
कां सरितांते सागरु । त्यजी केवि ॥२.६०॥

सागराने जवळ येणाऱ्या नद्यांचा स्वीकार करणे व गुरूने शिष्याचा स्वीकार करणे या दोन्ही गोष्टी समान स्वरूपाच्याच आहेत.

शिष्य हा नेहमी प्रसन्नचित्त असावा असेच गुरुला वाटत असणार. शिष्य उदासीन आहे असे दिसताच गुरुच्या हृदयात भडभडून आल्याखेरीज कसे राहील ? ज्ञानेश्वरांची गीतार्थकथन प्रवृत्तीतील उदासीनता पाहिल्याबरोबर निवृत्तींना प्रोत्साहनाचे उद्‌गार काढण्याची आवश्यकता भासलीच.

तंव गुरु म्हणति काइ जालें । हें समस्त ही आम्हां पातलें ।
परि आतां सांघें जें बोलिलें । नारायणें ॥ ९.३२ ॥

गुरु हा शिष्यांच्या अडीअडचणी जाणून घेण्यास नेहमीच तत्पर असतो. शिष्य संकटात आहे असे पाहून गुरु प्रसंगानुरोधाने त्यावर उपाययोजना करण्यास पुढे सरसावीत असतो. प्रल्हादास तसे साहाय्य मिळालेच ना !

जो प्रल्हादाचेया बोला । विषयो ही सकळ आपण जाला ।
तो सद्‌गुरु असे जोडला । किरीटी तेया ॥ १०.३०९ ॥

त्याचा प्रत्यय अर्जुनासही सद्‌गुरु श्रीकृष्णाकरवी अनेकदा मिळाला. ज्ञानेश्वरांनी पहिल्या अध्यायात—

आतां देइजे अवधान । तुम्हीं बोलविलां मीं बोलेन।
जैसें चेष्टे सूत्राधीन । दारुयंत्र ॥ १.८१ ॥

असे म्हणताच निवृत्तींनी शिष्याचे हृद्‌गत जाणून 'हे तुज बोलावें न लगे काहीं । आतां ग्रंथा चित्त देइं । झडकरि गा' (१.८३) ह्या शब्दात, शब्दाने गुरुजवळ विनवणी करण्याची फारशी गरज पडत नाही असे सुचविले.

गुरूकडून शिष्यास दिल्या जाणाऱ्या ज्ञानाचा उपयोग त्याच्या स्वतःपुरताच मर्यादित नसतो. त्याचा उपयोग संपूर्ण विश्वाच्या कल्याणार्थ होत असतो.

पैं गुरुशिष्यसंबंधु येकांतीं ।
जेया अक्षरा एकाची वदंती ।
ते मेघाचियापरी त्रीजगती ।
गर्जत असे ॥ १०.११० ॥

गुरुपासून ज्ञान मिळते व आत्मानुभव घडतो. त्याप्रमाणेच त्याला पाहिल्यावरोबर समाधान लाभते.

गुरु तेथ ज्ञान । ज्ञानि आत्मदर्शन ।
दर्शनीं समाधान । आथि जैसें ॥ १८.१६१७ ॥

या दृष्टीने गुरूचे व्यक्तिमत्व आकर्षक व प्रभावोत्पादक असते. अर्थात त्याचे आचरण शिष्याच्या अंतःकरणात उदात्त भाव निर्माण करणारे असणार हे ओघानेच आले.

अर्जुन रणांगणावर द्रोणाचार्यासारख्या गुरुवर्यांशी लढणे अनुचित समजतो. 'मी पार्थु द्रोणाचा केला' (२.३७) या शब्दात त्याने स्वतःवर गुरूने अनेक संस्कारांनी प्रभावित करून त्याचे व्यक्तिमत्त्व घडविल्याचे ध्वनित केले आहे.

गुरुकडून शिष्यावर नानाविध संस्कार केले जातात, परंतु शिष्याचे काही चुकले असताही रागाची भावना देखील त्याला शिवत नाही. 'क्षोमु मनीं नेणिजे । द्रोणाचिये ।।' (२.३९)

याचप्रमाणे गुरूच्या हृदयाची सखोलता केवढी ? तर ह्या आकाशाला एकदाची गवसणी घालता येईल; परंतु गुरुहृदयाचा थांग लागणे कठीण. याच प्रकारचा दुसरा एक प्रसंग पहा. पहिल्या अध्यायात रणक्षेत्रात आल्यावर कौरवसैन्याकडे पाहून अर्जुनाने 'देख देख । हे गोत्रगुरु अशेष' (१.७७) असे उद्‌गर काढले. त्यावेळी श्रीकृष्णास विस्मय वाटला, परंतु तो काहीच बोलला नाही. गुरुहृदयातील गंभीरपणाच ह्याला कारण नव्हे काय ?

हृदयाच्या या प्रकारच्या विशालतेस अनुसरून शिष्याच्या आवडीनिवडी, इच्छा आकांक्षा पूर्ण करण्याचे व्रत ह्या गुरुमाउलीने अंगिकारलेले आढळते.

स्नेहालागि माये । म्हणिपे तें कीरु होये ।
परि कृपा ते मूर्त आहे । इये द्रोणीं ॥ २.४२ ॥

गुरूच्या रूपाने कृपा मूर्त स्वरूपात समोर उभी ठाकणे म्हणजे गुरूच्या अंगप्रत्यंगातून कृपेचा अविरत ओघ सुरू असणेच होय.

गुरु हा 'कारुण्याची आदि' असल्याने दयारसाचा तो अधिष्ठात्रा असतो. तो 'सकळ गुणांचा निधि' असतो. सर्वगुणसंपन्न अशा रीतीचे त्याचे व्यक्तिमत्त्व असते. 'निरवधी विद्यासिंधु'त्व हे तर त्याचे प्रमुख वैशिष्टयच ! (२.४३)

शिष्याची कोणत्याही प्रकारची शंका नाहीशी करण्याकरिता तो सदोदित अग्रेसर असतो. दुसऱ्या अध्यायात महामोहाच्या काळसर्पाने अर्जुनाला ग्रासलेले दिसताच श्रीकृष्णरुपी हरिगारुडी तत्काल धावून आला किंवा ग्रीष्मकाळात डोंगराला वणवा लागावा तशी स्थिती अर्जुनाची होताच कृष्णरूपी मेघ तेथे येऊन पोचला अशा तऱ्हेचे वर्णन केले आहे. (२.६९–७७) गुरु हा नेहमी शिष्याला कोणत्याही प्रकारे संदेहात न ठेवणारा असावा. भ्रांतीची कल्पना जाणवताच ती निरसण्याच्या दृष्टीने त्याने आवश्यक ती उपाययोजना करणे हे त्याच्या गुरुत्वास पोषक असेच ठरावे.

गुरूने सांगितलेले ज्ञान एकाग्र चित्ताने ऐकणारा शिष्य मिळाल्यास गुरूला अपार आनंदाचे भरते येते व तो ज्ञानदानकार्यास प्रोत्साहित होत असतो. म्हणूनच अर्जुनाने अनेक प्रश्न विचारूनही श्रीकृष्ण 'अर्जुना तुं परियससी । परियसैंनियां अनुष्ठिसि । तरि आह्मांसि वाणि काइसी । सांघैं बापा ।।' (५.६८) असे म्हटल्याखेरीज राहत नाही.

गुरुप्रमाणेच ज्ञानेश्वरीतून आदर्श शिष्यत्वाच्याही कल्पना स्पष्ट झाल्या आहेत. श्रीकृष्ण अर्जुनास अत्यंत गुह्य स्वरूपाचे ज्ञान देण्यास तयार आहेत. या प्रसंगावर भाष्य करताना ज्ञानेश्वर ज्ञानेच्छू शिष्याची पात्रता विशद करतात—

एयालागि सुमनु आणि शुद्धमति ।
जो अनिंदकु आणि अनन्यगति ।
पैं गौप्य परि तेयाप्रति । चावळिजे ॥ ९.४० ॥

शिष्य निर्मळ अंतःकरणाचा, शुद्ध बुद्धीचा, निंदानालस्ती न करणारा व एकनिष्ठ असल्यास त्यास मनातील गुप्त गोष्टीही सांगावयास हरकत नसते. अशा वेळी श्रोत्यांच्या चित्ताची अवस्था कोणत्या प्रकारची असावी, हे निवृत्तिनाथांना ज्ञानदेवांच्या अंतःकरणात ज्ञानबीज पेरण्याची प्रेरणा कशी झाली ह्यासंबंधीच्या ज्ञानेश्वरांनी केलेल्या वर्णनावरून कळून येते.

जें सात्विकाचेनि वडपें । गेलें आध्यात्मिक खरपें ।
साहार्जे निरोळले वापे । चतुरचित्ताचे ॥
वरि अवधानाचा वापसा । लाधला सोनेआं ऐसा ।
म्हणौनि पेरावेआ धिवसा । निवृत्तिसी ॥
६.४८७ – ८८ ॥

ज्ञानबीज पेरण्याकरिता सत्वगुणांची वृष्टी होऊन व आध्यात्मिक तापांचे गुंतडे वाहून जाऊन चतुर श्रोत्यांच्या चित्ताचे वाफे तयार झालेले पाहून व त्यांवर सुवर्णाप्रमाणे अवधानाची वाफसा तयार झाल्याने निवृत्तींनाही ज्ञानबीजारोपण करण्याची उत्कंठा वाटली. ज्ञानग्रहणार्थ शिष्याच्या मनाची तयारी झाली असली तरी तेवढ्याने काम भागण्यासारखे नाही. शिष्याची चित्तवृत्ती ज्ञानग्रहणसमयी अत्यंत हळुवार असावी लागते. शरद ऋतूतील पौर्णिमेच्या चांदण्याचे कोवळे कोवळे अमृतकण चकोर पक्ष्यांची पिले जितक्या हळुवारपणे प्राशन करतात तीच मृदुल वृत्ती येथे असावी (१.५६ – ५७); परंतु ज्ञानामृतसेवनाचीही विशिष्ट पद्धती आहे. ती कोणती तर —

हें शब्देंविण संवादिजे। इंद्रियां नेणतां भोगिजे।
बोलाआधीं झोंबिजे। प्रमेयासि ॥१.५८॥

शब्दांचा उपयोग न करता त्याचा विचार करावा, इंद्रियांना न कळत त्याचा अनुभव घ्यावा व प्रतिपादक शब्दांच्या अगोदर ह्यातील रहस्याचे आकलन करावे. ह्या बाबतीत श्री. रा. श्री. जोगांचे मत लक्षणीय आहे. ते म्हणतात, "सौंदर्याचा आस्वाद अत्यंत हळुवारपणे आणि दुरूनही घेता येतो किंवा घ्यावयाचा असतो. ही तद्विषयक अभिरुची उच्च दर्जाची होय, हे सर्वांनाच मान्य करावे लागेल. हिला धरूनच ज्ञानेश्वरांनी आपले लेखन केले आहे." (मराठी वाङ्मयाभिरुचीचे विहंगमावलोकन, पृ. ६७)

गुरूकडून शिष्यावर अनंत उपकार होत असतात. त्यांची परतफेड शिष्याने कृतघ्नतेने करू नये. अर्जुनाचे बोल ह्यासंबंधी लक्षात घेण्यासारखे आहेत.

जेथिचिया कृपा लाभे वरु। तेथ चि मनें व्यभिचारु।
तरि काइ मी भस्मासुरु। अर्जुनु म्हणे ॥ २.३८॥

भस्मासुराचे असे अनेक अवतार निर्माण होऊ नयेत.

शिष्याने ज्ञानार्जनाकरिता आसुसलेले असावे. ज्ञानात परिपूर्णता लाभावी म्हणून गुरूस कोणताही प्रश्न विचारताना लाज मनात धरू नये. निर्भीडपणे प्रश्न विचारावेत.

...सर्वज्ञ श्रीगुरु।
भेटलेयां आत्मनिर्द्धारु।
न पुसे जैसा भारु। धरुनियां।
तैं आपण चि वंचे.. ॥ १८.१३२६–२७॥

गुरूला प्रश्न विचारण्यात संकोच बाळगल्यास स्वतःच आपल्या लाभास दवडण्यासारखे आहे; परंतु प्रश्न विचारण्याचीही विशिष्ट रीत आहे. अर्जुनाची प्रश्न विचारण्याची शैली पहा—

कैसी पूसती पां हे जाणिव। भीडेची तरि लंघों नेदी सींव।
यन्हवि कृष्णहृदयासि खेंव। देऊं सरलें ॥७.१९८॥

मर्यादेचे उल्लंघन न करता तो श्रीकृष्णाच्या अंतःकरणाचा आपल्या प्रश्नाद्वारे ठाव घेत असे. गुरूची मर्यादा शिष्याला विनयानेच राखता येते विनयशीलता प्रत्येक शिष्यात असावयास हवी. गुरूशी सलगीचे बोल बोलल्याची कारणमीमांसा ज्ञानेश्वरांसारख्या प्रज्ञावंतांनाही करण्याची आवश्यकता भासली—

ह्मणौनि मज लेकुरुवाचेनि बोलें।
तुमचें कृपाळुपणे निदैलें।
चेइलें हे जी जाणवलें। एयालागि बोलिलां ॥ ९.१९॥

हा विनय कशाकरिता ? एकाच आशेने—

परि ऐसा ही मज धिवसा।
तो पुढुतीं एया चि एकी आशा।
जें धीटींव करूनि भवादृशां। पढियंतेयां होआवे ॥९.२३॥

गुरुप्रिय व्हावे याच मनीषेने या तऱ्हेचे आचरण आवश्यक असते. शिष्याने मिळविलेल्या ज्ञानाचे आविष्करणही गुरूच्या प्रत्यक्ष साक्षीने होणे चांगले. त्यामुळे त्या ज्ञानास पुष्टता लाभेल. ज्ञानेश्वरांनी गुरूकडून लावल्या गेलेल्या सारस्वत–वृक्षाची वाढ त्यांच्याच अवधानामृताच्या सिंचनाने व्हावी अशी मागणी केली आहे (११.१९). ह्याची फलनिष्पत्तीही ठरलेलीच आहे.

मग हें रसभावफुलीं फुलैल।
नाना फळभारे भरैल।
तुमचेनि प्रसादें होइल। उपयोगु जगा ॥११.२०॥

ह्या ज्ञानात विश्वाचे कल्याण करण्याचे सामर्थ्य आहे.

शिष्याने ह्याबरोबरच गुरूजवळून प्राप्त केलेल्या विद्येचे प्रकटीकरण कुठेही अयोग्य ठिकाणी करू नये. तसे केल्यास 'कां विद्या गुरूपदिष्टा। वोंबाइलेयां चौहटां। तरि इष्टदा चि अनिष्टा। हेतु होंति ॥' (१६.२१७) याप्रमाणे हानि सोसावी लागते.

नेहमी गुरूच्या आज्ञेचे पालन करण्याकडे शिष्याची प्रवृत्ती असावी.

नातरि श्रीगुरूवचना। दीठि देंतु जतना।
शिष्यु आत्मभवना –। माझि पैसे ॥१६.४५४॥

आत्मप्राप्तीचा हा निर्वेध स्वरूपाचा मार्ग आहे. म्हणूनच ज्ञानेश्वर बुद्धीच्या मलक्षालनार्थ गुरूच्या मार्गदर्शनाची आवश्यकता प्रतिपादतात. गुरूने दाखविलेल्या मार्गाचे अनुसरण केल्याने 'विवेकतीर्थतटा'ची प्राप्ती होऊन बुद्धीचा मळ धुऊन निघतो (१८.१००५).

पुष्कळदा कर्माहंकारामुळे गुरुविषयी अनास्था बळावते व शिष्यास विवेकहीनतेची बाधा जडते. कालज्वराने व्याप्त झालेल्या मनुष्यास ज्याप्रमाणे औषध लागू पडत नाही, त्याप्रमाणे मनात अभिमान उत्पन्न झाल्यावर शिष्य बाप व गुरूला जुमानीत नाही (१८.६०१). म्हणून शिष्याने केव्हाही स्वकर्माविषयी अभिमान बाळगू नये आणि गुरुभक्तीचा तिरस्कार करू नये. गुरुभक्तीचा तिरस्कार करणाऱ्यास अत्यंत हीन म्हणून ज्ञानेश्वरांनी लेखिले आहे. 'तेयाचें नांव घेणें। तें वाचेसि शूद्रान्न होणें।' (१३.६७२) या शब्दात त्यांनी त्याची अवहेलना केली आहे. त्याचबरोबर गुरूभक्ताची स्तुतीही करावयास ते विसरले नाहीत. गुरूभक्ताचे नाव घेण्याने गुरूची निंदा करणाऱ्याचे नाव घेतल्यामुळे वाचेस जे पातक लागते तेसुद्धा धुवून निघते. (१३.६७४)

श्रीगुरूची ध्यानोपासना कोणत्या पद्धतीने व्हावी ते पहा–

आतां हृदय हें आपुलें। चौफळीनि भलें।
वरि बैसउं पाउलें। श्रीगुरुचीं ॥१५.१॥

अंतःकरणात शुचिता बाणून त्यावर सद्गुरूच्या पादुकांची स्थापना करणे ही शिष्याच्या सद्गुरुमूर्तीच्या ध्यानोपासनेची प्रथम पायरी होय. यानंतर तो आपल्या भावनेने आपणच पूजासाहित्य बनत असतो.

हृदयशुद्धीचां आवारीं।
आराध्य तें घूर करी।
मग सर्वभावेंसि परिवारी।
आपण होए ॥१३.३८५॥

याप्रमाणे गुरूची भक्ति ही स्वतःकडून अनन्यभावाने व्हावी. एवढेच नव्हे तर मृत्यूनंतरही गुरुसेवा घडावी अशी शिष्याची धारणा असणे, हे त्याच्या असीम निष्ठेचे निदर्शक आहे (१३.४२९).

ह्याप्रमाणे ज्ञानेश्वरीत आदर्श गुरु व आदर्श शिष्याची लक्षणे सांगितली गेली आहेतच; परंतु त्याबरोबरच गुरु व शिष्य ह्यांचे संबंध कसे असावेत यासंबंधीही स्पष्टपणे दिग्दर्शन केलेले आहे.

गुरुशिष्यातील संबंध हा माता व पुत्राच्या संबंधासारखा असल्याचे ठिकठिकाणी सूचित झाले आहे. अर्जुन श्रीकृष्णास 'तूं संवसारश्रांताची साउली। अनाथांची माउली। आमतें किर प्रसवली। तूझी चि कृपा॥' (४.३२) ह्याप्रमाणे गुरु हा अनाथ जीवांचा प्रतिपाळ करणारा व त्यांना योग्य घडण देणारा असल्याचे बोलून जातो. गुरु हा प्रसंगविशेषी रागावतोही; परंतु तो कसा? – 'जैसें मातेचां कोपीं थोकलें। स्नेह आथि ॥' (२.८८) या रागावण्यातही आईची ममता साठवलेली असते. अशा गुरुजवळ शिष्याला संकोच बाळगण्याचे कारण नसते. म्हणूनच अर्जुनाला 'एथ भीड कवणाची धरूं। तूं माये आमची' (३.२१) असे म्हणावयास फावते.

गुरूलाही शिष्याविषयी पराकाष्ठेचा जिव्हाळा वाटत असल्याने शिष्याला ज्ञानग्रहण करणे सोयीचे जावे ह्या उद्देशाने 'बाळकांते वोरसें। माये जेवऊं बैसे। तेव्हंळि तेया ठाकति तैसें। घांस करी ॥' (१८.१६७६) ह्या न्यायाने क्रमाक्रमाने पचेल अशा सुलभतापूर्ण मार्गाचा अंगिकार करावा लागत असतो. शिष्याचे हृद्गत ओळखण्याची कला तर गुरुच्या ठिकाणी अंगीभूत असते. स्तनपान करून दूर खेळत असलेल्या बाळाला भूक लागली आहे हे आईला चटकन कळते. गुरुसुद्धा शिष्याच्या ठिकाणची ज्ञानलालसाप्रवृत्ती हेरू शकतो व तदनूरूप उपदेश देतो. (८.१२) शिष्य 'गुरुतें पक्षिणी करी। चारा चारी चांचुवेन्हीं। गुरुतारुं कास धरी। आपण जळीं' (१३.४००) ह्या रीतीने वर्ततो. ज्ञानप्राप्तीकरिता तो हपापलेला असतो व संधी मिळाली की त्याचा फायदा तो लगेच घेतल्याशिवाय राहत नाही. ह्यातच गुरूलाही असीम समाधान मिळत असते.

देखा बोलाचिया धणी धाइजे ।
कां शिष्याचेनि जालेपणें होइजे ।
हें सद्‌गुरु चि एकलेनि जाणिजे ।
कां प्रसवतिया ॥ ८.५४॥

शिष्याच्या कृतार्थतेने आपण कृतार्थ व्हावे ही गुरूचीही अभिलाषा असतेच.

गुरुशिष्यातील संबंध पितापुत्राप्रमाणे असावेत असे दर्शविणारी स्थळेही बरीच आडळतात. गुरुशिष्यांचे संबंध सलगीचे असावेत. अंगी योग्यता नसतानाही मुलगा वडिलांशी सलगीचे वर्तन ठेऊ शकतो. तेथे वडील – लहान असा भेदभाव आडवा येत नाही. (११.५६५) शिष्याने आपल्या गुणांनी गुरूवरही मात करावी हे गुरूच्या दृष्टीने प्रशंसनीय असेच म्हणता येईल.

आणि पुत्रें मी सर्वगुणि ।
जीणावा हे बापु श्रियाणी ।
करी तैंसा सारंगपाणी ।
फळा आला ॥१८.१६३१॥

मुलगा 'बापसे बेटा सवाई' ह्या उक्तीनुसार प्रगतिशील असावा असे कुणाही पित्याला वाटणारच. गुरूचीही शिष्याच्या प्रगतीसंबंधी हीच भूमिका असावी.

गुरूची वागणूक प्रसंगविशेषी बंधूप्रमाणेही असावी लागते. अर्जुनाने श्रीकृष्णास 'तूं गुरु बंधु पिता । तूं आमची इष्टदेवता । तूं चि सदा रक्षिता । आपदीं आमतें' (२.५९) असे म्हटले आहे व अशा सद्‌गुरु श्रीकृष्णाने द्रौपदी–वस्त्रहरण प्रसंगी द्रौपदीस बंधूच्या नात्याने साहाय्यही केलेच.

शिष्याच्या दृष्टीने गुरु हा क्षेत्र व देवतेप्रमाणेही संबोधिल्या गेला आहे. (१३.४४४) ज्ञानेश्वरीत अर्जुनाकरवी श्रीकृष्णास उद्देशून वापरली गेलेली ही संबोधने शिष्याचे अंतरंग शुचिर्भुत बनण्याच्या दृष्टीने गुरूकडून केले जाणारे कर्तव्यच ध्वनित करतात असे म्हणावयास पाहिजे.

गुरूविषयीचा आदरभाव शिष्याकडून सख्यभक्तीतूनही दर्शविता येतो. अर्जुनाविषयी अभिप्राय व्यक्त करताना ज्ञानेश्वरांनी 'हो काज आत्मनिवेदनातळिची । जे पीठिका आहे सख्याची । पार्थु अधिष्ठात्री तेथिची । मातृका गा '(६.१२७). ह्या स्वरूपात त्याची श्रीकृष्णाविषयीची सख्यत्वाची भावना विशद केली आहे. गुरूच्या स्नेहपूर्ण वागणुकीमुळे शिष्याच्या हृदयातील आदरभाव द्विगुणितच होत असतो.

गुरुशिष्य संबंधात शिष्याच्या हृदयात गुरूला असलेले स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. ह्या बाबतीत शिष्याची दृष्टी कशी असावी हयासंबंधी ज्ञानेश्वरीतील उल्लेख पहा –

गुरुगृह जिये देशीं । तो देशु चि आहे मानसिं ।
विरहिणी जैसी । वल्लभातें ॥ १३.३७४ ॥

विरहिणीच्या अंतःकरणात ज्याप्रमाणे प्रियकराची प्रतिमा विराजमान असते तद्वतच गुरुगृहाचे वास्तव्य असणारा प्रदेश सर्वदा शिष्याच्या मनश्चक्षूसमोर असतो. गुरुसंबंधीची अनन्यनिष्ठा हया प्रकारची असावी. गुरूची स्मृती शिष्याच्या मनात तरळत असावी. तेथील वातावरणाचा ठसा हृत्पटलावर कायमचा उमटावा व त्या वातावरणातील प्रसन्नतेचा सुगंध अंतःकरणात सदोदित दरवळावा. शिष्याची हीच अवस्था 'नाना वेंटाळूनु जीवितें । गुणावगुण उखिते । प्राणनाथा उचिते । दीन्हलें प्रिया ॥ तैसें सबाहय आपुले । जेणें गुरुभक्ती दीधलें । आपण पैं केलें । भक्तीचें घर' (१३.३७२ - ७३) अशा रीतीने गुरुसेवा तन्मयतेने घडण्यास कारणीभूत होत असते.

शिष्याच्या हया प्रकारच्या अत्युत्कट गुरुसेवेने संतुष्ट होऊन पुष्कळदा गुरु स्वतःच शिष्याच्या अधीन बनतात. याचे स्पष्टीकरण ज्ञानेश्वरांनी – पत्नीच्या परिभाषेत पुढीलप्रमाणे केले आहे –

परि पांचा हि आंतु अर्जुना ।
कृष्णु सवियां चि जाला अधीना ॥
कामिकु जैसा अंगना । आपैता कीजे ॥ ११.१६९ ॥

श्रीकृष्ण पाच पांडवातून अर्जुनाच्याच अधीन पूर्णपणे झाला होता हयाचे कारण हेच.

गुरुशिष्यातील संबंध दर्शविताना काही ठिकाणी ज्ञानेश्वरांनी उपयोगिलेले प्रियकर–प्रेयसी, पति–पत्नी हयासंबंधीचे दृष्टांत आधारास घेऊन डॉ. प्र. न. जोशी हयांनी म्हटले आहे की, "गुरुशिष्याचे नाते त्याप्रमाणे प्रियकर–प्रेयसी, पति–पत्नी यांच्या परिभाषेत ज्ञानेश्वरांना सांगावे लागले याचा अर्थच असा की या मीलनाची प्रतीती बरोबर येण्यास दुसरी भाषा त्यांच्याजवळ नव्हती." (मराठी साहित्यातील मधुराभक्ती, पृ. २२६)

हे त्यांचे कथन मर्यादित स्वरूपातच सत्य मानता येईल. माता, पिता, बंधू, सखा इत्यादी नात्यांनी गुरूची वैशिष्टये दर्शविणारी ज्ञानेश्वरीतील नानाविध स्थळे पाहिली म्हणजे हे म्हणणे कितपत योग्य आहे याची कल्पना येऊ शकेल.

गुरुकृपास्नेहाचे जीवन शिष्याला नेहमीच हवे असते कारण त्यातूनच त्याचे व्यक्तित्व आकारास येत असते.

गुरुस्नेहसलीलीं । आपण होयें मासळी ।
कोण्ही एकी वेळीं । हें चि भावी ।।१३.३९७।।

ही वृत्ती ह्याच कारणाने शिष्याच्या अंगी बाणली जाणें इष्ट असते. गुरु व शिष्यातील ह्या स्नेहबंधानुसारच त्यांचे आचरणही व्हावयास लागते आणि तदनुसार परस्परांच्या अंतःकरणाचे तादात्म्य अनुभवावयास येते. यातून पुढे –

दों होंटिं एक बोलणें । दोंहि चरणिं एक चालणें ।
तैसें पुसणें सांघणें । तूझें माझें ।।१५.४२१।।

ही प्रतीती येऊ लागते. या प्रकारचे तादात्म्य अनुभवावयास येऊनही गुरु व शिष्य हा भेद प्रत्यक्षात शिल्लकच राहतो. ह्याचे कारणही पुढील प्रकारे आढळून येते –

पैं शून्य जें दावावें जालें । तैं बिंदुलें एक केलें ।
तैसें अद्वैत दावावें बोलें । द्वैत चि कीजे ।।१३.८८३।।

अद्वैताचे स्पष्टीकरण देताना द्वैताची भाषा वापरावीच लागते. ह्यातूनच अद्वैताकडे जाण्याचा मार्ग सुलभ होत असतो. म्हणून हा व्यावहारिक दृष्टिकोण स्वीकारावाच लागतो.

॥ ॥ ॥



घनु वाजे घुणघुणा

यशवंत पाठक

ज्ञानेश्वरांच्या सप्तजन्मशताब्दीनिमित्ताचे निमित्त काढून ज्ञानदेवांचा गाथा वाचीत असता अचानक थांबलो. झटकन् मन कुठेतरी गगनाला भिडू पहात होते. अचानक जाणवले. . .आकाश आषाढबनातून भरतंय्. . .ग्रीष्मानं तापलेल्या रानातून वारा सैरभैर होऊन नाचतोय्. . . समजल धारांचे तुषार पानावर झेलण्यासाठी झाडे आतुरली आहेत. . .पृथ्वीच्या आभिषेक-पात्रातून सहस्र-धारांचा अभिषेक श्रुतिस्मृतिपुराणोक्त थाटात चालला आहे. . .कुठेतरी आसरा मिळेल या भावड्या आशेने पांखरे थरकांपत उडताहेत. अन् अशा कमालीच्या कातरवेळी ज्ञानदेवांची अंतस्थ विरहिणी व्याकुळतेने साजणींना विनविते आहे–

घनु वाजे घुणघुणा । वारा वाहे रुणझुणा ।
भवतारकु हा कान्हा । वेगी भेटवा कां ।।

आता थोडचा वेळात काळं–सावळं आकाश जल-धारांच्या भुजा पसरून जमिनीच्या अणुरेणूत असीम तृप्तीच्या पोटी नवनवोन्मेषांचा गर्भ तरारेल. पांखरांच्या कातरलेल्या घरटचातून किंचित् चिवचिवाट ऐकू येईल.

ज्ञानदेवांच्या गाथ्यातील विराण्या वाचीत असताना अशा प्रकारचे चित्र डोळचापुढे उभे राहते. ज्ञानदेवांच्या ' विराण्या ' हा एक स्वतंत्र प्रातिभ चिंतनाचा विषय आहे. ' वापरखुमादेवीवरू 'ची आळवणी अत्यंत वत्सल कळवळचाने करणारे ज्ञानेश विराणीत मधुरा भक्तीचे श्रेष्ठ उपासक वाटतात. राधाभावाची पूर्ण जाणीव विराण्यात आढळते. पितृपरंपरेने मनात रुजलेली विठ्ठलभक्ति यात प्रासादिकतेने स्रवू लागते आणि विठ्ठलाचा झालेला विरह शृंगारी भाषेत प्रकट होतो. हा एक मोठाच चमत्कार मानला पाहिजे. ' तो वल्लभा मी कांत ।ऐसा पढिये ' अशा प्रकारच्या प्रेमाचा परमोत्कर्ष मधुराभक्तीत असतो.

ज्ञानेश्वरांनी तेराव्या अध्यायात ' आचार्योपासनम् ' या शब्दावर अत्यंत वहारीचे भाष्य केले आहे. गुरूस भेटण्याची उत्कंठा भक्तास कशी असते, त्यास साधकावस्थेत विरह कसा होतो हे दर्शविण्यासाठी त्यांनी घेतलेले विरहिणीचे उदाहरण अत्यंत मार्मिक आहे.

गुरुगृह जये देशीं । ते देशचि वसे मानसीं ।
विरहिणी कां जैशी । वल्लभातें ।। (१३.३७५)

याचा अर्थ असा की उदात्त प्रेमाची प्रचीती येण्यास दुसरी भाषाच त्यांच्याजवळ नव्हती. विराणी म्हणजे विरहिणी. ईश्वराच्या भेटीस आतुरलेली, भावविव्हल झालेली परंतु ईश्वर काही दर्शन देत नाही म्हणून वाट पहात विरहाने जगणारी ती विरहिणी किंवा विराणी होय. कविवर्य अनिल ' विराणी 'ची व्युत्पत्ति ' वैराण ' (Waist land) पासून सुचवितात. जीवनातील वैराणता विरहापेक्षाही विराणीला अधिक जवळची वाटते. रखरखीतपणाच्या वाटेवर जीवन चालले असल्याचे ' विराणी ' सुचविते. त्यामुळे ' वैराण ' शब्दापासून ' विराणी ' शब्द आला असावा. ' चेतोवृत्तिरुपेत्य तिष्ठति सदा सा भक्तिरित्युच्यते ' या आद्य शंकराचार्यांनी वर्णिलेल्या भक्तीच्या स्वरूपाप्रमाणे विराणीचे स्वरूप असते. ईश्वर व भक्त यात प्रियकार–प्रेयसीचे नाते मानून विशुद्ध प्रेमाचे समर्पण अनन्यभावाने देवास करणे हे विराणीचे काम होय. विराणी आपली संपूर्ण चित्तवृत्ती भगवंताच्या चरणकमलांवर वाहून टाकते. दर्शन न घडल्याने संसारात तिला कोणत्याही विषयात रस नसतो. उलट सुखाचे विषयही यावेळी दुःखरूप होतात. मी विरहिणी असून दूरदेशी पडल्याने देवाची आठवण होऊन माझ्या जीवाला त्याच्या वियोगाने भारी कष्ट होत आहेत. दिवस रात्रीसारखा होऊन हा वियोग नकोसा झालाय् असे मला झाले आहे. आणि तो मात्र मला ' अवस्था ' लावून परत का बरे येत नाही ? अशा त्या ईश्वराचा विरह इतका असह्य होतो आहे की–

अनुक्रमणिका

'चांद वो चांदणे चांपे वो चंदन
देवकीनंदनेविण नावडे वो'

फार काय, पण—!

'दर्पणी पाहता रूप। न दिसे वो आपुले'

अशी विलक्षण अवस्था निर्माण झाली

प्रत्येक साधकाच्या जीवनात येणाऱ्या आत्मज्ञानाच्या पहाटेपूर्वीचा काळोख म्हणजे विराणी. परंतु एवढ्यावरच थांबत नाही. त्यावेळी मनाचा कोंडमारा होऊन ती अत्यंत काकुळतीस येते व अगतिकपणे देवाची करुणा भाकते. ह्या उत्कट तळमळीचे प्रतिबिंब ज्ञानदेवांच्या विराण्यात आढळते. कृष्णाची व विठ्ठलाची भक्ती या प्रकारच्या अभंगवाङमयात ज्ञानदेवांनी वर्णिली आहे. विराण्यात ज्ञानेशांनी कृष्णभक्ति विस्ताराने गायिली. त्यामध्ये गोपींची विरहावस्था, त्यांच्या मनाची तगमग, श्रीकृष्णदर्शनाची उत्कंठा इ. सर्व सूक्ष्म भावना टिपल्या आहेत. काव्यदृष्टि, कोमलता, भक्तीचे माधुर्य व प्रेमाचा सगुण आविष्कार यांचा भव्य मिलाफ यात आहे.

'प्रेमैव गोपरामाणं काम इत्यगमत् प्रथाम्' या प्रमुख सूत्रान्वये गोपींच्या विशुद्ध प्रेमासच 'काम' अशी संज्ञा देण्याची प्रथा आहे. गोपींचे प्रेम अतीन्द्रियापलीकडील आहे. श्रीकृष्णाच्या सुखात त्या प्रेमास सुख वाटते यास 'राग' अशी संज्ञा देण्यात येते. स्तंभ, कंप, स्वेद, अश्रु, स्वरभंग, त्रैवर्ण्य, पुलक व प्रलय या अष्टसात्विक भावांना रागात्मिका भक्तीत महत्त्व आहे. ईश्वरी प्रेमात मत्त झालेल्या भक्तास हे सर्व भाव अनुभवावे लागतात. याच प्रेमाच्या पूर्वराग, वियोग व मीलन अशा तीन अवस्था सांगतात. परमेश्वराचा साक्षात्कार झालेला नाही, रात्रंदिवस प्रियाचेच ध्यान लागले आहे.

'तुजवीण वेल्हाळा कैं सुख सोहळा।
रखुमादेवीवरा विठ्ठल सेजे न लगे डोळा॥'

असे म्हणणारे ज्ञानेश्वर पूर्वरागात आहेत. यानंतर विरहाची स्वतंत्र व सर्वोत्तम अशी अवस्था प्राप्त होते. श्रीकृष्णाच्या वेधाने वेडावलेल्या एका विरहिणीचे हे चित्र पहा—

निळियेच्या निशीं विरहिणी पिशी।
शेजवाजे कैशी आरळ शेजे॥
कृष्णसंगे बाळी विव्हळ झाली निळी।
चंदन अंगी पोळी विरहज्वरे॥
ज्ञानदेव प्रेम निळारूप रूपसें सोहळा।
कृष्णवेधें वेधली बाळा भली असे॥

या विरहस्थितीचे किती काव्यात्म वर्णन केले आहे! निळ्या रंगाचे कृष्णाशी असलेले आकाशाएवढे विराट व निळ्या रंगाइतके भावगर्भ नाते ज्ञानेश नुसते 'निळे'पणात त्या रंगाच्या गोडव्यासह सूचित करतात.

वर्तमानविरह, भूतविरह व भावीविरह असे विरहाचे प्रकार शास्त्रकार सांगतात. चिंता, जागरण, उद्वेग, कृशता, मलिनांगता, प्रलाप, व्याधिवेदना, उन्माद, मोह व मृत्यु या आचार्यांनी वर्णिलेल्या विरहाच्या दहा दशा विराणीत दिसतात. विरहातील प्रत्येक छटा न छटा ज्ञानेशांनी अशा काही नाजुक भावुकतेने मांडली आहे की विरहाची पूर्ण माहिती झाल्यानंतर संसारातील आपल्या उथळ विरहाची सहज जाणीव होते. अर्थात् या विरही अवस्थेत जरी मनाची तगमग होत असली तरी एक प्रकारचे सुख भक्तास वाटत असते. साक्षात्काराची नांदी म्हणजे विराणी! भक्ताच्या सहृदय भावनेचा तो मूर्त आविष्कार असतो. रासपंचाध्यायीतील 'गोपीविलाप' अथवा वल्लभाचार्यांच्या 'मधुराधिपतेरखिलं मधुरम्' या दोनही भावकाव्यांची सुमधुर स्मृती ज्ञानेशांची विराणी देते आणि परमेश्वररतीच्या विविध छटांचाही आढळ मुबलक होतो.

यातून विरहिणीला आशेचा सूर गवसतो. त्या सुरांच्या मागोमाग 'त्याच्या' पावलांची चाहूलही लागते. तो येत असल्याची पलीकडच्या झाडावरील कावळा सूचना देतो. कावळा 'काऊ' शब्दाने किती कोमल केला!

पैल तो गे काऊ कोकताहे।
शकुन गे माये सांगताहे॥

काऊ हा मृदु असून कोकताहे कर्कश आहे. ज्ञानेशांच्या या नादप्रतिमेमध्ये विरोध लयीचा वापर उत्कृष्ट योजिला आहे. काऊच्या प्रतिमेतून निरोप सांगणारी दूती मोठी स्नेहाळ आहे. मनाचे सारे स्निग्धपण तिच्यात सामावले आहे. 'आता तो दूर नाही' असे ओरडून आश्वासन 'कोकताहे' या शब्दातून सूचित केलेले स्पष्ट व इष्ट आहे. त्या हव्याहव्याशा वाटणाऱ्या दैवी पाहुण्याचे आगमन काऊने सांगितल्याबद्दल त्याचे लाड पुरवावयास नकोत काय? हा पाहुणचारही इतका

नैसर्गिक आहे की आपणही काऊबरोबर सहज उडत जातो किंवा काऊ कोकून कानात कुजबुजतोय असा भास होतो. या काऊचा 'ध्वनि' विराणीला अमृतमयी व लावण्यमयी वाटतो म्हणूनच ती त्याच्या चोचीत आंब्याची रसाळ फळ देत नाही ना? यातील आर्तता व भावातुरता इतकी बेमालूम आहे की दिव्यतेच्या स्पर्शाशिवाय दुसरे काय भोगणार? जीवनातील नित्याच्या घडणाऱ्या शकुनांचा अर्थही ज्ञानेश्वरांनी इतक्या अपूर्वाईने लावला की वर्णनाला शब्द अपुरे पडावेत.

आजि शुभ लवे लोचनु ।
हरिखे सांगताहे शकुनु ।।

काऊचा शकुन खरा असला पाहिजे. कारण विराणीला पहाटे प्रियभेटीचे मधुस्वप्न पडले. अन् जाग येताच लोचन लवतो आहे. पाहण्यातला डोळसपणा एका लोचन शब्दाने सूचित होतो. जीवनात नित्य असणाऱ्या शकुनांचा अर्थही ज्ञानदेव किती संवेदनाशील मनाने अनुभव घेतात हे सहज ध्यानात येते.

ज्ञानदेवांच्या भावविश्वातील विराणी ही परब्रह्माच्या मीलनासाठी आसुसली आहे अन् आश्चर्य म्हणजे तो परमपुरुषहि या दिव्य विराणीचा विरहदाह शमविण्यासाठी उत्सुक झालेला आहे. ज्ञानदेवांच्या लेखी केवळ जीवतत्त्व विरही न बनता शिवतत्त्वही ओढीने विरही बनते. त्यांचा भगवान भक्ताच्या सहवाससुखाच्या सोहळ्याचा निष्ठावंत रसिक असतो. त्याच्याशी शब्देविण संवाद करतो, किंबहुना भक्ताला पाहण्यासाठी त्या अचक्षूला डोळे फुटतात. भक्ताला प्रीतीभराने कवेत घेण्यासाठी तो दोवरी भुजा धारण करतो. विराणीच्या श्रद्धेचा मोगरा फुलतो. इवलेसे रोप दिवसेंदिवस वाढते व गगनाच्या गहन मंडपाला व्यापते. फुले कितीही वेचली तरी कळयांचा बहर थांबणार आहे काय? या मोगऱ्याच्या फुलांच्या सुगंधी शेल्याने सजविलेले परब्रह्म अंतरी किती सुखावते हे 'बापरखुमादेवीवरे विठ्ठले अर्पिला' यातून प्रकट होते. भावाच्या गंधभोगी कोशात विराट् परमतत्व सामावून घेण्याची किमया फक्त 'विलक्षण' या एकाच शब्दाने सूचित करता येईल. ज्ञानेशांना 'माउली' का म्हणतात याचे एक कारण येथे असे दिसते की, माउली लेकराच्या प्रत्येक गोष्टीतील भाव स्वतः सहन करीत असते व कोकराप्रमाणे जगत असते. असा भाव ज्ञानेश्वर जगता जगता लेकराला आकाशाचे विराट् स्वरूप साध्या काऊच्या पंखांनी पलीकडच्या चिदानंदाच्या भेटीस नेऊन कधी आणतात कळत नाही. विराणीतही या माउलीचे माउलीपण सहजसिद्धीच्या पैलतटाचे आहे.

ज्ञानदेवांची विराणी इंद्रिय संवेदनांच्या द्वारे अतींद्रियाचे दर्शन घडविते. अरूपाला रूप देते व पार्थिवाच्या द्वारा अपार्थिव तत्त्वही अनुभूतीच्या कक्षेत बसविते. ऐंद्रिय संवेदनेच्या पातळीवर यात वाचक फारसा रेंगाळत नाही. विरहिणीचे भावविश्व प्रकटताना ऐंद्रिय मीलनाच्या प्रतिमा ते वापरतात. परंतु शेवटी त्या अभिव्यक्तीला 'परतत्त्वाचा स्पर्श' लीलया घडतो. जेव्हा प्रिय मीलनाशिवाय विराणीला काहीही नको असते तेव्हा दर्पणात तिला आपले रूप दिसत नाही. उलट आपल्याच रूपात 'ते' रूप दिसते. ध्येय, ध्याता, ध्यान यांच्या त्रिपुटीचा निरास घडल्याचे हे काव्यात्म सूचन विराणीच्या सर्व भावव्यापारांना साक्षात्काराच्या पातळीवर नेते, अन् हृदय हेलावते. इवल्याशा मनाने अनंताला मापण्याची आकांक्षा ज्ञानदेवांच्या भावसृष्टीत जिव्हाळ्याने अवतरते. ते परमतत्त्व आकाशरूपाने सहज जाणवते म्हणून आकाशाचे ज्ञानदेवांचे नाते अखंड जडलेले आहे. नभाचे निळेपण पाहून अरूप विराटाचा रूपवान् प्रत्यय येतो. मेघगर्जना झाली की भगवंत गंभीर वाणीने बोलू लागतो. मेघ बरसला की सारे काही झोकून त्या अपूर्व क्षेमात कोणी कोणाला कवटाळले आहे याचा निवाडा करणे कठीण होऊन बसते. विराणीतील प्रतिमांमधून अशा प्रकारच्या ज्ञानेशांच्या कविमनाच्या वेगवेगळ्या भावावस्था प्रकट होतात. विराणीतील प्रतिमातही विशिष्ट लय आहे. नैसर्गिक प्रतीकांच्या स्वाभाविक अर्थाचा मोहक पदन्यास आहे. घनुचे घुणघुणणे व वाऱ्याचे रुणझुणणे हे शब्दावरूनच त्यातील भाव पूर्णपणे साकार करते. निसर्गातील भावांना शब्दरूप देताना निसर्गच उभा राहतो. विराणीतील काही शब्द तर त्यांचे अर्थ सांगण्यापेक्षाही त्यांच्या गुणगुणण्यातच निर्भेळ आनंद देतात. शब्दांचे नाद ब्रह्माशी लावून विराणीत ज्ञानदेवांनी 'नादब्रह्म' उभे केले आहे. 'नाद जसा वाद्याच्या आश्रयाविना प्रत्ययाला येत नाही तसे चैतन्य रूपाच्या आश्रयाविना प्रत्ययास येत नाही.' म्हणूनच अनुभवांची असंख्य रूपे ज्ञानेश साकार करतात. 'ज्ञानदेवांचा प्रत्येक अनुभव एकाच

(पुढील मजकूर पृष्ठ ३४१ वर)

ज्ञानेश्वरांची सुखकल्पना

डॉ. गंगाधर मोरजे

संतांनी आपले जीवनसर्वस्व आपले स्वतःचे आणि इतरांची जीवनसमृद्धी साधण्यासाठी वेचले. पण बऱ्याच वेळा संतांनी लौकिक वा इहवादी जीवनाचा तिटकारा केला. वेळ प्रसंगी अधिक्षेप केला असेही जाणकार सांगतांना दिसतात. आजच्या भौतिकवादी जीवनपद्धतींत संतांची विचारसरणी कित्येकांस पोरकट, किंवा भावडी वाटते. सहजासहजी माणसाला प्राप्त न होऊ शकणाऱ्या सुखामागे माणसाने लागावे असे संत सांगतात असेही संतांबद्दल सांगण्यात येते. ज्ञानेश्वर, सातशे वर्षे होऊन गेली, त्यांच्या हाती कोणतीही राजकीय सत्ता नव्हती तरी लोक त्यांच्या विचारसरणीने भारावतात तेव्हा हे सर्व लोक अंधश्रद्धाळू भाबडे तरी आहेत असे म्हणावे लागते किंवा त्यांची (ज्ञानेश्वरांची) विचारधाराच इतकी प्रभावी आहे की आजही त्यांचे विचार स्वीकार्य ठरतात असे म्हणावे लागेल.

ज्ञानेश्वर आपला काव्यविषयक विचार मांडत असता काव्यातील 'परतत्त्वस्पर्शाला' श्रेष्ठत्व देतात, तसेच सुख विषयक विचार करीत असता "आत्मसुख" महत्वाचे मानतात. याचा अर्थ ते इतर सुखांचा विचार करीत नाहीत असे नाही. ज्ञानेश्वरांना सुख म्हणजे काय ते कसे प्राप्त होते या विषयी काय अभिप्रेत होते ते आपणास बघावयाचे आहे.

तरि अवधान एकलें देइजे ।
मग सर्वसुखासि पत्र घेईजे ।
हे प्रतिज्ञोत्तर माझे । उघड आइका ।।९–१

असे जेव्हा ज्ञानेश्वर म्हणतात तेव्हा केवळ आत्मसुख हे एकमेव सुख आहे असे त्यांना अभिप्रेत नाही. सर्वसुखात आत्मसुख एक आहे. या जीवनात अनेक प्रकारची सुखे आहेत. ती सर्व सुखे अनुभवण्याची पात्रता सुप्तपणे तुमच्यांत स्वभावतःच आहे – मी काय सांगतो त्याच्याकडे एकाग्रतेने लक्ष दिल्यास ती सुखे मिळाल्याचे प्रात्यक्षिक मी तुम्हाला दाखवीन अशी ज्ञानेश्वरांची प्रतिज्ञा आहे. थोडेसे विषयांतर करून आणखी एक गोष्ट स्पष्ट करावी लागेल. "सर्वसुखासि पात्र होईजे" असा पाठ काही ज्ञानेश्वरीच्या प्रतींत आहे – मला हा पाठ योग्य वाटत नाही. ज्ञानेश्वरांच्या चिद्‌विलास वा एकंदर आध्यात्मिक विचारसरणीचा विचार करतां हे विश्व आनंदस्वरूप, चैतन्यस्वरूप आहे. त्या आनंदाचा अनुभव घेण्यासाठी ज्ञानेश्वर वा अन्य कुणी कुणाला पात्र करणे विश्वाच्या आनंदस्वरूपाशी विरोधी आहे – पण तो आनंद अनुभवाला आणून देणे शक्य आहे – ज्ञानेश्वर सुप्त शक्ती आपल्या वाणीने जागृत करू अशा आत्मविश्वासाने बोलतात एवढेच. त्या संदर्भात श्रोत्यांचे अवधानही तितकेच महत्त्वाचे आहे. श्रोते व ज्ञानेश्वर या दोघांचाही त्या पातळीवर मिलाफ झाला तरच ज्ञानेश्वरांच्या प्रतिज्ञेला अर्थ आहे. थोडक्यांत ती दोनही हातांनी वाजणारी टाळी आहे –

ज्ञानेश्वरीच्या अखेरीस

किंबहुना सर्वसुखीं । पूर्ण होऊनि तिही लोकी ।
भजिजो आदि पुरुषी । अखंडीत ।।१८.१७४८

असे जेव्हा ते म्हणतात तेव्हाही त्याना सर्व सुखे अभिप्रेत आहेत. पण त्यांत त्यांना "आदि पुरुषाला अखंड भजणे" श्रेष्ठ सुख असल्याचे अभिप्रेत असलेले दिसते. तें सर्वांनी अनुभवावे असें त्यांना वाटते.

(पृष्ठ ३४० वरून)

वेळी रूपवान् आणि प्राणवान् असतो. केवळ शब्दांच्या द्वारा अरूप रूपाला आणण्याचे अन् अतींद्रिय इंद्रियांकरवी भोगविण्याचे हे असामान्य सामर्थ्य पाहिले की ज्ञानदेवांच्या प्रतिभेपुढे आपले मस्तक नम्र होते –' (रा. चिं. ढेरे.) याचे मर्म ज्ञानेश्वरांच्या विराण्यात उत्कटतेने येते व अतृप्त तृप्तीचा पुकारा आपल्या अंतर्मनात निनादत राहतो.

ज्ञानेश्वर केवळ 'आत्मसुख' 'आत्मानंद' असे न म्हणता 'सर्वसुखांसि सर्वसुखीं' असा सुखांचा अनेकवचनी उल्लेख करतात त्या अर्थी एका सुखाहून अनेक सुखे असतात हे त्यांना मान्य आहे याबद्दल शंका रहात नाही. या सुखांच्या निरनिराळ्या पातळ्या त्या सुखांच्या स्वरूपावरून ते ठरवितात कसे ते पुढे पाहू.

सुख म्हणजे तरी नेमके काय असते ? एखादा कोणी आपणास सुख झाले असे म्हणतो तेव्हा त्याला काय अभिप्रेत असते ? खरे म्हणजे जो तो हे आपल्या अनुभवाने जाणीत असतो. तसे पाहिले तर आपणास सुख झाले असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा आपली कोणतीच वासना अस्तित्वात नसते. सुख म्हणजे वासनेचा अभाव. पुढे आपणास असेही दिसून येते की आपणास वासना झाली म्हणजे आपले सुख नाहीसे होते. त्या वासनातृप्तीसाठी आपली धडपड सुरू होते. थोडक्यांत वासनेचा अभाव म्हणजे सुख. हा वासनेचा अभाव कधी वासनापूर्ती झाल्यामुळे होतो, कधी वासनेचा त्याग केल्यामुळे होतो, कधी वासनाच उत्पन्न न झाल्यामुळे होतो, कधी चित्ताची एकाग्रता झाल्यामुळे वासनाच लुप्त होते, त्यामुळे सुखप्राप्ती होते, तर कधी चित्ताचा लोप झाल्यामुळे वासनेचा अभाव होतो. नवव्या अध्यायांत पहिल्या ओवीत ज्ञानेश्वर सांगत असलेले 'सर्वसुख' श्रोत्याच्या चित्ताची एकाग्रता झाल्यामुळे, वासना लुप्त होण्याने लाभणारे सुख आहे हे जाणकारांच्या लक्षांत येईल; असो.

प्राणीमात्राला हा वासनेचा अभाव दोन स्थितीत जाणवतो. एक जागृती स्थितीतील वासना अभाव व दुसरा निद्रा स्थितीतील वासना अभाव. यातही जागृती स्थितीतील वासना अभाव अधिक महत्वाचा कारण या अवस्थेत सुख घेणारास आपण सुख घेतो याचे भान असते. निद्रावस्थेंत आपणास वासना अभावाचे सुख लाभते हे खरे पण अनुभव घेणारास आपण अनुभव घेतो याचे भान नसते म्हणून या अवस्थेतील सुखाला महत्व कमी. यावर असा आक्षेप येणे शक्य आहे की हे सर्वसुख अभावात्मक आहे. पण तेही म्हणणे खरे नाही कारण जागृत अवस्थेत वासनेचा अभाव उत्पन्न होतो त्याचवेळी भावात्मक असे कांही तरी निर्माण होते. उदा० श्रीखंडाचा आस्वाद म्हणजे चक्का, साखर, वेलदोडयाचा आस्वाद नसून अधिक काही असते. (मुलांचा खेळातील अनुभव.)

जागृती अवस्थेतील वासनेचा अभाव म्हणजे उच्च प्रकारचे सुख होय. माणसाला हे सुख तीन प्रकारांनी प्राप्त करून घेता येते, पुढीलप्रमाणे ते स्पष्ट करता येईल.

१) इंद्रियांना हवे ते विषय प्राप्त झाले म्हणजे होणारे सुख. उदा० स्वादिष्ट वस्तू खाल्यामुळे रसना सुखावते, कर्णमधुर गाणे ऐकल्याने कान सुखावतात किंवा स्त्रीसंगाने रतिसुख मिळते. अर्थात् या सुखाचे स्वरूप काही काळ म्हणजेच क्षणिक असते. यास आपण शरीरसुख म्हणू.

२) मनातील इच्छा, कामना पूर्ण झाल्यामुळे मिळणारे सुख; परीक्षेत सुयश मिळाल्यामुळे होणारे सुख; पुत्रप्राप्तीमुळे होणारे सुख – अशा प्रकारचे सुख होण्यापूर्वी त्यासंबंधीच्या कोणत्या तरी वासना असाव्या लागतात. शत्रू मेल्याबद्दल आपणाला आनंद होणे व त्याच्या हितचिंतकास दुःख होणे.

३) वासनेचा जाणीवपूर्वक त्याग केल्याने होणारे सुख. यालाच आत्मसुख, नित्यसुख, सात्त्विक सुख, आनंद या अनेक नावांनी ओळखले जाते.

वरील तीन सुखांपैकी दोन सुखे विषयजनित सुखे आहेत. ती अनित्य आणि क्षणिक आहेत. जोपर्यंत विषयांशी इंद्रियांचा संयोग असतो तोपर्यंत ती सुखे टिकतात. सातत्याने इंद्रियांशी संयोग ठेवला तर तो सुखकारक न ठरता त्रासदायक किंवा दुःखकारक ठरतो. आणखी एक महत्वाची बाब अशी की या प्रकारचे सुखे कुणावर तरी अवलंबून असतात. म्हणजे ती पराधीन असतात. उलट आत्मसुख म्हणजे वरीलपैकी तिसरे सुख नित्य असते; ते अनुभव घेणाऱ्याच्या स्वाधीन असते आणि कितीही अनुभवले तरी त्याच्यापासून दुःख उत्पन्न होत नाही.

वरीलपैकी पहिली दोन सुखे क्षणिक, अल्पकाळ टिकणारी, परावलंबी, विषयजनित आहेत हे कबूल पण ती सुखे खोटी नव्हेत. किंवा टाकाऊ, तिटकारा करण्याजोगी नव्हेत कारण तिसरे जे आत्मसुख ते अनुभवण्यास शरीरस्वास्थ्य असले पाहिजे. भुकेने व्याकूळ झालेल्या माणसाचे चित्त वासनारहित कधीच होऊ शकणार नाही. सर्व शरीरदुःखांचा परिहार चित्त एकाग्र करून करता येणार नाही.

शरीर आणि मन यांचा संयमित उपयोग करून माणसाला मोठे सुख प्राप्त करून घेता येईल अशी

ज्ञानेश्वरांची धारणा आहे. या दोघांचाही अतिरेक होणे म्हणजे दु:ख ओढवून घेणे व दोघांचा संयमित उपयोग करणे म्हणजे सुख प्राप्त करून घेणे असे ज्ञानेश्वरांना अभिप्रेत आहे. ते म्हणतात,

जो रसनेंद्रियाचा अंकिला ।
का निद्रेसी जीवें विकला ।
तो नाही एथ म्हणितला ।
अधिकारिया ॥६–३४५॥

अथवा आग्रहाचिये बांदोडी ।
क्षुधातृषा कोंडी ।
आहारातें तोडी ।
मारूनिया ॥३४६॥

निद्रेचिया वाटा न वचे ।
ऐसा दृढिवेचेनि अवतरणे नाचे ।
ते शरीरचि नव्हे तयाचे ।
मा योगु कवणाचा ॥३४७॥

म्हणोनि अतिशये विषयसेवा ।
तैसा विरोध न व्हावा ।
कां सर्वथा निरोधु करावा ।
हे ही नको ॥३४८॥

आहार तरी सेविजे ।
परी युक्तीचेनि मापे मविजे ।
क्रियाजात आचरिजे ।
तयाचि स्थिती ॥३४९॥

मपितलां बोलीं बोलिजे ।
मितलां पाउलीं चालिजे ।
निद्रेही मानु दीजे ।
अवसरें एके ॥३५०॥

जागणे जरी जाहलें ।
तरी व्हावे ते मितले ।
येतुलेनि धातुसाम्य संचले ।
असेल सुख ॥३५१॥

ऐसे युक्तिचेनि हाते ।
तै इंद्रिया वोपिजे भातें ।
तै संतोषासी वाढते ।
मनचि करी ॥३५२॥

(दांडेकर प्रत.)

साधारणपणे लौकिक जीवनांतही आपण एखादी चांगली वस्तू म्हणून जी निवडतो ती दीर्घकाळ टिकणारी, आपल्या स्वत:च्या ताब्यात रहाणारी वस्तू असते तसेच आत्मसुखाचे आहे. ते अधिक म्हणजे नित्य टिकणारे आहे म्हणून ज्ञानेश्वर त्या सुखाचा लाभ सर्वांना व्हावा असे अपेक्षितात.

ज्ञानेश्वरांच्या मते वासना अभाव असलेले सुख आणि त्यासाठी आवश्यक असणारे शरीरस्वास्थ्यही मानवी सुखाची दोन अंगे आहेत. यांत कोणतेही कमी जास्त नाही. एकाच नाण्याच्या त्या दोन बाजू आहेत. प्रवृत्तिनिवृत्ती संयोग खऱ्या सुखास उपयोगी आहे. वासना अभावास वैराग्य आवश्यक असते हे जरी खरे असले तरी सुखाचे हे क्षणभंगुरत्व, पराधीनत्व आणि आत्मसुख म्हणजे काय हे कळण्यास ज्ञानाची आवश्यकता असते. जीवनास व शरीरास आवश्यक त्या वस्तू कर्मामुळे मिळतात आणि म्हणूनच ज्याला ऐहिक सुख साधता आले नाही त्याला हे अत्युच्च सुख मिळणे अशक्य हे सांगताना ज्ञानेश्वर म्हणतात,

जया ऐहिक धड नाही ।
तयाचे परत्र पुससी काई ।
म्हणोनि सांगोका वाई ।
पांडुकुमरा ॥४.१५५॥

ज्ञान आणि कर्म यांच्या यथायोग्य मीलनातून आत्मसुख अनुभवास येते. हे उच्चतर सुख लाभावे म्हणून ज्ञानेश्वर म्हणतात,

दिसो परतत्व डोळा ।
पाहो सुखाचा सोहळा ।
रिघो महाबोध सुकाळा–।
माजि विश्व ॥१३–११६१॥

ज्ञानेश्वरांच्या अभंगरचनेतही या सुखानुभवाचे वर्णन येते. नमुन्यादाखल कांही ओळी दिल्याशिवाय रहावत नाही.

सुखी सुख मुरे तेथे कोण झुरे ।
जळी लवण विरे तैसे झाले
ज्ञान ते विज्ञान प्रपंचेसि भान ।
तेजोरूप गगन बिंबले दिसे ॥

ज्ञाने० अभंग गाथा, अभंग क्रमांक ५३२

सुख सोज्वळ मोतियाचे लेणे ।
दिघळे जाई जणे बाई ये वो ।

(पुढील मजकूर पृष्ठ ३४४ वर)

ज्ञानेश्वरीतील एक नवीन ओवी?

जयन्त बाळकृष्ण कुळकर्णी

ज्ञानेश्वरीचे पाठभेद संशोधित करून मूळ ज्ञानेश्वरीची प्रत तयार करणे हा महाराष्ट्रातील विद्वज्जनांचा अनेक वर्षांचा प्रयत्न चालू आहे. या क्षेत्रातील राजवाडे, माडगांवकर, फाटक, बनहट्टी इ. संशोधकांची नावे केवळ वानगीदाखल देत आहे. याखेरीज अनेक लोकांचे या क्षेत्रात सातत्याने प्रयत्न चालू आहेत.

या कार्यातून प्रेरणा मिळून अनेक ठिकाणी विखुरलेल्या पोथ्या पाहून त्याबाबत जी नवीन माहिती उपलब्ध होते ती वाचकापुढे ठेवणे हे संशोधकाचे पवित्र कार्य ठरते. अशाच एका जुन्या पोथीसंबंधी माहिती मिळण्याची मला संधी मिळाली. माझे रहिमतपूरचे मित्र श्री. ह. भा. माने हे ज्ञानेश्वरीवरील एक अधिकारी असे पुरुष आहेत. त्यांचा ज्ञानेश्वरीवरील व्यासंग वाखाणण्याजोगा आहे. त्यांच्या संग्रही असलेली हस्तलिखित ज्ञानेश्वरी प्रत म्हणजे सुमारे तीनशे वर्षापूर्वीची आहे. सदर हस्तलिखित प्रतीचा शक १६७६ आहे. संवत्सर पिंगल असून चैत्र कृष्ण ८ सोमवार असा निर्देश आहे. तसेच हे हस्तलिखित सातारा जिल्ह्यातील मलवडी गांवी लिहिल्याचे म्हटले आहे. हे हस्तलिखित अपूर्ण आहे. कारण त्यात अध्याय १३, १६ व १७ संपूर्ण आढळले नाहीत. या हस्तलिखितात एकंदर ९०३६ ओव्या आहेत.

या हस्तलिखित प्रतीत पुढील एक जादा ओवी आढळली. ही ओवी अध्याय १० मध्ये असून तिचा क्रमांक ७४ आहे.

> नभ अलिप्त सर्वांसी । स्वयें अलिप्त होणें नभासी ।
> हेचि महाभूतांच्या मायेयासि । चढणे साचे ॥

ही ओवी प्रसिद्ध असलेल्या ज्ञानेश्वरीच्या कोणत्याही प्रतीत आढळत नाही. या हस्तलिखिताचे वैशिष्टय म्हणजे नकलाकार हा स्वतःला ज्ञानेश्वरांच्या परंपरेतील शिष्य समजतो आणि वस्तुस्थिती अशी आहे, की या भागात परंपरेने अनेक संत होऊन गेले. त्यामुळे हे हस्तलिखित कोठून नकलून घेतले असावे हा एक अभ्यासाचा भाग ठरतो. यामुळे या ओवीला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

॥ ॥ ॥

(पृष्ठ ३४३ वरून)

> देशी नाही देशा उरी नाही ।
> हाटंणी नाही ते पाटणी नाही ।
> लक्षाचेनि लाभे जोडले निधान ।
> वापरखुमादेविवरा विठ्ठलु जाण ॥क्र.९३९

ज्ञानेश्वरीत एके ठिकाणी परसुखाने सुखावणाऱ्या मनासंबंधी ज्ञानेश्वर लिहितात,

> पैं पायी कांटा नेहटे ।
> तंव व्यथा जीवीं उमटे ।
> तैसा पोळे संकटे । पुढिळाचेनि ॥१६-१५९
> कां पावो शीतलता लाहे ।
> कीं ते डोळयांचि लागी होये ।
> तैसा परसुखे जाये । सुखावतु ॥१६-१६०

ज्ञानेश्वरांनी सांगितलेले हे "आत्मसुख" सर्वांसाठी म्हणजे ब्रह्मविद्येचे भुकाळू असलेल्यांसाठी आहे. ज्याला पोटाची भ्रांत आहे, ज्याला जीवनाचे अस्तित्व कसे तरी टिकवायचे आहे त्यासाठी हे आत्मसुख नव्हे. लौकिक जीवनधारणेच्या दृष्टीने सुखाचा विचार ज्ञानेश्वरांनी प्राधान्याने केलेला नाही. तो त्यांनी गृहित धरलेला आहे. ज्याला लिहिता येत नाही त्याचे अक्षर सुंदर असावे अशी अपेक्षा नाही. पण जर अक्षर काढता येत असेल तर ते सुंदर असावे हे अधिक चांगले अशा प्रकारची ही सुखाची अपेक्षा आहे. □□□

ज्ञानेश्वरांचे गणेशवंदन

कृ. रा. परांजपे

कोणत्याही कार्यारंभी गणेशवंदनाची परंपरा भारतात पूर्वापार चालत आलेली आहे. तशीच ग्रंथारंभी गणपतीवंदन करण्याची प्रथा देखील भारतात परंपरागत आहे. त्याप्रमाणे ज्ञानदेवांनीही ज्ञानेश्वरीच्या प्रारंभी गणेशवंदन केले आहे. परंतु त्यांच्या गणेशाचे स्वरूप मात्र इतरांच्याहून बरेचसे निराळे आहे. त्यांनी केलेले रूपवर्णन, त्यांनी दिलेली विशेषणे, त्यांनी वर्णिलेली अंगभूषणे या बाबतीत सुद्धा निराळेपणा दिसून येतो. वास्तविक त्या काळच्या रूढीविरुद्ध प्राकृतात ग्रंथरचना करून, मराठी रूढिग्रस्त पंडितांना एक जाग त्यांना आणावयाचीच होती, तर पुनः गणेशवंदनाच्या स्वरूपात बदल करून आरंभीच आणखी एक धक्का त्यांनी का दिला असावा ?

स्वतंत्र बुद्धीने ध्यान, मनन, चिंतन करून, ज्ञानेश्वरांच्या उक्तीप्रमाणे "मनन निदिध्यास श्रवण" करून, आपले देव व धर्मग्रंथ यांचे तत्वशोधन करून, देशकालपरत्वे ती तत्वे आचारानुकूल करून, सामान्य जनापर्यंत पोचविण्याची श्रीव्यासांची परंपरा, श्रीमत् शंकराचार्यांनंतर लुप्त होत चालली होती. त्यामुळे सामान्याकडून मिळणाऱ्या, सहजप्राप्त प्रतिष्ठेच्या लोभाने भोंदूपणा, अहंकार व अत्याग्रही वृत्तीचा प्रादुर्भाव होऊ लागला होता. श्रीव्यासादिकांचे "उन्मेख। रहाटती जेथ साशंक ॥" अशी स्थिती झाली होती. व कार्यांच्या योग्यायोग्यतेविषयी संभ्रम उत्पन्न होऊ लागला होता. आणि अशा वृत्तीमुळे, प्रकांड पंडिताकडून देखील, सामान्य जनतेतील लोकाचारांच्या बाबतीत अन्याय होऊ लागला होता. या वृत्तीला धक्का देवून लोकाना जागते करण्यासाठी व सामान्यांना विचारवंत करून, रूढिग्रस्त न होता, डोळसपणाने धर्माचरण करावयास लावण्यासाठीच ज्ञानेश्वरानी हा प्रपंच मांडला असला पाहिजे. "स्त्री शूद्रादि प्रतिभेला सामावून" घेणाऱ्या श्रीव्यासांच्या गीतेविषयी ते म्हणतात, "म्हणोनी व्यासांचा हा थोर। विश्वासि झाला उपकार। जे श्रीकृष्ण उक्ती आकार। ग्रंथाचा केला ॥ आणि तोचि हा मी आता। श्रीव्यासांची पदे पाहता पाहता। आणिला श्रवणपथा। मऱ्हाठिया ॥" (ज्ञा. १८-१७०८-९) आणि केला लोकाश्रया। दिठीचा विषो ॥ (ज्ञा. १८-१७३६) या ठिकाणी "**दिठीचा विषो**" हा शब्दप्रयोग फार महत्वाचा आहे. यावरून ज्ञानेश्वरांचे मनोगत स्पष्ट होते. त्याना सामान्य जनानी लिहिणे वाचणे शिकून स्वतः आपले धार्मिक ग्रंथ वाचावेत असेच वाटत असले पाहिजे. आणि याचा परिणाम म्हणून अगदी उच्चस्थापासून ते नीचस्थापर्यंत साऱ्या विठ्ठल भक्तांच्या मुखातून माणुसकी, सदाचार व वेदांताचा ओघ वाहू लागला. तो इतका व्यापक होता की सारा महाराष्ट्र त्यात बुडून गेला व आजही त्यात अवगाहन करीत आहे.

या लेखात ज्ञानदेवांच्या गणेशवंदनाचाच तेवढा विचार करावयाचा आहे. ज्ञानेश्वरीत गणेशवंदनाच्या एकंदर पहिल्या वीस ओव्या आहेत. प्रथमच्या चार ओव्यात, गणपती अथर्वशीर्षाप्रमाणे, **ओंकार ब्रह्माला गणेश** मानून वंदन केले आहे. पुढे पाच ते अठरा ओव्या "**आंगिक भावांच्या**" म्हणजे गणपतीच्या, उपासनेसाठी कल्पिलेल्या, रूढ लौकिक रूपाच्या वर्णनाच्या आहेत. व शेवटी १९ आणि २० या ओव्यात ध्यानासाठी गणपतीच्या लौकिक मानवी स्वरूपाशी ॐ या चिन्हाचे साम्य दाखविले आहे. ग्रंथाचा आरंभ असा आहे —

ॐ नमोजी आद्या। वेदप्रतिपाद्या।
जयजय स्वसंवेद्या। आत्मरूपा ॥ १ ॥

अशी पहिली ओवी आहे. ॐ म्हणजे ब्रह्मच. "ओमित्येकाक्षरं ब्रह्म" असे भगवान श्रीकृष्णानीच गीतेत सांगितले आहे (८.१३). मांडुक्योपनिषदाची सुरवातच "ओमित्येतदक्षरमिदं सर्वं।" अशी आहे. म्हणून चराचर विश्वाची, अर्थातच मूर्तामूर्त वाणीची व वाणीतून प्रसवलेल्या सर्व साहित्यसंभाराची देखील

उत्पत्ती ज्यातून झाली त्या ब्रह्माच्या ॐ या मूर्त प्रतीकाला 'आद्या' असे संबोधून '**नमोजी**' असे आदरार्थी वंदन केले आहे. ॐ या मूर्त स्वरूपाबद्दल ज्ञानदेवानीच म्हटले आहे, "तरी अनादि परब्रह्म। जे जगदादि विश्रामधाम।। ते कीर अनाम अजाति। परि अविद्यावर्गाचिये राती–। माजि ओळखाया श्रुती। खूण केली।।" (१७-३२८-२९). अ, उ, म या वर्णानी युक्त '**ओं**' हा प्रणव आणि त्याचे मूर्त प्रतीक ॐ कार हा, त्याचा मूर्त संकेत, यांचे एकत्व व महत्व सांगताना ज्ञानदेव म्हणतात, "कष्टले संसारशिणे। जे देवो येती गाऱ्हाणे। तया 'ओं' दे नावे देणे। तो **संकेत** हा।।"(अ. १७–ओ. ३३१). यातील '**संकेत**' व **खूण** या शब्दावरून ॐ हे लिखित चिन्हच त्यांच्या डोळ्यापुढे होते हे अघड आहे.

पुढील स्तुतीमध्ये ॐ काराला '**वेदप्रतिपाद्या**' असे संबोधिले आहे. वेदांगामधील उपनिषदांतून जरी ॐ कार ओतप्रोत भरलेला आहे तरी प्रत्यक्ष ऋग्वेदात त्याचे प्रतिपादन कोठे व कसे झाले आहे, असा एक प्रश्न पुढे येतो. ऋग्वेदात ॐ काराचा उल्लेख तीन ठिकाणी तरी आलेला दिसून येतो. गायत्री मंत्रात (३·६२·१०) आरंभी तो स्पष्ट दिसून येतो, आणि अस्यवामीय सूक्तात (१·१६४·३९) व पर्जन्य सूक्त (७·१०१·१-२) मध्ये तो 'अक्षर' व 'तिस्र: वाच:' या शब्दानी सूचित केला आहे. या साठीच ज्ञानदेवानी त्याला **वेदप्रतिपाद्या** असे संबोधिले आहे. ऋग्वेदाच्या लिखित व छापील प्रतीतून गायत्री मंत्राच्या आरंभी ॐ न लिहिता व छापता त्या मंत्राची सुरवात "तत्स-वितुर्वरेण्यम्" अशी करितात. परंतु मंत्रपठनाच्या वेळी मात्र तीन व्याहृतीनंतर ॐ चा उच्चार करितात. त्याचे समर्थन असे केले जाते की, कोणताही वेदमंत्र ॐ च्या उच्चाराने करावा असा आदेश आहे. परंतु हेच एक कारण आहे असे वाटत नाही. हा मंत्र मूळ सावित्री मंत्र म्हणजे सवितृ देवतेचा – सूर्याचा – मंत्र असून, लेखनात व उपासनेत सूर्याचे प्रतीक म्हणून त्याचे गोलाकार मंडलच उपयोगात आणतात. ॐ हे चिन्ह देखील सूर्य मंडलाच्या अर्धगोलाकारातून तयार झाले आहे. आदित्य आणि ब्रह्म हे दोन्ही उपनिषदातून एकरूप मानले आहेत. "आदित्योब्रह्मेत्यादेश:।" (छां. १९·१). बृहदारण्यकात म्हटले आहे की "वाणी हेच परमब्रह्म. त्यात जे सत्य आहे ते म्हणजे आदित्य जो त्याच्या या मंडलातील पुरुषब्रह्म होय." (४·१-२ व ५·५·२) ब्रह्म हे मानवाच्या आवाक्यावाहेरचे असून, मानवाला सहायभूत होण्यासाठी ते विभक्त होते. त्याचे प्रतीक म्हणून पहिले दोन उभे अर्धगोल, पुढे दोन आडवे अर्धगोल व नंतर वरचा एक टिंवयुक्त आडवा अर्धगोल असे ॐ या चिन्हात घेतलेले आहेत. दुसऱ्या आडव्या अर्धगोलाला जोडून शेवटी पुन: एक गोलाकार घेतला आहे. ते ब्रह्माचेच प्रतीक असून, ब्रह्मातून उत्पन्न झालेले सर्व पुन: ब्रह्मातच विलीन होते हे सुचविते. वरच्या अर्धगोलातील बिंदू ब्रह्माच्या **अणोरणीयान्** स्वरूपाचे द्योतक असून, तो अर्धगोल अथवा कंस ब्रह्माच्या **महतोमहीयान्** स्वरूपाचे द्योतक आहे. कारण तो विशाल ब्रह्मगोल मानवाच्या आवाक्यात येणे शक्य नाही. त्याला त्या ब्रह्मगोलाच्या परिघाच्या एखाद्या कंसाचा आधार घेवूनच चालले पाहिजे. म्हणूनच ज्ञानदेव त्या कंसाला, तो अंशात्मक असून देखील, पूर्णत्वद्योतक '**महामंडल**' असे म्हणतात. (अ. १ ओ. १९). ब्रह्माचे सर्वव्यापित्व व्यक्त करण्या-करिता त्या चिन्हातील अर्धगोल उभे आणि तसेच आडवेही घेतले आहेत. याप्रमाणे हे पूर्णब्रह्माचे ॐकार चिन्ह सवितृमंडलातून निर्माण झालेले असल्यामुळे व गायत्री मंत्रात या चिन्हाचीच प्रार्थना असल्यामुळे, त्या मंत्राला **सावित्री** मंत्र असे म्हणतात. व तो मंत्र **गायत्री** छंदात असल्यामुळे त्याला गायत्री मंत्र असेही म्हणतात.

या गायत्री मंत्रांचा थोडा लक्षपूर्वक विचार केला तरी देखील या मंत्राच्या प्रारंभी त्या मंत्राचे अंगभूत म्हणून ॐ या अक्षराचे लेखन व वाचन करणे आवश्यक आहे हे ध्यानात येण्याजोगे आहे. गायत्री छंद आठ आठ अक्षरांच्या तीन चरणानी म्हणजे एकंदर चोवीस अक्षरानी तयार होतो. हा मंत्र जर आरंभीचे ॐ हे अक्षर वगळून लिहिला तर एकंदर तेवीसच अक्षरे होतील व पहिला चरणच सात अक्षरांचा होईल. म्हणजे वृत्तदोष उत्पन्न होईल आणि हा वृत्त-दोष, आपल्या अज्ञानाचे खापर म्हणून या मंत्राचा दृष्टा जो विश्वामित्र ऋषी, त्याच्या माथी फोडण्याचे पाप केल्याचा दोष आपल्याला चुकविता येणार नाही. ज्ञानदेवांना याची पूर्ण जाणीव असल्यामुळेच त्यानी, ॐकाराला गायत्री मंत्राचे आद्याक्षर मानून '**वेद-प्रतिपाद्या**' '**वेदांनी प्रतिपादिलेल्या**' या अर्थाने हे

संबोधन वापरले असावे. आता आपण ॐकारासहित गायत्री मंत्राचा अर्थ काय होतो ते पाहू. या मंत्राचा अन्वय "ॐ, सवितुः देवस्य वरेण्यम् भर्गः । तत् धीमही । यः नः धियः प्रचोदयात् ।।" असा होईल. आणि त्याचा अर्थ, 'ॐ हे जे सूर्यदेवाचे अत्यंत श्रेष्ठ असे तेज (वरेण्यं भर्गः) त्या ॐचे आपण ध्यान करू या. ते आपल्या बुद्धीला प्रेरणा देवो.' असा होईल.

सूर्याचे तेज सकल पृथ्वीवर पडलेले आपण रोजच पाहतो. परंतु त्याचे वरेण्य असे दुसरे अत्यंत श्रेष्ठ असे **भर्ग** नावाचे तेज कोणते ? ते सूर्याच्या गोल मंडलातून निर्माण झालेले, वाग्ब्रह्मवाचक ॐकार हेच होय. "वाग्वै सम्राट् परमं ब्रह्म" (बृह. ४.१.२) कारण जेथे सूर्याचे अत्यंत प्रखर आणि तेजस्वी किरण देखील जाऊन पोचत नाहीत, त्या मानवाच्या मस्तकाच्या आत, मतिस्थानी, ॐकारातून निर्माण होणाऱ्या शब्दब्रह्माचे तेज – त्याचे ज्ञानकिरण जाऊन पोचतात. म्हणूनच ॐकारातून निर्माण होणाऱ्या अक्षरांचे, शब्दांचे व वाङमयाचे आपण ध्यानपूर्वक मनन चिंतन केले पाहिजे. लिहिणे वाचणे शिकले पाहिजे. त्यामुळेच आजपर्यंतच्या साऱ्या ज्ञानभांडारावर प्रकाश पडून आपल्या बुद्धीला प्रेरणा मिळेल. हा अर्थ लक्षात घेऊन ज्ञानदेव पुढच्या ओवीत ॐकाराला 'सकल मतिप्रकाशु' असे म्हणतात. मैत्रायणीयोपनिषदात् देखील गायत्री मंत्र ॐरूपी ब्रह्माचाच मंत्र आहे असे म्हटले आहे. (मै. ६.७) तसेच छांदोग्यात म्हटले आहे, "यदिदं किंच वाग्वै गायत्री वाग्वा इदं सर्वं ।।" (१२.१).

'वेदप्रतिपाद्या' याचा अर्थ वेदांचे प्रतिपादन करणारा असाही होवू शकेल. गायत्री मंत्राला वेदमाता असे म्हटले आहे. आणि तो अर्थ मनात घेऊनच ज्ञानदेवानी ॐकाराला स्वसंवेद्य असे संबोधन करून त्याचा जयजयकार केला आहे. ज्ञानदेवानी हे संबोधन का दिले असावे हे समजून घेणे आवश्यक आहे. वेद्य या शब्दाचा ज्ञानदेवांना अभिप्रेत असलेला अर्थ स्वतः त्यानीच सांगितला आहे. "आणि आघवेया जाणणे याचिया वाटा। जया गावा येति गा सुभटा। वेदांचिया चोहाटा। वेद्य जे म्हणिजे ।।" (अ. ९ ओ. २७३) वेदांपासून आजतागायत, जे जे म्हणून जाणण्यायोग्य आहे, ते सकल ज्ञानभांडार जेथून सुरू होते; त्या अधिष्ठानाला **वेद्य** असे म्हटले आहे. अर्थातच **संवेद्य** म्हणजे संपूर्ण वेद्य, म्हणजे भूतभावी सकल ज्ञान विज्ञान होय. आता ॐकाराला **स्वसंवेद्य** असे ज्ञानदेवानी का संबोधिले असेल, असा एक प्रश्न पुढे येतो. प्रदीर्घ ध्यान, मनन, चिंतना नंतर मला प्रतीत झालेले या प्रश्नाचे उत्तर मी पुढे देत आहे.

वाग्देवतेच्या मूर्त म्हणजे ॐ हे चिन्ह व अमूर्त म्हणजे **ओं** हा ध्वनि, अशा प्रतीकातूनच, म्हणजे **अ उ म** या तीन वर्णांनी युक्त असलेल्या वर्णमालेच्या स्वरूपात तयार होणाऱ्या अक्षरे, शब्द व वाक्ये यांच्या द्वारे ॐ स्वतःच वेदांसहित सर्व ज्ञानविज्ञानाचे संकलन आणि वितरण करितो. हेच ते उत्तर आणि हे उत्तर स्वतः ज्ञानदेवानीच दाखवून दिले. "**जया ॐकाराचिया कुशी** । अक्षरें होती अ, उ, मकारेसी । जिये उपजत वेदेसी । उठली तीन्ही ।।" (अ. ९ ओ. २७६) या स्वसंवेद्य ॐकाराला ज्ञानदेवांनी **आत्मरूपा** असेही संबोधिले आहे. चराचर विश्वाचे संचालन करणारा जो **परमात्मा** त्याचा अंशभूत असलेला आपला **आत्मा** स्वतःचा आविष्कार ॐकारातून जन्मलेल्या वाणीच्या रूपाने प्रगट करितो. "सोयमात्मा अध्यक्षरमोंकारोऽधिमात्रं पादा मात्रा मात्राश्च पादा अकार, उकार, मकार इति ।।" (मांडु. ८) तो हा आत्मा मात्रांनी युक्त अशा अक्षरांच्या रूपात व्यक्त होणारा ब्रह्मस्वरूप ॐकार होय. याचे ध्वनिरूप पाद म्हणजे अक्षररूप मात्रा होत. व ॐकाराच्या अक्षरमात्रा म्हणजे **ओं** या ध्वनीचे पाद म्हणजे विभाग **अ, उ व म** हे होत. म्हणून मूर्त आणि अमूर्त वाणी ही परमात्म्याचेच एक रूप होय. "द्वे वा **ब्रह्मणे** रूपे मूर्तंच अमूर्तंच ।" (बृह. २–३–१) यातील मूर्तरूप म्हणजे अक्षरें व अमूर्तरूप म्हणजे त्या अक्षरांचे ध्वनी होत. आणि आजपर्यंत झालेले व पुढे होणारे सर्व वाङमय म्हणजे **शब्दब्रह्मच** होय. ज्ञानदेव सांगतात, "पैं ब्रह्मजीवा जाहला अंकुर । घोष ध्वनि नादाकार । तयाचे गा भवन जो ॐकार । तो ही मीच गा ।।" (अ. ९ ओ. २७५) "म्हणौनि ऋक् यजुः साम । हे तीन्ही म्हणे मी आत्माराम । एवं मीच **कुलक्रम । शब्दब्रह्माचा** ।। (अ. ९ ओ. २७७).

आता या ॐकार चिन्हातून **शब्दब्रह्माचा कुलक्रम** म्हणजे वर्णमाला व तिचा विनियोग व व्याप कसा तयार झाला ते पाहिले पाहिजे. ॐ या चिन्हाचे तीन भाग आहेत. पहिला ३ या आकड्यासारखा दिसणारा, एकाखाली एक दोन अर्धगोल असलेला भाग.

त्याच्यापुढे एकापुढे एक उलट सुलट लिहिलेल्या साध्या व गाठीच्या दोन आडव्या कंसांचा दुसरा भाग. त्यानंतर वरचा बिंदुयुक्त आडवा अर्धगोल हा तिसरा भाग. हे तीन्ही भाग मिळून जी आकृती होते ती **ॐकाराची** असून त्यातील पहिला भाग **अ** चा निर्देशक, दुसरा **उ** चा निर्देशक व तिसरा **म** चा निर्देशक आहे. या ॐकारालाच महर्षी पाणिनीने आपल्या शिक्षेत वक्त्र, म्हणजे वाणीचा आधार असे संबोधिले आहे. यातील पहिला भाग **कंठविवराचा**, दुसरा **मुखविवराचा** व तिसरा **नासिकाविवराचा** निर्देश करितात. या चिन्हाचे पुनः अकाराच्या पहिल्या भागातील वरचा कंस व खालचा कंस असे दोन भाग होतात. तसेच उकाराच्या दुसऱ्या भागातील साधा व गाठीचा असे दोन भाग होतात. आणि टिंबयुक्त कंसाचा वरचा तिसरा भाग मिळून एकंदर पाच भाग होतात. आणि या पाच भागांच्या संयोगाने सारी वर्णमाला व लिपी तयार झाली आहे.


मैत्रायणीयोपनिषदात देखील याचे विवेचन पुढीलप्रमाणे केले आहे. "उद्गीथां प्रणवाख्यम् त्रिपदं त्र्यक्षरं पुनः पंचधा ज्ञेयं निहितं गुहायामिति। स्वनवत्येषा अस्य तनूः। या ॐ इति॥ (मैत्रा. ६–५–६)॥ म्हणजे प्रणव नावाचे हे ॐ रूपी उद्गीथ तीन पदांचे म्हणून **तीन अक्षरांचे** असून पुनः त्यात **पाच भाग गुप्त स्वरूपात** आहेत. या ॐ चिन्हाच्या पाच अवयवानी **सारे ध्वनी** निर्देशित होतात." हे पाच भाग उपनिषदात गुप्त आहेत असे म्हटले आहे, तरी महर्षी पाणिनीनी आपल्या शिक्षेत ते स्पष्ट करून ॐकाराची तनु कशी स्वनवति – ध्वनि उत्पन्न करणारी – आहे ते दाखविले आहे. शिक्षा ग्रंथ हे शुद्ध उच्चार व वाचन शिकविण्यासाठी लिहिलेले असतात. पाणिनीय शिक्षेत म्हटले आहे की प्राणवायूने छाती भरल्यानंतर, "सोदीर्णो मूर्घ्नि अभिहतो वक्त्रमापद्य मारुतः। वर्णान् जनयते तेषाम् विभागः पंचधा स्मृताः। स्वरतः कालतः स्थानात् प्रयत्नानुप्रदानतः। इति वर्णविदः प्राहुर्निपुणम् तन्निबोधत॥" याचा अर्थ "प्राणवायू छातीतून वर सरकून शिरोभागात अडल्यानंतर वक्त्रात म्हणजे तोंडात शिरून वर्णांना जन्म देतो. त्या वर्णांचे पाच प्रकार मानले आहेत. (१) स्वर (२) काल (३) स्थान (४) प्रयत्न व (५) अनुप्रदान. असे वर्णविज्ञानात निपुण असलेल्यानी सांगून ठेविले आहे ते समजून घेतले पाहिजे." [हें अधिक स्पष्ट होण्याकरिता **चौकट क्र. १** पहावी.] ॐ या चिन्हातील कंठविवराचे दोन उभे कंस स्वर आणि त्यांचे ऱ्हस्व दीर्घ आदि भेद निर्देशित करितात. तसेच मुखविवराचे साधा व गाठीचा हे दोन आडवे कंस व्यंजनाच्या उच्चारात नादवायू (मारुत) कोठे अडवावयाचा व त्यासाठी जिभेने व ओठांनी कोणता प्रयत्न करावयाचा ते निर्देशित करितात व पाचवा भाग चंद्रबिंदू हा अनुप्रदान म्हणजे अनुनासिके निर्देशित करितो. अशा रीतीने ॐकाराच्या या पाच भागांच्या निरनिराळ्या संयोगाने सारी वर्णमाला व लिपी तयार झाली आहे. छांदोग्योपनिषदात देखील याला आधार मिळतो. "यथा शंकुना सर्वाणि पत्राणि संतृण्णान्येवम् ॐकारेण सर्वा वाक् संतृण्णोंकारएवेदं सर्वमोंकार एवेदं सर्वम्॥" (२३.३) याचा अर्थ फुलांच्या देठाच्या आधाराने जशा सर्व पाकळ्या निर्माण होतात तशी ही सारी वाणी ॐकारातूनच निर्माण झाली आहे. हे सर्व ज्ञानविज्ञान ॐकारमयच आहे.

आता ॐकाराचे हे पाच भाग वर्णमालेचा व लिपीचा निर्देश कसा करितात ते पाहू. सारे स्वरवर्ण ३ या नाद चिन्हातून निर्माण झाले आहेत. या नाद चिन्हातील वरचा अर्धगोल **इ** या स्वरवर्णाचा निर्देशक आहे व खालचा अर्धगोल **उ** या स्वरवर्णाचा निर्देशक आहे. या निर्देशाचे कारण असे आहे की 'इ' या स्वराचा उच्चार करताना जिव्हामूल वर उचलले जाते व 'उ' या स्वराचा उच्चार करताना जीभ खालच्या जवडचात पडून असते. इकाराचा निर्देश देण्यासाठी ३ या नादचिन्हातील वरचा अर्धगोल इंग्रजी S सारखा उलटा लिहिला जातो व उकाराच्या निर्देशासाठी वरचा अर्धगोल अजीबात वगळून केवळ खालचा अर्धगोलच 5 असा लिहिला जातो. शिवाय नादाला ध्वनीचे अथवा वर्णाचे रूप देण्याकरिता तो नाद मर्यादित अथवा खंडित करावा लागतो. नाही तर त्याला गाण्यातील सुराचे स्वरूप येईल. त्याला अक्षर असे कोणी म्हणणार नाही. या साठी आपल्या लिपीतील प्रत्येक अक्षरात, मग ते स्वर असो वा व्यंजन असो, एक दंडक अथवा उभी रेघ असते. ही रेघ संस्कृत लेखनात पूर्ण विरामासाठी वापरतात. या रेघेचा ध्वनिमानका (Phonetic unit) सारखा उपयोग होतो. एक उभी रेघ म्हणजे एक अक्षर (Syllable) असे हे समीकरण आहे. म्हणून '**इ**' या अक्षरात ध्वनिचिन्ह S + ध्वनिमानक ⊤ = इ

चौकट १	अक्षरांचे मूळ घटक

प्रणव = ओंकार ॐ तार = ध्रुव


क्रमांक	चिन्ह	वक्त्रविभाग	निर्देश	कार्य	नाम
१	३ (१, २)	कंठविवर	नाद	स्वर व काल	अ
२	ऽ	मुखविवर	ध्वनि	स्थान व प्रयत्न.	उ
३	◡	नासिका विवर	अनुनासिक	अनुस्वार	म
४	१ ३ → इकार निर्देशक; २ → उकार निर्देशक				
५	T → शिरोरेखा → अक्षर व शब्दनिर्देशक; → दंडक = ध्वनिनामक → अकाररेषा				



देवनागरीतील प्रत्येक अक्षरात आडवी शिरोरेखा व उभी अकाररेषा यांची T ही आकृती आवश्यक आहे. शिरोरेखेखाली व अकाररेषेच्या मागे किंवा क्वचित् प्रसंगी खाली जोडून ओंकार चिन्हातील योग्य निर्देशक कंस लिहिल्याने सारी वर्णमाला व अक्षरे तयार होतात.

संयोजक- कुला-परांजपे.

हे स्वराक्षर तयार होते. या अक्षरातील उभी रेघ उंची समान राखण्यासाठी अर्धी वर अर्धी खाली घेतली आहे. उ या अक्षरात खालचा अर्धगोलच तेवढा घेऊन त्याच्या-वर उभी रेघ जोडली आहे व सोयीसाठी तिची उंची कमी केली आहे. या प्रमाणे अ इ व उ हे मूलस्वर ॐ या नादचिन्हातच समाविष्ट आहेत, आणि । ही उभी रेघ देखील त्या **नादचिन्हाचे ध्वनिचिन्ह** करण्या-करिता आवश्यकच आहे. नाही तर तो बोलण्याचा विषय न होता गाण्याचा अथवा रडण्याचा विषय होईल. अ या अक्षरातील नादाला अक्षरत्व देण्याकरिता उभ्या खंडरेषेची आवश्यकता आहे व याच रेषेला उद्देशून गीतेत भगवान श्रीकृष्ण म्हणतात, "अक्षराणाम्



संयोजक - कृ. बा. परांजपे


अकारोस्मि।" (१०.३३) तेव्हा या रेषेला या पुढे आपण **अकाररेषा** असे म्हणत जावू. बाकीची स्वरांची अक्षरे **अ इ** व **उ** यांचीच दीर्घ, गुण, वृद्धी वगैरे विकाररूपे असल्यामुळे त्यांची चिन्हे देखील या मूलस्वर चिन्हातच फेरफार करून तयार केलेली आहेत. दीर्घत्वाकरिता निर्देशक मात्रेचे पुनर्लेखन केले जाते. [चौकट क्रमांक २ पहा.]

ए व ऐ यांच्या रूढीत असलेल्या वळणामुळे थोडा विसंवाद येतो. पण या अक्षरांची कांही जुनी वळणे व लेखनातील त्यांच्या मात्रा पाहिल्या म्हणजे त्या अक्षरांचे मूळ रूप ध्यानांत येते. इकारातील S हा इंग्रजी एस् सारखा दिसणारा भाग व अकाररेषा मिळून **ए** हे अक्षर बनलेले आहे. **ऐ** या अक्षराकरिता S हा इकाराचा भाग पुन: शिरोभागी तिरकस करून लिहिला आहे. छपाईच्या सोईसाठी त्याना रूढ रूपे प्राप्त झाली आहेत. **ओ** व **औ** या अक्षरातील शिरोमात्रात ॐ कारातील **उकार** वापरलेला आहे असे हस्तलिखितात आढळून येते. छपाईत त्याचे रूप बदललेले आहे. अधिक स्पष्टतेसाठी पुढील पृष्ठावर **चौकट क्र. ३ पहावी.**

स्वरानंतर व्यंजनांची घडण ॐ या बीजाक्षरामधील साधा व गाठीचा हे कंस घेऊन केलेली आहे. माहेश्वरी सूत्रांना अनुसरून **क, च, ट, त** व **प** ही अघोष स्पर्श व्यंजने ‿ या साध्या कंसानी घडवलेली आहेत. **ग, ज, ड, द** व **ब** ही घोष स्पर्श व्यंजने ∂ या गाठीच्या कंसातून घडविलेली आहेत. सारी महाप्राण व्यंजने **ख, घ, छ, झ, ठ, ढ, थ, ध, फ** व **भ,** ही साधा व गाठीचा अशा दोन्ही कंसांचा उपयोग करून घडवलेली आहेत. सारी अनुनासिके **ङ, ञ, ण, न** व **म** ही ◡̇ या बिंदु कंसातून घडविलेली आहेत. **य, र, ल, व** ही अंतस्थ व्यंजने साध्या कंसाची बनलेली आहेत; व **श, ष, स, ह** ही उष्म व्यंजने आणि **ळ** हे अक्षर साधा व गाठीचा अशा दोन्ही कंसांची बनलेली आहेत. अधिक स्पष्टतेकरिता पृष्ठ ३५२ वर **चौकट क्र. ४** पहा.

बाराखडीत स्वराक्षरातील स्वरमात्रांचा आणि अकार रेषेचा मुळातील **आडवा क्रम** न घेता लेखनाच्या सुविधेकरिता **उभा क्रम** घेतला आहे. जोडाक्षरातून हे दोन्ही क्रम पूर्वीपासून चालत आलेले

अनुक्रमणिका



संयोजक-कृ.वा.परांजपे

आहेत. अधिक स्पष्टतेकरिता **चौकट क्र. २, ३** पहावेत. जोडाक्षरे घडविण्याची पद्धती **चौकट क्र. ५** मध्ये दाखविली आहे. लेखन सौकर्याकरिता व सुविधे-करिता अक्षरांतील कंस व अकाररेषा यांचे आडवे, उभे अथवा तिरकस रूप घेण्याची प्रथा देवनागरीत पूर्वापार चालत आलेली दिसून येते.

याप्रमाणे गायत्री मंत्रातील ॐकारातून सारी मूर्त व अमूर्त वाणी कशी तयार झाली व ज्ञानदेवानी ॐका-राला '**वेदप्रतिपाद्या**' असे का संबोधिले हे आपण पाहिले. या नंतरही वाचकांना गायत्री मंत्रातील ॐकारा-बद्दल शंका राहिली असेल तर त्यांनी ज्ञानदेवांच्या पुढील ओळी पहाव्यात. "ब्रह्माचा अबोला फिटावा। अद्वैत तत्त्वें तो भेटावा। ऐसा मंत्र देखिला कणवा। वेदें बापे ॥" १७.३३२ ॥ वेदमंत्राच्या रूपाने प्रगट झालेले ब्रह्म बोलके व्हावे व लोकांच्या कानी पडावे व डोळयांना दिसावे, ध्वनी व अक्षरे अशा दोन्ही रूपात अद्वैतपणे त्याचे ज्ञान व्हावे, म्हणून वेदांनी हा ॐकार-रूपी शब्द व ब्रह्माचा गायत्री मंत्र देऊन केवढी कृपा केली आहे ! पुढे ज्ञानदेव म्हणतात, "मग दाविलेनि जेणे एके। ब्रह्म आळविले कवतिके। मागा असत ठाके। पुढा उभे ॥" १७.३३३ । मग त्या एकाच अद्वैत ब्रह्माला आळविल्यानंतर म्हणजे लिहिण्याचे व वाच-ण्याचे कौतुकास्पद ज्ञान मिळविल्यानंतर, जे मागे गेले होते ते पुढे येवून उभे राहते. वैखरी वाणीच्या रूपाने बोललेले शब्द तत्काल हवेत विरून जावून मागे भूतकाळात विलीन होतात. त्यामुळे विस्मरणाने त्यात दोष उत्पन्न होतात. परंतु ते लिहून ठेविल्यामुळे पुन: पुढे येऊन उभे राहतात. आणि विस्मरण, श्रवण दोष, अथवा वाचा दोष यामुळे येणारी व्यंगे नाहीशी होतात. आणि यासाठी ज्ञानदेव पुढे म्हणतात "तरी सर्व मंत्राचा राजा। तो प्रणव आदिवर्ण वुझा ॥ १७–३४२ ॥ या ठिकाणी '**प्रणव**' म्हणजे **ओंकार ध्वनि** व '**आदिवर्ण**' म्हणजे **ॐकारचिन्ह** हे विशेषत्वाने ध्यानात घेतले पाहिजे.

यानंतर ज्ञानदेव ॐकाराला संबोधून म्हणतात, "देवा तूचि गणेशु। सकलमति प्रकाशु" ॥२॥ एकदा ओंकाराला गणपती मानून वंदन केल्या-नंतर "पुन: ॐकारा तूच गणेश आहेस" असे आग्रहाने सांगण्यात ज्ञानदेवांनी केवढे औचित्य दाखविले याचा प्रत्यय आला म्हणजे ज्ञानदेवांच्या अवतारी सर्वसाक्षित्वाचा साक्षात्कार झाल्यावाचून रहात नाही. हे संबोधन करण्यात गणपती अथर्वशीर्षातील

चौकट ४	व्यंजने				
	कवर्ग	चवर्ग	टवर्ग	तवर्ग	पवर्ग
अघोष स्पर्श	क	च	ट	त	प
घोष स्पर्श	ग	ज	ड	द	ब
महाप्राण	ख	छ	ठ	थ	फ
महाप्राण	घ	झ	ढ	ध	भ
अनुनासिक	ङ	ञ	ण	न	म
अंतस्थ		य	र	ल	व
ऊष्म	ह	श	ष	स	ळ
जाड रेषा कंसनिर्देशक		जोडरेषा अकार निर्देशक			

संयोजक = कृ वा पंबाउरे


गणेशविद्येची ॐ **गँ गणपती** ही देवता त्यांच्या समोर होती, याची जाणीव होते. ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीचा आरंभ जसा ॐकाराला 'आद्या' असे संबोधून केला आहे, तसा अथर्वशीर्षाचा आरंभ "ॐ नमो गणपतये" आहे. दोन्ही ठिकाणी ॐकारालाच वंदन आहे.' 'गणपतये' यातील 'गण' हे अक्षरगणच गृहीत धरले आहेत. अथर्वशीर्षात जी गणेशविद्या सांगितली आहे ती ध्यानात घेतल्यास, ती लिहिण्यावाचण्याची विद्या आहे हे सहज कळून येण्याजोगे आहे. ती विद्या पुढील प्रमाणे आहे. "**गणादीन् पूर्वमुच्चार्य। वर्णादीन् तदनंतरं। अनुस्वारः परतरः॥**" याचा अर्थ वाचताना **गणादीन्** म्हणजे **ग, ण** अशा **अक्षरांच्या आदिस्थानी** असणारी जी ग, ण, अशी चिन्हे असतात त्यांच्या उच्चारांचा आरंभ करावा. म्हणजे कंठ, जीभ, खालचा जबडा, वरचा जबडा, नासिका, दात व ओठ यांच्या ठिकाणी जो प्रयत्न करावा लागतो त्याचा आरंभ करावा व त्यालाच जोडून **वर्णादीन्** म्हणजे **वर्णमालेच्या आरंभी** असणाऱ्या **स्वरचिन्हांचा** उच्चार करावा. म्हणजे व्यंजनांचा सस्वर उच्चार करावा. आणि त्यानंतर त्यालाच जोडून, जरूर तेथे

चंद्रबिंदू अथवा बिंदू कोणत्याही स्वरूपातील अनुस्वाराचा उच्चार करावा. अशा तऱ्हेने वाचण्याची प्रक्रिया सांगितल्यानंतर लिहिण्याची प्रक्रिया सांगितली आहे. लिहिण्याचा आधार म्हणून, "**अर्धेंदुलसितं । तारेण ऋद्धं । एतत्तव मनुस्वरूपम् ॥**" असे म्हटले आहे. याचा अर्थ लिहिण्यासाठी तुझे जे स्वरूप आद्य ऋषींनी मानले आहे ते चंद्राकार अर्धगोलानी सुशोभित असून **तारेण** म्हणजे ॐ या प्रणव चिन्हाने समृद्ध झालेले आहे. चंद्रकोरीप्रमाणे शोभणारे त्यातील अर्धगोल तर आपणाला प्रत्यक्षच दिसतात. आणि ज्या प्रणवचिन्हातून सारी वर्णमाला सिद्ध झाली त्याला समृद्ध म्हणावयाचे नाही तर काय म्हणावयाचे ?


पुढे या प्रणव चिन्हातून निर्माण झालेल्या अक्षरांचे लेखन कसे करावे ते '**गँ**' हे बीजाक्षर अथवा नमून्याचे अक्षर घेऊन सांगितले आहे. "**गकारः पूर्वरूपम् अकारो मध्यम् रूपम् । अनुस्वारश्चांत्यरूपम् । बिंदुरुत्तररूपम् ॥**" असे म्हटले आहे. म्हणजे बीजाक्षरातील व्यंजननिर्देशक जो गाठीचा कंस आहे, तो प्रथम लिहावा. नंतर अकाराची उभी रेघ लिहावी. या रेघेला **मध्यमरूप** म्हणावयाचे कारण त्यानंतर तिलाच जोडून इतर स्वरनिर्देशक मात्रा लिहावयाच्या असतात हे होय. व शेवटी म्हणजे स्वरमात्रांच्या मागून येणारे **अनुस्वाराचे चिन्ह** लिहावे. या अनुस्वारचिन्हाचेच नंतरचे एक रूप म्हणून एक **बिंदू** देखील दिला जातो. या निर्देशातील **कार** या प्रत्ययावरून व **रूपम्** या शब्दावरून येथे लिहिणे अभिप्रेत आहे हे स्पष्ट होते. पुढे "**नादस्संधानम् । सैषा गणेशविद्या ॥**" असे स्पष्ट सांगितले आहे. याचा अर्थ लिखित अक्षरांतील कंसाच्या व मात्रांच्या निर्देशाप्रमाणे **नादाशी संधान** साधावे, म्हणजे उच्चार करावेत. हीच ती लिहिण्यावाचण्याची **गणेशविद्या** होय. या पुढे "**गणक ऋषिः । गणपतिर्देवता ॥**" असे म्हटले आहे. यावरून दिसून येते की या विद्येचा ऋषी **गणक** आहे. कारण पंचाग व त्याला अनुसरून होणाऱ्या कार्यांची नोंद **गणक** म्हणजे ज्योतिषी ठेवीत असत. तेव्हा लिपी निर्माण करण्याची आवश्यकता प्रथम त्यानाच वाटली असली पाहिजे. आणि या विद्येची देवता म्हणजे प्रारंभी वंदिलेला अक्षरगणांचा अधिपती **ॐ रूपी गणपती** आहे असे सांगून **ॐ गँ गणपतये नमः॥**" असे नमन केले आहे. आता या गणपतीला ॐ च्या जोडीला पुनः **गँ** असे संबोधण्याची आवश्यकता काय, हा प्रश्न राहिला. भारतीय विद्वानांच्या परंपरेत असा एक वर्ग आहे की जो लेखनाच्या बाबतीत पुढे दिलेल्या मताचा पुरस्कार करितो. त्यांचे म्हणणे असे असते की "ॐ या चिन्हावरून केवळ वर्णोच्चाराचा फार तर निर्देश मिळतो, लिहिण्याचा नाही. आपले वैदिक पूर्वज लिहीतच नसत. सारी वेदवेदांगे गुरुमुखाने श्रवण करून पठन शक्तीने ते मुखोद्गत करीत." असा वृथाभिमान बाळगून आपल्या पूर्वजाना कमीपणा आणणाऱ्या विद्वानांच्या समाधानासाठी ज्या चिन्हात लेखनाची सर्व अंगे असून शिवाय ॐकाराचे प्रमुख घटकही ज्यात आहेत असे चिन्ह हवे होते. ते **गँ** या बीजाक्षरात साधले आहे. या बीजाक्षरात ॐकारातील साधा व गाठीचा दोन्ही कंस व अनुस्वार बिंदू असून शिवाय अत्यावश्यक अशी उभी **अकाररेषा** अक्षरभेद (Syllable) स्पष्ट करण्यासाठी आडवी **शिरोरेखा** यांचाही समावेश आहे. म्हणून लेखनाची सर्व अंगे **गँ** या चिन्हात आलेली आहेत. या बीजाक्षरातील **ग** हे वर्णमालेतील पहिले **घोष व्यंजन** आहे हे लक्षात ठेवून ज्ञानदेवांची पुढील ओवी वाचावी, म्हणजे वरील विवेचनाचे स्वारस्य लक्षात येईल. "**घोषाचिये कुंडी । नादचित्रांची रूपडीं । प्रणवाचिये मोडी ।** रेखिली ऐसी ॥" अ. ६ ओ. ७६ [नादचित्रें = अक्षरांची वळणे. प्रणवाचिये मोडी रेखिली = प्रणव चिन्हातील कंसांच्या वळणानी लिहिलेली.] ज्ञानदेवांचा हा प्रणवरूपी **गणेशु सकलमतिप्रकाशु** कसा आहे याचे विवेचन पूर्वी झालेलेच आहे.

गणेशवंदनात पुढे ज्ञानदेव म्हणतात "**म्हणे निवृत्तिदास । अवधारिजो जी**" ॥ निवृत्तिनाथांचा उल्लेख या ठिकाणी त्याना आवश्यक का वाटला असेल आणि "**अवधारिजो जी**" असे आर्जवून त्यानी का सांगितले असेल, याचा विचार केला पाहिजे. निवृत्तिनाथ नाथसांप्रदायातले होते, व नाथसांप्रदायाचे आदिदैवत महेश्वरशंकर मानले जाते. आणि महेश्वरांच्या डमरूतून, माहेश्वर सूत्रांच्या रूपाने सारी वर्णमाला व ओघानेच त्यातून निर्माण झालेले आजपर्यंतचे सर्व वाङ्मय जन्मास आले अशी श्रद्धा आहे. या माहेश्वर सूत्रावरूनच महर्षी पाणिनीने आपल्या व्याकरणाची रचना केली आहे हे सुप्रसिद्ध आहे. आणि आजतागायत जगातील साऱ्या व्याकरणकारांचे आदर्श म्हणून महर्षी पाणिनीच मानले जातात.

या पुढे ज्ञानदेव म्हणतात, " हे शब्दब्रह्म अशेष । तेचि मूर्ती सुवेष । तेथ वर्णवपु निर्दोष । मिरवित असे "॥३॥ ज्ञानदेवाना सांगावयाचे आहे की ॐकाराची वपु म्हणजे मूळ देह केवळ वर्णचिन्हांचे बनलेले आहे.



संयोजक- कृ. ना. पवांजपे.



संयोजक- कृ. ना. पवांजपे.

उपासनेसाठी पूजा बांधून वस्त्रालंकारानी सजविलेली ती मूर्ती नव्हे. तर अशेष शब्दब्रह्माने म्हणजे वेदापासून ते आजपर्यंत निर्माण झालेल्या स्मृति, पुराण, दर्शन, काव्य, नाटकादि ज्ञानविज्ञानाच्या साहित्याने तिची पूजा बांधल्यानंतर ती मूर्ती दर्शनयोग्य होते. म्हणून ज्ञानदेवानी म्हटले आहे, "स्मृतीं तेचि अवयव। देखा आंगिक भाव। तेथ लावण्याची ठेव। अर्थ शोभा" ॥४॥ ॐकाराचे जे अ, उ, म हे अवयव आहेत त्यांच्या आधारावर गणेशविद्या स्मरणात ठेवून, वेदवेदांगादि साऱ्या साहित्याचा साज चढवून त्या मूर्तीचा आंगिक भाव पहा. म्हणजे त्यातील अर्थाच्या सौंदर्याने त्या मूर्तीचे लावण्य दिसून येईल. अशी प्रस्तावना करून पुढील पाच ते अठरापर्यंतच्या ओव्यात ज्ञानदेवानी स्वतःच ती पूजा बांधून वाचकाना भारतीय वाङमय साहित्याने नटलेल्या गणेशाचे दर्शन घडविले आहे. वाचीत असताना ते दर्शन वाचकांच्या मनांत सहज भरण्यासारखे आहे. ते दाखवून देण्याची आवश्यकता नाही.

त्यानंतर-१९ व २० या ओव्यात ज्ञानेश्वरानी आपण कल्पिलेल्या ॐकाररूपी गणेश मूर्तीचे वर्णन केले आहे. या स्वरूपात ॐकाराची रचना उभी घेतली आहे. **चौकट क्र. ६ पहा.** या मूर्तीचे वर्णन ज्ञानेश्वर पुढील ओळीत करितात. "**अकार चरणयुगुल। उकार उदर विशाल। मकार महामंडल। मस्तकाकारें ॥१९॥ हे तीन्ही एकवटले। तेथ शब्दब्रह्म कवळलें। ते मिया श्रीगुरुकृपा नमिलें। आदिबीज ॥२०॥**" अकाराच्या दोन अर्धवर्तुळाना ज्ञानदेवानी मांडी घातलेल्या पायांची जागा दिली आहे, ती किती समर्पक आहे पहा. कारण **अ** आणि त्यातून निघणाऱ्या स्वरवर्णांच्या पायावरच साऱ्या वर्णमालेची आणि परिणामी साऱ्या साहित्याची उभारणी झाली आहे आणि ॐकार हा **वर्णवपु गणेश** आहे. **उकाराच्या** कंसाना त्यानी विशाल उदराचे स्थान दिले आहे. कारण सारी व्यंजने त्यांत सामावलेली आहेत व त्यांची संख्या वर्णमालेत मोठी आहे. शिरस्थानी **मकाराचा** चंद्रबिंदू ठेविला आहे. कारण लेखनात अनुस्वाराचे स्थान स्वरव्यंजनांच्या शिरोभागीच ठेविले आहे. या मकाराला ज्ञानदेवानी **महामंडल** म्हटले आहे. वास्तविक ते चिन्ह पूर्ण गोलाकार देखील नाही. ज्ञानदेवाना त्यात काय सांगावयाचे असेल? थोडा विचार केल्यास त्याची जाणीव होऊ शकेल. मानवाला ब्रह्माचे जे दर्शन घडू शकते ते आदित्याच्या स्वरूपात. त्या आदित्य ब्रह्माचे मंडल आपण गोलाकारानी व्यक्त करतो. परंतु अणोरणीयान्महतोमहीयान् अशा विश्वगोलाचे दर्शन मानवाला केवळ अंशत्वानेच होणार. शिवाय या आदित्य गोलाचा शब्दब्रह्मरूपी प्रकाश मानवी मस्तकातील मतिस्थानावर, त्याच्या बुद्धीवर पडतो, हे सांगताना ज्ञानदेव म्हणतात, ॐकारातील **अ, उ, म** "हे तीन्ही एकवटले। तेथे शब्दब्रह्म कवळलें।" शेवटी निवृत्तिनाथांच्या कृपेचे स्मरण करून या ॐरूपी आदि बीजाला ज्ञानदेव वंदन करितात. "ते मिया नमिले आदिबीज ॥"

आता ज्यांच्या कृपेने मला त्या आदिबीज ओंकाराचे हे विश्वरूपदर्शन घडले त्या ज्ञानेश्वरांना वंदन करून, त्यांच्याच चरणी ही सेवा अर्पण करितो.

♡♡♡

युगवाणी दीपावली १९७५, वर्ष ३१, अंक ७–८ संबंधी टिपण

—पृष्ठ १८४. "गारा, कन्हेर व करक" या लेखात सर्वत्र 'कऱ्हेर' ऐवजी 'कन्हेर' असे वाचावे.

—पृष्ठ २१३. "एका शुक्रवारी" या कथेसंबंधी लेखक श्री. श्रीराम खांडेकर यांची खालील टीप आहे:— "सत्यकथेत आपली जाहिरात वाचली नंतर हा अनुवाद केला. एका अभिजात पण जातिभेदाच्या जाळ्यात अडकलेल्या चित्ताची ही कथा म्हणूनच मायकेल अँन्जेलोच्या स्मृतीस अर्पण केली."

श्रीज्ञानेश्वरांच्या चांगदेवपासष्टीच्या संस्कृत व मराठी अनुवादाचे एक जुने हस्तलिखित

पृष्ठ १

श्लो. ज्ञानदेवेन लिखितं चांगदेवाय प्रेपितं । तद्रहस्यं यथा बुध्या वदामि परमादरात् ।। ६ ।। श्रीगणेशाय नमः ।। अथश्रीमदादिनाथसंप्रदायसंपन्नेन श्रीमन्निवृत्यानुजेन वासतिशष्येण सोपानाग्रजेनमुक्तेर्ज्येष्ठ-बंधुना परमहंसात्मजेन ज्ञानधनेन ज्ञानदेवेन श्रीमद्भगवद्गीता हृद्दीपप्रवोधकेन दशोपनिषदानामनुभवा-मृतार्थस्वादप्रदर्शकेन निर्जीवकुद्रिप्रचालकेन महिषाय निगमपठनसामर्थ्यप्रदेन अब्रह्मविद्ब्राह्मणानां देहात्म . . . मदगजध्वंसकेन श्रीमत्पांडुरंगावतारेण सच्चिदानंदस्य गुरुणा कलौ प्रथमचरणे शालिवाहन शकस्य द्वादशशत वर्षांते इंद्रायणी सरित्तीरे अलकावती क्षेत्रे ।। प्रध्वस्ताखिलमोहोपिलोककार्यार्थमात्मविदिति वाक्यपालनविधिना स्वहितार्थसूचितलिखितं ।। श्रीमद्योगसंपन्नाय चांगदेवाय प्रेपितं ।। तद्रहस्यं पंचषष्ठीतिसूत्रैर्विद्वज्जनप्रीत्यर्थं यथामत्या स्वाधिकारत्वेन परमादरेण अहं वदामि ।। तेषां सूत्राणां मध्ये पूर्वसूत्रात् पट्त्रिशत् सूत्रपर्यंतं श्रीमद्वटेशप्रशंसनं कृतं ।। ततः एकोनत्रिंशत् सूत्रैरद्वैतज्ञानं प्रवोधितं । येन ज्ञानेन दर्शनं विनादर्शनं भूत्वापि संदेहरहितं समाधानं जातं ।। तदाह ।। यथा नद्यः स्यंदमानाः समुद्रे ताः गच्छंति*

पृष्ठ २

स्वस्ति श्रीमद्वटेशश्च यो लुप्ता जगदंकुरं । दर्शयित्वा पु[न र्भा ?]सं कुरुते स्वप्रकाशतः ।। १ ।। * नामरूपे विहाय ।। तथा विद्वान् पुण्यपापैर्विनिमुक्तो निरंजनः परमसाम्यमुपैति ।। इत्यनेन वे[दां]त-शास्त्रस्यसूत्रेणेदं सूचितं ।। किं ।। यथा नामरूपेविहाय नद्यः समुद्रे गछंति ।। तथा विद्वान् मनोजनित-पापपुण्यविवर्जितो ज्ञानांजनरहितः सन् परमसाम्यमुपैति ।। तत्परमसाम्यं दृशं ।। की । आत्मसदृशं स्वयमेवात्माधिष्ठानभूतं निरुपमं तदेव वर्णयति ।। स्वस्ति श्रीवटेशेति सूत्रारंभः ।। स्वस्ति श्रीवटेश ।। जो लपोनि जगदाभास ।। दावि मग ग्रास ।। प्रगटला करि ।। स्वस्ति श्रीवटेश गोसावी ।। जो लपोनि ज [ग ?] ज. . .स्वरूप प्रगटवी ।। ग्रासावया ।। १ ।। अस्यार्थः ।। स्वस्तीति कल्याणवाचकः कल्याण-रूपः श्रीपदेनशोभितः विश्वाकारवटस्याधिष्ठानरूपः नियामकत्वेनईशः यो लुप्त्वा जगदाभासंदर्शयित्वा पुनः स्वाविभविने स्वप्रकाशेन ग्रसनं करोति ।। १ ।। प्रकटत्वान्नदृश्यं च गूढत्वाद्भासते जगत् । न स्पष्टो-[ऽ]पि न गुप्तो[ऽ]पि क्षोभातीतो[ऽ]पि यः स्वयं ।। २ ।। सूत्र ।। प्रगटे जव जव न दिसे ।। लपे तव तव आभासे ।। प्रगट ना लपालासे ।। न खोमता जो ।। २ ।। अस्यार्थः ।। यदा यदा प्रकटो[ऽ]भि-भूतः सन्नदृश्यते ।। तदा तदा गुप्तेभिभूतः सन् आभाति तत्रापि क्षुभितो न भूत्वा न प्रकटो न गुप्तो-स्तीति भावः ।। २ ।। सूत्र ।। वहू जव जव होय ।। तव तव काही न होय ।। काही न होनि आहे ।। अघवेचि जो ।। ३ ।। अस्यार्थः ।। वहूवोपि यदा यदा भवति तदा तदा किंचिन्न ।। वहूवोपि यदा भूतस्तदा किंचिन्न जायते ।। किंचिन्न भूत्वास्तिचयं समग्रं चराचरं ।। ३ ।। वोवी ।। जव जव प्रगटता न दिसे ।। लपाला तव तव आभासे ।। उत्कर्षास न येता असे ।। लपे ना प्र[गटे] ।।

पृष्ठ ३

भूत्वापियः सकलमस्तीत्यभिप्रायः ।। ३ ।। . . .होय वहुत ।। तेह्वा तेह्वा काही न हो. . . .।। समग्र जो ।। ३ ।। वोवी ।। . . . ।। ३ ।। सूत्र ।। सोने सोनेपणा उने ।। न येताचि जाले लेने ।। तेवि न वेचता

जग होने ।। आंगे जया ।। स्वर्णं स्वर्णान्न न्यूनत्वं भूत्वालंकाररूपतः। तथास्त्वाऽव्यययोगेन जगत्त्वेन प्रकाशत ।। वोवी ।। ४ ।। जसे सुवर्णत्व न हारपता ।। लेनेचि जाले तत्वता ।। तसे अव्ययत्वे जगन्मयता ।। निजांगे जया ।। ४ ।। अस्यार्थः ।। यथा सुवर्णं सुवर्णत्वान्न न्यूनं भूत्वापि अलंकारत्वेन राजते ।। तथा स्वत्वं नहित्वापि स्वांगेन जगद्रूपावस्थानं यस्य घटते ।। ४ ।। सूत्र ।। कल्लोळाचे कंचुक ।। न फेडितां उघडे उदक ।। तेवि जगेसि सम्यक ।। स्वरूप जो ।। ५ ।। नवीचेः कुंचुकं हित्वा प्रकटं सलिलं यथा ।। तथैव जगतः सम्यक् समेत्तं यः स्वरूपकं ।। ५ ।। अस्यार्थः ।। यथा कल्लोलानां कंचुकन्नहित्वापि नाछादितमुदकमस्ति तथाजगत्समवेतं सम्यक् स्वरूपं योस्ति ।। ५ ।। सूत्र ।। परमाणुचिया मांदिया ।। पृथ्वीपणे न वचति वाया ।। तेवि विश्वस्फूर्ति इया ।। झाकवेना जो ।। ६ ।। श्लोक ।। परमाणुगणाश्चैव नभवेद्वसुधांविना ।। तथैवविश्वस्फूर्त्याच नाछादयति यः क्वचित् ।। ६ ।। अस्यार्थः ।। यथा सूक्ष्मात्सूक्ष्माणुगणाः पृथ्वीत्वंविना पृथक्त्वेन न भवंति ।। तथा विश्वाकार-स्फूर्त्यापि यो नाछादयति ।। ६ ।। सूत्र ।। कळाचेनि पांघुरणे । चंद्रमा हारपो नेणे ।। का वन्ही दीपपणे ।। आन नव्हे ।। ७ ।। वोवी ७ जसे लहरिचे आंगड ।। न काढिता सलिल उघड ।। तैसे जगेसि अखंड ।। स्वरूप जो ।। ५ ।। वोवी ११ जेवि परमाणुसमुदाय ।। पृथ्वीहून वेगळा न होय ।। तेवि विश्वस्फुरणे नव जाय ।। आछादिला जो ।। ६ ।।

पृष्ठ ४

३ वोवी ।। षोडश कळेच्या वसने ।। चंद्रमा झाकिला तेणे ।। दीपप्रकाशे न होणे ।। अग्निने दुजे ।। ७ ।। वोवी ६ ह्मणोन अविद्याव्याजे ।। द्रष्टा दृश्यत्वे विराजे ।। ते मी नेणे सहजे ।। असतत्रि असे ।। ८ ।। श्लोक ।। कलायाश्चांवरेनैव न नष्टोचंद्रमा यथा ।। तथा दीपप्रकाशत्वाद्भिन्नोवन्हिर्नकर्हिचित् ।। ७ ।। अस्यार्थः ।। षोडशकलात्मक प्रावर्णनात्रिसुतश्चाछादितो न भवति यथा ।। तथापि चानलोदीपयोगेन द्वितीयो न भवति ।। ७ ।। सूत्र ।। ह्मणोनि अविद्यानिमित्ते द्रष्टा दृश्यत्वे वर्त्ते ते मी नेणे हे आयिते । असेचि असे ।। ८ ।। श्लोक ।। तस्मादविद्या हेतुत्वात् दृश्यद्रष्टत्व मुच्यते न जानामि तदेवाहं एवंचैवास्ति सर्वदा ।। ८ ।। अस्यार्थः ।। यस्मादविद्यानिमित्तेन यदृश्यद्रष्टत्वंवर्त्तते ।। तदहं न जानामि निर्हेतुत्वात् स्वतः सिद्धमस्ति ।। ८ ।। सूत्र ।। जैसे नाममात्र लुगडे ।। येन्हवि सूतचि ते उघडे ।। की माति मृद्भांडे ।। जयापरि ।। ९ ।। श्लोक ।। यथा नाम्नांवरत्वं च वस्तुतः सूत्रमेवच ।। अथवा मृत्तिकाभांडुमेकत्वे-नैववर्त्तते ।। ९ ।। अस्यार्थः ।। यथा नाममात्रं वधूनां वा पुरुषाणां परिवेष्ठितवसनं तदपिसूत्रमस्ति प्रकटितं ।। यथा घटशरावादि मृद्भांडमपि मृत्तिकेत्येव सत्यं ।। ९ ।। सूत्र ।। तेवि द्रष्टादृश्य दसे । अतीतदृङमात्र जे असे तेणि द्रष्टा दृश्यमिषे ।। केवळ हा ।। १० ।। श्लोक ।। तद्वदृष्टत्वदृश्यत्वाद्भिन्नं दृङमात्रकेवलं ।। *

१० वोवि ।। जैसे अंवरनाम ।। येन्हवी तंतु सप्रेम ।। की घट शरावादि नेम ।। मृत्तिका जेवी ।। ९ ।।

पृष्ठ ५

. . .द्रष्टादृश्य वेगळे ।। दृङमात्र जे सोवळे ।। तेचि द्रष्टादृश्यत्वलीले ।। केवळ होय. . .।। अळंकाराच्या नावे ।। परि सोनेच आघवे ।। अयवा नानावयवे ।। अवयवी जसा ।।

* तदेवद्रष्टा दृश्यत्वमिषेनायं विराजते ।।१०।। अस्यार्थः ।। तथैवद्रष्टत्वदृश्यत्वदशातीतं यदृङमात्रमस्ति।। तच्चद्रष्टादृश्येतिव्याजेनायं केवलोपि ।। १० ।। सूत्र ।। अळंकार येणे नामे ।। असिजे निखळ हेमे ।। नाना अवयवसंभ्रमे ।। अवेविया जेवी ।। ११ ।। श्लोक ।। अलंकाराभिधानेन व्याप्यनेकनकेनच ।। नाना-वयवयोगेन अवयवी यथा भवेत् ।। ११ ।। अस्यार्थः ।। भूषणं नामाभिधानं याति तर्हिवस्तुनः कनक-मस्ति ।। यथानेकावयवसंभ्रमादवयवीभवति ।। ११ सूत्र ।। तेविशिवौनि पृथ्वीवरी ।। भासती पदार्थाचिये परि ।। प्रकाशते येकसरि ।। संविती हे ।। १२ ।। श्लोक ।। तथा शिवाद्धरांते च पदार्था भांति सर्वशः ।।

भुवंचैकेन कालेन संविद्योगेन गम्यते ॥ १२ ॥ अस्यार्थः ॥ तथा परशिवस्वरूपात पृथ्वीपर्यंतं भांति नानापदार्थप्रकाराः ॥ परंतु संविन्मात्रमिदं प्रकाशते ॥ १२ ॥ सूत्र ॥ नाही ते चित्र दाविति ॥ परि असे एकचि भिंति ॥ प्रकाशे तेवि संविति । जगदाकारे ॥ १३ ॥ श्लोक ॥ नानाकारेण चित्राणि कुड्डिमेकासुनिश्चिता ॥ तथा संवित्प्रकाशोपिजगदाकाररूपतः ॥ १३ ॥ अस्यार्थः ॥ नानाचित्रमभिनवाकारं यथा*

९ ॥ वोवि ॥ तेवि शिवापासून पृथ्वीपर्यंत ॥ पदार्थ भासति समस्त ॥ एकसरी प्रकाशत ॥ संवित्ति हे ॥ १२ ॥

पृष्ठ ६

वोवि ॥ नाहीपणे चित्र दावी ॥ परि ते एक भिंति वरवी ॥ प्रकाशे संवित्ति तेवि ॥ जगदाकारेसी ॥ ५ बांधा आणि मोकळ ॥ गुळाचि गोडी केवळ ॥ तया परि जग सकळ ॥ संविति हे ॥ १४ ॥

* दर्शयति परंतु तस्याधिष्ठानरूपाकुड्डिमेकासत्यत्वेनैवास्ति ॥ तथा संविज्जगदाकारेण प्रकाशते ॥ १३ ॥ सूत्र ॥ बांधयाचि मोडि ॥ बांधा न होनि गुळाचि गोडी ॥ तयापरि जग परवडि ॥ संविति जाण ॥ १४ ॥ श्लोक ॥ गुडपिंडे यथास्वादो ह्यपिंडेपि तथैवच ॥ तथा जगत्प्रकारोपि विद्धि संवित्सु निश्चितं ॥ १४ ॥ अस्यार्थः ॥ यद्वागुडपिडो विखंडितः सन् रुचिर्नभिन्ना भवति ॥ तथा जगत्प्रकारेण संविद्रहस्यमेकत्वेन विद्धि ॥ १४ ॥ सूत्र ॥ घडियेचेनि आकारे ॥ प्रकाशिजे जेवि अंबरे ॥ तेवि विश्वस्फूर्ति स्फुरे ॥ स्फूर्तिचि हे ॥ १५ ॥ श्लोक ॥ घटयाकारेण तेनैव अंबरं च प्रकाशितं ॥ तथैव विश्वस्फूर्त्याच स्फूर्तिरेवन संशयः ॥ १५ ॥ अस्यार्थः ॥ घटेश्वैवाकारेण यथांबरत्वं विलसितं ॥ तथा विश्वस्फूर्त्याचेत्यपरं स्फुर्तिरेव स्फुरति ॥ १५ ॥ सूत्र ॥ न लिंपिता सुखदुःख ॥ येणे आकारे क्षोभोनि नावेक ॥ होय आपणिया सन्मुख ॥ आपणचि जो ॥ १६ ॥ श्लोक ॥ न लिप्त्वा सुखदुःखाभ्यांक्षोभायित्वाणुमात्रतः ॥ स्वसन्मुखं स्वयंभूत्वा स्वयमेव विराजते ॥ १६ ॥ अस्यार्थः ॥ सुखदुःखाभ्यांनलिप्त्वायदाकारेण किंचित्*.. वोवी ॥ घडीचे रूपे करुण ॥ प्रकाशिजे प्रावर्ण ॥ तेवि होता विश्वस्फुरण ॥ स्फूर्त्तिचेनि ॥(?)॥

पृष्ठ ७

..दुखास न लिंपता ॥ आकारे नावेक उत्कर्षा येता ॥ होय आपुल्या...आपणचि जो ॥१६॥ ॥५॥ त्या नाव होणे दृश्याचे ॥ संवितीस आणिजे द्रष्टुत्व साचे ॥ वि.....

* क्षुभितो भूत्वाचात्मनो सन्मुखो यश्चात्माच भवति ॥१६॥ सूत्र ॥ तया नाव दृश्याचे होणे ॥ संविती द्रष्टत्व आणिजे तेणे ॥ विंबाविंबत्व जालेपणे ॥ प्रतिबिंबाचेनि ॥१७॥ श्लोक ॥ तदेव दृश्याकारत्वं संविद्‌द्रष्टत्वमाप्नुयात् ॥ बिंबे बिंबत्वमुत्पन्नं प्रतिबिंबस्य योगतः ॥१७॥ अस्यार्थः । तद्दृश्यमिति नाम्ना जातं तेनैव संविद्द्रष्टत्वं याति ॥ यथा प्रतिबिंबसंबंधेन बिंबस्य बिंबत्वं सिद्धमिति वक्तुं योग्यं भवति वस्तुतः ॥१७॥ सूत्र ॥ तेवि आपणचि आपुला पोटि ॥ आपणया दृश्य दावीत उठि ॥ द्रष्टा दृश्य दर्शन त्रिपुटि ॥ मांडेतें हे ॥१८॥ श्लोक ॥ तथा स्वयं स्वगर्भेच दृश्यं दर्शयति स्वयं ॥ द्रष्टा दृश्यं दर्शनंच त्रिविधं वर्तते तदा ॥१८॥ अस्यार्थः ॥ तथात्मापि आत्मनो उदरे आत्मानं दृश्यं प्रदर्शितः सन् समुथ्यितः ॥ तदा द्रष्टादृश्यदर्शनमिति त्रिपुटिलता विस्तीर्णा भवति ॥१८॥ सूत्र ॥ सूताचिये गुंजे ॥ आत वाहिर नाही दुजे ॥ तेवि तीनपणे विन जाणिजे ॥ त्रिपुटी हे ॥१९॥ श्लोक ॥ सूत्रपुंजवहिश्चांतः सूत्रमेवसुनिश्चितं ॥ तथा त्रिपुटिश्शून्यत्वात्त्रिपुटिं च विराजते ॥१९॥ अस्यार्थः ॥ यथैवाखंडितसूत्रसमुदायोपि* ९ वोवि ॥ तेवी आपण आपुले उदरी ॥ आपणा दृश्य दावी नाना परी ॥ दृश्य द्रष्टादर्शनलहरी ॥ विलसे तें हे ॥१८॥

पृष्ठ ८

२ वोवी ।। सुताचिये कंदुकी ।। आत बाहेर सूतच की ।। तेवि तिनपणावाचुन कवतुकी ।।........
५ वोवी ।। जैसे एकले एक मुख ।। देखिजे दर्पणी प्रतिमुख ।। ते वायाची देखिले सन्मुख ।। गमो लागे ।।
* बहिरंतः सूत्रंविना द्वितीयं नास्ति ।। तथा द्रष्टा दृश्यदर्शनमितित्रयं विना इयं त्रिपुटि ज्ञातव्या ।।१९।। सूत्र ।। जैसे नुसधेचि मुख असे ।। देखिजे दर्पणाचेनि आभासे ।। ते वायाचि देखिले ऐसे ।। गमो लागे ।।२०।। श्लोक ।। यथानिःशंकवदनं दर्पणेनैवभासते ।। वृथैवतत्प्रतिमुखं यदुपाधिवशात्किल ।।२०।। अस्यार्थः ।। यथाधिष्ठानभूतमेकमेवमुखं स्वस्थितः सन् ।। दर्पणोपाधिवशाद्यदग्रे भाति तद्वृथैवगम्यते ।।२०।। सूत्र ।। तैसे न वचता भेदा संविती गमे त्रिधा ।। हेचि जाण प्रसिद्धा ।। उपपत्ति इया ।।३१।। श्लोक ।। तद्वद्भेदं न लब्ध्वा च संविद्भाति त्रिधापि च ।। इदं विद्धि प्रसिद्धा च उपपत्या महामते ।।२१।। अस्यार्थः ।। तथा त्रिविधभेदं न लब्ध्वा संविदेव त्रिधा भाति ।। इदं सम्यक् विद्धि प्रसिद्ध उपपत्तिद्वारा संविद्ब्रह्मैव सत्यमद्वयमस्ति ।।२१।। सूत्र ।। दृश्याचा जो उभारा ।। तोचि द्रष्टत्व होय संसारा ।। या दोही माजिला अंतरा ।। दृष्टि पंगु होय ।।२२।। श्लोक ।। योपि दृश्यस्य संरंभः सद्द्रष्ट-त्वानुरूपकः उभयोर्मध्यदेशे तु दृष्टिः पंगुर्भवेद्ध्रुवं ।।२२।। अस्यार्थः ।। यद्दृश्यंचो *—
वोवि ।। जैसे भेदास न पारता ।। संवित्ति त्रिधा भासता ।। हेचि जाण तत्वता ।। युक्तिने या

पृष्ठ ९

२ वोवी ।। जो दृश्याचा उभारा होय ।। तो द्रष्टत्वास ठाय ।। या दोमध्ये होय ।। पंगु दृष्टी ।।२२
५ वोवि ।। मग जेव्हा नाही द्रष्टत्व ।। तेव्हा कैचे दृश्यत्व ।। आणि दृश्येविन काय द्रष्टत्व ।। मिरवत असे ।।२३।।

*—द्भव प्रकारः तदेव द्रष्टत्वं संसरति ।। यदुभयांनर्वर्त्ति दृष्टिस्तत्पंगूर्भवति ताटस्छमित्यभिप्रायः ।।२२।। सूत्र ।। मग द्रव्टत्व जेव्हा नाही ।। तेव्हा दृश्य घेऊन असे काही ।। आणि दृश्येवीन कायि ।। द्रष्टेपण असे ।।२३।। श्लोक ।। द्रष्टत्वं च यदा नास्ति तदा दृश्यं न गृह्यते ।। दृश्यं विना न द्रष्टत्वं एकं एकं विनानहि ।।२३।। अस्यार्थः ।। अहो द्रष्टत्वं यदा नास्ति तदा दृश्यं गृहित्वा किमस्ति अपीति दृश्यंविना द्रष्टत्वं किमस्ति ।।२३।। सूत्र ।। ह्मणोनि दृश्याचे जालेपणे ।। दृष्टि द्रष्टत्व होणे ।। पुढति ते गेलिया जाणे ।। तैसीच दोन्ही ।।२४।। श्लोक ।। तस्माद्दृश्यावतरणे दृष्टिद्रष्टत्वमुच्यते ।। पुनस्तद्विगतेनैवद्वंद्वं नास्ति कदाचन ।।२४।। अस्यार्थः ।। यद्यस्मात्कारणात् दृश्यस्य जननत्वेन दृष्टचा द्रष्टत्वं घटते ।। पुनः क्षणांतरे दृश्यं विगतः सन् द्वंद्वं समाप्ति याति ।।२४।। सूत्र ।। एवं एकाची जाली तिन्हि होति ।। तिन्हि गेलिया एकचि व्यक्ति ।। तरि तिन्हि हे भ्रांती ।। एकपण साचे ।।२५।। श्लोक ।। एकमेकेन त्रिविधं तन्नाशेचैकमेवच ।। तस्माच्चत्रिविधा भ्रांतिरेकत्वं सःसुनिश्चितं ।।२५।। ९ वोवि ।। ह्मणोनि दृश्य उठलिया ।। दृष्टि द्रष्टत्व ये वराया ।।
पुढति दृश्य गेलीया ।। दोन्ही नाही ।।२४।।

पृष्ठ १०

२ वोवि ।। एवं एकाचेचि भाग तिन्ही ।। तिन्ही गेलिया एकपणी ।। तरि लटिकेपणे तिन्ही ।। एक खरे ।।२५।। ६ वोवि ।। दर्पणाचे पूर्वी मुखी मुखाचि ठेवी ।। मध्ये दर्पणावलोकने दावि ।। भिन्न होउनि ।।२६।। अस्यार्थः ।। एवं एकस्योत्थाने त्रिविधं भवति ।। त्रयं विगते सति एकमेव व्यक्तिः ।। तर्हि त्रिविधं भाति तत्भ्रांतिरेकत्वं सत्यमिति ।।२५।। सूत्र ।। दर्पणाचे आधी सेखी ।। मुख असतचि असे मुखी ।। माजी दर्पण अवलोकी ।। आण काही होय ।।२६।। श्लोक ।। दर्पणात्पूर्वकालेपिवर्त्ततेच मुखे मुखं ।। मुकुरोपाधियोगेन द्वितीयं न भवेन्मुखं ।।२६।। अस्यार्थः ।। दर्पणावलोकनात्पूर्वावसरे मुखं मुखे-

स्छितं सम्यगस्ति ।। मध्ये दर्पणावलोकनेन द्वितीयं किं भवति ।।२६।। सूत्र ।। पुढे देखिजे तेणे वागे ।। देखिले ऐसे गमो लागे ।। परि दृष्टीचेनि वाउगे ।। जालेचि ते ।।२७।। श्लोक ।। अग्रेच पश्यन् तेनैव दृश्यते तीवमन्यते ।। परंतु दृष्टियोगेन वृथैवाभास्यमंडलं ।।२७।। अस्यार्थः ।। अग्रे यद्विलोकितः सन् इदं मया दृष्टमितिप्रत्ययोघटते परंतु निजदृष्टियोगेन तद्वृथैव जातं ।।२७।। सूत्र ।। ह्मणोनि दृश्याही वेळे ।। द्रष्टत्वाहि वेगळे ।। वस्तुचि स्फुरे निखळे।। आपणपेनि ।।२८।। श्लोक ।। तस्माद्दृश्यप्रसंगे तु द्रष्टत्वाच्चविलक्षणं ।। सर्वत्र वस्तुस्फुरणं *

१० वोवी ।। सन्मुख देखिजे तेन प्रसंगे ।। देखिले ह्मणोन उमगे ।। परि स्वदृष्टिचेनि योगे ।। मिथ्या जाले ।।२७।।

पृष्ठ ११

२ वोवि ।। म्हणोन दृश्यसमंधीहि ।। द्रष्टया तु वेगळे पाही ।। वस्तूचि स्फुरे स्फुरताहि ।। आपणचि ।।२८।। ६ वोवि ।। ध्वनीवाद्य जातिविन ।। वन्हीकाष्ठ जातिविण ।। तैसे ग्रासूनि विशेषपण ।। स्वताच असे ।।२९।। * – आत्मन्येव सुनिश्चितं ।।२८।। अस्यार्थः ।। तस्माद्दृश्यावसरेपि द्रष्टत्वाद्विलक्षणं वस्तुएव स्फुरति आत्मत्वेनापि ।।२८।। सूत्र ।। वाद्य जातेविन ध्वनी ।। काष्ठजातेवीन वन्ही ।। तैसे विशेष ग्रासुनि ।। स्वयेचि असे ।।२९।। श्लोक ।। वाद्यजातिविना नादो काष्ठ जातिविनानलः ।। तथा शेषं ग्रसित्वा तु स्वयमेवास्ति केवलं ।।२९।। अस्यार्थः ।। यथा वाद्यजातिविना ध्वनिः स्वभागेस्छितः ।। यद्वाकाष्ठजातिविना वन्हिः स्वभागे स्छितः ।। तथा विशेषं ग्रसित्वा स्वयमस्ति ।।२९।। सूत्र ।। जे म्हणोच नये कोनिही ।। जाणोचि नये कैसेनही नसताचि आथि नाही ।। असे नाजिये ।।३०।। श्लोक ।। यत्केनापि न वक्तव्यं ज्ञातव्यं न च केन वै ।। अस्ति नास्ति निरासत्वात्सद्भावेनैत्र तिष्ठति ।।३०।। अस्यार्थः ।। इत्थं भूतामिति यन्नामरूपाकारेण केनापि न वक्तव्यं केन प्रकारेण केनापि न ज्ञातव्यं ।। अस्ति नास्तीतिभावाभावाद्यदस्तिकत्वंच ।।३०।। सूत्र ।। आपुलिया बुबुळा ।। दृष्टि असुनि अखम डोळा ।। तैसा आत्मज्ञानि दुवळा ।। ज्ञानरूप जो ।।३१।। श्लोक ।। आत्मनो दृष्टि द्रष्टत्वा १० वोवि ।। जे कोनीही ह्मणोच नये ।। जे कैसेनि जाणोच नये ।। आहे ना हीनसता स्वये ।। असे ना जेथे ।।३०।।

पृष्ठ १२

वोवि ।। पाहावया बुबुळा ।। दृष्टि असून आंधळा ।। तैसा जाणावया दुवळा ।। ज्ञानरूप असून जो ।।३१।। ७ वोवि ।। जे ठायींच जाणने ।। निपटुन नाही नेणने ।। परी जाणने ह्मणोन जाणने ।। तेथे कैचे ।।३२।। द्द्रष्टा सन् चक्षुर्वर्जितः ।। तद्वदात्मपरिज्ञाने दुर्बलो ज्ञानरूपकः ।।३१।। अस्यार्थः ।। यथा आत्मनो दृष्टेर्द्रष्टत्वमस्तिचेत्तर्हि आत्मानं द्रष्टुमक्षमश्चक्षुर्भवति तथा यो ज्ञानरूपः सन् आत्मपरिज्ञाने दुर्बलो भवति ज्ञातुमसमर्थः ।।३१।। सूत्र ।। जे जाणनेचि की ठायी ।। नेणने कीर नाही ।। परि जाणने ह्मणोनिया ही ।। जाणने कैचे ।।३२।। श्लोक ।। यत्ज्ञातृत्वंच संपूर्णमज्ञातृत्वं न सर्वथा ।। परंतु ज्ञातृत्वमिति ज्ञातृत्वंनैव वर्त्तते ।।३२।। अस्यार्थः ।। स्वयं यश्चिन्मात्रत्वेन संस्छितं यत्रचित्पदेन मामहं न जानामीति वद ज्ञातृत्वं नास्तीति निश्चित्य परंतु इदं ज्ञेयमिति ज्ञेयत्वं क्वास्ति ।।३२।। सूत्र ।। यालागी मौनेचि बोलिजे काही न होनि सर्व होयिजे ।। न होता लाहिजे ।। काहीच नाही ।।३३।। श्लोक ।। यस्मान्मौनेन वक्तृत्वं किंचिद्भूत्वानशेषतः ।। न भूत्वा प्राप्यतेवस्तुकिंचिन्नैवचतद्ध्रुवं ।।३३।। अस्यार्थः ।। इति हेतुत्वान्मौनत्वेन वक्तव्यं किंचिन्नभूत्वा सर्वं भवितव्यं नभूत्वापि किंचिन्नास्ति तत्स्वीकार्यं ।।३३।। सूत्र ।। नानात्रोधाचिये सोयरिके ।। साचपण जेणे एके ।। *

११ ।। वोवि ।। यालागि बोलिजे मौने ।। काही न होनि सर्व होणे ।। न होता लाहने ।। काहीच नाही ।।३३।।

पृष्ठ १३

४ वोवी ।। यद्दा वोघाचे मीळनी ।। सत्यत्व ज्याचे एकपणी ।। नाना कल्लोळ श्रेणी ।। उदक जेवि ।।३४।।
८ वोवी ।। जे देखतेन विन ।। एकले देखतेपणाचि खुण ।। हे असो अपणास आपण ।। आपणचि जे ।।३५।।

* नाना कल्लोळ माळिके ।। पानी जेवी ।।३४।। श्लोक ।। नाना वोधस्य संबंधे सत्यत्वं येन जायते ।। यथा तरंगमालायां सलिलं परिपूरितं ।।३४।। अस्यार्थः ।। अथवा वोधस्यात्मसंबंधेपि सत्यत्वं येन एकेन सम्यक् भवति ।। यद्वातरंगमालिकायां परस्परमालिंगने यथा सलिलमधिष्ठानरूपमस्ति ।।३४।। सूत्र ।। जे देखीजतेविन ।। एकले देखतेपण ।। हे असो आपणीया आपण ।। आपणचि जे ।।३५।। श्लोक ।। यच्चावलोकनातीतमेकर्माक्षणमदभुतं ।। इदमस्त्वात्मनः स्वात्माह्यात्मत्वेनैव सर्वदा ।।३५।। अस्यार्थः ।। यद्दृष्टिगोचरत्वंविना एकमेवद्रष्टत्वमस्ति ।। इदमस्तु आत्मनो आत्मत्वेन आत्मरूपं यत् ।।३५।। सूत्र ।। जे कोन्हाचे नव्हतेन असने ।। जें कोन्हाचे नव्हता दिसने ।। जे कोन्हाचे नव्हता भोगने ।। केवळ जो ।।३६।। श्लोक ।। यदस्ति त्वमहेतुत्वाद्यद्व्याप्तत्वं तथैवच ।। निर्हेतुत्वाच्चमोक्तृत्वं केवलं यन्निरंतरं ।।३६।। अस्यार्थः ।। यत्कस्यसंभूतिं विना अस्तिकत्वेन संस्थितं ।। यत्कस्यसंभूतिं विना दृश्यते ।। यत्कस्य न भूत्वाभोक्तृत्वं तत्केवलो यस्तिष्ठति ।।३६।। ११ वोवी ।। जे कोन्हाच्या होण्याविन असन। जे कोन्हाचे न होता दिसनेपण ।। जे कोन्हाचे न होता भोगनेपण ।। केवळ जो की ।।३६।।

पृष्ठ १४

६. वोवि ।। तया वटेश्वराचा तु पुत्र ।। जसा कर्पूररवा स्वतंत्र ।। चांगया मज तुज आपणयाचा पवित्र ।। वचनार्थ ऐके ।।३७।।

सूत्र ।। तया पुत्र तु वटेश्वराचा ।। रवा जैसा कापुराचा ।। चांगया मज तुज आपणयाचा ।। बोल ऐके ।।३७।। श्लोक ।। तद्वटेशसुतस्त्वंहि कर्पूरस्य यथा रजः। भो चांगदेव तव मे चात्मनो वचनं श्रुणु ।।३७।। अस्यार्थः ।। एवं पूर्वोक्त षट्त्रिंशत्सूत्रैर्यो वर्णितः ।। तस्य वटेश्वरस्य त्वं पुत्रोसि पुन्नां नरकात्त्रायतेऽसौ पुत्रः ।। इत्यनेन सत्पुत्रत्वं त्वयि राजते कथं यथा कर्पूरस्यांशः परिमलोपि न तद्भिन्नः ।। हे चांगदेव निर्गुणत्वात्सगुणानां देवानां निर्मलोसि ।। तस्मान्मेतत्वैक्यत्वेन आत्मनो वाक्यं श्रृणु ।।३७।। सूत्र ।। ज्ञानदेव ह्मणे ।। तुज माझा बोल ऐकणे ।। ते तळहाता ताळी देणे ।। स्वये जेवी ।।३८।। श्लोक ।। उवाच ज्ञानदेवोहि तवमे श्रवणं शुभं ।। श्रोतव्यं तालिकान्यायात्स्वयमद्वैतभावतः ।।३८।। अस्यार्थः ।। ज्ञानदेव उवाच यदि तव मे शब्दश्रवणकर्त्तव्यं तत्करतालिकान्यायेन भवति ।।३८।। सूत्र ।। वोलेचि बोल ऐकिजे ।। स्वादेचि स्वाद चाखिजे ।। का उजीवडे देखिजे ।। उजीवडा जेवि ।।३९।। श्लोक ।। शब्देन शब्दः श्रोतव्यः स्वादे*

१० वोवि ।। ज्ञानदेव ह्मणे कौतुक ।। तु माझा बोल ऐक ।। ते तळहातावरि ताली अवश्यक ।। स्वता जैसी ।।३६।।

पृष्ठ १५

२. वोवि ।। वोले वोल ऐकने ।। स्वादेचि स्वाद चाखने ।। उजिवडे देखने ।। उजिवडाते ।।३९।।
७ वोवि ।। जसा सुवर्णकस सुवर्ण ।। मुखा मुखचि दर्पण ।। मज तुज संभाषण ।। चक्रपाणी तसे ।।४०।।

*न स्वादचर्वणं ।। प्रकाशेन प्रकाशस्य दर्शनं घटते यथा ।।३९।। अस्यार्थः ।। शब्देन शब्द श्रोतव्यः ।। स्वादेन स्वादः स्वादितव्यः प्रकाशेन प्रकाशो द्रष्टव्यो यथा ।।३९।। सूत्र ।। सोनयाचा कल सोने जैसा ।। का मुखा मुख होय आरिसा ।। मज तुज संवाद तैसा ।। चक्रपाणी ।।४०।। श्लोक ।। सुवर्णस्य कसः मुखस्य मुकुरे मुखं ।। संवादस्तवमे तद्वच्चक्रपाणे परंतप ।।४०।। अस्यार्थः ।। सुवर्णस्य कसः कांतिर्वापुष्टत्वं

सुवर्णं यथा किंवा मुखस्यादर्शो मुखंमेतवसंवादस्तथैव चक्रपाणे ।। शमदमादिवाहकं संकल्पविकल्पातीतं मनोचक्रं करे यस्य स चक्रपाणि: ।।४०।। सूत्र ।। गोडिये आपुली गोडी ।। घेता काय न माय तोंडी ।। आम्हा परस्परे आवडी ।। तो पाडु असे ।।४१।। श्लोक ।। स्वादेन चात्मन: स्वादग्रहणेन मुखे-स्थित: ।। तुल्यं परस्परेनैव उभयोर्व्यसनं तथा ।।४१।। अस्यार्थ: ।। स्वादेन स्वात्मनः स्वादोपिगृण्हन् सन् स्वादस्यमुखे संपूर्णो किं न भवति तथा यूयं परस्परत्वात्सश्रद्धाभावोस्ति ।।४१।। सूत्र ।। पै सखया* ११ वोवी ।। आपुली गोडी गोडिये ।। घेता का तोंडि न माये ।। परस्पर आवडीचि सोय ।। तो भाव असे ।।४१।।

पृष्ठ १६

४. वोवि ।। पै सज्जना तुझ्या प्रीत्यर्थ ।। भेटावया जिवी स्वार्थ ।। परि सिद्धभेटि विपरितार्थ ।। ऐशा भेणे ।।४२।। तुझेनि उद्देशे ।। भेटावया जीव उल्हासे ।। कि सिदी भेटी विसकुसे ।। ऐसिया बिहो ।।४२।। श्लोक ।। हे सखेति तवोद्देशाद्दर्शनार्थेतनुभृत: ।। उत्सुकस्तत्रप्राक्भावनष्टत्वाच्चभयं मयि ।।४२।। अस्यार्थ: । एवंभूत: सन् हे सखे तवोद्देशात् दर्शनार्थे जीवोतिशयेनोल्लसति ।। किंतु निरुपाधिक-सिद्धदर्शनस्यांतरायो भवति तेन भयं वहामि ।।४२।। सूत्र ।। घेवो पाहे तुझे दर्शन ।। तेथे दर्शना होय अवजतन । तव रूपा येवो पाहे मन ।। ऐसे गमो लागे ।।४३।। श्लोक ।। दर्शनं तव गृण्हन् सन् दर्शनं प्राग्विनश्यति ।। रूपे स्वयं मनोयात्मेवं भावोहि गम्यते ।।४३।। अस्यार्थ: ।। ग्रहणकर्त्तुमिच्छामि तव दर्शनं तत्र पूर्णदर्शनस्य व्ययत्वं घटतेपि तदात्मनो भाव: रूपं प्रति आगमन कर्त्तुं पश्यति ।। एवं मयि शंका वर्त्तते ।।४३।। सूत्र ।। काही करी बोले कल्पी ।। का न करी न बोले न कल्पी ।। इये दोन्ही तुझ्या स्वरूपी ।। न घेती उमसु ।।५४।। श्लोक ।। किंचित्कर्त्तुं च वक्तुं च नैवचोभयकल्पना ।। द्वंद्वं तव स्वरूपे तु राजते नैव सर्वथा ।।४४।। अस्यार्थ: ।। तर्हि किं तत्राह ।। किंचि*

९ वोवि ।। घेवो ह्मणे तुझे दर्शन ।। तेथे भेदास अवतेण ।। व्यक्तिसमनेयावया इछिजे ।। गमे ऐसे ।। ४३ ।।

पृष्ठ १७

२ वोवी ।। काही करणे बोलने कल्पने ।। का न करणे न बोलणे न कल्पने ।। हे द्वंद्व तुझ्या सन्निधाने ।। विश्रांति न पवे ।।४४।। ६ वोवि ।। चांगया तुझे अभिधाने ।। नव्हे करणे न करणे ।। हे काय ह्मणावे परि......।।४५।।

* त्कृत्वंवक्तृत्वं कल्पना किंवा न कर्तृत्वमवक्तृत्वमकल्पना इति द्वंद्वं तव स्वरूपेनोथ्थितं भवति ।।४४।। सूत्र ।। चांगया तूझेनि नावे ।। करणे न करणे न व्हावे ।। हे काय ह्मणो परि न धरावे ।। मीपणही ।।४५।। श्लोक ।। चांगदेवहित्वन्नाम्ना न युक्तं कृतमकृतं ।। इदं किंबहुना तात नाहं त्वं धारणं कुरू ।।४५।। अस्यार्थ: ।। चांगदेव इति देवोत्तम तवाभिधानेन कर्त्तव्यमकर्त्तव्यंनचोद्भूतं ।। इदं किं वक्तव्यं परंतु अहमिति भावमघृत्वापि नि:संगोभव ।।४५।। सूत्र ।। लवण पानियाचा थावो ।। माजी रिघोनि गेले पाहो ।। तव तेचि नाही मा काय घेवो । मापजळा ।।४६।। श्लोक ।। सामुद्रिकं स्वाश्रयस्याप्यंतं द्रष्टुं निगर्छति ।। तत्र स्वयं विनष्टत्वात्केन तोयं विगण्यते ।।४६।। अस्यार्थ: ।। सलिलस्यांतो लवणं द्रष्टु-मिछयांत: प्रविशति तत्र तन्नास्ति तर्हि जलस्य प्रमाणं केन कर्त्तव्यं ।।४६।। सूत्र ।। तैसे तुज आत्मयाते पाही ।। देखो गेलिया मीचि नाही ।। तेथे तू कैचा कायि ।। नेणोचि होय ।।४७।। श्लोक ।। तथापि त्वां महात्मानं द्रष्टुं गछन्नहं नच ।। *

१० वोवि ।। लवण थाक घ्यावया ।। पानीया माजि रिघालिया ।। आपणचि नाही मातोया ।। मोजावे कोणे ।।४६।।

पृष्ठ १८

२ वोवि ।। तैसे तुते पाहो जाता ।। मीचि नाहि तत्वता ।। तेथ तु कैचा आता ।। नकळे काहि ।।४७।।
६ वोवि ।। जो निद्रादेखे जागृति ।। तो देखनेपणा मुके निश्चिति ।। तसं तुतं पाहून मी प्रस्तुति ।। काही न होउन असे ।।४८।।

* तत्रत्वंचकुतः किवानज्ञत्वं च भवेद्ध्रुवं ।।४७।। अस्यार्थः ।। तथात्वामात्मानं प्रति द्रष्टुं गछन् सन्नह-मपि नास्ति तत्र त्वंकुतः कि तस्मादविज्ञातत्वं भवति ।।४७।। सूत्र ।। जो जागोनि निद देखे ।। तो देखणेपणा जेवि मुके ।। तेवि तुते देखोनि मी ठाके ।। काही न होनी ।।४८।। श्लोक ।। यो जागृदीक्षते-निद्रांसोपि द्रष्टत्वविन्मुखः ।। तथात्वामपिदृष्ट्वाच तिष्ठामि नच किंचनः ।।४८।। अस्यार्थः ।। यो जागृदवस्छायां निद्रां पश्यति सद्रष्टत्वाद्विन्मुखो भवति ।। तद्वत्त्वांदृष्ट्वाहं किंचिन्नभूत्वास्छितोस्मि ।।४८।। सूत्र ।। आंधाराचे ठायी सूर्यप्रकाश तव नाही ।। परि मी आहे हे काही ।। न वचेचि जेवी ।।४९।। श्लोक ।। अंधकारे महाघोरे न तु सूर्यप्रकाशकः ।। तत्रैवाप्यहमस्मीतिनभवेन्निजविस्मृतिः ४९।। अस्यार्थः ।। अंधकारे सूर्यप्रकाशो नास्ति परंतु अहमस्तिदंनष्टं न भवति ।।४९।। सूत्र ।। तेवि तुते मी गीवसी ।। तेथे तूपण मीपणेसी ।। असते पडे ग्रासी ।। भेटीचि उरे ।।५०।। श्लोक ।। तद्वच्चत्वामहं पश्यन् तत्रत्वमहमित्यपि ।। अस्तित्वात्पतितंग्रा *

१० वोवि ।। नक्त समयी पाहता ।। भास्करप्रकाश नसता ।। परी मी आहे हा अनुभव चित्ता ।। सोडीच ना ।।४९।।

पृष्ठ १९

२ वोवि ।। तेवि तुते मी गिवसू पाहे ।। तेथ तुपण मीपणेंसी न राहे ।। असतेचि ग्रासी जाय ।। दर्शन उरे ।।५०।। ६ वोवी ।। डोळियाचे भूमीवरी ।। डोळा चित्र होय वहुता परी ।। तेणे संतोपयुक्त अंतरी. ....।।५१।।

* सेवशिष्टं दर्शनं किलं ।।५०।। अस्यार्थः ।। तथा त्वां प्रति अहं संपादनार्थमुद्योगं कुर्वन् सन् तत्र त्वं भावोप्यहं भावसहितः लीनो भूत्वादर्शनमवशिष्टमिति ।।५०।। सूत्र ।। डोळियाचे भूमिके ।। डोळा चित्र होय कौतुके ।। आणि तेणेचि तो तोखे ।। न डंडळिता ।।५१।। श्लोक ।। चक्षुर्भूम्यां स्वतःसिद्धश्चक्षु-श्चित्रैव कौतुकात् ।। अपितेनैव संतुष्टश्चंचलत्वंविना सदा ।।५१।। अस्यार्थः ।। नेत्रस्य भूम्यां नेत्रं कौतुके-न चित्रं भवति ।। अपि तेनैवतुष्यति न चांचल्यत्वात् ।।५१।। सूत्र ।। तैसी उपजविता गोष्टी ।। न फुटता दिठि ।। मोतूपणेवीन भेटी ।। माझी तुझी ।।५२।। श्लोक ।। तद्वद्गुह्यव्यतांचोक्ति दृष्टिर्नैव विचाल्यतां अहं त्वं च विनासम्यक् दर्शनं मे तवैचहि ।।५२।। अस्यार्थः ।। तथैववाक्यत्नजनेपि न दृष्टिर्दलिता अहं त्वंविनामेतवाभेददर्शनलाभोस्ति ।।५२।। सूत्र ।। आता मी तू या उपाधी ।। ग्रासोनिया भेटी नुसधी ।। तो भोगीयेंही अनुवादी ।। घोळघोळी ।।५३।। श्लोक ।। यद्वाभेदद्वयग्रासाद्दर्शनंचैवनिर्मलं ।। तद्भूत्काप्यनुवादेन *

९ वोवी ।। तैसी गोष्टी उपजविता ।। निज दृष्टी न फुटता ।। मोतु पणे विण आयिता ।। दर्शन लभ ।।५२।।

पृष्ठ २०

२ वोवि ।। आता मी तु उपाधिपासूनि ।। भेटी अखंड एकपणी ।। तेच भोगीया वचनि ।। पुढत पुढती ।।५३।।

* सूक्ष्मदृष्ट्या पुनःपुनः ।।५३।। अस्यार्थः ।। अथ अहंचत्वंचेति उपाधि प्रसित्वायत् सिद्धदर्शनं तद्भोक्तु योग्यं वस्त्रपूतंकृत्वा त्वं ग्रहाण ।।५३।। सूत्र ।। रूचतियाचेनि मिषे ।। रूचिते जेविजे जैसे ।। का दर्पण व्याजे दिसे ।। देखते जेवी ।।५४।। श्लोक । माधुर्यत्वमिषेनैवरुचिरंभोजनं यथा ।। अथवा दर्पणव्याजा-

त्स्वयमेव हि दृश्यते ॥५४॥ अस्यार्थः ॥ स्वादिष्टरसज्ञमिषेणै *स्वादिष्टं यथा सेवितुं योग्यं ॥ तथा दर्पण व्याजेन द्रष्टत्वं दृश्यते ॥ ५४॥ सूत्र ॥ तैसी अप्रेमेये प्रमेयी भरलि ॥ मौनाचि अक्षरे भलि ॥ रचोनि गोष्टी केली ॥ मिठीयेंची ॥५५॥ श्लोक ॥ अप्रमेयानि तद्वच्च प्रमेयेतुप्रपूरिताः ॥ मौनाक्षरान् रचित्वातु चोक्तिरैक्यान्विताकृता ॥५५॥ अस्यार्थः ॥ तथाऽ प्रमेयेन प्रमेयं पूरितं मौनस्याक्षराणि सुष्ठु रचित्वा तु वाक्यमाला कृता माधुर्यत्वेन ॥५५॥ सूत्र ॥ इयंचे करुणि व्याज ॥ तू आपणयाते बुझ ॥ दीपदीपपणे पाहे निज ॥ आपुले जैसे ॥५६॥ श्लोक ॥ एवं पूर्वोक्तिहेतुत्वात्त्वमात्मानं विलोकय ॥ दीपोदीपत्वयोगेन यथात्मानं विलोक्यते ॥५६॥ अस्यार्थः ६ वोवि ॥ रुचितीयाचे व्याजे ॥ जसे रुचिते जेविजे ॥ का दर्पणमिषे देखिजे ॥ देखते जसे ॥ ५४॥

९ वोवि ॥ तैसी प्रमेयी अप्रमेयत्व रे ॥ भरली मौनाचि अक्षरे ॥ ग्रथोन गोष्टी केली परिकरे ॥ ऐ

पृष्ठ २१

....करुणमिष ॥ तु आपणा समज निशेष ॥ दीप दीपपणे निर्दोष ॥ पाहे निजस्वरूप ॥५६॥

....सी गोष्टी जे केली ॥ तया दृष्टी उघडली ॥ ते आपणेनसी जाली ॥आपणया आटी ॥५७॥

....मेषंकृत्वात्त्वमात्मानं पश्य दीपोदीपकत्वेन यथा स्वं पश्यति ॥५६॥ सूत्र ॥

तैसी केलिये गोष्टि ॥ तया उघडिजे दृष्टि ॥ ते आपणेनसी आटी ॥ आपणपया ॥५७॥ श्लोक ॥ तथामद्गदितं वाक्यं विशालनयनेनच ॥ तदात्मसहितं शून्यमात्मत्वेन सुशोभितं ॥ ५७॥ अस्यार्थः ॥ तथा मया चर्चाकृता उन्मनिदृष्टचा ॥ तत् आत्मनासह लयो भवति आत्मन्येव ॥५७॥ सूत्र ॥ जालया प्रळयी एकार्णव ॥ अपार पानियाची धाव ॥ गिळी आपुला उगव ॥ तैसे करी ॥५८॥ श्लोक ॥ एकाधि प्रलये भूत्वाह्यमितं जलधावनं ॥ ग्रसित्वा चोद्भवस्छानं तथैव कुरु निश्चितं ॥५८॥ अस्यार्थः ॥ प्रलयेपि एकार्णवभूतः सन् अपारोदकस्य प्रवाहो स्वमूलमात्माधिष्ठानं ग्रसित्वा यथास्ति तथा कुरु ॥५८॥ सूत्र ॥ ज्ञानदेव ह्मणे नामरूपे ॥ विन तुझे साच आहे आपणपे ॥ ते स्वानंदजीवन पे ॥ सुखिया होयी ॥५९॥ श्लोक ॥ ज्ञानदेव उवाचेदंनामरूपंविनातव ॥ आत्मत्वं सत्यमानंदामृतं पीत्वा सुखी भव ॥५९॥ अस्यार्थः ॥ *

९ वोवी ॥ प्रळयी एकार्णव जालया ॥ अपार धाव पानिया ॥ गिळी उगवा आपुलीया ॥ तैसे करी ॥५८॥

पृष्ठ २२

२ वोवि ॥ ज्ञानदेव ह्मणे नामरूपावाचुन ॥ तुझे आहे आपुलेपण ॥ तेथे स्वानंदजीवन ॥ सुखरूप होयी ॥५९॥ ५ वोवि॥ पुढत पुढती चांगेया ॥ ज्ञानसंपत्ति घरा आलिया ॥ वेद्य वेदकत्व मागे टाकोनिया ॥ निजपदा वसे ॥६०॥ * ज्ञानदेवेनेदं चोक्तं नामरूपंविना तवसत्यत्वमात्मत्वेन तत्स्वानंदजीवनं पीत्वा सुखी भव ॥५९॥ सूत्र ॥ चांगया पुढतपुढती ॥ घरा अलिया ज्ञानसंपत्ति । वेद्यवेदकत्वाही अतीति ॥ पदी बैसे ॥६०॥ श्लोक ॥ मुहुर्मुहुष्चांगदेवज्ञानसंपद्गृहेपिच ॥ आगतेवेद्यविच्चांते पदे त्वं संस्छिरो भव ॥६०॥ अस्यार्थः ॥ चांगदेव मुहुर्मुहुः गृहेज्ञानसंपत्स्वयमागतार्तहि वेद्यवेदकातीतपदेहचुपविष्टो भव ॥६०॥ सूत्र ॥ जे मज तुझेनिव्याजे ॥ माउलीया श्रीनिवृत्ति राजे ॥ स्वानुभव रसाळ खाजे ॥ दीधले लोभे ॥६१॥ श्लोक ॥ यन्मेतु तवहेतुत्वान्निवृत्ति कृपया इदं ॥ सरसंस्वानुभावैकं खाद्यं दत्तं सलोभतः ॥६१॥ अस्यार्थः ॥ यन्मेतव व्याजेन मातृरूपे श्रीनिवृत्तिनाथेन अनुभवरसभरितंखाद्यं लोभेन दत्तं ॥६१॥ सूत्र ॥ एवं ज्ञानदेवचक्रपाणी ऐसे ॥ दोन्ही डोळस आरिसे ॥ परस्परे पाहता जैसे ॥ मूकले भेदा ॥६२॥ श्लोक ॥ ज्ञानेश चक्रपाणिश्चोभौदृग्दर्पणौ किल ॥ परस्परैव पश्यन् सन् संजातौ भेदविन्मुखौ ॥६२॥

वोवि ॥...तुझेनि व्याजे मज॥ श्रीमन्निवृत्तिगुरुराजे ॥ रसभरित स्वानुभव खाजे ॥..

दीधले ॥६१॥

पृष्ठ २३

....ज्ञानदेव चक्रधर ।। दोह्नी डोळस मुकुर ।। पाहाता जैसे परस्पर ।। अभेद जाली ।।६२।।

....इया जोतिये परी ।। वोविया दर्पण करी ।। तो आत्मदर्शनाभीतरी । निज खुने मिळे ।।६३।।

अस्यार्थः ।। एवं ज्ञानदेव चक्रपाणी उभौतौ प्रकाशदर्पणौ यथापरस्परेण पश्यन् सन् भेदविन्मुग्नौ जातौ ।।६२।। सूत्र ।। तिग्रेपरि जो इया ।। दर्पण करील वोविया ।। तो आत्मदर्शनीया ।। मिळेल खुणे ।।६३।। श्लोक तत्प्रकारेण सूत्राणां दर्पणं यः करिष्यति ।। सचात्मदर्शने साक्षात्सामरस्य-मुपैतिव ।।६३।। अस्यार्थः ।। तद्वत्तत्प्रकारेण यो इदं सूत्ररहस्यंदर्पणं करोति स एवात्मदर्शनं प्रति संज्ञा-रूपसुखेन मिलति ।।६३।। सूत्र ।। नाही तेचि काय नेणो जैसे ।। दिसतेचि कैसे नेणो दिसे ।। असतचि नेणो आपैसे ।। तेकी होयिजे ।।६४।। श्लोक ।। नतत्किनत्तुविज्ञानंदृश्यते किं न दृश्यते ।। आसीत्तेनैव नायासात्तन्मयं भावयेत्सदा ।।६४।। अस्यार्थः ।। नास्ति तत्कियया न ज्ञायते दृश्यते तत्किं न दृश्यते ।। अस्तिकत्वेन तन्नज्ञायते अनायासेन तदेव भूत्वास्थिरो भव ।।६४।। सूत्र ।। निदेपरौतेनिदैजने ।। जागृती गिळोनिजागणे ।। करी ते ज्ञानदेव ह्मणे। । गुंफणे हे (णिजेत नसे इति कश्चित्पाठः) ।।६५।। श्लोक ।। निद्रातीताचयानिद्रा जागृत्पीत्वाच जागृतिः ।। *

१० ।। वोवि ।। काय नेणो जसे नाही तेची ।। कैसे नेणो दिसे दिसतची ।। आपैसे नेणो असतेचि ।। होयिजे ते की ।।६४।।

पृष्ठ २४

३ वोवि ।। निद्रेपलीकडे निजने ।। जागृति गिळोनि जागणे ।। करीते ज्ञानदेव ह्मणे ।। गुह्य ग्रथन हे ।।६५।। कर्त्तव्यं तत्कुरू प्राज्ञ ज्ञानदेवेन सूचितं ।।६५।। अस्यार्थः ।। निद्रातीतनिन्द्रां सुखमनुभाव्यं जागृदवस्छांग्रसित्वा जागृद्भावः ।। कुरुतदिति ज्ञानदेवेन प्रोक्तं गुंफणाख्यं ।।६५।। इदंपंचाषष्टीतिसूत्र-सहितमुभयसिद्धसंवादरहस्यं दिव्यंलिखितं तस्योपरि श्रीमत्सहजबोधसिद्धस्यानुचरेण शिशुकृष्णेन स्वछंदेन बालभाषयाटिप्पणं कृतं तत्समाप्तिमगमत् ।। छ ।। छ ।। छ ।। छ ।।

३ श्लोक श्रीमत्सहजबोधस्यसिद्धस्यानुचरेणच ।। पंचाषष्ठीतिसूत्राणां टिप्पणं रचितं शुभं ।। १ ।। छ ।। छ ।।

३ श्लोक एवंच पंचषष्ठीति सूत्राणि विविधानिच ।। ज्ञानेश्वरकृतानीह निर्वाणपदसिद्धये ।। छ ।। छ ।। छ ।। छ ।।

वोव्या ।। .त्रिशत्सूत्री ।। चांगदेवाचे सुक्षेत्री ।। ज्ञानदेवे लिहिले पत्री ।। स्वरहस्य ।।४।। याना [व चांगदेव] पासष्टी ।। येथे उघडली ज्ञानदृष्टी ।। दाविली संवित्सृष्टी ।। सृष्टिसंवित्ति ।।५।। . रहस्यप्रकरणं संपूर्णं श्रीरामकृष्णार्पणमस्तु ।।छ।। मूळ सूत्र ।।६५।। टी. ।। श्लोक ।।६७।। वोव्या ।।७०।।

चांगदेव पासष्टीचे चारशे वर्षांपूर्वीचे संस्कृत गद्यपद्य रूपांतर

—प्रा. म. शं. वावगावकर, नागपूर विद्यापीठ

प्राप्तिस्थल

प्रस्तुत हस्तलिखित नागपूर जिल्ह्यातील सावनेर तालुक्यातील पाटणसावंगी येथे मिळाले. पाटणसावंगी हे प्राचीन गाव असून पैठण येथील एकनाथांच्या घरच्या श्रीखंडयाच्या रांजणासारखा प्रचंड भूमिगत दगडी तळ-घरवजा पाणी भरण्याचा रांजण तेथील पुरातन गणेश मंदिरात आजहि पाहावयास मिळतो. पाचशे वर्षांपासून तेथे नांदलेल्या व आमचे आप्त असलेल्या पुराणकर नामक तेथील विद्वान् ब्राह्मण घराण्यात ही पोथी

उपलब्ध झाली. तिची मुद्रणप्रत मित्रवर्य प्रा. डॉ. वि. बा. प्रभुदेसाई ह्यांनी तसेच प्रा. सौ. मंगला वावगावकर ह्यांनीहि करून दिली. व मूळ हस्तलिखितावरून ती तपासून घेण्याच्या कामी कविवर्य अनिलांनी परिश्रमपूर्वक साहाय्य केले. ह्या सर्वांचे आम्ही ऋणी आहोत.

हस्तलिखिताचे अंतरंग

पोथी संपूर्ण असून तिची बारा पाने म्हणजे चोवीस पृष्ठे आहेत. पानांचा आकार २४ × १२ मिलिमीटर असून त्यावर दोन्ही बाजूस लाल रेषा काढून समास दर्शविले आहेत. कागद पिवळसर व फार जुना असून लेखन बोरूच्या लेखणीने काळ्याभोर महाजनी मसीने केलेले दिसते. अक्षर वळणदार व व लेखन सुवाच्य आहे. मधून मधून मजकुरात शब्द सुटलेल्या जागी ⌣ असे चिन्ह करून त्या स्थलींचे शोध समासात नमूद केले आहेत. पानांना क्वचित् छिद्रे पडली असून काही ठिकाणी पाने कडेला दुमडली व फाटली आहेत.

अंतरंग विशेष

पासष्टीचा संस्कृतात समश्लोकी पद्यानुवाद करण्याचा लेखकाचा मूळ हेतु दिसतो. त्या पद्यानुवादावर संस्कृत गद्य भाष्यहि त्याने केले आहे. ज्ञानेश्वरांच्या मूळ ओव्यांचा सोप्या मराठीत समओवी अनुवाद करावा असेहि त्याने नंतर योजिलेले दिसते. स्वतःच्या मराठी समओवीला त्याने 'वोवी' असे म्हटले असून ज्ञानेश्वरांच्या मूळ ओव्यांना सर्वत्र 'सूत्र' म्हटले आहे. चांगदेव पासष्टीची एक संस्कृत समश्लोकी कै. स. म. दिवेकर ह्यांनी भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक वर्ष १२ अंक ३ मध्ये छापिली होती. तिच्यात मात्र ज्ञानेश्वरांच्या मूळ ओव्यांनाच 'वोवी' असे म्हटले असून संस्कृत समश्लोकीला 'श्लोक' म्हटले आहे. तिच्यात संस्कृत गद्य भाष्य नाही व मराठी समओवीहि नाही. प्रस्तुत हस्तलिखितात संस्कृतातील भाष्यलेखन पद्धतीला अनुसरून त्याने काही शास्त्रवचनेहि उद्धृत केली आहेत. ती लाल रंगाने रंगवून स्वतःच्या मजकुराहून त्यांचे पृथक्त्व दर्शविले आहे. जसे "प्रघ्वस्ताखिल मोहोऽपि लोककार्यार्थमात्मविद्" हे वचन आरंभ भागातच येते. प्रत्येक पृष्ठाक्र अकरा ओळी लिहून उरलेली जागा आरंभी मोकळी सोडलेली दिसते. नंतर ह्या मोकळ्या जागेत शिरोभागी व अधोभागी लेखकाने स्वकृत मराठी समओव्या लिहिल्या आहेत व अधून मधून समासात उजव्या डाव्या बाजूंना संस्कृत श्लोकहि लिहिले आहेत. मध्येच येणाऱ्या त्याच्या स्वकृत ओव्यांमुळे संस्कृत अनुवादात खंड पडलेला आहे. तुटलेले हे खंड जुळवून सलग वाचता यावे ह्यासाठी मुद्रितात त्या त्या स्थळीं * असे चिन्ह छापलेले आहे.

पोथीच्या पहिल्या व चोवीसाव्या पृष्ठांचे ठसे आवरणपृष्ठ दोनवर मुद्रित केलेले आहेत. शेवटल्या दोन ओळीतली काही अक्षरे उडून गेली असली तरी ग्रंथाचे नाव **चांगदेवपासष्टीरहस्य** असे असावेसे दिसते. त्यात मूळ सूत्र ६५, टीकाश्लोक ६७ व स्वकृत ओव्या ७० असल्याचे लेखकाने अंतीं नमूद केले आहे.

लेखक व त्याचा काळ

लेखनकालाचा निर्देश हस्तलिखितात नाही. तथापि 'श्रीमत्सहजबोधसिद्धस्यानुचरेण शिशुकृष्णेन' म्हणजे सहजबोधांचा शिष्य असलेल्या शिशुकृष्णाने हे लिहिले असल्याचा निर्देश अंतीं येतो. स्वच्छंदाने बालभाषेत हे टिपण लिहिले असल्याचेहि तो म्हणतो. त्याअर्थी मराठी समओवीचा कर्ता शिशुकृष्ण आहे हे निश्चित्. अमृतानुभवावर श्रीहंसराजस्वामींनी रचलेली मराठी समओवी (लेखनकाल शके १७६०) उपलब्ध आहे. ज्ञानेश्वरीवर प्रा. कु. विमल लेले व प्रा. डॉ. श्री. भा. वर्णेकर ह्यांच्या मराठी समओवी रचना अलिकडे झालेल्या आहेत. तथापि चांगदेवपासष्टीवरची ही प्राचीन मराठी समओवी टीका येथे प्रथमच प्रकाशात येत आहे.

चांगदेवपासष्टीवरील एक संस्कृत समश्लोकी अलिकडे श्री. पां. ज्ञा. कुलकर्णी ऊर्फ पांडुरंग शर्मा ह्यांनी केलेली श्री. वि. त्र्यं शेटे ह्यांनी प्रसिद्ध केली आहे. एक जुनी संस्कृत समश्लोकी कै. स. म. दिवेकरांनी भा. इ. सं. म. त्रै. व. १२, अं. ३ मध्ये छापल्याचा उल्लेख वर आलाच आहे. ती त्यांना एदलाबादला रा. शंकर विष्णु कुरंभटी यांच्या रुमालात उपलब्ध झाली होती. तिच्यात "कर्त्याने आपले नावाचा निर्देश केलेला नाही. आद्यंतीचे दोन श्लोक हे ग्रंथकर्त्याने प्रस्तावना व उपसंहार यांदाखल पदरचे घातले आहेत; बाकी प्रत्येक मूळ ओवीवर एकेकच अनुष्टुभ् संस्कृतात दिले आहे." (भा. इ. सं. म. त्रै. व० १२ अं० ३, पा. १०९) तात्पर्य, सहजबोध व शिशुकृष्ण ह्यांचा वा अन्य कुणाच्याहि कर्तृनामाचा निर्देश दिवेकरांच्या

प्रतीत नाही. त्या प्रतीतले संस्कृत श्लोक व प्रस्तुत प्रतीतले श्लोक हे सारखेच आहेत. तथापि ह्या प्रतीत संस्कृत गद्यभाष्य व मराठी समओवी **हे दिवेकर प्रतीत नसलेले दोन अधिक भाग आहेत व ह्या कृतीचा कर्ता सहजबोध शिष्य शिशुकृष्ण होय हे प्रस्तुत हस्तलिखितामुळे प्रथमच प्रकाशात येत आहे.**

दिवेकरप्रतीत आरंभी 'श्रीगुरुदत्तात्रेयायनमः' येते व अंतीहि 'श्रीसद्गुरुदत्तात्रयार्पणमस्तु' असे येते. ह्या प्रतीत हे नाही. तसेच दिवेकर प्रतीतील "हरिः ॐ तत्सदिति पंचषष्टिलिखित सूत्रपट्ट समाप्तः" हा शेवटहि ह्या प्रतीत नाही. दिवेकर प्रतीतील 'सूत्रपट्ट समाप्तः' ह्या शेवटावरून **तो मूळ ग्रंथ पासोडीवर लिहिला होता** असे दिसते. सहजबोध व शिशुकृष्ण **हे दासोपंतांचे समकालीन आहेत असे प्रस्तुत लेखात पुढे दाखविले आहे.** दासोपंतांच्या पासोडीप्रमाणे **हाही एक छोटीशी पासोडीच मुळात होती असे दिसते.** दिवेकरप्रतीत ३६ व्या श्लोकानंतर 'इतिपूर्वार्द्ध' असे म्हटले आहे. तसे येथे नाही.

सहजबोध व शिशुकृष्ण ह्यांचा उल्लेख चांदोरकरांच्या संतकविकाव्यसूचित नाही. तसाच महाराष्ट्र सारस्वताच्या नवीनतम ५ व्या आवृत्तीतही नाही. प्रा. कृ. पां. कुलकर्णी संपादित "विवेकसिंधु" च्या प्रस्तावनेत छ प्रत म्हणून निर्दिष्ट असलेल्या एका हस्तलिखिताची माहिती येते. (विवेकसिंधु – कृ. पां. कुलकर्णी, १९५७, प्रस्तावना पृ. ८ व संहिता परिशिष्ट पान ३९) ही प्रत शके १६७८ मधली असून तिच्यावर पुढील मजकूर आहे :– आदावादिगुरुं हरिसुरवरं श्रीरामचंद्रं मुनिं । योगाधीश मुकुंदराज विबुधं श्रीमन्नृसिंहं परम् । सच्चिन्मात्र जगत्पतिचं **सहजं** श्रीरंगबोधं वरम् । वंदे केशवसंतमद्वयसखा आनंदपूर्ण नमः (पूर्णाय तुभ्यं नमः) ।। श्रीआदिनाथ हरिनाथ रघुनाथ मुकुंदराज योगी समर्थ ।। नृसिंह भारती जगन्नाथ । **सहज** रंगबोध केशवस्वामी ।।१ संतसखा पूर्णबोध । स्वयंबोध जो विशुद्ध । अखंड भोगी ब्रह्मानंद । पूर्णानंद सद्गुरु जो ।।१।। यावरून–

श्रीआदिनाथ – हरिनाथ – रघुनाथ – मुकुंदराज– नरसिंहभारती – जगन्नाथ – **सहजबोध** – रंगबोध – केशव – संतसखा – पूर्णबोध – ह्या गुरुपरंपरेचा बोध होतो. यातील केशव म्हणजे केशवस्वामी भागानगरकर असून त्यांचे गुरु रंगबोध ह्यांचा मठ मुडलगी येथे होता. त्यांच्याविषयी आवळीकरांनी लिहिले आहेच. (मुकुंदराजांची परंपरा - महाराष्ट्र साहित्य पत्रिका, अंक १२७, डिसेंबर, १९५९) केशवस्वामीशिष्य संतसखा हे चंद्रपूरचे. ह्यांची माहिती 'चितानिवारण' ग्रंथात येते. सहजबोधांचे कोनेरीबोध व कोनेरीबोधपुत्र रंगबोध हे उभयता शिष्य होते. रंगबोधांची रंगबोधिनी गीताटीका शके १५४८ सुमारची - त्यांचा समय शके १५१० ते १५८०. त्यांचा गुरुबंधु उद्योगपर्वकर्ता अमृत. आनंदबोध हे सहजबोधांचे पुत्र व उद्बोध हे त्यांचे नातू. (पहा– मुकुंदराजांची अंबानगरी कोणती – वि. अं. कानोले) सहजबोध परभणीजवळ कुंभकर्ण टाकळी येथे राहत. त्यांचा वंश अद्याप असून समाधिस्थळ शेतात आहे. ते मूळचे जिंतूरजवळील भोगावचे. पितृनाम विठ्ठल व मातृनाम रुक्मिणी. गोत्र शांडिल्य. कार्तिक शु. १५ हा त्यांचा समाधिदिन.

सहजबोधकथामृत, देशिकचरित्र, शिवरामकृत वंकटतरंगिणी ही सहजबोधांच्या चरित्राची साधने. यांवरून गोदातीरी कुंभकर्ण टाकळीला शके १४४० ते १५३५ ह्या काळात ते होऊन गेल्याचे कळते. त्यांच्या परंपरेतील भगवंत कवीचे सच्चिदानंदविलास काव्य उपलब्ध आहे (चांदोरकर सूचि, पा. ९९). सहजबोधांचे दौहित्र शिवकल्याणबोध व अमृतानुभवावर टीका लिहिणारे मुक्ताबाईंच्या परंपरेतील शिवकल्याण हे भिन्न होत.

शिवरामाच्या' वंकटतरंगिणी 'वरून सहजबोधांची बरीच माहिती मिळते. (भा. इ. सं. म. त्रै. व० ४६ अं० १ – ४ – प्रा. वा. ना. मुंडी ह्यांचा लेख) हा ग्रंथ शके १७०५ मधला आहे. सहजबोधांचे पूर्वाश्रमीचे नाव कमलाजीपंत. वृत्ति ग्रामलेखकाची. बेदरच्या बादशहाने द्रव्यासाठी त्यांना डोहात टाकले. ते गीतेचे उपासक होते. जलदेवता त्यांना भक्षू शकल्या नाहीत. आठव्या दिवशी नदीच्या काठावर आणून ठेवले. त्यांना नेण्यासाठी कुटुंबीय व ग्रामस्थ आले असता पाटी मागवून तिजवर त्यांनी "संबंध नाही तुम्हा आम्हा । जगन्नाथभारतीपाशी नेऊनि सोडा या देहासि" असे लिहिले. पुढे जगन्नाथ भारतींची १२ वर्षे त्यांनी सेवा केली. जगन्नाथ भारतींचा मठ गोदातीरावर गंगाखेडला होता. जगन्नाथ भारतींचा समय शके १४१० ते १४९० व **सहजबोधांचा समय शके १४४० ते १५३५ (इ. स. १५१८ ते १६१३)** असा प्रा. म. रा. जोशी

ह्यांनी निश्चित केला आहे. (जगन्नाथ भारती व सहज-बोध – प्रा. म. रा. जोशी, तरुणभारत, दिवाळी अंक १९७१) बेदरच्या यवन बादशहाने सहजबोधांना त्रास दिला. बेदरच्या यवन बादशहाने याच काळात दासोपंतांनाहि बाटविण्याचा प्रयत्न केला होता. तात्पर्य, सहजबोध हे एकनाथ व दासोपंत ह्यांचे समकालीन आहेत. **शिशुकृष्ण ह्या त्यांच्या आणखी एका शिष्याचे नाव ह्या हस्तलिखितामुळे प्रथमच** कळत आहे. शिशुकृष्णाविषयी अन्य कोणतीही माहिती आपणांस उपलब्ध नाही. तथापि तोहि त्यांचा समकालीन असल्याने त्याचा काळ स्थूलमानाने इ. स. १५२५ ते १६१० असा ठरतो. प्रौढ वयात त्याने हा चांगदेवपासष्टीरहस्य ग्रंथ लिहिला असे मानले तरी ह्या ग्रंथाचा **काळ इ. स. १५७५ च्या सुमारास तरी धरावाच लागतो. म्हणजेच प्रस्तुत चांगदेवपासष्टी टीका चारशे वर्षांपूर्वीची ठरते.**

ह्या हस्तलिखितात ६३ वी ओवी व तिची समश्लोकी पुढीलप्रमाणे आहेत. "तियेपरी जो इया ।। दर्पण करील **बोलिया** ।। तो आत्मदर्शनीया ।। मिळेल खुणे ।।६३।। श्लोक – तत्प्रकारेण **सूत्राणां** दर्पणं यः करिष्यति ।। सचात्मदर्शने साक्षात्सामरस्यमुपैति च ।।" येथे ज्ञानेश्वरांच्या मूळ ओवीला सूत्र म्हटले आहे. प्रस्तुत प्रतीतहि मूळ ओवीच्या जागी सर्वत्र सूत्र असे लिहिलेले आहे. (उलट चांदोरकर प्रतीत 'श्लोक' असे लिहिले आहे). यावरून ज्याने ही समश्लोकी केली त्याचेच (वा त्याच्याच मूळावरून नकललेले) हे हस्तलिखित ठरते. म्हणजेच **मराठी समओवीप्रमाणे संस्कृत समश्लोकीचाहि कर्ता हा शिशुकृष्णच असला पाहिजे हे ह्या हस्तलिखितावरून प्रथमच कळते.**

दिवेकर प्रतीवाबत "मूळ मराठी कळण्यास कठीण अशी स्थळे या टीकेने सुलभ केली आहेत. मूळ व छाया यात भेदच दिसत नाही" असे दिवेकरांनी लिहिले आहे. पण भा. इ. सं. म. त्रै. च्या संपादकांनी मात्र यावर "हे विधान सर्वांशी खरे नाही. वाचनात व टीपरूपाने अनेक दुरुस्त्या सुचवूनहि काही ठिकाणे बोध होत नाही अशी राहिली आहेत" अशी मुद्दाम टीप दिली आहे. तात्पर्य, दिवेकरप्रतीत अशुद्धे बहुत आहेत. उदाहरणार्थ – श्लोक ३, १५, २५, २७, ३०, ३३, ३६, ५२, ५६, ५८, ६०, ६१, ६२, इत्यादि. प्रस्तुत प्रत फार शुद्ध व सुवाच्य असल्याने दिवेकर प्रतीतील अशुद्धे हिच्या आधारे शुद्ध करून घेता येतात व मूळ पाठ कळून येतात. वानगीदाखल काही थोडकी उदाहरणे देतो. जसे– दिवेकरप्रतीत श्लोक ३६ मध्ये "हेतुत्वा द्यायातत्वं (= ?)" असे आहे. संपादकांनी अर्थबोध न झाल्याने कंसात प्रश्नचिन्ह छापले आहेच. आमच्या प्रतीवरून ते "यदस्ति त्वमहेतुत्वाद् यद् व्याप्तत्वं" असे असल्याचे कळते. दिवेकरप्रतीत "मुयु र्मुयु श्चांगदेव" असे श्लोक ६० मध्ये आहे, ते प्रस्तुत प्रतीत "मुहुर्मुहुश्चांगदेव" असे शुद्ध आहे. अशी स्थळे आणखीहि आहेत. तात्पर्य, ह्या प्रतीवरून पासष्टीच्या संस्कृत समश्लोकीचा शुद्ध पाठ प्रथमच उपलब्ध होत आहे. पासष्टीच्या शिशुकृष्णाने दिलेल्या मूळ ओव्यांचे पाठहि आजवरच्या अन्य मुद्रित व हस्तलिखित प्रतीतील पाठांपेक्षा पुष्कळ ठिकाणी भिन्न, शुद्ध व सरस आहेत. जसे – मूळ ओवी ३८ मध्ये साखरे महाराजांच्या मुद्रित प्रतीत "**ते तळहाता तळी मिठी देणे । जया परी**" असा पाठ आहे. त्याऐवजी शुभकृष्णाने दिलेला "**ते तळहाता ताळी देणें । स्वयें जेवी**" हा पाठ अर्थाचे अनुसंधान पाहता एकदम सरस आहे हे सुज्ञांसी सांगणे नलगे. मूळ ५५ व्या ओवीत इतरत्र 'देखे' आहे त्याऐवजी येथे 'तोखे' येते इत्यादि. मूळ ओव्यांना शुभकृष्णाने सूत्र म्हटले आहे. ही त्याची भावना पाहता त्या ओव्या त्याने यथामूल व अविकृत लिहून घेतल्या असल्या पाहिजेत. इतकेच नव्हे तर (ओवी ६५) "णिजेत नसे इति कश्चित् पाठः" असे म्हणून पाठभेदहि तो नमूद करतो. म्हणजेच **चांगदेव पासष्टीचा जुन्यात जुना मूळ पाठहि ह्या हस्तलिखितामुळे अनायासे उपलब्ध होत आहे.**

भाषाविशेष व लिपिवैशिष्ट्ये

हस्तलिखितातील संस्कृत लेखन सर्वत्र शुद्ध आहे. मराठी लेखनात मात्र न ऐवजी ण व ण ऐवजी न हे दोन्ही प्रकार दिसतात. संस्कृताचे प्राकृतीकरण जसे 'प्रावरण' चे 'प्रावर्ण' आढळते. मराठी लेखनाचे भाषिक स्वरूप बहामनीकालीन दिसते. दीर्घ अक्षर दाखविण्यासाठी – ह्रस्व अक्षराच्या वेलांटीवर ᵐ असे तीनसारखे चिन्ह दिलेले दिसते. जसे कि (ऱ्हस्व कि, किᵐ दीर्घ की). स्थ ऐवजी स्छ तसेच क्, भ् इत्यादि अक्षरात लिपीचे प्राचीनपण स्पष्ट आहे.

समारोप

कै. दिवेकरांनी छापिलेली व ही समश्लोकी एकच असली तरी हिच्यात दिवेकरप्रतीत नसलेला कर्त्याचा नामनिर्देश त्याच्या गुरूनामासह येतो. त्यावरून हिचा कालनिर्णय करता येतो. शिवाय पद्यसमश्लोकीवर

संस्कृत गद्य भाष्य व मराठी समओवी हा दिवेकरप्रतीत नसलेला शिशुकृष्णाच्या "चांगदेव पासष्टी रहस्या"चा अधिक भाग आपणांस कळतो. शिशुकृष्ण हा एक नवा संस्कृत मराठी ग्रंथकार ह्यानिमित्ताने आपणांस प्रथमच ज्ञात झाला आहे. चारशे वर्षांपूर्वीच्या ह्या 'रहस्या'मुळे मूळ पासष्टीचाहि प्राचीनतम पाठ आपणांस उपलब्ध होत आहे. व शिशुकृष्णाची गुरुपरंपरा मुकुंदराज संप्रदायी असल्याने मुकुंदराजांच्या परंपरेत ज्ञानेश्वर वाङ्मयाचे अध्ययन अध्यापनच नव्हे तर संपादन – विवरणही होत होते ही महत्त्वाची गोष्ट ह्या हस्तलिखितामुळे प्रकाशात येत आहे. शेवटी "चांगदेवाचे मुक्षेत्री ।। ज्ञानदेवें लिहिलें पत्रीं ।। स्वरहस्य ।।४।। या नाव चांगदेव पासष्टी ।। येथे उघडली ज्ञानदृष्टी ।। दाविली संवित्सृष्टी । सृष्टिसंवित्ति ।।५।।" अशा दोन ओव्या येतात व त्यापुढे 'रहस्यप्रकरणं संपूर्ण' येते. त्यावरून शिशुकृष्णाने खानदेशातील योगी चांगदेवाची तपोभूमि म्हणून ख्यात असलेले एदलाबादेजवळचे (५ मैल अंतरावरचे) जे तापी–पूर्णा संगमावरील चांगदेवक्षेत्र तेथे आपले हे चांगदेवपासष्टीरहस्य लिहिले असेल काय ? नाहीतरी त्याची प्रत दिवेकरांना एदलाबादेलाच मिळाली होती.

[खुलासा—या लेखाच्या संदर्भात अनुक्रमणिकेत आत्माराम रावजी देशपांडे यांचे नाव छापले गेले आहे, तेथे म. शं. वावगावकर यांचे नाव पाहिजे. —संपादक]

●●●

विदर्भ साहित्य संघ : परीक्षा समिती, नागपूर

प्रथम सत्रीय सर्वप्रथम परीक्षार्थी

परीक्षा		परीक्षार्थ्यांचे नांव	पारितोषक	केंद्र पत्ता
	विद्यालयीन			
१.	मराठी प्रवेश	कु. मृणालिनी दे. सरकार	रु. ५–००	कामगार विद्या निकेतन, रैयतवारी कॉलरी, चंद्रपूर
२.	मराठी परिचय	कु. श्रद्धा सु. झा	रु. ५–००	जनता कॉलेज ऑफ एज्युकेशन चंद्रपूर.
३.	मराठी बोध	श्री. दि. भि. बांदोडकर	रु. ५–००	अ. ले. ऑफ परपेच्युअल सोकर हायस्कूल, कुठ्ठाळी गोवा.
४	मराठी प्रबोध	१. श्री. जफर सिद्धीकी	रु. ५–००	म्यु. उर्दु प्रा. शाळा क्र. २ अमरावती.
		२. श्री. सैयद मोयिनोद्दीन	रु. ५–००	म्यु. उर्दु प्रा. शाळा, अमरावती.
५.	मराठी प्रारंभ	श्री. अ. द. मेढे	रु. ५–००	भणसाळी बुनियादी विद्यामंदिर, टाकळी
६.	साहित्य विनीत	कु. लीला र. बुटले	रु. १५–००	कर्मवीर विद्यालय, मूल.
	शासकीय			
७.	मराठी प्रवीण	कु. कमल एन्. गुप्ता	रु. ५–००	भारतीय भाषाध्ययन मंदिर नागपूर.
८.	मराठी प्राज्ञ	श्री. वि. रा. कोहिरकर	रु. २५–००	भा. भा. मंदिर, नागपूर.
	महाविद्यालयीन			
९.	साहित्य प्रबोध	श्री. दि. अ. गिरप	रु. ५–००	अ. ले. ऑफ परपेच्युअल सोकर हायस्कूल, कुठ्ठाळी गोवा.
१०.	भाषा स्नातक	श्री. अब्दुल कैयुम शेख इस्माईल	रु. १०–००	म्यु. उर्दु प्रा. शाळा क्र. २ अमरावती
११.	साहित्य स्नातक	श्री. वि. ना. इंगळे	रु. १०–००	भा. भा. मंदिर, नागपूर.

विदर्भ साहित्य संघ

कार्यवृत्त (१६ आक्टोबर १९७५ ते २६ जानेवारी १९७६)

गो. स. देहाडराय, सरचिटणीस

१. कार्यालय व्यवस्थापन

१.१ कार्यकारी मंडळाची बारावी सभा दि. ९-११-७५ ला झाली. त्या सभेने मराठी साहित्य मंडळावर श्री. त्रि. गो. देशमुख व श्री. गो. स. देहाडराय यांची सदस्य म्हणून नियुक्ती केली.

१.२ कार्यकारी मंडळाची तेरावी सभा दि. १४-१२-७५ ला झाली. त्या सभेत अचलपूर येथील संलग्न संस्थेचे निमंत्रण स्वीकारण्यात आले. व संघाचे ३२ वे संमेलन अचलपूर येथे ६, ७ व ८ फेब्रुवारी १९७६ या तीन दिवसात भरविण्यात यावे असे ठरले.

२. परीक्षा समिती

२.१ ऑगस्ट १९७५ मध्ये झालेल्या प्रथम सत्राच्या मराठी भाषा परीक्षांना, शासकीय, शालेय व महाविद्यालयीन अशा १६ केंद्रातून एकूण ५२१ परीक्षार्थी होते.

२.२ प्रथम सत्राच्या परीक्षात पहिला क्रमांक मिळविणाऱ्यांची नांवे याच अंकात पृ० ३६९ वर दिली आहेत.

३. सन्माननीयांच्या भेटी

३.१ माननीय श्री. रा. धों. भंडारे, राज्यपाल बिहार यांनी दि. ९-१२-७५ ला संघाला भेट दिली. संघाचे उपाध्यक्ष श्री. त्रि. गो. देशमुख यांनी त्यांचे पुष्पमाला अर्पण करून स्वागत केले. राज्यपाल श्री. भंडारे यांना वि. सा. संघाच्या कार्याची माहिती दिली. त्यांनी कार्याविषयी आस्था प्रदर्शित केली.

३.२ नागरिक समितीने डॉ. पुरुषोत्तम नारायण प्रधान यांचा अमृत महोत्सव धनवटे रंगमंदिरांत साजरा केला. त्याप्रसंगी सरचिटणीस श्री. गो. स. देहाडराय यांनी वि. सा. संघातर्फे त्यांना पुष्पहार अर्पण करून त्यांचे अभीष्टचिंतन केले.

३.३ **संगीत समिती (स्वर मंडळ)** – सुप्रसिद्ध गीतकार श्री. सी. (चितळकर) रामचंद्र यांनी दि. १७-१-७६ ला संघाला भेट दिली. संघाध्यक्ष श्री. आ. रा. देशपांडे यांनी त्यांचे पुष्पहाराने स्वागत केले. नाट्य व संगीत या विषयासंबंधी उपस्थित सभासदांनी त्यांच्याशी अनौपचारिक चर्चा केली.

३.४ केन्द्रीय शिक्षण संचालनालयाने पुणे येथे पश्चिम प्रादेशिक भाषा अध्ययन केन्द्र स्थापन केले आहे. त्याचा उद्देश ज्यांची मातृभाषा वेगळी आहे. त्यांनी मराठी, गुजराथी आणि सिंधी ह्या भाषांपैकी एक शिकावी हा आहे. हे केन्द्र पुण्यातील डेक्कन कॉलेजच्या परिसरात आहे. हृया केन्द्राचे मराठी

मातृभाषा नसलेले आणि मराठी शिकणारे १८ प्रशिक्षणार्थी गुरुवार दि. २२-१-७६ ला संध्याकाळी विदर्भ साहित्य संघाचे कार्य समजावून घेण्यासाठी केन्द्रातील मराठी प्राध्यापक श्री. कल्याण काळे ह्यांच्यासह आले होते. त्यांना विदर्भ साहित्य संघाच्या कार्याचा परिचय करुन दिला. परीक्षा समिती, शिवाजी संदर्भ ग्रंथालय या व इतर कार्याविषयी चर्चा झाली. मराठी नव्याने शिकलेल्यांना तो अभ्यास सातत्याने कसा चालविता येईल ह्यासंबंधी चर्चा करण्यात आली.

४. आजीव सभासद

१. डॉ. ना. गो. कालेलकर, एरंडवणे, पुणे.

२. श्री. नरेंद्र पुरुषोत्तम चपळगावकर

३. श्री. केशव जगन्नाथ उपाख्य शांताराम पुरोहित, मुंबई.

४. डॉ. प्रा. सौ. शकुंतलाबाई खोत, नागपूर.

५. निधनवृत्त

५.१ संघाचे आजीव सभासद श्री. देवराव अंबादास उपाख्य बाबासाहेब नाईक याचे दि. ३०-१२-७५ ला निधन झाले. सरचिटणीस गो. स. देहाडराय यांनी त्यांच्या कुटुंबियांना वि. सा. संघाचा शोकप्रस्ताव पाठविला.

६. अचलपूर येथील विदर्भ साहित्य संमेलनाच्या अध्यक्षाची निवडणूक

६.१ कार्यकारी मंडळाच्या दि. १४-१२-७५ च्या सभेत ठरल्याप्रमाणे अचलपूर येथे भरणाऱ्या विदर्भ साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी तीन माननीय वैदर्भीय साहित्यिकांची नांवे तेथील स्वागत-मंडळाला सुचविण्यात आली होती. त्या तीन नांवातून स्वागत मंडळाने, सुप्रसिद्ध साहित्यिक व युगवाणीचे विद्यमान संपादक डॉ. मधुकरराव आष्टीकर यांची अध्यक्षपदासाठी एकमताने निवड केली.

६.२ अचलपूर येथील वि. सा. संघाचे साहित्य संमेलन शुक्रवार दि. ६, शनिवार दिनांक ७ व रविवार दिनांक ८ फेब्रुवारीला संपन्न होईल. संमेलनाचे उद्‌घाटन माननीय श्री. मधुकरराव चौधरी करतील.

७. कै. इंदिराबाई खरे शालेय वक्तृत्व स्पर्धा

७.१ दि. ११ जानेवारी ७६ ला कै. इंदिराबाई खरे शालेय वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली. स्पर्धेचा विषय "एक सतत आठवणारी गोष्ट" असा होता. कु. माधुरी पारसनीस (हडस हायस्कूल) या विद्यार्थिनीस रु. ५१ चे पहिल्या क्रमांकाचे रोख पारितोषिक मिळाले. रु. ३१ आणि रु. २१ ची रोख पारितोषिके अनुक्रमे कु. अंजली पांडे (भिडे कन्या शाळा) व कु. सीमा देव (धरमपेठ हायस्कूल) यांना मिळाली. श्री. वसंत सदाशिव नानल, सौ. मेघा आष्टीकर व कु. नीलिमा दाणी यांनी परीक्षक म्हणून काम केले.

८. संघाचा त्रेपन्नावा वर्धापन दिन

८.१ दि० १४ जानेवारी ७६ ला मकरसंक्रमणदिनी संघाचा त्रेपन्नावा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. सुप्रसिद्ध गायिका सौ. कुसुम चाफळे यांच्या सुस्वर मंगलगीताने कार्यक्रमाला सुरुवात झाली. समारंभाचे अध्यक्षस्थान न्या. मू. भास्करराव मासोदकर यांनी मंडित केले होते. संघाचे

उपाध्यक्ष श्री. त्रि. गो. देशमुख यांनी प्रास्ताविक भाषण केले. त्यानंतर अध्यक्ष न्या. मू. मासोदकर यांनी कै. न्या. मू. के. तु. मंगळमूर्ती यांच्या छायाचित्राचे अनावरण केले. संघाध्यक्ष श्री. आ. रा. देशपांडे 'अनिल' यांनी कै. न्या. मू. मंगळमूर्ती यांच्या वि. सा. संघातील महनीय कामगिरीबद्दल थोडक्यात माहिती सांगितली. वि. सा. संघाच्या अचलपूर येथील आगामी साहित्य संमेलनाचे निर्वाचित अध्यक्ष डॉ. मधुकर आष्टीकर यांचा न्या. मू. मासोदकर यांचे हस्ते शाल व श्रीफल देवून गौरव करण्यात आला. तसेच 'कविवर्य भा. रा. तांबे – एक चिकित्सक अभ्यास' या संशोधनपर प्रबंधाच्या लेखिका डॉ. सौ. आशा सावदेकर व 'मराठी नाटकातील स्वगत' या संशोधनपर प्रबंधांच्या लेखिका डॉ. सौ. शकुंतलाबाई खोत ह्या दोघींचा पीएच. डी. पदवी मिळाल्याबद्दल शाल व श्रीफल देवून सत्कार करण्यात आला. याप्रसंगी व्यासंगी संशोधक डॉ. ग. त्र्यं. देशपांडे यांनी-डॉ. आष्टीकर यांच्या व्यक्तित्वाची व वाङमयीन कर्तृत्वाची श्रोतृवर्गाला ओळख करून दिली. डॉ. मधुकर आष्टीकर, डॉ. सौ. आशा सावदेकर व डॉ. सौ. शकुंतलाबाई खोत यांनी सत्काराबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. यानंतर १९७४ या वर्षाची वि. स. खांडेकर पारितोषिके घोषित करण्यात आली. परीक्षा समितीच्या मराठी भाषेच्या परीक्षात प्रथम क्रमांक मिळविलेल्या विद्यार्थ्यांना आणि कै. इंदिराबाई खरे शालेय वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना अध्यक्षांचे हस्ते पारितोषिके देण्यात आली. समारंभाचे अध्यक्ष न्या. मू. मासोदकर यांच्या भाषणानंतर संघाध्यक्ष श्री. आ. रा. देशपांडे 'अनिल' यांनी त्यांचे व इतर उपस्थितांचे आभार मानले. तिळगूळ वितरणानंतर हा कार्यक्रम संपला.

९. कै. बेहरे व्याख्यानमाला

९.१ ह्या वर्षाची कै. ना. के. बेहेरे व्याख्यानमाला त्यांच्या पुण्यतिथीच्या दिवशी १९ जानेवारीला सुरू झाली. सुप्रसिद्ध साहित्यिक व इतिहास संशोधक श्री. सेतुमाधव पगडी यांनी 'मध्ययुगीन भारतातील साहित्यिक आणि सांस्कृतिक प्रवाह' या विषयावर दि. १९, २० व २१ जानेवारी ७६ ला धनवटे रंगमंदिरांत तीन व्याख्याने दिली. या तिन्ही दिवशी श्रोत्यांची उपस्थिती उल्लेखनीय होती. कै. बेहेरे यांच्या पत्नी श्रीमती विमलाबाई व चिरंजीव श्री. प्रतापराव बेहेरे तिन्ही दिवशी उपस्थित होते.

१०. राम गणेश गडकरी स्मृतिदिन

१०.१ ह्या वर्षाचा राम गणेश गडकरी स्मृतिदिन नित्याप्रमाणे २३ जानेवारीला पाळण्यात आला. त्यानिमित्त सावनेर येथे जाऊन वि. सा. संघातर्फे त्यांच्या समाधीला पुष्पहार वाहण्यात आला. संध्याकाळी प्राध्यापक डॉ. शकुंतलाबाई खोत ह्यांचे 'गडकऱ्यांच्या नाटकातील नायिका' ह्या विषयावर गडकरी सभागृहात भाषण झाले.

११. गणराज्यदिन

११.१ गणराज्य दिनाच्या दिवशी सकाळी ९ वाजता संघाध्यक्ष श्री. आ. रा. देशपांडे यांचे हस्ते ध्वजवंदनाचा कार्यक्रम झाला.

शाखा वृत्त

१२. वणी

सन्माननीयांच्या भेटी

१२.१ दि. ३-८-७५ डॉ. यु. म. पठाण, औरंगाबाद.
दि. ५-८-७५ पं. जितेंद्र अभिषेकी, मुंबई.

१२.२ दि. ३१-८-७५ ला लोकनायक बापूजी अणे यांच्या जयंत्युत्सवानिमित्त श्री. वळीराम एकबोटे यांच्या अध्यक्षतेखाली सभा झाली. त्याप्रसंगी डॉ. श्री. वा. भागवत, कुलसचिव नागपूर विद्यापीठ व अॅड. श्रीहरि गणेश अणे यांची भाषणे झाली.

१२.३ शाखेच्या कार्यकारिणीचे सन्माननीय सदस्य श्री. र. वि. उपाख्य बापूसाहेब दामले निवर्तले त्या निमित्त दि. ३०-१०-७५ ला दुखवटयाची सभा घेण्यात आली.

१३. गोंदिया

१३.१ दि. १ डिसेंबर ७५ ला वि. सा. संघाच्या गोंदिया शाखेच्या कार्यकर्त्यांचे शिष्टमंडळ मुख्यमंत्री माननीय श्री. शंकरराव चव्हाण यांना भेटले. आणि भवभूती मंदिराचे राहिलेले काम पूर्ण करण्याविषयी माननीय मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर केले. मुख्यमंत्र्यांनी या प्रश्नाचा सहानुभूती-पूर्वक विचार करण्यात येईल असे आश्वासन दिले. सौ. मनोरमा धोटे यांचे नेतृत्व असलेल्या या शिष्टमंडळात अॅड. नानासाहेब तेलंग, प्रा. कृष्णा चौधरी, सर्वश्री रमेश ललगूणकर, रमेश कोतवाल, किशोर कुळकर्णी व सौ. नीलिमा कुळकर्णी होते.

१४. चिखली

१४.१ चिखली येथे वि. सा. संघाची शाखा स्थापन होवून कार्यकारिणीची निवड झाली. अध्यक्ष डॉ. सुरेश खेकाळे, उपाध्यक्ष डॉ. दि. भा. वारे, सचिव प्रा. वा. वि. दिक्षित व प्रा. एम्. एम्. देशमुख, कोषाध्यक्ष डॉ. भागवत मेहेत्रे असे पदाधिकारी निवडण्यात आले.

१५. यवतमाळ

श्रद्धांजली

१५.१ नाटयसंमेलनाचे पूर्वाध्यक्ष व ख्यातनाम संगीत-दिग्दर्शक श्री. वसंतराव देसाई आणि मौज, सत्यकथा या नियतकालिकांचे संपादक श्री. वि. पु. भागवत यांच्या निधनानिमित्त २३-१२-७५ ला शोकसभा झाली.

सत्कार

१५.२ अकोला येथे झालेल्या कामगार केंद्राच्या राज्य नाटयस्पर्धेत, यवतमाळच्या 'सुंदरा मनामधे भरली' या नाटकाला प्रथम क्रमांक मिळाला. सौ. आशाताई बर्वे ह्यांचा व अभिनयाचे प्रथम पारितोषिक मिळविणारे आचार्य काकासाहेब आमडेकरांचा सौ. निर्मलाताई कोठारे यांचे निवासस्थानी, पंडित विश्वनाथजी सारस्वत यांचे अध्यक्षतेखाली सत्कार करण्यात आला. आचार्य आमडेकर यांनी सत्काराबद्दल भावपूर्ण शब्दात कृतज्ञता व्यक्त केली.

१६. दारव्हा

१६.१ प्राध्यापक नरहर कुरुंदकर ह्यांची दि. ८ नोव्हेंबर ७५ ला 'ज्ञानेश्वर' आणि ९ नोव्हेंबरला 'ययाती' या विषयावर व्याख्याने झाली.

१७. उमरखेड

१७.१ दि. १-१-७६ ला वि. सा. संघाच्या शाखेची सभा होवून पदाधिकाऱ्यांची निवडणूक झाली. ती अशी - अध्यक्ष श्री. नरवाडे गुरुजी, उपाध्यक्ष श्री. बा. दा. जोशी, सचिव - प्रा. रा. कृ. कुळकर्णी, सहसचिव - श्री. भा. अं. अयाचित, कोषाध्यक्ष - श्री. अ. ह. पोटे, सदस्य - सर्वश्री किवले, प्राचार्य रा. रा. चिंतलांगे, ग. ना. एकबोटे, प्रा. द. अ. जोशी, दादेगावकर, शरद वाळ्रे, केशवराव भागवत, मधुकरराव बेदरकर, महादणी, श्रीमती मालतीबाई गोखले.

१८. इतर शाखांचे वृत्तांत हाती आले नाहीत.

साभार पोच

[दि. १६–९–७५ ते २६–१–७६ पर्यंत युगवाणीला भेट म्हणून आलेल्या पुस्तकांची पोच खाली दिली आहे.]

मौज प्रकाशन, खटाववाडी, मुंबई ४०० ००४

१. सोलेदाद – विलास सारंग, पृष्ठे १४०. मूल्य रु. १३-२५.

२. डार्क रूम – माधव आचवल, पृष्ठे १०७, मूल्य रु. ८.

३. सोन्याचा पिंपळ – श्रीनिवास विनायक कुळकर्णी, पृष्ठे २१८, मूल्य रु. १९.

४. सहवास – कृ. द. दिक्षित, पृष्ठे २+१५२, मूल्य रु. १८.

५. नक्षत्राचे लेणे – चि. त्र्यं. खानोलकर, पृष्ठे ९३, मूल्य रु. १०.

६. काळा सूर्य – हॅट घालणारी बाई – कमल देसाई, पृष्ठे १४२, मूल्य रु. १५.

७. एका नृत्याचा जन्म – श्री. दा. पानवलकर, पृष्ठे १४२, मूल्य रु. १५.

नागपूर प्रकाशन, सीताबर्डी, नागपूर

८. संनिचय (पूर्वार्ध) – भ. श्री. पंडित, पृष्ठे २२५, मूल्य रु. १६.

९. संनिचय (उत्तरार्ध) – भ. श्री. पंडित, पृष्ठे ४२०+२, मूल्य रु. १६.

१०. अमरवेल – पु. भा. भावे, पृष्ठे १७९, मूल्य दिले नाही.

इतर प्रकाशने

११. गोंदण – शांता ज. शेळके, प्रकाशक ल. मो. प्रभुणे, शाकुंतल, साहित्य सहवास, वांद्रा (पूर्व) मुंबई ५१; पृष्ठे १०४, मूल्य रु. १५.

१२. हिंदूसमाज एक अन्वयार्थ – इरावती कर्वे, प्रकाशक दि. धों. कर्वे ४७३/१७ ब, गुलटेकडी, पुणे ४११००९; मूल्य रु. १५.

१३. गंधवती – चंद्रशेखर कपाळे, प्रकाशक – मराठी साहित्य मंडळ, गुलबर्गा; पृष्ठे १४+७०, मूल्य रु. ५.

१४. शोधणी – डॉ. यु. म. पठाण, मराठवाडा विद्यापीठ प्रकाशन, पृष्ठे १२+१६६+७, मूल्य रु. २०,

१५. सं. सौभद्र – व. दि. कुळकर्णी, व्हीनस प्रकाशन, ३८१ क शनिवारपेठ पुणे ३०; पृष्ठे २२+३५९ मूल्य रु. ३५.

१६. शास्त्रीय संज्ञांचे सुगमता मापन – डॉ. अ. व्यं. सावजी, प्रकाशक – सौ. रजनी अभय सावजी, शंकरनगर, नागपूर १०; पृष्ठे २८, मूल्य रु. २.

१७. हरि नारायण आपटे यांच्या कादंबऱ्या – अचला जोशी, मुंबई मराठी साहित्य संघ प्रकाशन, मुंबई ४; पृष्ठे १+१२७, मूल्य रु. ८,

१८. कस्तुरी मृग – नारायण रा. पेडणेकर, प्रकाशक– कस्तुरी मृग प्रकाशन, मुंबई; पृष्ठे १+५६, मूल्य रु. ५.

१९. दलित मुक्तिलढा आणि दलित साहित्य – वामन इंगळे; प्रकाशक – कालचक्र प्रकाशन, टिळक पथ, औरंगाबाद; पृष्ठे १४+४६. मूल्य रु. ७.

२०. आदिम – फ. मुं. शिंदे, प्रकाशक – कालचक्र प्रकाशन, टिळक पथ, औरंगाबाद. पृष्ठे ८०. मूल्य रु. ९.

२१. माझी तीनशे मुले – व्रजवासी; प्रकाशक – समन्वय प्रकाशन, नागपूर; पृष्ठे २१०. मूल्य रु. २०.

२२. पुंडलिक चरित्रे – संपादक प्रा. माणिक धनपलवार, प्रकाशक – उस्मानिया विद्यापीठ, हैद्राबाद; पृष्ठे ८६, मूल्य दिले नाही.

२३. काव्यश्री – स. सो. सुतार, प्रकाशक – सस्नेह प्रकाशन, वडजी, ता. भडगाव जि. जळगाव; पृष्ठे ३६. मूल्य रु. ४.


या मासिकाला वापरलेला कागद हा महाराष्ट्र राज्य शिक्षण खात्याने उपलब्ध करून दिलेला सवलतीच्या दरातील कागद आहे.

प्रकाशक : *गो. स. देहाडराय, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, झाशी राणी चौक, नागपूर १२*

मुद्रक : *श्या. श्री. बनहट्टी, श्रीनिवास मुद्रणालय, सुविचार प्रकाशन इमारत, धनतोली, नागपूर १२*

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संमेलन
अधिवेशन ३२ वे



संमेलनाध्यक्ष

डॉ. भास्कर उपाख्य मधुकर रघुनाथ आष्टीकर

यांचे भाषण

अचलपूर, शुक्रवार दि. ६ फेब्रुवारी १९७६

अनुक्रमणिका

या सम्मेलनाचे उद्घाटक माननीय श्री. मधुकरराव चौधरी, स्वागताध्यक्ष आमदार श्री. भैय्यासाहेब देशमुख आणि सामाजिकांनो !

आपण मला या संमेलनाच्या अध्यक्षपदाचा बहुमान दिलात याबद्दल मी आपल्या प्रती गभीर कृतज्ञता व्यक्त करतो. हे संमेलन म्हणजे साहित्यिकांचा सणच. आनंदाची पर्वणीच. पण या क्षणी कै. श्री. ना. उपाख्य दादासाहेब बनहट्टी, कै. डॉ. शं. दा. पेंडसे, कै. न्या. अण्णासाहेब मंगळमूर्ति आणि कै. वा. ना. देशपांडे या विदर्भ साहित्य संघाच्या प्रेरणाशक्ती आज आपल्यात नाहीत ही खंत मनाला बोचते आहे. सर्व प्रथम मी माझ्यातर्फे, विदर्भ साहित्य संघातर्फे आणि आपणा सर्वांतर्फे त्यांच्या पावन स्मृतीला श्रद्धांजली अर्पण करतो.

एलिचपूर हे फार प्राचीन परंपरा असलेले गाव आहे. इथे संस्कृतचा महाकवि भारवि होऊन गेला. त्याचा पणतू 'दण्डि' हि ह्या आजोळी खचितच खेळून गेला. मीहि शाळेची चवथी पाचवी इथेच शिकून गेलो. त्या वयातल्या काही आठवणी अजून ताज्या आहेत. पाचवीत सरांनी, सिद्धार्थ वटवृक्षाखाली बसला आणि ज्ञानी झाला, गौतम बुद्ध झाला, हा चमत्कार सांगितला आणि त्या बालवयात मला ज्ञानप्राप्तीचा नवा मार्ग सापडला. मी माझ्या मित्रांबरोबर रोज ह्या गावालगतच्या चिखलदरा रोडवरील रांगेने असलेल्या असंख्य वटवृक्षांखाली जाऊन बसत असे; –अर्थातच् शाळेच्या वेळात, शाळा बुडवून ! पण इथल्या वटवृक्षाखाली कुणी बुद्ध झाला नाही, होणार नाही. मीहि झालो नाही. उलट निर्बुद्ध मात्र ठरलो. वडिलांच्या शिव्या आणि मास्तरांचा मार खाऊन बसलो. पण ह्यामुळे जीवनाचा एक पाठ शिकलो की केवळ अंधानुकरणाने मी मोठा होऊ शकत नाही. माझं जीवन, माझा संसार, माझी परिस्थिती आणि मला हवी ती सिद्धी, बुद्धाच्या साध्यापेक्षा अगदी वेगळी आहे. शिवाय बुद्धाचे ते वटवृक्षाखाली बसणे, तपस्येचे एक साधन होते; नव्हे त्याची तपस्या हेहि एक साधनच होते – वैश्विक कल्याणाच्या, मानवाला मानवी यातनांतून मुक्त करण्याच्या साध्याचे. त्या विश्वमानवाची अथक् नजर होती ती ह्या साध्याकडे. साध्य महत्वाचे. साधनाचे स्तोम नको म्हणून वटवृक्षाखाली तप साधायचे. साध्य आणि साधन ह्यांच्यात विवेक नेहमी केला पाहिजे. साधनच साध्य होऊन बसणार नाही ह्याची काळजी घेतली पाहिजे. 'लोकयात्रा' सरळ, सुलभ व सुखद व्हावी म्हणून मानवानेच, कुटुंब, समाज, देश, धर्म, सभ्यता, संस्कृती ह्या संस्था स्थापन केल्या. आणि हजारो वर्षांपूर्वी, वैश्विक शांती व मानवी कल्याण साधणाऱ्या ह्या संस्थांच्या धारणेसाठी, नव्हे सुधारणेसाठी, एका मंगल प्रभाती एका कोळ्याचा एक अनुष्टुभ छंद हवेत निनादला–

मा निषाद ! त्वं प्रतिष्ठामगमः शाश्वतीः समाः।
यत्क्रौञ्चमियुनादेकमवधीः काममोहितम् ॥

आणि काव्य जन्माला आले. शब्दार्थ–छंदोमय वाङमय नावाचे नवे साधन मानवी प्रगतीसाठी उपलब्ध झाले. पण ते साधनच आहे हे त्या क्रान्तदर्शी कोळ्याने, वाल्मिकीने ओळखले होते. तो त्या छंदाच्याच फंदांत गुरफटला नाही. आपल्या काव्याच्याच कोळीष्टकांत तो कोळी मश्गुल होऊन बंदिस्त झाला नाही. त्या साधनाद्वारा त्याने जनजीवनात 'राम' ओतला; अहिल्या, सीता, तारा, मंदोदरी, शूर्पणखा, चंद्रसेना, शबरीसारख्या अबलांचे दास्यविमोचन केले. – स्त्रीमुक्तीची चळवळ आदिकवीने सुरू केली आहे बरे ! सामाजिक न्याय, ममतापूर्ण समता, बहुजनवृद्धिकारक समृद्धिक्षमता आणि त्यागमय निर्भयता प्रचलित करण्यासाठी अयोध्या सोडून वनवासाचा मार्ग – जणू 'खेड्याकडे चला'चा संदेश– त्याने दाखविला. हनुमान, सुग्रीव, वाली, जटायुसारख्या प्रदलितांना प्रबल केले, प्रतिकारतत्पर केले; त्यांचे जीवनमान उंचाविले. 'लोकयात्रा' मंगल करण्याचा मंत्र म्हणजे वाङमय – त्या वाङमयसाधनेनेच हे सारे सिद्ध झाले.

आज साहित्यिक, साहित्य हे साधन आहे हे विसरले असावेत. कारण साहित्यनिर्मिती एवढेच त्यांचे साध्य उरल्यासारखे दिसते. पण हा जुनाच अनुभव आहे की साधनेच जर साध्य बनली तर जगात सारेच

असाध्य होऊन बसते. मी सुप्रसिद्ध कवी होईन; मला कादंबरीकार म्हणून चमकायचे आहे; मला नाटककार म्हणून गाजायचे आहे, असल्या केवळ लोकेषणांनीच आजचा साहित्यिक भारलेला असावा. प्रसिद्धी वा लोकेषणा ह्यांची हाव अविवेककारी असते. लोक उतरंड रचायला घट जोडीत, तर एक प्रसिद्धीलोलुप वेडा ते फोडीत असे ! लाज राखायला लोक कपडे शिवीत तर हा पागल ते टराटर फाडत असे. लोक घोड्यावर बसून फिरत, हा गाढवावर बसून मिरवीत असे. 'येन केन प्रकारेण' प्रसिद्धी मिळवायची हेच त्याचे साध्य होते. पण प्रसिद्धी हे कधीहि साध्य असू शकत नाही. कारण प्रसिद्धी ही नेहमी सिद्धीचे आनुषंगिक फळ असते. उघड्या अंगाला रंग फासून मोहरमचे वाघ बनतात तसे शब्दांचे रंग करून, आपल्याच वेतालात दंग होत अंगात आणल्याने कवि बनता येत नाही. नव्हे कवि बनतच नसतो– तो सहज होत असतो; नकळत होतो. वाल्या कोळ्याला कवी व्हायचं नव्हतं. तो तपश्चर्या करीत होता. लोकयात्रा मंगल व्हावी म्हणून मंत्रसाधना करीत होता. तमसातीरी जाताना क्रौञ्चवधाच्या वैश्विक दुःखानं विव्हळून तो अंतःकरणापासून आपोआपच काही बोलला आणि नकळत कवी झाला. लोकांनी त्याला कवी म्हटलं. लोकांनी त्या छंदाला काव्य ठरवलं होतं. क्रौञ्चीचा विनाश हे वंशविच्छेदी कृत्यच ! त्याचा प्रतिकार करण्यास तो ऋषि काव्याचे साधन घेऊन प्रकटला. ते त्याच्यातील चित्‌शक्तीचे स्फुरण होते; समाजसापेक्ष असे प्रस्फुरण होते. म्हणूनच म्हणायचे की आदिकवी व्हायचे म्हणून वाल्मिकींनी रामायण रचले नाही. कुणाचा मानभंग करायचा म्हणून तुकोबाने अभंग रचले नाहीत. ब्रिटिशांच्या जुलमी सत्तेला आव्हान देणाऱ्या खाडिलकरांनी नाटककार व्हायचे म्हणून 'कीचकवध' लिहिले नाही. 'कुशल पत्रकार' असा गौरव व्हावा म्हणून टिळकांनी 'केसरी' किंवा महात्मा गांधींनी 'हरिजन' काढला नाही. साहित्य हे नेहमी साधनच राहिले आहे. सामाजिक व राजकीय यशस्वी सिद्धी त्यांना प्रसिद्धी देऊन गेली. केवळ प्रसिद्धीसाठी त्यांनी हे केले नाही.

पण आज साहित्यक्षेत्रात प्रसिद्धीसाठी खूप धडपड चाललेली जाणवते. नवत्वाचा उद्‌घोष त्याचपायी सर्वत्र केला जातो. त्या प्रसिद्धीलोलुपाने जसे घटपटादि फोडण्याचे योजनापूर्वक केले तसेच काहीसे आजचे साहित्यिक करीत असावेत का ? केवळ प्रसिद्धीच्या हव्यासापायी त्यांनी नव्याचा ध्यास घेतला आहे का ? नवकाव्य, नवकथा, नवनाट्य वगैरे नवलाईची भाषा सर्वत्र वापरली जात आहे. पण नव्याची व्याख्या मात्र कुणालाहि हमखास सांगता येत नाही. अमुक काव्य, अमुक कथा, अमुक नाट्य व अमुक कवि वा नाटककार, 'नव' आहे असे संबोधिले जाते म्हणून त्याला 'नव' म्हणायचे. हे किराण्यासारखे झाले. किराण्याची व्याख्या करता येत नाही. किराण्याच्या दुकानात किराणा नावाची वस्तू मिळत नाही. 'किराणा' असा बोर्ड लावलेल्या दुकानात जे जे मिळते ते ते किराणा ठरते. तसे नववाङ्‌मयाचे नवत्व केवळ तसे नाव ठेवण्यात दिसते. व्यवहारात नव्याची कल्पना कधी कधी नुसती कालसापेक्ष असते. १९७६ च्या सम्मेलनाचा अध्यक्ष १९७५ च्या अध्यक्षाच्या दृष्टीने नवा कोरा करकरीत असतो. पण हे 'नवेकोरेपण' चांगलेच असेल असे नाही. उलट कधी कधी कालदृष्ट्या जितके जुने तितके अधिक चांगले असे ठरते. डॉक्टर, वकील, जेवढा जुना तेवढा चांगला. अगदी लिंबाच्या लोणच्यासारखा. उलट कालदृष्ट्या जे नवे ते पुष्कळदा चावते, अवघडते. जसा नवा जोडा– दोन्ही अर्थातला – काही दिवस 'फिट' नाही बसत. पण आजकालच्या वाङ्‌मयातले 'नव' म्हणजे केवळ 'वेगळे' असा अर्थ दिसतो. व्यक्तिगणिक वेगळे, रोज बदलणारे – फॅशनसारखे – ते नव. लांब बाह्या रोज रोज थोड्या आखूड व्हायची फॅशन सुरू झाली आणि एक दिवस बाह्याच नसलेल्या बाह्या Sleeveless sleeves शिवण्याची फॅशन बनली. तसे काव्यातले काव्य, नाट्यातले नाट्य, कथेतली कथा, कमी कमी होता होता आता काव्यलेस काव्य, नाट्यलेस नाट्य व कथालेस कथा अशी फॅशन झाली आहे. फॅशनला मराठीत 'बूट' असा शब्द वापरतात. तेव्हा ह्या नववाङ्‌मयाला 'बूट वाङ्‌मय' म्हणता येईल. रोज नवा 'बूट' निघतो. 'नव' हा शब्द काही लोकांना मंगल, हवेहवेसे वाटणारे, चारचौघात घालून मिरवावे व त्यांनीहि त्याचे कौतुक करावे, असे काहीसे दाखविणारा वाटतो. फॅशनमध्ये मात्र नवेच पाहिजे असे नसते. उलट नव्याचा विध्वंस, चांगल्याचे चौपट करणे हीच आजकाल फॅशन झाली आहे. कित्येकदा कितीतरी तरुणींना मी लॉन्ड्रीवाल्यांना रागावताना ऐकले आहे की, "तू कपडे चांगले धूत नाहीस; कारण तुला हजारदा सांगूनहि तू माझ्या

पँटचे रंग, भट्टीत दहादा उकळून पार विटके करीत नाहीस. इस्तरी करताना इष्ट ठिकाणी त्या पँटींना जाळून भोके पाडीत नाहीस, तेव्हा आता शिप्याकडे जाऊन ठिगळे लावू कुठे ?" ह्या नववाङ्मयात, वूट वाङ्मयातहि असेच फॅशनेवल विटके, फाटके नि ठिगळबाज ठसठशीतपणे जाणवते !

फॅशनमुळे दुर्वोधता येते हे आपण अनुभवतो आहोत.बायकांनी केस कापायचे तर पुरुषांनी वाढवायचे! वायकांनी पँट घालायचे तर पुरुषांनी गोल साडीची लुंगी ! आणि मग लिंगवोध दुर्वोध व्हायचा ! आज विनयभंगाचं पाप पदरात पाडून घेतल्याशिवाय नुसत्या कपडयांवरून वाई ओळखणे कठीण झाले आहे ! तसेच साहित्यात घडू लागले आहे. कविता, कथा, नाटक ह्या वाङ्मयप्रकारांतले भेद ओळखणे दुरापास्त झाले आहे. चीटाचे कापड शर्टींगचे लेवल लावलेले म्हणूनच त्याचे बुशशर्ट शिवायचे नं ? तसेच कादंबरी, लघुकथा, कविता, निवंध, नाटक असले लेवल लेखकच लावतो म्हणून त्याला तो तो वाङ्मयप्रकार म्हणायचे असे आज होत आहे. कारण त्यांची व्यवच्छेदक लक्षणे आज लुप्त होत आहेत. मी एकदा एक नवकथा – लघु लघुतम लघुकथा लिहिली. " एक होती वुढी; ती गेली कुपुकुपु; तिला सापडला पैसा; पैशाची आणली भाजी; चिरू कशी खसखस, शिजू कशी गदगद, खाऊ कशी मटमट, निजू कशी डाव्या कुशी वगैरे. " आणि रात्री वायकोला ती सुवाच्य अक्षरात लिहून काढायला सांगितली. आणि मी झोपलो. वायकोच्याहि डोळयात झोप झेपावत होतीच. कागद शोधणे तिला जमले नाही. जवळच एक उभट कागदाचा चिटोरा सापडला तोच तिने वापरला. एका ओळीत दोन तीन शब्द मावत. तिने त्याचा विचार केला नाही. ती गोष्ट तिने दोनतीन शब्दांच्या ओळीत झोपेच्या तारेत लिहिली ती अशी–

भाजी होती वुढी
कुपुकुपु पैसा
निजू कशी आणली
सापडला चिरू तिला
पैशाची खसखस
डाव्या कुशी गदगद
एक कशी मटमट–

आणि मी ती तशीच न पहाता एका क्रान्तिकारी नवमतवादी मासिकाकडे पाठविली. त्याने ती अशीच छापली. वर फक्त लिहिले— Latest नवकाव्य ! आणि मग या पंथातले अनेक नवकवी जन्माला आले. निवंधांच्या अशाच लघुकथा होतात आणि लघुकथांचे निवंध. एकदा एकाने आत्मचिंतन केले की " माझे शेजा-ऱ्याशी भांडण का झाले? काल्च का झाले? माझे झाले की शेजाऱ्याचे झाले ? शेजाऱ्याचे त्याच्या शेजाऱ्याशी का नाही झाले ? भांडण्यासारखे तर काहीच नव्हते ? भांडायलाहि कुणात दम नव्हता आणि भांडणातहि काही दम नव्हता ? मग जे झाले ते काय झाले ? जे झाले त्याला भांडण म्हणता येईल का ? मग भांडण का झाले की भांडण झाले का ? हाच मला प्रश्न पडलाय् ! कारण शेजारी विचारतो, काहो, लोक म्हणतात, तेव्हा खरेच आपले भांडण झाले का ?" आणि असे हे आत्मचिंतन मासि-कांच्या कंपूने नव लघुकथा म्हणून छापले आणि अनेक नवकथांचे छापे पाडले. तेव्हा रूढार्थाने, कथा नसलेल्या लघुकथा, काव्य नसलेल्या कविता आणि नाटय नसलेले नाटक आज निर्माण होत आहे. वाङ्मय-प्रकारांच्या कृत्रिम सीमारेषा पुसट झाल्या किंवा मिटल्या त्याचा खेद नाही. हे स्वागतार्हहि होईल. ह्या सगळया प्रकारांना एकच नाव देता येईल, 'काव्य' म्हणून; आणि पूर्वी होतेही तसे. संस्कृत साहित्यात काव्य, नाटक, कादंवरी, चरित्र वगैरेंना काव्य म्हणूनच ओळखले जाई. पण काव्य म्हणून तरी त्याची काही व्यवच्छेदक लक्षणे असत आणि ती आजहि असायला हवीत. आणि त्याच्या प्रेरणा व धारणा निश्चितच स्वदेशी, भारतीय परंपरेतील समाजवादाशी सुसंगत असाव्यात. तशी आज साहित्यिकांची कमी नाही; शेकडा नव्हे, अगदी एकशे एक हजारागणिक मिळतील. पण आज गरज आहे ती एकशे एक ची नाही तर 'एक से एक'ची !

काव्य, कथा, नाटक, नव्हे सर्व ललित साहित्य आज प्रयोगशील बनत चालले आहे. सिद्धीपेक्षा प्रसिद्धीचा योग जुळावा म्हणून प्रयोग करणे म्हणजे एकादशीचे पारणे फेडण्यासाठी मनातले मांडे खाण्यासारखे आहे. एवढे खरे की अपयश झाकण्यासाठी ही प्रयोगशीलता ह्या साहित्यिकांना चांगली मानवलीहि आहे. काव्य फसले, कथा हुकली, नाटक नासले की हा 'प्रयोग' होता म्हणून मोकळे होता येते ! उलट तो प्रायोगिक लेखक म्हणून एकदम एका सुप्रभाती प्रकाशात आणला

अनुक्रमणिका

जातो ! त्याचे नेमके सारे दोष गुण ठरवले जातात ! प्रसंगी प्रेक्षकांनाही – सामाजिकांनाहि – वाचकांनाहि – मूर्ख, अज्ञानी, बुरसटलेल्या विचारांचे, सनातनी, बुझ्वां वगैरे ठरविले जाते. त्यांनी आस्वाद घ्यायला शिकलं पाहिजे, त्यांची ' टेस्ट ' अजून ' डेव्हलप ' झाली नाही म्हणून कीवहि केली जाते ! साहित्य म्हणजे सामाजिक चित्शक्तीचे प्रत्ययकारी प्रस्फुरण असते. त्या प्रस्फुरणाला प्रयोगाच्या कृत्रिम चौकटी चढवता येणार नाहीत. कारण त्या चित्शक्तीचा तो स्वाभाविक उद्रेक हाच एक महान प्रयोग असतो. तो स्वयंभू असतो. तोहि त्या प्रस्फुरणाबरोबरच स्फुरलेला असतो. ठेच लागली की मनुष्य स्वाभाविकपणेच शहाणा होतो, पण म्हणून शहाणे होण्यासाठी धोंडा उचलून पाय ठेचण्याचे प्रयोग शहाणपणाचे ठरतील का ? प्रायोगिक मूस निर्माण करून तीत चित्शक्तीचे प्रस्फुरण बंदिस्त करणे अनुचित होय. केवळ नावीन्याची आणि आपला आगळेपणा मिरविण्याची धडपड ह्या प्रयोगशीलतेच्या मुळाशी असते. पण नावीन्य म्हणून किंवा आपला आगळेपणा दाखविण्यासाठी म्हणून शिवधनुष्य तोडणाऱ्या दिग्विजयी धनुर्धराने कधी इन्द्रधनुष्य तोडण्याचा प्रयोग करावा काय ? शिवाय प्रयोगशीलतेत प्रयत्नांची पराकाष्ठा असते. कारण प्रयोग म्हणजे जाणीवपूर्वक जुळवाजुळव होय. पण अशी प्रयत्नपूर्वक साधावयाची कुठलीहि सौंदर्यतत्वे काव्याला वा नाटचाला उपकारक ठरत नसतात हा जुनाच सिद्धांत आहे. साहित्याच्या स्वाभाविक प्रस्फुरणाचे वेळी चित्तैकतानता आपोआपच साधली जाते; पण ह्या प्रयत्नसाध्य कलासाधनाच्या प्रयोगात चित्तविक्षेप सपाटून होतो, मूळ प्रतिपाद्यापासून प्रतिभा विचलित होते आणि मग कलेला अवकळा येते. आनंदवर्धनाने म्हणूनच यत्नसाध्य सौंदर्याधायक प्रयोगांना शापित केले आहे. ' आलोचना 'कर्ते व समीक्षाकार देखील असेच मत व्यक्त करतात. जे सहजसाध्य असेल, जे त्या प्रस्फुरणाबरोबरच स्फुरले व प्रकटले असेल तेच त्याचे कलावर्धक व सौंदर्याधायक तत्व ठरते. तीच त्याची चौकट, तीच त्याची मूस. मला कविता करायचीय्, मला नाटक लिहायचेय् असे ठरवून कवि वा नाटककार बनणे म्हणजे कलात्मक बनवाबनवी ठरेल. कलासाधनेत ही दुय्यम पायरी होय. मग त्यातहि पुनः यत्नसाध्य प्रयोगांचे प्रयोग म्हणजे तर कलामूल्यांचा आत्यंतिक वियोग होय. म्हणूनच मी मघा म्हटले होते की आदिकवि व्हायचंय् हे ठरवून किंवा अमक्याचा प्रवर्तक ठरावा म्हणून काही वाल्मिकीने अनुष्टुभाचा प्रयोग केला नाही. त्या प्रस्फुरणाबरोबर जो श्लोक प्रकटला तो अनुष्टुभाचा प्रयोग ठरला. केशवसुतांनी फुंकली ती तुतारी ठरली. केशवसुतांच्या प्रस्फुरणाबरोबर प्रकटली ती काव्यक्रान्ति ठरली. केशवसुतांनी क्रान्तीची आरोळी ठोकून तुतारी फुंकण्याचा प्रयोग केला नाही. गुलाबी भावनांच्या प्रस्फुरणासोबत जो छंद स्वयंभू प्रकटला तो मुक्तपणे निघाला म्हणून मुक्तछंद ठरला, अनिलांचा.!

नाटकाबाबत तर प्रायोगिकता हा शब्द वापरणे म्हणजे केवळ पुनरुक्तीच होय. कारण नाटक हा मुख्यतः प्रयोगप्रकारच आहे; वाङमयप्रकार आहे तो गौणत्वाने. अभिनयाच्या माध्यमातून होणारे नाटचाचे प्रयोग म्हणजेच नाटक होय. " प्रयोगप्रधानं हि नाटचशास्त्रम् ।" " प्रयोगे अभिनेतव्यम् " ही कालिदासकथित नाटचशास्त्रसूत्रे ह्या दृष्टीने मौलिक होत. चतुर्विध अभिनयापैकी वाचिक अभिनयापुरते शब्दार्थांचे सहाय्य नाटकात असते. म्हणून शब्दार्थरूप वाङमय हा नाटकाचा एक चतुर्थांश भाग आहे. त्यातहि आहार्य अभिनयाला नाटकात प्रथम क्रमाङ्काचे स्थान असते. कारण नाटक सोडून इतर वाङमयप्रकारांत फक्त वाचिक रसाचीच उत्पत्ती होते, पण नाटकात ती तर होतेच पण स्वभावज व नेपथ्यज रसांचीहि त्यात भर पडते. त्रिविध रसनिर्मितीद्वारे जनमानसावर अत्यंत प्रभावीपणे परिणाम करणारे साहित्यसाधन म्हणजे नाटकच होय. शिवाय यच्चयावत् उपलब्ध कला व विज्ञान ह्यांचा नाटकात उपयोग होतो व तो करावाही असे भरतानेहि सांगून ठेवलेले आहे. फक्त पथ्य पाळायचे ते एवढेच की अभिनयकला व नेपथ्यविज्ञान ह्यांची साथ तेवढी महत्वाची, बाकी सर्व कला आणि विज्ञान त्यापुढे गौणच. अभिनयेतर कला आणि नेपथ्योपकारकेतर विज्ञान ह्यांचेच प्राबल्य झाले तर नाटक मेलेच म्हणून समजा. संवाद, गीत व संगीत आणि आधुनिक विज्ञानाचे तंत्रात्मक सहाय्य हे नाटकाचे साथी होत. साथीचा रोग बळावू नये हे नाटककारांनी व नाटक करणाऱ्यांनी पक्के ध्यानात ठेवावे. आज व्यक्तीऐवजी गटागटांच्या सामूहिक हालचालींतून नाटच फुलविण्याची नवी टूम निघाली आहे. ती कल्पक आणि स्वागतार्ह आहे. पण त्याचेच प्राबल्य व त्याकडेच सर्व लक्ष केन्द्रित झाल्याने, होणारा अभिनय म्हणजे पुष्कळदा free style योगासने,

कवायती वा मुक्त नृत्यांची पोरकट प्रात्यक्षिके तर आपण बघत नाही ना, असे वाटू लागते आणि त्यामागील प्रतीकात्मता व आशयांचे आकलन अत्यंत दुर्बोध होते.

'नित्यनूतनत्व' हे कोणत्याहि कलेचे सनातन अंगभूत मूल्य आहे हे मान्य. पण त्यासाठी अनुभूतीचे क्षेत्र व्यापक करायला पाहिजे. प्रतिभेचे साक्षात्कार प्रखर होण्यासाठी सतत अभ्यास, चिंतन व चर्चा करायला पाहिजे. आशय आणि अभिव्यक्ति ही साहित्याची दोन प्रमुख अंगे होत. दुर्दैवाने आज ह्यांच्या बव्हंश प्रेरणा पाश्चात्यांकडून घेतल्या जात आहेत. पाश्चात्यांची संस्कृती वेगळी; सामाजिक, आर्थिक व कौटुम्बिक व्यवस्था वेगळी. महायुद्धे, यांत्रिकीकरण व कमाल औद्योगीकरण ह्यामुळे मानवी मूल्ये व सामाजिक नीतितत्वे ह्यात झालेले मूलग्राही बदल आपल्या भारतीय परिस्थितीशी अजिबात सुसंवाद न राखणारे आहेतः मानवी सभ्यतेपासून ढळलेला मानव जणू आदिमानवाच्या रानटी अवस्थेकडे वेगाने झेपावत आहे की काय अशी साधार भीति पाश्चात्य विचारवंतांना भेडसावीत असते. महायुद्धांनी दुभंगलेली कुटुंबव्यवस्था, शस्त्रास्त्रे व अतिसांपत्तिक सुबत्ता नि उपभोग्य वस्तूंची विपुलता – विलासप्रियता – आणि मानसिक विकृतींचे भयानक वाढते प्रमाण – ह्यामुळे काही पाश्चात्य देशांत आढळणारे नैराश्य, वैफल्य, असहिष्णुता, मरगळ, व्यर्थत्व, अविश्वास व आत्यंतिक अतिरेक, ही सार्वजनीन प्रवृत्ती बनू पहात आहे. समाज व कुटुंबव्यवस्था त्यामुळे धोक्यात आलेली दिसत आहे. मानवाच्या कर्तृत्वावर, नव्हे अस्तित्वावर देखील व्यर्थत्वाचे अर्थ तिकडे लावले जात आहेत. त्यामुळे पाश्चात्य लेखकांच्या अनुभूतीचे विश्वच अगदी वेगळे बनले आहे. त्यांच्या सामाजिक चित्शक्तीचा आविष्कार करणारे प्रस्फुरण त्यामुळेच अगदी आगळे वेगळे आहे. भारतीय सामाजिकाला व साहित्यिकाला पाश्चात्य साहित्य वाचून ह्या अनुभूतीचा परिचय असला तरी प्रत्यय मात्र येत नाही. आणि साहित्यनिर्मिती केवळ परिचयातून नव्हे तर प्रत्ययातून होत असते हे सनातन तत्व आहे. त्यामुळे साहित्यात आशय व अभिव्यक्तीचे केवळ अनुकरण घडत आहे. त्यातहि सरळ सरळ अनुवाद काही श्रेष्ठ कलाकृतींचे व्हावेत हे मी समजू शकतो, पण ऋणहि मान्य न करिता होणारी सरळ सरळ हिणकस साहित्यतस्करी, इथले पारंपारिक समाजजीवन, नीतिमूल्ये व स्वदेशनिर्माणाचे महान् प्रयत्न, धोक्यात आणीत आहे. चोरलेला साहित्यिक आशय स्वदेशीला देशोधडीला लावत आहे. आज भारतीय परंपरेतील समाजवादानुसार आम्हाला नवे राष्ट्र निर्माण करायचे आहे म्हणून २० कलमी योजना आमच्या लाडक्या पंतप्रधानांनी जाहीर केली व जनतेने त्याला प्रचंड प्रतिसाद दिला व देत आहे. अशा परिस्थितीत इथल्या सर्व क्षेत्रांतील पारंपारिक जीवनमूल्यांवर हल्ला करणारे हे उध्वस्तवादी परभृत वाङमय आवरते घेतले नाही तर अनवस्था ओढवेल हे निश्चित. शिवाय साहित्य हेहि एक साधन आहे. उपलब्ध सर्व साहित्यानिशी प्रत्येकाने भारताच्या नवनिर्माणात सहभागी व्हायला पाहिजे आहे. मग साहित्यच तेवढे उपेक्षून कसे चालेल ? शिवाय परंपरेनुसार, साहित्य हे नेहमी मंगलमय प्रेरणा व मानवतेवरील अढळ विश्वास निर्माण करीत आलेले आहे व त्याने इथे मानवतावादी सभ्यतेचा भरभक्कम पाया घातलेला आहे. त्यावर सुंदर मंदिर उभारायचे मानवतेचे की तो पायाच उखडून फेकायचा, याचा विवेक आज झालाच पाहिजे.

ह्या परक्या प्रेरणा जशा घातक तशीच केवळ नावीन्यासाठी चितारली जाणारी अपवादात्मक व केवळ आत्मनिष्ठ अनुभूतीहि समाजविघातकच. विकृत मनोवृत्तींची व न्यूनगंडाने पछाडलेल्या पाशवी प्रवृत्तींची चित्रणे आज साहित्यात धुडगूस घालीत आहेत. आपल्या हजारो मानवी पिढ्या मानवाला पशूपासून वेगळा काढण्यात, त्याला सभ्य व सुसंस्कृत बनविण्यात खर्ची पडल्या. त्यांनी समाज निर्मिला, काही सनातन मानवी मूल्यांवर तो उभारला; काही सनातन मानवी श्रद्धास्थाने निर्माण केली व कौटुम्बिक, सामाजिक आणि राष्ट्रीय व्यवस्था उभी केली. आज ही सारी प्रक्रिया आम्ही उलटया दिशेने नेणार काय ? 'वासुनाका', 'निष्पर्ण वृक्षाच्या छायेत' वगैरे सारख्या कादंबऱ्या, 'गिधाडे','वासनाकांड' आदि पद्धतीची उगीच आकांडतांडव करणारी गिधाडी नाटके, 'गध्येघोडे' सारख्या, कुत्र्यांचे भाद्रपदी चाळे विवाहित स्त्रीकडून करविणाऱ्या एकांकिका, एका विकृतकामासक्त कामिनीवर बलात्कार करणारा विषयलंपट भारतीय विघ्नहर्ता देव, गणपती – रंगविणाऱ्या गलिच्छ कविता; रक्त, पू आणि बीभ-

अनुक्रमणिका

त्सच अर्थ व क्रियापदे पदोपदी योजणारी अभिव्यक्ति-पद्धती, आज पद्धतशीरपणे प्रचारात आणली जात आहे. गेल्या दशकातील काही तथाकथित समीक्षक व प्रकाशक कंपूशाही करून झुंडगिरीद्वारे ह्या प्रकारच्या साहित्याला प्रतिष्ठाहि मिळवून देत आहेत ! सख्खा भाऊ व बहीण ह्यांच्यातील संभोग, भावांनी बहिणींच्या व वडिलांनी पोटच्या पोरींच्या आलेल्या पोटांची व ते पाडण्यांची केलेली चविष्ट चर्चा, विवाहित स्त्रीने इतर अनेकांशी करावयाचे व केलेले मनःपूत संभोग, पत्नीने पतिसंमतीने किंवा अन्यथा करावयाचे साहेबी व्यभिचार व ह्यासारखेच अन्य अनन्त व्यभिचार, अत्याचार, अनाचार व दुराचार ह्यांची समाजचारित्र्यहननकारक चित्रणे व माणसासाठी केवळ विषयासक्त कुत्र्यामांजरांची केलेली वेचव प्रतीकात्मक रचना, हे सारे आपल्या भारतातील वास्तवाचे, भारताला भेडसावणाऱ्या सामाजिक, कौटुम्बिक, आर्थिक व राष्ट्रीय समस्यांचे, सार्वजनीन अनुभूतीजन्य प्रामाणिक आविष्कार आहेत काय ? भारतीय परंपरेतील समाजवादाच्या उभारणीसाठी करावयाच्या श्रीमती इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील प्रामाणिक प्रयत्नांना असले साहित्य हानिकारक ठरणार नाही काय ? साहित्याने अशांतता, अस्थिरता व गडबडगोंधळ आणि मानवतावादी मूल्यांना तारावयाचे की मारावयाचे ह्याचा आज विचार व्हायलाच पाहिजे. पण दुर्दैव असे की ह्याचा विचारहि कुणी करीत नाही. ही लंपट लैंगिकता व विकृत वैषयिकता ह्यांचा अल्ट्रा-मॉडर्न 'टच्' आज निर्माण होणाऱ्या ९९ टक्के साहित्याचे जणू सोने करीत आहे असे समीक्षकांनाहि वाटत आहे ! ते त्या 'टच्' मध्ये उदात्त भारतीय तत्वज्ञानांतील जीवाशिवाचे ऐक्य शोधीत आहेत; 'अहं ब्रह्मास्मि'चा साक्षात्कार अनुभवीत आहेत !! संभोगातून समाधीकडे किंवा प्रेयसीच्या वशिल्याने परमेश्वराकडे नेणारी ही साहित्यिक बुवाबाजीच नाही काय ? समाजातील विकृती साहित्यिकांनी घालविली पाहिजे पण ती प्रकृती समजून रंगविल्यानं हे साधेल काय ? असले गिधाडी आईबाप, मुले, भाऊवहिणी, विद्यार्थी, तरुणतरुणी व समाजघटक या देशात किती प्रमाणात आहेत ? त्यांचे असले लैंगिक व लंपट जीवन ही ह्या समाजाची प्रकृती आहे का? विकृती हा अपवाद असतो. अपवाद अपघातासारखा असतो. अपवादाचा बाऊ करीत, 'लोकयात्रा' कधी बंद झाली आहे का ? त्याचाच शोध व शोक करीत ऊर बडविल्याने लोककल्याण साधेल काय ? ह्या विकृतीची वैयक्तिक स्तरावर अनुभूती लेखकाला कदाचित् येतहि असेल पण ती सार्वजनीन समजून चितारणे इष्ट नाही. कारण अपवादात्मक व्यष्टिनिष्ठ अनुभूती साहित्याची प्रेरणा होऊ शकत नाही; आणि विकृती उपेक्षित नसली तरी अपेक्षित नसतेच.

ह्याचा अर्थ असा नाही की साहित्यिकांचे स्वातंत्र्य हिरावून घ्यावे. साहित्यिकांनी अमुक विषयावरच लिहावे, अमुक विषयावर लिहू नये अशी सक्ती नसावी. पण मित्र हो, साहित्यिकावर विषयाची सक्ति नसावी पण म्हणून तो नेहमी विषयासक्तच असावा असे कुठंय् ? काम हा 'एक' पुरुषार्थ आहे, 'एकच' नाही. शिवाय कामवासनेतून सर्व घटनांकडे पहाण्याचा फ्राईडचा चष्मा आता निकामी झालेला आहे. कामवासनेपेक्षा जगण्याची वासना अधिक बलवत्तर असते. तीच साहित्याचे मूळ प्रेरणास्थान असते. आणि म्हणूनच लेखकांनीच स्वातंत्र्य आणि स्वैराचार ह्यात विवेक केला पाहिजे. सार्वजनीन सभ्यता व मानवतावादी उदार नीति उध्वस्त करणारे स्वातंत्र्य, स्वैराचार ठरेल आणि त्यावर बंधन घालणे हे विचारवंतांचे कर्तव्यच ठरेल. साहित्यिक समाजाचा घटक असतो आणि या देशाचा नागरिक म्हणून जगतो. समाजधारणा व सुधारणा आणि स्वदेशनिष्ठा व प्रतिष्ठा प्रस्थापिण्यात योगदान देणे हे साहित्यिकाचेहि कर्तव्यच ठरते. समाज त्याला सर्वप्रकारचे सुखी जीवन देतो; देश त्याला सर्व प्रकारचे व सर्वांपासून संरक्षण देतो. मग त्या साहित्यिकाने त्या समाजाची व त्या देशाची उपेक्षा करणे – स्वातंत्र्याच्या व्याख्येत बसेल काय ? सामाजिक व आर्थिक न्याय मिळवून देणारा व सर्वप्रकारच्या मानवनिर्मित विषमतेविरुद्ध सुरू असलेला आजचा लढा साहित्यिकांनी उचलून धारायला नको का ? ह्या दृष्टीने समाज व शासन, मानवतावादी दृष्टिकोनातून करीत असलेले प्रयत्न व आखीत असलेल्या नानाप्रकारच्या सामाजिक व आर्थिक अनुशासनपूर्ण योजना, ह्यांच्या बाबतीत साहित्यिकांनी उदासीन राहणे लेखकांच्या स्वातंत्र्यात बसेल काय ? नाही. कारण जो कर्तव्य करायला विसरतो त्याला स्वातंत्र्य भोगायचा अधिकार नसतो.

केवळ नावीन्य व वेगळेपणा ह्यापायी आज साहित्यात दुर्बोधता येत आहे. "बुंथी आहे नाही" ह्या काव्यातील 'बुंथी'चा अर्थ शोधायला शब्दकोष घेऊन

बसावा लागतो. गेल्या दशकातले बरेचसे नवकाव्य, नवकथा, नवनाटक वगैरे वाङ्मयप्रकार व्याख्येशिवाय समजतच नाहीत. भामहाने 'व्याख्यागम्यत्व' हे शास्त्राचे लक्षण म्हटले आहे; वाङ्मयाचे नाही. 'व्याख्यागम्यत्व' काव्याचे दूषण होय असे तो स्पष्ट सांगतो. ही गेल्या दशकातली दुर्बोधताहि चालेल एकदाची, पण आज तर वाङ्मय अबोधतेकडे झुकते आहे. मासिकाच्या पानावर डाव्या कोपऱ्यात खालच्या भागाला 'क्व' शब्द बारीक अक्षरात लिहायचा आणि त्याच पानाच्या उजव्या कोपऱ्यात पण वरच्या भागा-पर्यंत असे उभट आडवे 'क्व क्व' हे अक्षर जाडे जाडे काढीत लिहीत जायचे – म्हणजे निर्माण होणारा हा अक्षरांचा गुंता म्हणजे काव्य म्हटले जाते. ह्यात काहीहि अर्थबोध होत नाही. ह्या क्वच्या बालचित्र-लिपीला काळी जाडी चौकट मात्र त्या मासिकाने घातली होती. नवकाव्याचा जणू तो मृत्यूलेखच होय, असे तर सुचवीत नव्हती ना ती काळी चौकट! ही 'सत्यकथा' आहे. आज या अबोधतेच्या पुढे जाऊन मन:पूतार्थतेचे प्रयोग सुरू झालेत. 'पक्षी जे झाडावर गाणे गातो' 'पक्षी जे झाडावर गातो' 'झाडावर जे पक्षी गातो' असल्या काव्याचा अर्थ—म्हणे ज्याला जसा समजेल तसा असतो! अशाच प्रकारच्या काव्यपंक्ती मला एकदा एकाने ऐकवल्या—

> आट्यावर पिट्या, काय काय पिट्या
> पोराची पिवळी तुपाची। बॉनबीन बूनबू
> याक् हुक् चक्क थू: !

मी म्हटले ह्याचा अर्थ काय? तो म्हणाला तुम्हाला काय वाटते? मी म्हटलं मला मळमळते—चक्क थुंकावेसे वाटते! हे ऐकून तो खूष झाला. तो म्हणाला, 'माझ्या काव्याचा परिणाम झाला.' हे परिणामकाव्य आहे. इथे अर्थ लावायचाच असेल तर तो ज्याने त्याने आपल्या मनाला वाटेल तसा लावावा! एका थोर समीक्षकाने ह्याचा अर्थ असा लावला म्हणे की हे 'चक्क थू:'चे काव्य भारतीय तत्वज्ञानाचा उन्मेष आहे. 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या' हा त्याचा गंभीर अर्थ आहे!

कुणालाहि काहीहि न समजेल असे लिहिणे बोलणे वा वागणे सगळ्यांनाच येते, पण तसे कुणी करीत नाही कारण ते सुजाणणाचे लक्षण नाही. माझा आशय दुसऱ्यांना कळावा म्हणूनच ना अभिव्यक्तीची धडपड असते? आणि खरे म्हणजे कुणालाहि चटकन् समजेल असे लिहिणेच फार कठिण असते. खरी कला त्यातच आहे. प्रसादगुणाचे काव्यातील अनन्यसाधारण महत्व म्हणूनच सर्वांनीच प्रतिपादिलेले आहे. पण चटकन समजले तर आपली हीन अभिरुची, प्रतिभेचे दारिद्र्य, व आशयाची उथळता वगैरे पितळ उघडे पडेल ही भीती वाटल्यामुळेच तर हा दुर्बोधतेचा, अबोधतेचा व मन:पूतार्थतेचा आश्रय घेतला जात नाही ना? हे असले व्याख्यागम्य, प्रायोगिक, दुर्बोध वाङ्मय फक्त विशिष्ट वर्गाकरताच, विशिष्ट क्लास करताच उपयोगी ठरते; कदाचित् ते तसेच ठरावे आणि म्हणजेच मग ते 'क्लाससाठी' म्हणूनच 'क्लासिक' ठरेल असा अनुकूल भ्रम तर ह्यांना नाही ना? आजवरच्या 'क्लासिक्स'ना केव्हाहि केवळ "क्लास अपील" नव्हते. 'मासेस' साठी जे निर्माण झाले, 'मासेस'ने जे डोक्यावर घेतले, 'मासेस'च्या जे मनात ठसले तेचं 'क्लासिक' ठरले. निरक्षरांना कळले, नव्हे वळलेहि तेच वाङ्मय अक्षर ठरले. वाल्याचे रामायण, मत्स्यगंधासुताचे महाभारत, समाजाने वाळीत टाकलेल्या दलिताची ज्ञानेश्वरी, तुकोबा चोखोबा व जनाईचे अभंग, कबीराचे दोहे व तुलसीचे मानसचरित्—नव्हे अगदी अलीकडील घ्यायची तरी राष्ट्रसंतांची ग्रामगीता, साळूबाई ढसाळांचे रसाळ अभंग, बहिनाबाई चौधरींची गोड गीते—अशी किती किती उदाहरणे द्यायची? व्याख्यागम्य गाठाळ काव्य कसे रसाळ ठरणार? ते ठरते नाठाळच!

आजकाल आणखी जाणवते ते म्हणजे अभिव्यक्ती-साठी वापरली जाणारी शब्दार्थांची अमंगलता. साल्या, भडव्या, भ्यांचोद, ह्यासारख्या शिव्यांचा व बीभत्स शब्दांचा सर्रास वापर करण्यात कुठली कलात्मकता आहे न कळे! अशक्य ते शक्य करून दाखवतो, असाध्य ते साध्य बनवितो – तो कलावंत. आम्हाला जे अशक्य, असाध्य वाटले ते तूं साधले म्हणून तू साहित्यिक. पण वरील अमंगळ व बीभत्स भाषा कुणालाहि अशक्य वा असाध्य आहे काय? कुणीहि ती सरसकट वापरत नाही ह्याचे कारण ती अशक्य वा असाध्य आहे हे नाही तर ती 'असभ्य' आहे, हे आहे. असाध्य आणि असभ्य यातला विवेक साहित्यिकांनी राखला पाहिजे. बोलण्या-वागण्यातली असभ्यता, ही कलावंतांची नव्हेत तर कलावंतीणींची लक्षणे होत. साहित्याने समाज सुधारता येतो किंवा हे सुधारण्याचा ठेका साहित्यिकांनी घ्यावा

हे कदाचित कुणाला मान्यहि नसेल पण निदान तो समाज त्यांनी विघडवू तरी नये हे कुणालाहि मान्य व्हावे. साहित्यांत 'रंजन' असावे की 'अंजन' ह्याबाबत वाद होऊ शकतील, पण त्याने 'भंजन' करू नये हे तर विवादातीत आहे ना ?

काही लोक विचारतात, की काय हो, हे आजकालचे वाङमय इतके वाईट आहे तर लोकांना ते आवडते कसे ? ते ते वाचतात कसे ? ह्यावर एका अगतिक तरुणीची गोष्टच उत्तर म्हणून देता येते. परमेश्वर प्रसन्न झालेल्या तरुणीने परमेश्वराला म्हटले, 'देवा ! माझं ज्याच्यावर प्रेम आहे तो मला पति म्हणून मिळू दे.' परमेश्वर म्हणाला हे न झाले तर दुसरे काय मागतेस ?' ती म्हणाली, 'माझं ज्याच्यावर प्रेम आहे तो पति म्हणून मिळत नसेल तर निदान जो कुणी पति म्हणून मिळणार असेल त्याच्यावर प्रेम तरी करू दे.' अगतिक वाचक म्हणतो, जे आवडते ते मिळत नसेल तर जे मिळते ते तरी आवडून घेऊ दे ! याचा अर्थ असा नाही की आजकाल चांगले वाङमय निर्माणच होत नाही. ते होते आहे. पण वाईट वाङमयहि मोठ्या प्रमाणावर निर्माण होत आहे आणि त्यामुळे अर्थशास्त्राच्या नियमानुसार धोका निर्माण झाला आहे. कारण अर्थशास्त्रात असे म्हणतात की 'Bad money drives good money out of circulation.' तसं वाईट साहित्य चांगल्याला चलनातून चटकन घालवील ह्याचा धोका असतो, म्हणून वाईटाच्या निर्मूलनाकरिता प्रयत्न व्हावा लागतो.

पुष्कळ साहित्यिक मला सांगतात, अहो आम्ही असले लैंगिक मुद्दाम का लिहितो ? गळचाशी बेतते— लिहिल्याशिवाय गत्यंतरच नसते, म्हणून लिहितो. यावर मी फक्त एका धर्मोपदेशकाची गोष्ट सांगतो,— की एक धर्मोपदेशक सांगत असे की गळचाशी बेतत असेल – प्राणच जाण्याची पाळी येत असेल तरच दारू प्या. त्यामुळे त्याचे शिष्य त्या धर्मोपदेशकापुढं जेव्हा जेव्हा दारूचा प्याला ठेवीत तेव्हा तेव्हा तो उपदेशक 'मी दारू घेत नसतो' असे म्हणून तो नाकारी आणि मग एक शिष्य सुरा हाती घेऊन धावत येई व उपदेशकाच्या गळचाला लावी – मग जीवावर बेतले—गळचाशी आले म्हणून – तो उपदेशक तो दारूचा प्याला गटकन गिळून घेई असे नित्यच चाले !

वाङ्मयात व्यक्तिचित्रणाला नको तर प्रवृत्तीचित्रणाला प्राधान्य हवे. सुष्ट व दुष्ट प्रवृत्तींचे व्यक्तिनिष्ठ चित्रण केले की नायक वा खलनायक निर्माण होतात. अतिमानवतेची अभिव्यक्ती होते आणि मग व्यक्तिपूजा वा व्यक्तिविद्वेष वाचकांच्या मनात घर करू लागतो. मग रामरावणवादाने कलह व फुटीर वृत्ती वाढीला लागते. व शेवटी एकाची देवळे आणि दुसऱ्याची होळी करून मानव मोकळा होतो. शिवाय व्यक्ति महान ठरली की समाज आपोआपच लहान वाटू लागतो. व्यक्ती आदर्श बनली की ते आदर्श आपल्याला झेपणारे नाहीत म्हणून समाज न्यूनगंडाने पछाडतो. तसेच दुष्ट व्यक्ति मारून समाजाचे कधी उन्नयन होत नाही. दुष्ट प्रवृत्तींचे समूळ उच्चाटन महत्वाचे ठरते. अहीमही राक्षस व्यक्ती मारल्या तेव्हा त्यांच्या रक्ताच्या प्रत्येक थेंबांतून हजारो अहीमही निर्माण झाले हा बोध महत्वाचा आहे. तोच घेऊन कदाचित् रामायणापाठी निर्माण झालेल्या महाभारतात, व्यक्तिसापेक्ष सुष्ट वा दुष्ट प्रवृत्ती–चित्रण व्यासांनी केले नसावे. पाच पांडव व शंभर कौरव व इतर असंख्य सुष्ट दुष्ट आधाराला घेऊन ह्या प्रवृत्तींचे प्रभावी चित्रण व्यासांनी केले आहे. बायकोचाहि जुगार खेळणारी अविवेकी धर्मप्रवृत्ती आणि पत्नीची विटंबना भरसभेत खाली मान घालून सहन करणारी अगतिक पराक्रमी प्रवृत्ती मानवी वाटते. समाजाला मानवते ती मानवता, ना की अतिमानवता.

विनोद आमच्या मराठी साहित्याचे फार मोठे भूषण आहे. विनोदाचा स्तर व विविधता मराठी वाङ्मयाने जेवढी साधली तेवढी इतर कुठल्याहि भारतीय भाषेला साधता आलेली नाही हे आम्ही मोठ्या अभिमानाने सांगू शकतो. विनोदाचे साहित्यातील स्थान जीवनातील मिठासारखे आहे. त्यावाचून वाङ्मय आळणी वाटते. आपाततः सुसंगत वाटणारी विसंगती - विनोदाची गुरुकिल्ली आहे. चांगला विनोद निर्माण करणे चांगल्याचांगल्यांनाही जड जाते. ज्याला विनोद जमतो त्याचे सगळचांशीच जमते. माणसाला जिवंत ठेवूनहि मेल्याहून मेल्यासारखे करायचे असेल तर विनोदाशिवाय दुसरे शस्त्र नाही ! – पण ह्याबाबत छोटीशी तक्रार आहे की विनोदी वाङ्मय सगळचांना आवडते; ते पैसाहि देऊन जाते, पण त्याच्या लेखकाला व त्या वाङ्मयालाहि मिळावी तेवढी प्रतिष्ठा व मान समाज अजूनहि देत

नाही ! तो हलका फुलका लेखक आहे अशी शेलकी शिवीहि कधीकधी त्याच्या नशिबी येते ! असो.

मित्र हो ! एका कोळयाने रामायण' लिहिले. एका सूताने शौनकाला महाभारत सांगितले; कानीन पुत्राने लिहिलेले महाभारत सांगितले. एका शूद्रपुत्राने, ऐतरेय ब्राह्मण लिहिले, उपनिषद लिहिले. पण ह्यांच्या जातीची गेल्या हजारो वर्षात कधी कुणी विचारपूस केली का ? नव्हे हा विचार तरी कधी कुणाच्या मनात आला का ? तमाम जनतेने आजवर जाणली ती फक्त त्या साहित्याची जात. आणि मग सगळया जातिजमातीचे ते साहित्य झाले जीव की प्राण ! त्या लेखकांनाहि कधी जाणवली नाही आपली जात. स्वप्नांत सुद्धा गरजच वाटली नाही त्या आधारे विचार करण्याची त्यांना. कधी वाटले नाही त्यांना की आपल्या जातीच्या आधारे आपला वेगळा साहित्यिक संसार मांडावा. तुका, चोखा, नामा, कबीर, सावता, महदंबा, नरहरी सारख्यांनी कधी वेगळी दिंडी काढली नाही; कधी वेगळा कंपू करून चंद्रभागेच्या वाळवंटात वेगळी पताका फडकविली नाही. त्यांना समाजाने कधी अव्हेरलेही नाही आणि ही पाळीच त्यांच्यावर येऊ दिली नाही. आजच्याहि युगात श्री. शंकरराव खरात, सुरडकर, वागुल, ग्रेस, शेंडे, मनोहर, मेश्राम, शेळके, तल्हार, मोहोड इत्यादि प्रतिभासंपन्नांचे साहित्य अत्यंत ललित व उच्च दर्जाचे म्हणूनच तमाम पब्लीकने स्वीकारले आहे. त्यावर ललिताऐवजी दलिताचा शिक्का मारण्याची कधी गरज कुणाला वाटली नाही.

बरे, आजवरच्या साहित्याचा आशयदृष्टया विचार केला तरी काय दिसेल ? जिंकण्याच्या पाशवी भावनेपायी, जेत्यांच्या उन्मत्त मनोवृत्तीपायी, भोगवादाच्या पिसाट गंडापायी, एका पारध्याने क्रौञ्च पक्षाचा जीव घेतला. पक्षाची जगण्याची इच्छा आणि पारध्याची जिंकण्याची इच्छा ह्यातला सनातन संघर्ष वाल्मिकींनी जाणला आणि त्यांची मानवतावादी सामाजिक जाणीव जागी झाली. क्रौञ्चाच्या दलितावस्थेने त्यांचे वैश्विक मन द्रवले; चित्शक्ती स्फुरली आणि तिचा आविष्कार छंदोमय वाणीत झाला. रामायण निर्माण झाले. असेच महाभारतहि घडले. पुराणेहि घडली. शूद्रक, बाण, कालिदास, ज्ञानेश्वर, तुकाराम, मोरो पंडित, देवल, गडकरी, फुले, डॉ. आंबेडकर, महात्मा गांधी, टिळक, आगरकर, अत्रे, खांडेकर, वीर वामनराव, वामणगावकर, लोकनायक अणे आणि वियाणी – इत्यादि किती किती नावे घ्यावीत ?— ह्या साऱ्यांची साहित्यिक प्रेरणा – ह्याच संघर्षातून निर्माण झाली ना ? आजहि हाच संघर्ष समाजजीवनात, मानवी मनात, देशोदेशींच्या शासकांच्या वर्तनांत जागा आहे. दलितावस्थेचे चित्र, 'अजून रंग ओला आहे' ह्याच अवस्थेत आहे. मग साहित्यिकांनी ही जगण्याची इच्छा आणि ती जिंकण्याची इच्छा ह्यापैकी कुणाचा पिच्छा पुरवायचा हे ठरवायचे नाही का ? हा संघर्ष संपवून, दलितावस्थेचे निर्मूलन करण्यासाठी वा ह्या संघर्षाच्या केवळ चित्रणासाठी कुणी वेगळे दलितबंड करायला पाहिजे का ? दलित ही जात नाही; अवस्था आहे. ती कुणाच्याहि नशीबी व केव्हाहि येऊ शकते. पण ती कधीच व कुणाच्याहि नशीबी येऊ नये ह्यासाठी सतत जागरूक रहाणे साहित्यिकांचेहि कर्तव्य नाही का ? पण कदाचित् हे असे घडत नसेल किंवा असा विश्वास वाटत नसेल म्हणून तर दलित साहित्याचे नवे निशाण साहित्य क्षितिजावर फडकवायला आज कुणी पुढारला नसेल ना ? पण साहित्यिकांत कधीहि नव्हती ती वैफल्यजन्य वेगळेपणाची जाणीव व फुटीरतेचे बीजारोपण आपल्याच काही लाडक्या बांधवांच्या मनात कुण्या ना कुण्या निमित्ताने व्हावे ही दारुण खंत व्यक्त केल्याशिवाय चैन पडत नाही. ही विलगता विलयाला लौकरात लौकर जावो हीच प्रभुचरणी प्रार्थना ! दलित वाङ्मय ललितवाङ्मय नाही का ? वाङ्मय म्हटले की काही सनातन बाबी त्यात येतातच. त्यांची सनातन मूल्ये त्यामुळे राहतील ती एकच. म्हणून दलित वा ललित हा भेद बाजूला ठेवून विचार करू या.

अनुभवसंपन्न आशय व्यक्त करण्यासाठी गवसलेल्या विषयवस्तूत नाटय पाहिजे आणि स्फुरलेल्या शब्दात आणि अर्थात अभिनयसंपन्नता पाहिजे. आशयनिष्ठ वस्तूतील नाटय आणि शब्दार्थातील अभिनयसंपन्नता ही काव्याची श्रेष्ठ मूल्ये होत. तसेच साहित्यिक, समाजपुरुषाचे, राष्ट्रपुरुषाचे एक अविभाज्य अंग होत. त्यापासून ते फटकून वागतील, आपल्याच उंच मनोऱ्यात खिडक्या बंद करून तोऱ्यात विराजमान होतील तर विषारी बनतील, विंचवाची नांगी असते ना तशी – विंचवाच्या शरीरापासून फटकून उंच तोऱ्यात विराजणारी आणि म्हणूनच अत्यंत विषारी !

संभूत आणि संभाव्य म्हणजेच वास्तव आणि काव्य ह्यांचे सीमांकन. काव्याचे प्रयोजन, काव्याचे स्वरूप, काव्याचे आत्मतत्त्व वगैरे काव्यशास्त्रीय प्रमेयांची अनुमेयता वाल्मिकी रामायणातून अचूकपणे करता येणे अशक्य नाही. संस्कृत काव्यशास्त्रज्ञांनी, श्री मम्मटाचार्यांनी विधिसृष्टि व कविसृष्टीची महती वर्णन केली व त्यातून वास्तव व काव्य ह्यांची सीमारेषा स्पष्ट केली. ह्या विचारांचे अचूक सूचन वाल्मिकीच्या रामायणात स्पष्ट जाणवते. पक्षीनिष्ठ पक्षाभिनिवेशातून निर्माण झालेला शाप जेव्हा पक्षनिरपेक्षपणे वैश्विक वेदनांना वाचा फोडणारे वरदान ठरला तेव्हा काव्यप्रांतात पहिले पदार्पण झाले. वास्तवातील कारुण्यपूर्ण शोक विकारविरहित रमणीय श्लोकात परिणत होतो ही वास्तवाची काव्यात परिणती होय.

सभाक्षरैश्चतुर्भिर्यः पादैर्गीतो महर्षिणा ।
सोऽनुव्याहरणाद्यः शोकः श्लोकत्वमागतः ।।

क्रौञ्चवधाच्या प्रसंगाने वाल्मिकीमुनींच्या मनात कारुण्यातिशयाने खळबळ माजविली, ऊर दाटून आला – भरल्या कंठातून शोकजन्य क्रोध शापद्वारा उक्त झाला. पण हा विकाराचा क्षण होता. वाल्मिकीमुनि चिंतित झाले.

तस्येत्थं ब्रुवतश्चिन्ता बभूव हृदि वीक्षतः ।
शोकार्तेनास्य शकुनेः किमिदं व्याहृतं मया ।।

मी काय बोलून गेलो हे? ही शापमय उक्ति? छेः ह्या शब्दांचे स्वार्थ परमार्थप्रत जाऊ देत. हे पाप, पुण्य होऊ दे. संस्काराने विकार नाहीसे होऊ देत – हा शोक श्लोक होऊ दे. 'हिंसा पाप आहे' हे शास्त्र जाणून दिलेला शाप मनाला तापदायक झाला म्हणून त्याचे पुण्यप्रद श्लोकात, काव्यात परिवर्तन होवो ही वाल्मिकींची संकल्पना जगातल्या कुठल्याहि टीकाशास्त्राचा भरभक्कम पाया ठरावी.

पादबद्धोऽक्षरसमस्तन्त्रीलयसमन्वितः ।
शोकार्तस्य प्रवृत्तो मे श्लोको भवतु नान्यथाः ।।

विषयसापेक्ष आशय अतिशय होऊन उक्त झाला की त्याला वेगळेपणा प्राप्त होतो. त्या शब्दांची जात संस्कारित होते व सुसंस्कृत माणसाप्रमाणे तिला वक्रत्व व दीप्तरसत्व प्राप्त होते. मग शापवाणी श्लोकवाणी होते. म्हणूनच ब्रह्मदेव विचलितमना वाल्मिकी ऋषींना सहेतुकपणे सस्मित म्हणाले––

तमुवाच ततो ब्रम्हा प्रहसन्मुनिपुंगवम् ।
श्लोक एवास्त्वया बद्धो नात्र कार्या विचारणा ।।

हे वाल्मिकी मुने, हा श्लोक होवो – ही तुझी व्यक्तिगत अपवादभूत अनूभूति न राहो. तुझी शोकभावना, संभावनेत परिणत होवो व त्यातून कारुण्यभाव अभिव्यक्त होवो. तुझ्या हातून रामायण महाकाव्य होवो. आणि म्हणूनच आपण टीकाशास्त्रात म्हणतोच की, भावना संभावनेत परिणत झाली की भावाभिव्यक्ति होते, तो भाव होतो. त्याचे भावगीत बनते. अन्यथा उरते ती केवळ अपवादभूत व्यक्तिगत अनुभूति. आणि व्यक्तिगत अपवादभूत अनभूति दुःखदायक असते. तिचे भावगीत मात्र सुखदायी होते – ब्रम्हानंदसहोदरस्वरूप असते.

एक क्रौंचवधवर्णन रामायणात विलीन झाले आणि रामायणाने त्या कौंचवधाला सामावून घेतले. आणि म्हणूनच टीकाशास्त्राचा सिद्धान्त जन्माला आला, की तेव्हाच काव्य होईल जेव्हा व्यक्तिगत अनुभूतिवर्णन समष्टीत विलीन होईल व समष्टिसापेक्ष अनुभूतिवर्णन व्यक्तीला आपल्यात सामावून घेईल. . . माझी व्यथा जगाच्या व्यथेला वाचा फोडेल आणि जगाने फोडलेल्या टाहोत माझ्या वेदनेचा अंत होईल.

शापवाणीचे शब्दार्थ, श्लोकवाणीत रूपांतरित होणे ही किमया काव्याचीच. पिसाटवारा सोबतीला घेऊन ग्रीष्मावर आक्रमण करीत काळेभिन्न मेघ अवतरावेत आणि कुण्या रसिकाने मान उंचावून विशाल अवकाशात कधी पहावी वप्रक्रीडारत मदोन्मत्त गजाची प्रखर प्रस्तराला टक्कर देणारी अवखळ प्रतिमा, तर कधी अनुभवावी गोपवेष लेवून गुणी गोपिकांसह झिम्मा घालणारी सावळयाची पावा वाजविणारी, शृंगारमय मुलामय भावप्रतिमा. पण ह्या प्रतिमा म्हणजे ना मेघ ना वारा – पण त्यांनीच स्वतःला बाजूला ठेवून कमावलेली एक साधना. वनोपवनात उंच उडावेत थुईथुई जलतुषार आणि त्यातून शिरावेत आडदांड सूर्याचे भेदक किरणकलाप आणि त्या विलोभनीय मिलापातून उठून यावी सप्तरंगी इंद्रधनूची प्रतिमा, की जी न मेघ, न जलतुषार, ना रविकिरण; पण त्यातूनच प्रतीयमान होणारी एक सुखद भावुक सप्तरंगी ढंगदार प्रतिमा. जलतुषार आणि रविकिरण ह्यांच्या सहकार्याची एक काव्यमय तदितर साधना. लांबसडक नाजुक अंगुली फिरविते कुंचले रंगांच्या

असंख्य रेखा ओढीत आणि त्यातून प्रकटावी एखादी हृदयाल्हाददायक ओलेती वा मन व्याकुळ करणारी कृषविरहिणी; की जी नसते रंग ना रेखा, पण या रंगरेखातूनच प्रकटणारी – रंगरेखांना गौण करून उमटणारी एक आगळीच भावस्पर्शी प्रतिमा. रंगरेखांच्या सहकार्याचे उदात्त प्रतीक! असंच असतं काव्याचं. ह्याचमुळे बनतात वाल्मिकीच्या पापमय शापवाणीतील शब्द आणि अर्थ पुण्यप्रद श्लोक.

"तेनास्य श्लोकस्य करुणरसमयत्वं ध्वनितम्।"

क्रौंचवधरूप अधर्म जाणून – शास्त्रानुसार वाल्मिकी वदले शाप. त्या शापवाणीत आहे शब्दांचा स्वार्थ. शब्दांचा दंभ व अर्थाचा स्वार्थ केवळ आत्मपर बनून तत्वार्थशोधन करतात तेव्हा बनते शास्त्र आणि म्हणूनच शास्त्रात असते शब्दप्रामाण्य. पण काव्यात मात्र शब्द 'मीपण' विसरतात आणि अर्थ स्वार्थ सोडून परमार्थपर बनतो आणि परमार्थ साधून सहृदयस्पर्शी भावपोषण व रसनिर्सिचन करतो तेव्हा बनते काव्य, आणि म्हणूनच काव्यात असते भावप्रामाण्य. काव्य असते परमार्थरूप परमार्थसाधन. हाच आहे आदिकवीचा शास्त्र आणि काव्य ह्यातील विवेक.

"सहृदयहृदयस्पर्शिपरमार्थोत्थापनक्षमशब्दार्थयुगलं काव्यम्" अशी बनते उत्कृष्ट काव्याची व्याख्या. तीच जीवनाची थोरवी आहे ना? नाही तरी "स्वार्थ" सोडून परमार्थ साधण्यातच जीवन सार्थ ठरते ना? मग जीवनाचे चित्र म्हणवणारे काव्य जीवनाशी फारकत घेऊन आपला व्यवहार कसा करणार?

अशी सार्वजनीन जाणीव व निरपराधी दुर्बलाचा कणव, कविताकारुत्वाचा कणाच होय. ह्याविना काव्य ही केवळ कवीची केविलवाणी धडपड होय. शब्दार्थाची अनुकंपनीय हेमाडपंथी जडणघडणच होय. आदिकवी वाल्मिकीच्या शापवाणीचे श्लोकवाणीत रूपांतर होते हे सामर्थ्य कवीचेच. प्रतिभागुणाशिवाय हे घडणे नलगे.

वाङमयात भोवतालच्या परिस्थितीचे चित्रण हवे. भेडसावणाऱ्या सर्वच प्रकारच्या समस्यांना त्यांत स्थान हवे असे म्हटले जाते. पण म्हणजे नेमके काय असावे हे मात्र कळत नाही. भोवतालची परिस्थिती, घटना व समस्या ह्यांचे साहित्यात प्रतिबिंब पडावे अशीहि काही मंडळी भाषा वापरतात. पण हे उचित नाही. साहित्यात घटनांचे प्रतिबिंब नको; परिपाक पाहिजेत; परिणाम पाहिजेत. वैचारिकता हा साहित्याचा धर्म आहे. प्रतिबिंब घेणे हा कॅमेराचा उद्योग आहे. सामाजिक संदर्भ आणि सर्वव्यापी जीवनातील संघर्ष केवळ प्रतिबिंबित करून जतन करण्याने काय साधणार? आगीशी झगडायचे ते ती विझवायला; ती पेटत ठेवायला नाही! तिचे प्रतिबिंब टिपीत बसल्याने त्या आगी स्मृतीरूपाने का होईना पण जाग्या राहतीलच; कायमच्या विझणार नाहीत. प्रतिबिंब म्हणजे नकला, कला नाहीत. सूडाची भावना पेटत ठेवणारी प्रतिबिंबे नेमके वैर वाढवितील, शमवणार नाहीत. आज साहित्यात नेमके प्रतिबिंब काढणे सुरू आहे. म्हणूनच 'बाईंडर,' 'गिधाडे' व 'गद्घेघोडे' ह्यांच्या स्वरूपात मानवाचे पशुपश्वादि दशावतार चित्रित होत आहेत. म्हणूनच वाङमयांत घटनांचेहि केवळ पडसाद नकोत; त्यांना मानवांचा प्रतिसाद पाहिजे. 'चोर चोर', 'धावा धावा', असे कुणी म्हटले तर शेजाऱ्याने त्याचे नुसते 'चोर चोर' व 'धावा धावा' म्हणून पडसाद उमटवायचे की त्याला 'आलो आलो' 'पकडा पकडा' म्हणून प्रतिसाद देऊन धीर द्यायचा; चोर पळवायचा, विनाश टाळायचा, आणि आपत्ती घालवायची? पडसाद व प्रतिबिंब ही इतिहासाची कलमे होत. बखरीची पाने त्याने भरावीत. ही खबर बखरीने घ्यावी – साहित्याने घ्यावी ती ह्या खबरीची खबरदारी; तसे पुनः घडू नये म्हणून खबरदारी. समाधानाची गोष्ट ही की अशी खबरदारी अभिजात मराठी साहित्य नेहमी घेत आलेले आहेच. आणि याचेच गोड फळ म्हणून यंदाचे भारतीय ज्ञानपीठाचे अनमोल पारितोषिक मराठीतील ख्यातनाम साहित्यिक श्री. भाऊसाहेब खांडेकर यांना मिळाले आहे. ह्या सन्मानाबद्दल भाऊसाहेबांना सर्व मराठी मनांचा मानाचा मुजरा!

'दंढार' आणि 'खडीगंमत' ही वैदर्भीय ग्रामीण विभागातील लोकरंजनाची वैशिष्ट्यपूर्ण साधने. ह्यातील गीते व गमजा ह्यांचे जतन व्हायला पाहिजे. कारण हे प्रकार आता खेड्यापाड्यातूनहि लुप्तप्राय होत आहेत. ह्या मनोरंजन प्रकारातील नृत्यांचा रंग व अभिनयाचा ढंग ढोलक्याच्या तालावर रसिकांना दंग करून टाकतो. खडीगंमत हा प्रकार रात्रभर चालतो. सारे कलावंत रंगमंचावर सतत उभे राहूनच नृत्य व गमजा करीत असतात. म्हणूनच ह्याला 'खडीगंमत' म्हणतात. मर्दानी मनोरंजनाच्या ह्या

अनुक्रमणिका

खडीगमतीतील विनोदाचा स्तर ग्रामीणच पण कल्पक असतो. श्रीकृष्ण आणि गौळणी ह्यांचे कथानक आधाराला असते. पुरुषच स्त्री वेष घेऊन गौळणी होतात व नाचतात. खडीगंमत बघणारी ग्रामीण श्रमिक जनता बहुधा पुरुषवर्गातीलच असते. त्यामुळे ह्या गमजातील ग्राम्यत्व सापेक्षपणे अश्लील ठरत नाही. वानगीदाखल ह्यातली एक गंमत सांगतो. गौळणी, यशोदेजवळ कृष्णाच्या तक्रारी करतात. एक तक्रार अशी असते की "किसनानं आमचा चेंडू पळवला, अता आमी कसानं खेळाचं?" मग यशोदा कृष्णाला जाब विचारते, "काय रे खरय् का?" कृष्ण म्हणतो—"मैय्या, साफ खोटं—मी यांचा चेंडू घेऊन काय करू?—ह्यांचा चेंडू ह्यांच्याच जवळ आहे." आणि असं म्हणून किसना गौळणीचं सोंग घेतलेल्या एका पुरुषाजवळ जातो आणि त्याच्या छातीवरचा रबरी चेंडू काढून आणतो आणि यशोदेला म्हणतो हा पहा तो चेंडू! उगीच माझ्यावर आळ घेते! आणि जमावात जोरदार हशा पिकतो! सरकारने ह्या लोकरंजनसाधनांच्या फिल्मस् घेऊन ठेवाव्यात आणि गाणी व गंमतीहि ध्वनिमुद्रित करून ठेवाव्यात; म्हणजे ह्या मनोरंजन-प्रकारांचा पुढेहि कुणाला आवश्यक वाटल्यास अभ्यास करता येईल.

साहित्यसंघाच्या शाखा वाढल्या पाहिजेत; संख्येने आणि ताकदीने देखील. गाव तिथे साहित्यसंघ हवा. साहित्याचे पठन आणि जतन व्हावे; तसेच निर्माण आणि वर्धनहि. त्यासाठी केन्द्राने प्रयत्न केले पाहिजेत. केन्द्र वृक्षाच्या बुंध्यासारखे असावे. बुंधा मुळे धरून असतो आणि प्रसंगी स्वतः शुष्क रहातो पण जीवन पुरवितो ते शाखांना; काळजी घेतो ती शाखा पल्लवित व्हाव्यात, फळाव्यात ह्याचीच.

बोली आणि भाषा ह्यांचे कौटुम्बिक जिव्हाळ्याचे संबंध संवर्धिले पाहिजेत. कौटुम्बिक बंध घट्ट ठेवले पाहिजेत. बोलींनी वेगळा संसार थाटण्याची भाषा अपरिपक्वावस्थेत बोलू नये. कुणी तसे तिला बोलायला उत्तेजनहि देऊ नये. बोलीतील वाक्यरचनेचा डौल आणि अर्थाभिव्यक्तीचा कौल भाषेपासून वेगळा होणारा वाटेल आणि तोहि तिच्यातील अभिजात व विपुल ग्रंथसंभारावरून साधार सांगता येईल तेव्हाच बोलीला भाषेचा दर्जा देता येईल. अन्यथा केवळ फुटीरता व अशांतता निर्माण केल्याचे अनाठायी पाप तेवढे पदरी पडेल.

विदर्भ हा "विदर्भविषयः सारस्वतीजन्मभूः।" म्हणून गौरविलेला आहे. येथे साहित्यिकांची वाण नाही. इथल्या मातीचे गुणच काही और आहेत. सकसता आणि सुफलता इथे ढेकळाढेकळात आहे. साहित्याला सुंदर नायिका पुरविल्यात त्या ह्या विदर्भानेच. "धन्यासि वैदर्भि — गुणैरुदारैः।" असा ह्या वैदर्भी वाणीचा व वृत्तीचा परिचय फार पुरातन काळापासून घडत आलेला आहे. विदर्भातील डॉ. मिराशी, श्री. पु. य. देशपांडे, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, डॉ. ग. त्र्यं. देशपांडे, अनंतराव शेवडे, डॉ. वि. भि. कोलते, कवी अनिल, प्रा. वामन चोरघडे, प्रा. भ. श्री पंडित, प्रा. राम शेवाळकर, डॉ. डोळके, प्रा. टोंगो, प्रा. वसंत वऱ्हाडपांडे, प्रा. या. मु. पाठक, प्रा. केचे, ग्रेस, बाबा मोहोड, शांताराम, उद्धव शेळके, मनोहर तल्हार, प्रा. श्रीधर शनवारे, प्रकाश देशपांडे, शिरीष देशपांडे, ना. रा. शेंडे, कृष्णा चौधरी, प्रा. डोके, प्रा. श्री. व सौ. डहाके, दिनकर देशपांडे, प्रभाकर पुराणिक, कमलाकर धारप, योगेन्द्र मेश्राम, डॉ. शकुंतला खोत, सौ. यमुताई शेवडे, श्री. ढाकुळकर, श्री. निगवेकर, सौ. जोग, सौ. पारसनीस, अंबादास देवळे, प्रा. सरपटवार, प्रा. सोटे, पां. श्रा. गोरे, श्री. निमजे, प्रा. सुशीला पाटील, सौ. विजया डबीर, प्रा. मुक्तिबोध, प्रा. यशवंत मनोहर, प्रा. मो. दा. देशमुख, प्रा. रोकडे, श्री. दाभाडे, श्री. आगाशे, श्री. भा. रा. आठवले, डॉ. पडोळे, प्रा. दि. वि. जोशी— अशी किती किती आजच्या साहित्यिकांची नावे द्यावीत? अभिमानाने सांगतो की ही यादी खूप मोठी आहे— संख्येने आणि गुणांनीही!

विदर्भात बालकवि सोटे व बाल नाटककार म्हणून दिनकर देशपांडे, नि प्रभाकर पुराणिक प्रसिद्ध आहेत. पण हे वयाने बाल नाहीत. ह्यापैकी एकाने आपल्याला बाल म्हणवून घेतले आहे व दुसऱ्यांनी बालांसाठी लिहिलेले आहे. श्री. दिनकर देशपांडे व श्री. प्रभाकर पुराणिक हे प्रौढ लिखाणाकडे वळलेत, पण त्यांनी मूळ वळण सोडू नये अशी विनंती आहे. आज खरोखर बाल लेखक निर्माण होण्याची नितांत गरज आहे. पण त्यासाठी बालांसाठी लिहिलेले सर्व प्रकारचे साहित्यहि विपुल प्रमाणात निर्माण होणे अत्यंत आवश्यक आहे.

बालांची साहित्यिक निगा राखण्याचे कार्य व्हावे म्हणून साहित्यसंस्थांनीहि सतत कार्यरत असणे उचित ठरणार आहे. प्रयत्नपूर्वक व पद्धतशीरपणे बालवाङ्मय निर्माण करण्याचे प्रयत्न सामाजिक व शासकीय स्तरावरहि व्हायला पाहिजेत. बालवयांतच चांगले संस्कार व कल्याणकारी प्रतिभा प्रस्फुरित झाली तर भविष्यकाळ निश्चितच रम्य ठरेल. शस्त्रांनी कदाचित् स्वराज्य मिळेलहि पण सुराज्यासाठी शब्दासारखे दुसरे शस्त्र नाही. रामबाणाने आले स्वराज्य पण रामराज्य आले ते रामायणानेच. तेव्हा साहित्याची महती शासनानेहि ओळखली पाहिजे. निरंकुश राज्यकर्त्यांवर नेहमी अंकुश राहिला आहे तो साहित्याचाच. "न कोपनीयाः कवयः क्षीतीन्द्रैः।" असा इषारा राज्यकर्त्यांना एका कवीने दिलेला आहे. पण त्यामुळेच साहित्यिकांचीहि जबाबदारी खूप वाढते आहे हे ध्यानात घ्यावे. इथे जमलेले व न जमलेले सर्व साहित्यिक ही जबाबदारी ओळखून वागतील असा विश्वास बाळगतो.

ग्रंथालयाच्या वतीने हे सम्मेलन भरत आहे. ग्रंथालय आणि साहित्य संस्था आज एकत्र आल्या आहेत हा सुयोग आहे. हे सहकार्य असेच सदैव टिकावे अशी प्रामाणिक इच्छा आहे. ती व्यक्तवून पुनः आपणा सर्वांच्या विषयी कृतज्ञता प्रकट करून मी आपला निरोप घेतो.

॥ ॥ ॥

प्रकाशक : *गो. स. देहाडराय, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ,* झाशी राणी चौक, नागपूर १२
मुद्रक : *श्या. श्री. बनहट्टी, श्रीनिवास मुद्रणालय,* सुविचार प्रकाशन इमारत, धनतोली, नागपूर १२

अनुक्रमणिका

डॉ. मधुकर आष्टीकर ह्यांचे प्रकाशित वाङ्मय

नाटके

सं. क्षणाची सून
जग माझे आहे
सं. सावळा गोंधळ (चवथी आवृत्ती)
सं. तीन इसम तेरा आणे (चवथी आवृत्ती)
सं. बैरी (तिसरी आवृत्ती)
माझा रघू बोलला
अमृतघट तुझ्या घरी (दुसरी आवृत्ती)
प्रत्येकाला जोडा चावतो
ते झोपले ढार्र ढुर्र (सरकारी प्रकाशन)
अमर हो माझी झाशी
माझा ज्ञानियांचा राजा

एकांकिका

नाटक बसले
बलिदान
च्याऊ म्याऊ पत्रावळीचे पाणी पिऊ (बालांसाठी)
कावळयांची शाळा
जेव्हा मला विंचू चावला
हौस माझी पुरवा
डॉक्टर सलामत तर रोग पचास

प्रबंध


ध्वनिसिद्धान्त

संपादित

'संशोधन'
विश्रुतचरित्
किरातार्जुनीयम् (सर्ग १ व २)
कुमारसंभवम् (सर्ग ५)

प्रकाशित होत आहेत—

कथासंग्रह – 'भीमपलास'
इतर – भगवान महावीर व विश्वमानवाची संकल्पना
(लाड स्मारक व्याख्यानमालेतील व्याख्याने)
टीकाटिप्पणी – 'कात्रणे'
ललित निबंध – आवळयांची मोट
संशोधनावली




सुप्रसिद्ध इतिहास संशोधक श्री. सेतुमाधवराव पगडी धनवटे रंगमंदिरात ता. १९ जाने. १९७६ रोजी कै. ना. के. बेहेरे स्मारक व्याख्यानमालेतील पहिले व्याख्यान देत आहेत.



कै. न्या. मंगळमूर्ती
छायाचित्राचे अना

वि. सा. संघाच्या वर्धापनदिनी, ता. १४ जानेवारी १९७६ रोजी, संघाचे एक माजी विश्वस्त व थोर कार्यकर्ते न्या. के. तु. मंगळमूर्ती यांच्या छायाचित्राचे अनावरण, वर्धापनदिन समारंभाचे अध्यक्ष न्या. भा. आ. मासोदकर यांनी केले. त्या प्रसंगीचे छायाचित्र.



ता. १४ जानेवारी १९७६ रोजी धनवटे रंगमंदिरात झालेल्या विदर्भ साहित्य संघाच्या त्रेपन्नाव्या वर्धापनदिनी अचलपूर संमेलनाचे नियोजित अध्यक्ष डॉ. भा. र. आष्टीकर यांचा न्या. मू. भास्करराव मासोदकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. (डावीकडून) वि. सा. सं. चे सरचिटणीस श्री. गो. स. देहाडराय, डॉ. आष्टीकर, न्या. मू. मासोदकर व संघाध्यक्ष श्री. आ. रा. देशपांडे.

प्रा. डॉ. भास्कर तथा मधुकर रघुनाथ आष्टीकर

ह्यावर्षी, दिनांक ६–७–८ फेब्रुवारी १९७६ ला अचलपूर येथे भरणाऱ्या विदर्भ साहित्य संघाच्या बत्तीसाव्या साहित्य संमेलनाचे निर्वाचित अध्यक्ष डॉ. मधुकर आष्टीकर हे विदर्भातच नव्हे तर अखिल महाराष्ट्रात संस्कृतचे ज्येष्ठ प्राध्यापक म्हणून सुपरिचित तर आहेतच पण यशस्वी ललित लेखक आणि साहित्य-शास्त्राचे गाढे अभ्यासक म्हणूनहि सुप्रसिद्ध आहेत.

डॉ. आष्टीकरांचा जन्म १ जानेवारी १९२८ चा. शालेय जीवनात ते बुद्धिमान विद्यार्थी म्हणून गाजले, तसेच महाविद्यालयात. नागपूर विद्यापीठाच्या एम्. ए. परीक्षेत १९५० ह्या वर्षी त्यांनी सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांत पहिल्या वर्गाचा प्रथम क्रमांक मिळविला, आणि दोन सुवर्ण पदके. पुढे त्यांनी आनंदवर्धनपूर्व आलंकारिकांवर प्रबंध लिहून पीएच्. डी. ही पदवी प्राप्त केली. शासकीय महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून त्यांची नियुक्ति झाल्यावर त्यांनी गेल्या पंचवीस वर्षात नागपूर विद्यापीठातील बहुतेक सर्व मानाची स्थाने भूषविली. कला शाखेचे 'डीन' म्हणून त्यांची दोन वेळा निवडणूक झाली.

मूळ अध्ययन आणि अध्यापन संस्कृत भाषेचे असले तरी डॉ. आष्टीकरांनी मातृभाषा मराठीच्या साहित्याचा सतत अभ्यास ठेवला आणि तिच्या साहित्यात स्वतःच्या नवनिर्मितीची भर टाकली. त्यांनी आतापर्यंत अकरा मराठी नाटके आणि दहा एकांकिका लिहून प्रसिद्ध केल्या. ह्यांचे प्रयोगहि झाले आणि त्यांत डॉ. आष्टीकरांनी स्वतः भूमिका रंगविल्या. लघुकथा, ललित निबंध आणि शोधनिबंधहि लिहिले. आकाशवाणी-वर त्यांची अनेक भाषणे झाली आणि लाड स्मृति व्याख्यानमालेत त्यांची तीन व्याख्याने झाली. त्यांनी संस्कृत काव्यांचे संपादन केले. अनेक साहित्यिक आणि सांस्कृतिक संस्थांतील मानाची आणि जबाबदारीची पदे भूषविली.

विद्वत्व आणि रसिकत्व ह्यांचा असा हृद्य संगम डॉ. आष्टीकरांत आहे की ते सर्वत्र प्रिय होतात, आणि आपल्या नर्म विनोदाने संभाषणे खुलवितात. ह्या वर्षीच्या अचलपूर येथे होणाऱ्या विदर्भ साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून एकमताने त्यांची निवड करण्यात तेथील स्वागतमंडळाने प्रशंसनीय गुणग्राहकता दर्शविली आहे.

डॉ. आष्टीकरांचे सप्रेम सहर्ष अभिनंदन !

—आत्माराम रावजी देशपांडे

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

युगवाणी
१९६७-७८